**DAMAGE BOOK**

# brown book

UNIVERSAL
LIBRARY
OU_192470
UNIVERSAL
LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. 891.4631 P98S Accession No. M 1245.

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below.

# शांति

शशिकांत पुनर्वसु

किंमत ३ रुपये

मौज प्रकाशन : ११

सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ति : ११०० प्रति

१० डिसेंबर, १९५३

वेष्टन : दीनानाथ दलाल

मुद्रक :
विष्णु पुरुषोत्तम भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई नं.

प्रकाशक :
वासुदेव पुरुषोत्तम भागवत
मौज प्रकाशन लिमिटेड,
खटाववाडी, मुंबई ४

अनिल

यास—

## .१.

# शांति

दिवस आडवारचा, तेव्हां जुहूचा समुद्रकिनारा इतका मोकळा, इतका स्वच्छ आणि जवळजवळ सगळाच्या सगळा एकट्या स्वतःलाच मिळाल्यासारखा आढळून आल्यावर अल्का अक्षरशः वेडी झाली. पाय आपटीत ओलसर वाळूंत तिनं खूप चालून घेतलं. मग ओचे वर करून गुडघाभर पाण्यांत ती गेली आणि मलाहि तिनं ओढून नेलं. पण पायाखालची वाळू सरकतांच तिचा तोल गेल्यासारखा झाला, तेव्हां एकदम किंचाळून मला तिनं घट्ट धरून ठेवलं. पाय दूर करून उभं राहण्याची युक्ति सांगतांच कंटाळा येईतों सरकत्या वाळूंत तिनं उभं राहून घेतलं. शेवटीं एका मोठ्या लाटेनं तिच्या मांडीशीं लगट करतांच तिचे ओचे सुटून भिजले तेव्हां ती बाहेर आली. मग कांठाशीं ओल्या वाळूवर एका काडीनं तिनं दोन मुखवटे काढले आणि म्हटलं, "कसं छान दिसतं आहे, पहा तरी! ही राणी आणि हा तिचा राजा!"

मीं चित्रांची स्तुति केली आणि तिच्याच काडीनं त्या राजाराणींच्या मध्यें एक चिमुकलं चित्र काढूं लागलों. तशीं तिनं माझ्या हातांतून ती काडी हिसकावून घेतली आणि म्हटलं, "माझं चित्र बिघडवायचं नाहीं!"

तिच्या हातांतून मी ती काडी परत घेऊं लागलों, तोंच तिनं चित्रावर रेघोट्या मारून त्याचा निकाल लावून टाकला. मीं विचारलं, "हें तूं काय केलंस?"

"माझी मर्जी!"

"शहाणी आहेस!" मीं म्हटलं.

"आहेंच मुळीं!" अल्का म्हणाली.

शहाळेवाल्यापाशीं एक किशोरी उभी होती. गोरी गोरी आणि गोंडस. तिनं दुरूनच अलकेला बघितलं आणि 'अय्या!' करीत तोंडावर हात ठेवला. शहाळीं पिऊन झाल्यावर ती किशोरी म्हणाली, "बाई, चला! आपण खूप खूप भटकूं या. पण आधीं आईला विचारतें. तुम्ही बरोबर असलांत म्हणजे ती जाऊं देईल मला."

ती पुढं धावली. मीं अलकेला विचारलं, "कोण ग ही?"

"हेमा. दोन वर्षांखालीं बोर्डिंगांत होती शाळेच्या, तेव्हां तिच्या वर्गाला गणित शिकवीत होतें मी. तिच्याविषयीं तुम्हांला एकदां --"

"म्हणजे—म्हणजे—?"

"हो हो! त्यांचीच!"

याच क्षणीं मला हेमाची आई एका नारळाच्या झाडाखालीं बसलेली दिसली आणि माझ्या काळजांत एकदम पोकळी निर्माण झाली. मग कांहीं तरी जड, जड, अगदीं खालपर्यंत भलत्याच वेगानं गेल्यासारखं झालं—पाण्यानं भरलेली घागर दोर तुटून विहिरींत गचकन् खालीं जावी तसं झालं, आणि मग हृदय जोराजोरानं धपापूं लागलं.

जवळ पोंचतांच हेमाची आई माझ्याकडे बघून हसली. मी हसलों कीं काय केलं तें माझं मलाच कळलं नाहीं.

त्या तिघीजणी कांहीं तरी बोलल्या, तें माझ्या डोक्यांत शिरलं नाहीं. हेमानं अलकेचा हात धरून तिला ओढून नेलं तेव्हां तिनं मला कांहीं तरी सांगितलं, पण तेंहि माझ्या नेणिवेच्या अलीकडे आलं नाहीं. मग केव्हां तरी हेमाची आई मला म्हणाली, "बसा ना!" तेव्हां मी बसलों.

समोर समुद्र अफाट पसरलेला होता. क्षितिजापाशीं कशानं कुणास ठाऊक, त्याच्यावर विलक्षण मोहक असा मोरचुदी रंगाचा पट्टा आला होता. समुद्रावरील रंगांचे खेळ मला प्रत्यक्ष असे कधींच बघायला मिळाले नव्हते. माझे डोळे दिपून गेले, तरी मी बराच वेळ त्याच्याकडे पहात राहिलों. त्यांत सुरुवातीला त्या रंगानं दृष्टि वेधली म्हणून आणि नंतर अंजलि जवळ होती म्हणून—

"किती दिवसांनीं भेट होते आहे ही आपली!" अंजलि म्हणाली.

माझ्या तोंडून हुंकारच काय तो बाहेर पडला. मग थोडा वेळ मी माडांच्या राईकडे पहात राहिलों. थोडा वेळ कीं पुष्कळ वेळ कुणास ठाऊक!

"अजूनसुद्धां तुम्ही पूर्वीसारखेच अबोल आणि संकोची आहांत काय?"

अंजलीनं विचारलं.

कुठं तरी कांहीं तरी सैल झाल्याचा मला भास झाला. मीं म्हटलं, "कशाचा अबोल नि कशाचा संकोची! सर्वस्वीं अबोल आणि संकोची असा कुणीहि माणूस असत नाहीं. भोंवतीं मित्रमंडळी असली म्हणजे मी पुष्कळ बोलतों. पण परक्यासमोर मात्र माझी जीभ काम करीत नव्हती आणि अद्यापहि करीत नाहीं."

"माझी गणना तुम्ही कुणामध्यें करतां?"

"असले प्रश्न माणसानं तोंडावर विचारायचे नसतात."

अंजलि एखाद्या लहान मुलालाहि लाजवील इतकं छान हसली. तिनं आपल्या मुठींत वाळू भरून घेतली आणि स्वतःभोंवतीं हात फिरवतां फिरवतां ती सांडू देत म्हटलं, "जवळजवळ पंधरा वर्षांनीं भेटतां आहांत, काय विचारूं तें तरी सांगा!"

किती मोकळेपणानं अंजलि बोलत होती! मला तिचा हेवा वाटला. मीं विचारलं, "सतार वाजवणं अजून चालू आहे का तुझं?"

वाळूमध्यें चारहि बोटं फिरवीत स्वतःभोंवतीं अपुरं वर्तुळ काढीत ती म्हणाली, "माझं वय आतां तिशीच्या पुढं गेलं आहे आणि मला तीन मुली आहेत म्हटलं महाराज!"

बैठक घालून सतार वाजवीत असलेल्या अंजलीचा फोटो माझ्याजवळ आहे. त्याचबरोबर एक जांभळ्या रंगाचा, छोटा, खादीचा जनानी हातरुमाल आहे. आणि चार पत्रं. त्यांत देखील तीन आहेत, तीं घाईघाईनं वहींतून टरकाव-लेल्या आंखीव कागदांवरचीं.

थोडा वेळ स्तब्धपणानं बसलों असतांनाच समोरच्या क्षितिजावरच्या मोरचुदी रंगाच्या पट्ट्यांत मला अनेक दृश्यं दिसलीं. त्यांनीं माझ्या मनावर बधिरतेचा एक तवंग चढू लागला होता, तेवढ्यांत अंजलीनं म्हटलं, "विचारायला नको, पण विचारतें, माझीं तीं पत्रं तुम्हीं जाळून टाकलींत?"

"नाहीं!" मीं खरं सांगितलं.

"माझ्या शेवटच्या पत्रांत मीं तुम्हांला निक्षून तसं लिहिलं होतं—"

"होय! पण त्या वेळीं मला तीं जाळवलीं नाहींत. आणि पुढं देखील मीं त्यांना फुलांसारखं जपलं आहे. अगदीं आजपर्यंत. आधीं, मन कधीं कधीं फार अस्वस्थ झालं म्हणजे मी तीं वाचीत असें. नंतर, म्हणजे आतांशीं मी तीं

कधींच वाचीत नाहीं, तरी पण त्यांना धक्का लावायला मन घेत नाहीं."

"आधीं आणि नंतर म्हणतां, तें कशाच्या?"

"लग्नाच्या—माझ्या लग्नाच्या—अलकेशीं झालेल्या माझ्या लग्नाच्या!"

हें म्हणतांना अंजलीकडे बघण्याचं मीं टाळलं. ज्या दिशेला मी पहात होतों तिकडे दूर समुद्रकांठीं हेमा अलकेला कांहीं तरी हातानं दाखवीत होती. आणि अलकेला तें दिसत नसलं पाहिजे म्हणून तिच्या खांद्यापर्यंत खालीं वांकून तेथून ती पहात होती.

मीं मग अंजलीला विचारलं, "तुला भीति वाटते?"

"भीति वाटत असती, तर आपल्यापैकीं पहिलं पत्र मीं लिहिलं नसतं."

होय! पहिलं पत्र देखील तिचंच नि शेवटचं देखील तिचंच. तिच्या घरीं काय काय झालं याची धड कल्पनासुद्धां मला आली नाहीं. सारींच अनुमानं नुसतीं...किती तरी गोष्टी तिला विचारायला हव्या होत्या. कधीं नव्हे ती आज एकटी निवांत भेटली आहे. विचारूं का तिला?...किती तरी वर्षं होऊन गेलीं होतीं साऱ्या गोष्टींना! त्या अनुमानांचं देखील आतां एवढं म्हटल्या एवढंमुद्धां महत्त्व उरलेलं नव्हतं. काय जरूरी होती विचारण्याची?

"अहो, मी काय म्हणतें आहें, ऐकलंत का?"

"अं? काय म्हणालीस?" मीं दचकून विचारलं.

"लक्ष कुठं आहे तुमचं?"

"समोर दूर क्षितिजाशीं तो विलक्षण रंगाचा पट्टा पाहिलास? त्याच्याकडे बघत होतों मी! विलायती चित्रांतून असले रंग मीं बघितले आहेत, पण मला ते खोटे वाटत. मी म्हणें, चित्रकार लोक सावल्यामुद्धां कधीं जांभळ्या तर कधीं हिरव्या काढतात, तसलींच हीं सोंगं असलीं पाहिजेत. पण आज तर हें मला प्रत्यक्षच दिसतं आहे!" मीं चक्क खोटं सांगितलं. मग विचारलं, "काय विचारीत होतीस तूं?"

"मी विचारीत होतें—अल्काताईची तुम्हीं एकदां रस्त्यांत धावती ओळख करून दिली होतीत, पण तुमचं लग्न कसं जमलं तें कळून घ्यायचं आहे मला."

माझ्या डोक्यांत याचा अर्थ शिरायला जरा वेळ लागला. पण जेव्हां तो शिरला तेव्हां त्याजबरोबर भूतहि शिरलं आणि मीं विचारलं,

"तुझं कसं जमलं तें सांगितलंस कधीं? नुसतं अनुमानांवरच तरंगत ठेवलंस मला!"

"माझं जमलं चारचौघांसारखं. त्यांत होतं काय असं सांगण्यासारखं नि ऐकण्यासारखं?"

"चारचौघांसारखं म्हणजे कसं?"

माझ्या शब्दांनीं तिला दंश झाला असला पाहिजे. गोरीमोरी होऊन ती म्हणाली, "छे छे! तुम्हांला दुखवावं म्हणून नाहीं मीं 'चारचौघांसारखं' म्हटलं! माझं लग्न 'चारचौघांसारखं' कसं बरं वाटेल मला? थोडे दिवस— अगदीं थोडे दिवस कां होईना—जाऊं दे! माझ्या त्या व्यथा मला एकटयानंच सहन करणं भाग होतं! तुम्हांला सारं सांगून माझ्या वेदना कमी झाल्यादेखील असत्या कदाचित्—पण—पण दुसऱ्या वेदना शतपटींनीं वाढल्या असत्या..."

भराभर कानांवर येत असलेल्या या शब्दांतून अर्थाचा अर्क मी काढीत होतों, तेवढ्यांत एकदम भलतीकडेच वळून अंजलि म्हणाली, "आपली शेवटची भेट आठवते तुम्हांला?"

या प्रश्नाचं उत्तर द्यायची जरूरी नव्हती. मीं तें दिलं नाहीं.

"त्या दिवशीं दुःखानं तुम्ही पिचून गेलां होतां."

"आणि तूं जमिनीकडे पहात मांजराच्या पिलाला पुढ्यांत घेऊन लोकरीच्या धाग्यानं त्याच्याशीं खेळत होतीस. आणि खेळत खेळत मला उत्तरं देत होतीस!" पंधरा वर्षं मनांत उगारून ठेवलेला घाव आज मीं घालून टाकला.

अंजलि घायाळ झाली असली तरी तिनं मला कांहीं दिसूं दिलं नाहीं. शांतपणानं ती म्हणाली, "तुम्ही त्या वेळीं म्हणालां होतां, 'तुझ्या नखाचा देखील स्पर्श मला घडला नाहीं. पण यापुढच्या भकास आयुष्यांत स्मृति म्हणून जतन करून ठेवण्यासाठीं, केवळ तेवढ्याचसाठीं, एकदांच, शेवटचं, तुला हृदयाशीं घट्ट धरून मनसोक्त—' आठवतं आहे?"

मला लाज वाटली. मीं म्हटलं, "या आठवणी आज काढून काय फायदा?"

"त्या वेळीं बोलायला मिळालं नाहीं. आज बोलून घेतें. अशा भेटी वारंवार घडून नाहीं येत. जमवून आणायच्या म्हटलं तरी..."

त्या साऱ्याच बालिश प्रसंगाची चर्चा करतांना तिला संकोच कसा वाटत नव्हता?...लोकरीचा अगवळ...मीं म्हटलं, "मग आर्य स्त्री, परपुरुष, हे आणि यांसारखेच ठेवणींतले दगड त्या वेळीं मला मारलेस, आज त्यांचं ही भाषा बोलतांना काय झालं?"

"असे रागावतां काय? मी काय म्हणतें, तें ऐकून तर घ्याल कीं नाहीं?"

"चालूं दे तुझं!"

अंजलि क्षणभर गंभीर होऊन स्तब्ध झाली व खालीं पाहूं लागली.

माझ्या काळजांत एकदम कुठं तरी दुखलं आणि मीं विचारलं, "रागावलीस?"

मान खालींच ठेवून ती म्हणाली, "तुमच्यावर इतका अन्याय झाला आहे, कीं तुम्ही कितीहि नि कांहींहि बोललांत तरी राग यायला नको. त्यांतून मला तर नकोच नको."

मीं विरघळून म्हटलं, "तूं काय सांगत होतीस, सांग ना!"

खालींच पहात वाळूंत एकमेकांना स्पर्श करणारीं, भूमितीच्या पुस्तकांतल्या-सारखीं दोन वर्तुळं तिनं तर्जनीनं काढलीं, मग तळव्यानं तीं पुसून जागा साफ करीत ती म्हणाली, "त्या प्रसंगाची आठवण होते, तेव्हां एक विलक्षण विचार मनांत येऊन जातो. वाटतं, हा एकेका वेळेचा गुण असतो. त्या दिवशीं तुम्ही आलांत त्या वेळीं तीन प्रहरचा सुमार होता---मला चांगलं आठवतं आहे. कारण, मीं तुम्हांला चहादेखील विचारला नाहीं याची मला फार चुटपुट लागून राहिली होती. तुम्ही असे संध्याकाळच्या तिन्हीसांजेच्या कातरवेळेला आलां असतां तर, कदाचित्, कुणीं सांगावं, मीं आपणहून तुमच्या हृदयावर डोकं टेकून स्फुंदून स्फुंदून रडून घेतलं असतं...तिन्हीसांजेची वेळ माणसाच्या काळजांत कसली उलथापालथ करूं शकेल त्याचा नेम सांगतां येत नाहीं..."

तिच्या मनाच्या गाभ्यांतलं हें विचित्र रहस्य ऐकतांक्षणीं मला क्षणभर गरगरल्यासारखं झालं. कुठं तरी आधार घ्यावा म्हणून मीं विचारलं, "तुझी थोरली मुलगी किती वर्षांची आहे?"

अंजलि खदखदां हसली. मलाहि हसूं आलं. पण तें क्षीण होतं. "येत्या आषाढांत तिला एकाववावं सरून बावन्नावं लागेल! एवढं पुरेल ना?" मग पुन्हा एकदां हसून, "गोष्टी इतक्या जुन्या होऊन गेल्या आहेत, तरी इतकं कसं तुम्हांला त्याचं हें वाटतं? पण असो. मी तो विषय बंद करतें."

मी ठीक आहे सुद्धां म्हणालों नाहीं.

"पण मला तुमचं अलकाताईशीं कसं लग्न जमलं तें समजून घ्यायची मात्र फार इच्छा आहे. इच्छा म्हणजे उत्सुकता!"

"आमचं लग्न चारचौघांसारखं जमलं! त्यांत आहे काय असं सांगण्या-सारखं नि ऐकण्यासारखं!"

"अगदीं खोटं! साफ खोटं! मी अगदीं मनापासून विचारतें आहें तर तुम्ही कांहींच्या बाहीच उत्तरं देतां आहां."

"खोटं कशावरून?"

"तुम्हांला वाटतं त्यापेक्षां किती तरी अधिक मी तुम्हांला ओळखतें आहें."

मी स्तब्धच राहिलों.

अंजलि म्हणाली, "असं काय करतां? सांगा ना! दुसरं कांहीं नाहीं तरी, निदान तुमच्या आयुष्यांत थोडे दिवस कां होईना, नुसत्या हृदयांत कां होईना, ज्या नात्यानं मी वावरलें, त्यामुळं मला हें विचारण्याचा हक्क आहे असं समजा हवं तर!"

हें ऐकून मला जें काय झालं आहे तें झालं आहे!

मीं म्हटलं, "सांगतों. पण सांगेन तें खरं मानशील?"

"असं कां बोलतां? तुमच्यावर कधीं तरी मीं अविश्वास दाखवला होता का? अक्षरन् अक्षर खरं मानीन. पण मला बरं वाटावं म्हणून बरीक नाहीं तें सांगूं नका!"

"नाहीं सांगणार. पण आधीं तुला काय काय माहीत आहे तें मला कळूं दे!"

"तुमचं लग्न व्हायच्या आधीं दोन वर्षं त्यांचं बिऱ्हाड तुमच्या वाड्यांत आलं यापलीकडे मला कांहीं कळलेलं नाहीं."

"खरं आहे तें." मीं म्हटलं आणि तिला सांगत गेलों. केवढ्या उत्कंठेनं ती ऐकूं लागली! द्वेष नाहीं, त्वेष नाहीं, असूया नाहीं, मग मत्सर कोठून असणार?

"खरं आहे तें. ती आल्यावर थोड्याच दिवसांत मीं तिच्याशीं ओळख करून घेतली. तुझ्या वेळेला माझ्या हातून मूर्खपणा घडला होता. पण आतां मी सावध झालों होतों. चांगलाच सावध झालों होतों. तिनं माझं हृदय तर व्यापून टाकलंच होतं, पण तेवढ्यावरच स्वस्थ न बसतां, तिनं मला आपला म्हणेपर्यंत तिच्याभोंवतीं राहून, साहित्यांत ज्याला प्रीतिकूजन म्हणतात तें सतत करीत राहिलों. सारं शक्तिसर्वस्व पणाला लावून आणि काळजांतला बिंदून् बिंदू उपयोगांत आणून—"

मीं अंजलीकडे बघितलं. समुद्राकडे तिची दृष्टि लागली होती. त्या समुद्राच्या क्षितिजरंगाकडे तिचं लक्ष होतं कीं दुसरे कसले तरी विचार तिच्या मनांत

तरंगत होते? मी गप्प झालेला पाहून तिनं माझ्याकडे एकदां बघितलं आणि मग ती खालीं पाहूं लागली.

"ती आमच्या वाड्यांत रहायला आली त्या वेळीं—त्यामुळं नव्हे, हें लक्षांत असूं दे—आपणां दोघांमधल्या त्या प्राचीन विचित्र नात्याची राखमुद्धां शिल्लक राहिली नव्हती."

अंजलीनं एक सुस्कारा सोडला. तो ऐकून मला फार फार बरं वाटलं. क्षणभर स्वतःच्या वेडेपणाची लाजहि वाटली, तरी पण फार फार बरं वाटलं. मीं आणखीहि पुढं जें कांहीं सांगणार होतों, त्याचंहि मला तें बोलण्याच्या आधींच फार बरं वाटलं. तें खोटं नव्हतं म्हणून तर विशेषच...

मीं म्हटलं, "तुला माहीत नसलं पाहिजे. आधीं तुला सांगायला मला कधीं संधि मिळाली नाहीं आणि नंतर कांहीं सांगायची जरूरीच उरली नाहीं. पण माझ्या आयुष्यांत तुझ्या आधींच अलकेनं प्रवेश केला होता!"

अंजलि एकदम चपापून माझ्याकडे विलक्षण दृष्टीनं पाहूं लागली.

"भडकलीस ना?" मीं विचारलं.

"छे! तसं कांहीं तरी माझ्या चर्येवर दिसतं आहे का? आणखी, तुमच्या-वर भडकायचा मला आतां काय अधिकार राह्यला आहे?"

माझ्या काळजांत हें ऐकून जें काय झालं तें प्रयत्नानं दाबून मीं म्हटलं, "निदान असूया तरी?"

"उगीच कां कांहींतरीच आरोप करतां? खरं म्हणजे त्यांनाच माझ्याविषयीं असूया वाटायला पाहिजे. माझ्या संबंधांत तुम्हीं त्यांना कितीसं सांगितलं आहे?"

"एकूण एक!"

"मग त्या कांहींमुद्धां बोलल्या नाहींत?—म्हणजे कडूपणानं?—मनाला जखम झाल्यासारखं?"

"एक तर तसं आपल्या हातून कांहीं घडलं नाहीं. त्यांतून तुझं लग्न झालेलं आहे, आपली कधीं भेटहि होत नाहीं. आणखी तिसरं असं, कीं तुझा तो, 'आर्य स्त्री...परपुरुष...' इत्यादिकांचा शेवटचा प्रसंग मीं तिला इत्थंभूत सांगितलेला आहे. तूं सर्वस्वीं चितापार आहेस तिच्या!"

"पण शल्य म्हणून तरी?"

"तेंहि असायचं कारण नाहीं. कारण, तुझ्या आधीं तीच आली होती..."

"बघा! तुम्हीं मघांशीं फाटे फोडलेत आणि भलतीकडे वळलांत. मी पण वहावत गेलें. आतां मी तसं करूं द्यायची नाहीं. वर्तुळ पुरं झालं आहे. सांगा. मला सगळा इतिहास ऐकायचा आहे."

आतां मात्र सांगणं गळ्याशीं येऊन ठेपलं. पण काय सांगूं? आणि सांगूं तरी कसं? साराच मूर्खपणा होता तो. आजपावेतों एकट्या अलकेलाच तें सांगायला मी धजावलों होतों. तेंसुद्धां तिनं माझ्या आयुष्यांत घनिष्ठ नात्यानं प्रवेश केला म्हणूनच...परंतु माझ्या मनांतला हा संकोच फार वेळ टिकला नाहीं. आतां अंजलीला देखील मीं ती सारी हकीकत सांगितली. पूर्वी 'त्या दिवसांत' सांगितली असती तर अपराधाचा शरमिंदेपणा मनांत आला असता. आतां मात्र ओथटपणाशिवाय कांहींच नव्हतं. असायचं कारणहि नव्हतं...

त्या वेळीं मी शाळेच्या शेवटच्या वर्षांत होतों. पुण्यालाच होतों. तेव्हां शाळेंत जातांना मला रोज अनेक मुलं दिसायचीं, मुली पण दिसायच्या. त्यांतलीं सगळींच जणं कुठलीं लक्षांत राहणार आहेत? तरी पण कालांतरानं त्यांतल्यासुद्धां कांहीं व्यक्ति ठराविक वेळीं, इथपासून इथपर्यंतच्या भागांत कुठं तरी रोज दिसतात एवढंच काय तें लक्षांत येई. मात्र तेवढंच. त्याहून अधिक कुठलाच विचार मनांत टिकून रहात नसे. क्वचित् प्रसंगीं समवयस्क मुलींच्यासंबंधांत पाचकळपणाच्या गप्पा देखील चालत, नाहीं असं नाहीं, पण त्यासुद्धां आम्ही लवकरच विसरून जात असूं.

रोज दिसणाऱ्या या व्यक्तींमध्येंच समवयस्क नसणारी अलका होती. तिचं वय तरी किती? मराठी शाळेंतली, परकर-पोलका घालणारी—असेल नऊ, नाहीं तर दहा वर्षं. एकाच रस्त्यानं पण विरुद्ध दिशांनीं आम्ही जायचों, त्यामुळं ती हमखास दररोज दिसे. केवळ कांठावरून पुराची मजा पहातां पहातां धारेंत सांपडून मी जोरानं केव्हां वाहूं लागलों तें मला कळलंहि नाहीं. पण जेव्हां कळलं तेव्हां अवस्था मोठी विचित्र झाली होती. काळजांत कळ येत होती, पण दुखत नव्हतं. सुन्न मनानं कधीं रस्त्यानं मी नुसताच भटकें, पण पाय दमत नसत. घराशेजारच्या एका बखळींत एक प्रचंड वड होता. संध्याकाळीं त्या वडावरचीं वटवाघळं उठून पंख फडफडावीत उडत जाऊं लागलीं म्हणजे त्यांच्याकडेच पापण्या न मिटतां पहात पहात माझा किती तरी वेळ जाई, पण डोळे दुखत नसत. आणि अपरात्रीं पापण्यांना शिशाचे गोळे बांधल्यागत होईपर्यंत जागरण

चाले. पण आंथरुणावर पडलं कीं मात्र झोप उडून जात असे. मित्र होते, ढीगभर होते, पण कुणापाशीं या रहस्याचा भेद करायची लाज वाटत होती...

अलकेला यांतलं कांहीं ठाऊक असण्याचं कारणच नव्हतं. किंबहुना, पुढं तिला मीं सारं सांगितलं तेव्हां प्रथम तिला एक अक्षरसुद्धां खरं वाटेना. पण त्या दिवसांतल्या तिच्या परकरपोलक्याचे रंग मीं सांगितले आणि तिच्या शाळेच्या संमेलनांत तिनं म्हटलेलं गाणं मीं ऐकलेलं होतं तेंहि सांगितलं, तेव्हां मात्र तिचा विश्वास बसला.

तेव्हां, अलकेला यांतलं कांहींच ठाऊक नव्हतं. पण कुणीं सांगितलं असतं तरी त्याचा अर्थ देखील तिला कळला नसता. मी तर प्रत्यक्ष अनुभव घेत होतों, परंतु मला तरी कुठं तो कळत होता? फडक्यांच्या कादंबऱ्या त्या वेळीं ज्या कांहीं प्रसिद्ध झाल्या होत्या, त्या मीं वाचलेल्या होत्या, पण त्यांत असले प्रसंग किंवा असल्या अनुभवांचीं वर्णनं कुठंच नव्हतीं.

सुदैवानं माझ्या अभ्यासांत मात्र कुठं खंड पडला नाहीं. त्या दिवसांत आठवड्याच्या परीक्षा असत. त्यांतल्या एकाच खेपेला, तीहि इंग्रजींत मी नापास झालों. पण कानपिचक्या शाब्दिक मिळाल्या तरी मला त्या पुऱ्या होत्या. आणि मग पुन्हां ती पाळी आली नाहीं.

एक दिवस मग माझ्या मनाला काय वाटलं कुणास ठाऊक, मीं एक चांगली जाडशी दैनंदिनी आणली आणि तिच्यांत माझ्या मनाच्या त्या गूढ व्यथा मी टिपून ठेवूं लागलों. त्यामुळं म्हणा किंवा व्यथेचा पूर वाहून जायला वाट सांपडली म्हणून म्हणा, माझ्या मनाला शांति आली आणि अभ्यास चांगला होऊन शेवटच्या परीक्षेंत श्रेष्ठ प्रतीचं यश घेऊन मी कॉलेजांत गेलों.

अलकेचं नांव मला माहीत नव्हतंच. सुरवातीपासूनच धोरण राखून निवडलेले 'ती व्यक्ति' हे शब्द माझ्या दैनंदिनींत पानापानागणिक अनेक वेळां असायचे, पण त्या दैनंदिनीचीं पानं आतां वारंवार कोरीं राहूं लागलीं. पुढं पुढं तिच्यावर धूळ देखील सांचायला लागली. तथापि क्वचित् प्रसंगीं संध्याकाळीं शाळा सुटण्याच्या वेळीं गांवांत जाण्याचा प्रसंग येई तेव्हां त्या विशिष्ट रस्त्यानं गेल्यावांचून मला राहावत नसे. मग अलका मला दिसे आणि छातींत धपधप होई...किती तरी वेळ. आणि मग रात्रीं दैनंदिनीची सोबत ...

एका रविवारीं, मला आठवतं आहे, मी असाच गांवांत गेलों होतों, तेव्हां मला रस्त्यांत अलका दिसली. तिच्याबरोबर तिची धाकटी बहीण पण होती.

दिवस सुटीचा होता आणि रस्ताहि वेगळा होता. ती दिसली ती इतकी अनपेक्षित, कीं माझ्या छातींतलं नृत्य एकदम द्रुत लयींत सुरू झालं आणि आपल्या हातून काय घडतं आहे याची पुरेशी जाणीव व्हायच्या आधींच मी तिच्या मागून, साहजिकच पुरेसं अंतर राखून, खूळ लागल्यासारखा जाऊं लागलों होतों. प्रथम नारायण, नंतर शनवार. शनवारांत तिला मैत्रीण भेटून ती थांबली. मी एका दुकानापाशीं, नको असलेल्या वस्तूंचे भाव विचारीत उभा राहिलों. आतां ती नेहमींच्याच परतीच्या रस्त्याला लागली होती, तेव्हां ती जात होती घराकडेच हें उघड होतं. शनवारवाड्याला वळसा घालून ती पुढं कसब्यांत शिरली.

एका अरुंद गल्लींतल्या घरांत तिला गेलेली बघितलं तेव्हां थोडं पुढं जाऊन मीं तें घर नीट बघून घेतलं, नंबर लक्षांत ठेवला आणि परत फिरलों.

दैनंदिनींत लिहिण्यासारखं त्या दिवशीं स्वप्न होतं. पण प्रत्यक्षांत ती लिहायला घेतांच माझ्या मनांत एकदम कांहीं तरी घालमेल सुरू झाली.

मीं दैनंदिनी दूर सारली आणि खोलीबाहेर पडून एकटाच भटकत सुटलों.

'आज हें तूं काय केलंस?' मनांतून एक आवाज आला.

'काय म्हणजे काय? मला वाटेल तें करीन मी!'

'एका निष्पाप मुलीचा तूं पाठलाग केलास! तुझे मित्र तुला सालस समजतात, पण तूं शुद्ध मवाली आहेस!'

'साफ खोटं! मी तिच्याविषयीं कुणापाशीं अचकटविचकट बोललों नाहीं किंवा तिच्याशींहि फाजीलपणा केला नाहीं!'

'ती आतां फक्त पुढचीच पायरी आहे. ती ओलांड म्हणजे कृतकृत्य होशील!'

'नाहीं नाहीं! तो विचारसुद्धां माझ्या मनांत येणं शक्य नाहीं!'

'मग तुझ्या मनांत आहे तरी काय?'

'कुणास ठाऊक?'

'ती कधीं भेटणार तरी आहे का तुला?'

'कुणी सांगावं?'

'तुझी तिची कधीं ओळख होणार आहे?'

'होय!—नाहीं!—पण!...'

शेवटीं एका निवांत मोकळ्या जागीं बसून गुडघ्यावर डोकं टेकून मीं मनसोक्त अश्रु ढाळले. परत येतांना वाटेंत लागलेल्या एका बंगल्याच्या बागेंतली

कण्हेरीची फांदी तोडून मीं तिचा फोक तयार केला आणि दोन्ही हातांवर व दोन्ही पोटऱ्यांवर सात सात वेळां सप् सप् प्रहार केले. वेदना झाल्या पण त्या दांत दाबून सहन केल्या. मग घरीं आलों आणि दैनंदिनी पेटवून दिली...

अशा रीतीनं हें कांड कायमचं तोडून टाकल्यानंतर सहा वर्षांनीं माझ्या आयुष्यांत तूं आलीस आणि मला भाजून काढून दूर गेलीस. तूं कशी वागलीस, चूक केलीस कीं बरोबर केलंस तें तुझं तुलाच माहीत. मी मात्र मूर्खासारखा वागलों. आणि पुढं माझ्या परिसरांत अलका आली तेव्हां मी शहाणा झालों होतों आणि शहाणपणानंच वागायचं मीं ठरवलं होतं...

मला पुष्कळ दिवसांनीं मोकळं मोकळं झाल्यासारखं वाटूं लागलं. मी सांगत होतों आणि अंजलि वाळूच्या घड्याळाप्रमाणं एकदां एक हात वर, तर नंतर दुसरा असं करीत या हातांतून त्या हातांत वाळू झुळुझुळु सोडीत राहिली होती. मी थांबलों तरी बराच वेळ ती कांहीं बोलली नाहीं. नंतर मग तिनं जें विचारलं तें चांचरतच, "आपलं सहज विचारतें, आम्हां दोघींपैकीं तुमचं जास्त प्रेम कुणावर—आहे म्हणूं, कीं होतं म्हणूं, कीं दोन्ही म्हणूं ?"

"कांहींच म्हणूं नकोस ! कारण, असल्या प्रश्नांचीं उत्तरं देतां येणं कठीण असतं."

"चला ! उत्तर द्यायला नको आहे तुम्हांला !"

"तसं मुळींच नाहीं. कठीण असतं म्हणून मीं म्हटलं, तें उत्तरं द्यायला नको असतात म्हणून नव्हे, तर माणसाचं माणसालाच त्याचं आकलन होत नाहीं म्हणून. निदान अशी माझी समजूत आहे. आणि म्हणूनच मला असंहि वाटतं, जे कोणी याचीं उत्तरं देतात, ते खोटं बोलत असतात. केवळ शिष्टाचार म्हणून ! विचारणाऱ्याला बरं वाटावं म्हणून !"

अंजलीला हसूं आलं आणि ती म्हणाली, "बरं तर ! कांहीं म्हणतहि नाहीं आणि विचारीतहि नाहीं त्या बाबतींत. म्हणजे तुम्हांला खोटं बोलावं लागायला नको. पण आतां इतकं सांगितलं आहांत, तर आणखी एक विचारून घेतें. विचारूं ?"

"विचार." मीं म्हटलं.

"आम्हां दोघींच्याप्रमाणं आणखी कुणी—"

मी प्रथम चकित झालों. यायला हवी होती, पण या प्रश्नाची मला कल्पना

आली नाहीं. थोडा वेळ मी विचारांत पडलों.

"सांगा ना! होती का कुणी?"

"काय करायचं आहे तुला विचारून?—सांगितलं तेवढं पुरे नाहीं का झालं?"

"पुरं कसलं नि अपुरं कसलं! मनांत आलं तें विचारलं. बायकांचा स्वभाव आहे हा! हवं तर माझा स्वभाव म्हणा. पण मला आपलं वाटतं, माझ्या कोण कोण मैत्रिणी होत्या तें निदान ठाऊक तरी असावं."

"मला तूं फार मोठी किंमत देते आहेस."

"कोणीं कुणाला किती किंमत द्यावी हें ज्याचं त्यानं ठरवायचं असतं."

अंजलीला घेऊन मीं भूतकाळांत एकदम उडी घेतली आणि तिथं तिच्या कानांत हितगुज सांगितल्यासारखं म्हणालों, "तशी एक जण होती खरी. पण माझ्या आयुष्यांत ती जशी अचानक आली तशीच अचानक निघूनहि गेली. आज ती कुठं आहे तें देखील मला माहीत नाहीं. कदाचित् तुरुंगांत असेल, कदाचित् परदेशीं गेलेली असेल. पण गुप्तपणानं. तिची माझी ओळख होती, तिच्या सान्निध्यासाठीं मी तडफडत होतोंहि. आणि तेंसुद्धां तिचे माझे मार्ग निराळे, आम्ही आयुष्यांत एकत्र येणं शक्य नाहीं, हें सर्वतोपरी कळत असून. कांहीं दिवस मीं क्लेश सहन केले, पण मग विवेक करून, वेड्या मनाला सावरून—"

"केव्हांची हकीकत ही?"

"तूं गेलीस आणि अलका आली नव्हती तेव्हांच्या काळांत—फक्त दोन महिने—"

यावर अंजलि कांहीं बोलणार तों मींच तिला म्हटलं, "आतां नांव विचारणार असशील तिचं! पण मी तें सांगायचा नाहीं. कारण मला आपलं वाटतं, कीं आपण आपलं मन तिला कधीं सांगितलं नाहीं. जें मनांत होतं तें जसं मनांतल्या मनांतच राह्यलं, तसं तिचं नांव पण रहायला पाहिजे."

अंजलि कांहीं बोलली नाहीं.

माझं घड्याळाकडे लक्ष गेलं. तें बंद पडलं होतं. किल्ली देऊन मीं तें चालू केलं. आणि अंदाजानं काटे फिरवले. अलका आणि हेमा अद्याप दूर होत्या. हेमा धावत होती आणि अलका तिच्यामागून झपाझप चालत होती. त्या काय खेळत होत्या कुणास ठाऊक!

मीं म्हटलं, "या ज्या लाटांतून मी गेलों, त्यांना काय नांव द्यायचं मला समजत नाहीं. प्रीति हें नांव देतां येत असलं, तर ती प्रीति मीं तीनदांच केली. तीनदांच कां, कमी-अधिक वेळां कां नाहीं, असं कुणीं विचारलं तर माझ्यापाशीं त्याचं उत्तर नाहीं. मात्र या तिन्ही प्रसंगांनीं माझं आयुष्य त्या त्या वेळीं उजळ झालेलं आहे. आणि त्या तिहींच्या तिन्ही विचित्र तऱ्हा मनांत येतात, तेव्हां, असंच कां, असा प्रश्न पडतो. तुझ्या वेळीं माझ्या साऱ्या भावना सुप्त होत्या आणि तूं पहिलं पत्र पाठवतांच त्या पेटून उठल्या. अलकेच्या वेळीं मी आधीं भडकलों होतों, पण मीं स्वतःच त्यावर पाणी ओतलं. ती माझ्या आयुष्यांत नंतर पुन्हा आली हा केवळ योगायोग. तिसरा प्रकार तर सर्वस्वीं सुप्तच राहिला. निदान माझ्या बाजूनं तरी. दुसऱ्या बाजूला कांहीं होतं का, तें मला समजलंहि नाहीं आणि मला कधीं विचारावंसंहि वाटलं नाहीं...आज मात्र माझ्या सगळ्या मनोव्यथा थांबल्या आहेत. मी पूर्णपणें शांत आहें."

मी थांबलों. अंजलि कांहींच बोलली नाहीं. तिनं कांहीं तरी बोलावं असं मला वाटत होतं.

मग मीं म्हटलं, "तूं विचारीत गेलीस नि मी सांगत गेलों. क्षणभर आतां मनांत येतं आहे, सांगायला नको होत्या त्या गोष्टी आपण सांगितल्या. काय जरूरी होती इतकं सगळं सांगायची? ना उपयोग ना समाधान. तूं कोण नि मी कोण आहोंत आतां!—जी एकनिष्ठ असेल तीच खरी प्रीति असं तूं मानीत असली पाहिजेस. पण मला हा निकष खरा कीं खोटा तें कळत नाहीं आणि कधीं कळेलसं वाटतहि नाहीं. माझ्या बाबतींत जें घडलं तें तुला जसंच्या तसं सांगितलं. आपल्या हृदयांत एके काळीं तूं मला कुठल्या तरी उंच ठिकाणावर बसवलं असशील, मग अलकेशीं मीं लग्न केलं तेव्हां मला तूं तेथून खालीं लोटलं असशील; आणि आतां तर आपल्या हृदयांतल्या त्या मला पायदळीं तुडवावंसं देखील वाटलं असेल तुला!—"

एकदम तोंड फिरवून अंजलि म्हणाली, "नाहीं हो! तसं मुळींमुद्धां नाहीं! तुम्ही शांत आहांत, सुखांत आहांत, हें कळल्यावर मला खरोखरच आनंद झाला. समाधान वाटलं. मात्र, एक विचार वारंवार कुसळासारखा बोंचत राहतो, तुम्हांला मी सुख देऊं शकलें नाहीं. उलट दुःखच दिलं. फार दुःख दिलं. अपरंपार दुःख दिलं!—"

"जाऊं दे! मी तें सारं विसरून गेलों आहें आतां."

अंजलि स्तब्ध राहिली. मीसुद्धां कांहीं बोललों नाहीं.

किती तरी वेळानं मीं विचारलं, "तूं सुखांत आहेस ना?"

"मला सुखांत नसायला काय झालं? हेमा आतां मोठी झाली आहे, पण दोन लहान मुली आहेत, त्यांचं करण्यांत दिवसभर रंगून जातें मी."

कसला तरी आवाज ऐकूं आला म्हणून मीं वळून बघितलं. आकाशांतून कुठून कुणास ठाऊक, एक घार आली, तिनं जमिनीवर तिरकस झेप घेतली आणि बघतां बघतां झपकन् ती परत वर उडाली. जमिनीवर तिला जें दिसलं असेल तें तिच्या हातांत गवसलं कीं नाहीं तें लक्षांत देखील आलं नाहीं.

अंजलि म्हणाली होती, "दोन लहान मुली आहेत. त्यांचं करण्यांत दिवसभर रंगून जातें मी!"

हे शब्द माझ्या कानांत किती तरी वेळ घुमत राहिले. माझ्या डोळ्यांपुढं मग अनेक दृश्यं उभीं राहिलीं. सारी माया—पण तीं दूर होईनात. बोलूं कीं नको, बोलूं कीं नको, असं थोडा वेळ मला झालं. अखेरीस मला राहवेना. वाटलं, बोलल्याखेरीज आजचं हितगुज पुरं झालंसं वाटणार नाहीं. मग कुठं तरी पहात मीं म्हटलं, "कधीं कधीं मी एकटा बसलेला असतों, तेव्हां अंजलि, काय होतं सांगूं? माझ्याभोंवतीं तीन मुलं वावरत असतात. जवळजवळ सारख्याच वयाचीं. कालिंदी, अनिल आणि सरिता. तीं माझ्या सभोंवार खेळत असतात आणि आपसांत भांडत पण असतात. मी त्यांच्या खेळांत भाग घेतों, केव्हां त्यांचीं भांडणं सोडवतों, कधीं कधीं तर त्यांतूनच एक होऊन तीं माझ्याशींच भांडूं लागतात. कधीं त्यांना मारणं मला भाग पडतं, कधीं मी त्यांना जवळ घेतों, चुचकारतों, सांत्वन करतों. नंतर थकून तीं माझ्या कुशींत झोपीं जातात. कालिंदीनं हट्ट करून माझ्याकडून फुलपांखरं छापलेल्या रंगीबेरंगी कापडाचा परकरपोलका मिळवला आहे; अनिल दांडगा आहे, तो कपडे फार खराब करतो आणि माझीं बोलणीं खातो; सरिता दोन शेपट्या सोडते आणि त्यांच्या टोकांशीं बांधण्याकरितां झगझगीत रंगाच्या चौदा फिती तिनं माझ्याकडून उकळल्या आहेत—"

अंजलि डोळे विस्फारून माझ्याकडे पाहूं लागली होती.

"या तीन मुलांमधली जी कालिंदी आहे, ती तुझी आणि माझी आहे, अनिल मला अलकेनं दिलेला आहे, आणखी सरिता..."

अंजलीनं एकदम आपल्या तोंडावर हात ठेवला. मग आश्चर्य थोडं

ओसरल्यावर ती म्हणाली, "चला! कांहीं तरीच काय तोंडाला येईल तें भरकटत सुटतां!"

"तूं म्हण हवं तर 'कांहीं तरीच' म्हणून! पण—पण मी त्यांत किती तरी वेळां आणि किती तरी वेळ, प्रत्यक्ष पिता देखील जितका रंगून जात नसेल तितका रंगून गेलों आहें. आणि या तिन्ही मुलांचीं वयं कधींच वाढत नाहींत ही तर केवढी चांगली गोष्ट!...खरं म्हटलं, तर माझ्या मनाला जी शांति आली आहे त्यांतला जेवढा वांटा काळाचा, तेवढाच वांटा—"

अंजलीनं जोराजोरानं हसून मला गप्प केलं आणि मग एकदम काय झालं कुणास ठाऊक, गुढघ्यावर डोकं ठेवून ती स्फुंदूं लागली.

आपल्याला काय होतं आहे तं मला कळेना. माझ्या डोळ्यांत येणारे अश्रु मोठ्या कष्टानं आवरून मी समोर समुद्राकडे पाहूं लागलों.

१९५२

## .२.

# संध्यामेघ

संध्याकाळ. सहासाडेसहाचा सुमार. महिना आश्विनाचा होता तरी पावसाची एक चांगली मोठी सर नुकतीच येऊन गेली होती, आणि गाणें संपल्यानंतर त्याचे मधुर आलाप बराच वेळपर्यंत श्रोत्यांच्या कानांत घुमत रहावेत त्याप्रमाणें आकाशांत क्षितिजाशीं सांचलेल्या मोठमोठ्या संध्यामेघांवर आलेला मंद नारिंगी रंग अजून रेंगाळत होता.

मी आणि मन्या पुरोहित फिरून लकडीपुलावरून घरीं परत चाललों होतों.

पूल संपल्यानंतर नारायणपेठेंत जाण्यासाठीं आम्ही डाव्या बाजूला वळलों.

आम्ही आठ दहा पावलें चालून गेलों असूं नसूं तोंच रस्त्यावर पूर्ण उमललेलें एक शेवंतीचें फूल पडलें होतें, तें आम्हां दोघांनाहि दिसलें. ताजें ताजें आणि पिवळें पिवळें धमक. नळाच्या तोटीवर बोट दाबलें, कीं जसें सगळ्या बाजूंनीं पाणी फाकतें तशा त्या शेवंतीच्या फुलाच्या पाकळ्या दिसत होत्या. मन्याला काय वाटलें कुणास ठाऊक, त्यानें तें चटकन् उचलून घेतलें आणि मनमुराद हुंगलें.

त्याच्या पाठीवर मीं एक सडकून थाप मारली आणि म्हटलें, "भाग्यवान आहेस बुवा!"

तोहि खुलला.

त्यानें तें फूल आपण नेहमीं मुठींत ज्या पद्धतीनें धरतों तसें धरलें आणि त्याचा मनमुराद वास घेत घेत तो म्हणाला, "शन्या, कुणाच्या अंबाड्यांतून पडलं असेल रे हें!"

"असेल कुणी तरी एकादी स्वरूपसुंदर रसिका!" मींहि रंग भरीत म्हटलें.

थोड्या वेळानें जरासा हसून मन्या म्हणाला, "आणि थोडं पुढं चालून गेल्यानंतर जर तिच्या ध्यानांत आलं, कीं आपल्या केसांतलं फूल वाटेंत कुठं तरी पडलं, तर अतिशय आश्चर्यचकित होऊन आपल्याबरोबरच्या मैत्रिणीला ती असं म्हणेल, नाहीं का?"

"कसं?" उत्सुकतेनें मीं मन्याला विचारलें.

"कीं—'जा बाई! हें काय हें! एवढंसंदिखिल फूल टिकत नाहीं डोक्यांत म्हणजे काय! आतां करावं तरी कसं?'..."

मन्याच्या या नाटकीपणाचें मला हसूं आलें. मी त्याला म्हणालों, "या साऱ्या प्रकारांत तिच्याबरोबर मैत्रीण होती असं गृहीत धरून चालतो आहेस तूं! तिच्याबरोबर तशी ती नसली तर?"

"हात्त्याच्या! मग स्वतःशींच म्हणेल ती तसं, अन् एकदोनदां आपला अंबाडा पुन्हा चाचपून ती पुढं चालायला लागेल!"

सिगरेटचे मोठमोठे दम मारावेत तसा मन्या मुठींतल्या त्या फुलाचा वास घेतच होता. फूल मात्र हळुवारपणानें धरलेलें.

मग मन्या पुन्हा हसून त्या फुलाचा जणुं सुगंध पसरीत म्हणाला, "या फुलावरून तिच्या नांवाचा देखील मला तर्क करतां येईल!"

"सांग, सांग, लवकर सांग!"

"मदालसा शृंगारपुरे!"

आम्ही दोघेहि खदखदून हसूं लागलों. सरतेशेवटीं मीं मन्याला म्हटलें, "लेका, तूं कितीहि रसिकता दाखवलीस, वाटेल तितका नाचलास, आणि 'मदालसा शृंगारपुरे'च काय, पण कानाला मंजुळ लागणारीं आणखी लाखों नांवं शोधून काढून त्यांचा जप करीत राहिलास, तरी जिच्या अंबाड्यांतून हें फूल निखळलं आहे, ती खरी कोण आहे तें तुला समजणं शक्यच नाहीं. आणि समजा, जरी तुला ती सांपडली तरी तुझी रसिकता तिच्यापर्यंत जाऊन पोंचायला सात जन्म तरी घ्यावे लागतील तुला!"

तो हसून उत्तरला, "अरे समज्याऽ!"

इतका वेळ होतो आहे तों आम्ही बरेच पुढं आलों होतों.

माझी दृष्टि खालीं रस्त्यावर गेली, तों तसलेंच एक फूल पडलेलें होतें आणि त्याच्या जवळ पांचसहा सुट्या पाकळ्या पडल्या होत्या.

मला जरा चमत्कारिकच वाटलें.

पण काय आश्चर्य !

आणखी पांचदहा पावलें आम्ही चालून जातों न जातों तोंच, तसलींच तीन-चार फुलें, दोन लहान व एक मोठें, आणि त्यांच्याभोंवतीं तांबड्या कण्हेरीच्या थोड्याशा पाकळ्या—सर्वजणी विखुरलेल्या, अगदीं मलूल होऊन पडलेल्या दिसल्या.

मला जरा शंका येऊं लागली.

पण आणखी थोडें पुढें गेलों तों तोच प्रकार! आणि मग मात्र माझी खात्री झाली.

मन्याच्याहि ध्यानांत ही गोष्ट यायला फार वेळ लागला नाहीं.

आणि मग त्यानें काय केलें असेल? त्यानें ज्या मुटींत तें मघाचें शेवंतीचें फूल धरलें होतें ती मूठ एकदां जोरानें दाबली. आणि मग ती उघडून, आंतलें फूल चुरगाळून, त्याचा कुस्करा करून टाकला आणि संध्येच्या वेळीं अघमर्षणाचा विधि करतांना, ‘दिवं च पृथिवीं चान्तरिक्षमथो स्वाहा’ म्हणून हातांतलें पाणी डाव्या बाजूकडे फेकतात त्याप्रमाणें त्यानें त्याच्या पाकळ्या भिरकावून दिल्या.

माझें मन कां कुणास टाऊक, कमालीच्या विपण्णतेनें भरून आलें.

आकाशांतला तांबूस रंग आतां अजिबात नाहींसा झाला होता. सारे संध्या-मेघ पुन्हा काळेनिळे झाले होते. आणि प्रतिक्षणीं अंधार अधिकाधिक भेसूर पडत होता.

१९३४

.३.

# कालिंदी गुळवेलकर

श्रीरंग शाळेंतून संध्याकाळीं पावणेपांच वाजतां घरीं आला. पाटीदप्तर त्यानें खोलींत गेल्यावर खुंटीवर वाटेल तसें अडकवलें अन् माजघरांत येऊन त्यानें आईजवळ खायला मागितलें.

सुमारें पंधरा मिनिटांनीं खाणं आटोपून आंचवल्यानंतर हात सदऱ्याच्या सोग्याला पुशीत आईकडे जाऊन त्यानें म्हटलें, "आई, मी कार्यकर्त्यांच्या दिनूकडे खेळायला जातां ग!"

"हं जा! पण लवकर परत ये हो!" असें आई म्हणाली आणि तिनें सहज रंगाच्या वेषाकडे दृष्टि टाकली. मोठें ध्यान होतें तें. केस पिंजारलेले, अन् त्यांत धूळ बसल्यामुळें कीं काय कुणास ठाऊक, ते भुरकट दिसत होते. त्याच्या अंगांत सुंदर निळ्या रंगाचा सदरा होता, पण या वेळपर्यंत तो मळून गेला होता आणि त्यानें त्याच्या पुढच्या सोग्यापाशीं नुकतेच हात पुसल्यामुळें तो ओला होऊन तेवढ्याच भागापुरता त्याचा रंग गडद निळा झाला होता. विजार पायांपाशीं पार मेणचट झाली होती आणि सदऱ्याबाहेर येऊन लोंबणाऱ्या तिच्या नाड्या रंगानें वेळोवेळीं चावल्याचघळल्यामुळेंच कीं काय कुणास ठाऊक, टोकांशीं त्यांच्या पार दशा दशा निघाल्या होत्या. रंगाच्या अव्यवस्थितपणाची त्या जणुं ध्वजाच होत्या.

श्रीरंग म्हणजे खरोखरच चलाख आणि अभ्यासांत हुशार असलेला एक मुलगा, पण अव्यवस्थितपणा आणि आळशीपणा यांच्यामुळें माणूस कसें चमत्कारिक दिसतें याचें तो एक चांगलें उदाहरण होता.

आईनें रंगाकडे थोडा वेळ टक लावून बघितलें आणि म्हटलें, "रंग्या,

वडरा, काय कपडे घाण केले आहेस तूं हे! अगदींच वेंधळा नि गलिच्छ आहेस बाबा तूं!"

रंगा भराभरा आपल्या डोक्यावर टोपी ठेवीत आईला म्हणाला, "असूं देत ग! अन् आतां काय खेळायच्चंच तर आहे!"

जवळजवळ रोज आई रंगाला असें म्हणत असे आणि जवळजवळ रोज रंगा तिला हेंच उत्तर देत असे. कारण, दररोज रंगाचे कपडे खरोखरच संध्याकाळीं शाळेंतून परत यायच्या वेळीं पार मळून गेलेले असत.

रंगा कार्यकर्त्यांच्या दिनूकडे गेला. तेथें त्याच्या शाळेंतलीं आणखी कांहीं मुलें जमत आणि तेथें त्यांचा रोज विटीदांडूचा खेळ चाले. दिनू कार्यकर्तेच्या घराचें अंगण खूप प्रशस्त होतें.

रोजच्याप्रमाणें भिडूंची वांटणी झाली आणि डावाला सुरुवात झाली.

डाव चालू असतांना रंगाची बाजू खेळत होती. त्याच्या बाजूचा एक गडी खेळत होता आणि त्यामुळें त्या बाजूचे इतर गडी नुसतेच उभे होते, तसाच रंगाहि डावाची प्रगति पहात उभा होता. मध्येंच त्याचें लक्ष अंगणांत दूर एका बाजूला उघडी मोरी होती तिकडे गेलें. त्या मोरीच्या कट्ट्यावर बरींचशीं भांडीं मोठ्यांत लहान अशीं ठेवून त्यांचे दोन ढीग केलेले होते. मोरींतला नळ सुटला होता. त्या नळाच्या धारेखालीं एकेक भांडें धरून एक मुलगी तीं विसळत होती आणि कट्ट्यावरच पलीकडे पुन्हा एकत्र करून ठेवीत होती.

गुळवेलकरांची कालिंदी होती ती.

दिनू कार्यकर्तेच्या वाड्यांत त्या मोरीशेजारीं असलेल्या तीन खोल्यांत गुळवेलकरांचें बिऱ्हाड होतें. कालिंदी ही त्यांची तिसरी मुलगी. रंगानें तिला पुष्कळ वेळां बघितलें होतें आणि त्याला ती अतोनात आवडे. परंतु त्यांचें बिऱ्हाड दिनूच्या वाड्यांत येऊन पुरते दोन महिनेहि झाले नव्हते आणि रंगाची व तिची ओळखहि अद्याप झालेली नव्हती. आपल्यामागें ती तीन वर्षें आहे यावरून आपल्यापेक्षां ती तीन वर्षांनीं लहान असली पाहिजे असा निष्कर्ष रंगानें काढला होता. त्यानें तो कां काढला होता कुणास ठाऊक! पण त्याला कालिंदीविषयीं अतोनात आपुलकी वाटे एवढें मात्र खास.

"रंग्या, लेका, तुझा डाव आला ना! हा घे दांडू! आणखीन् हें रे काय? बघतोहेस लेका कुठं तूं?" त्याच्या बाजूच्या गड्यानें त्याला डिवचून म्हटलें, तशीं रंगानें झटकन् दांडू घेऊन खेळायला सुरुवात केली.

रंगाचें खेळणें संपल्यावर दुसरी बाजू खेळायला गेली आणि रंगा व त्याचे मित्र झेलूं लागले.

खेळणाऱ्या बाजूचे पहिले दोन गडी झेलण्यांतच बाद झाले. तिसऱ्या गड्याला मात्र डाव पचला. तथापि नियमाप्रमाणें प्रत्येकाला मिळणाऱ्या तीन टोल्यांपैकीं त्याचे पहिले दोन टोले हुकले. पण त्याचा तिसरा टोला मात्र चांगलाच बसला. जमिनीवर असतांना विटीच्या टोकाला दांडू लागतांक्षणीं ती घाबरलेल्या चिमणीसारखी तिरमिरत उडाली आणि वरच्यावर तिला अगदीं मध्यावर जोराचा तडाखा बसतांच भिङ्ङ्ङूङ् करीत ती दूरपर्यंत गेली. सर्वांत मागें असलेला रंगा तिला झेलण्याकरितां मागच्या मागें धावला, पण त्याला ती कांहीं झेलतां आली नाहीं. कारण आधींच त्याच्या मागें जाऊन मोरीच्या शेजारून वाहणाऱ्या उघड्या गटारांत ती पडली होती.

रंगानें ती उचलली आणि धुऊन परत नेण्यासाठीं तो मोरीजवळ आला.

कालिंदी अद्याप भांडीं विसळत होती आणि मोरीच्या कट्ट्यावर तीं सांठवून ठेवीत होती.

रंगानें तिला विचारलें, "मला विटी धुऊन देतेस का?"

उजव्या हातांतलें भांडें तसेंच राहूं देऊन डाव्या हातानें नळ बंद करीत तिनें विचारलें, "काय?"

"मला विटी धुऊन देतेस का? आत्तां खेळतां खेळतां ती सांडपाण्याच्या गटारांत पडली होती."

नळाची धार पुन्हा चालू करीत कालिंदी म्हणाली, "धारेखालीं टाक!"

रंगानें विटी धारेखालीं टाकली. कालिंदीनें मग आपल्या हातांतलें भांडें जरा वेळ कट्ट्यावर ठेवलें, ती विटी वर उचलून नळाच्या अधिक जवळ धरली, एकदां दोन्ही हातांनीं चोळून स्वच्छ केली आणि त्याच्या हातांत देत म्हटलें, "हं, ही घे!"

त्यानें विटी घेतली. पण ती घेतांना त्याचें लक्ष मघांपासून तिच्या कपड्यांकडे गेलें होतें तें तसेंच खिळून राहिलें. तिच्या अंगांत पांढरा शुभ्र पोलका आणि पांढरा शुभ्र परकर होता. परकर पायांमधून पुढें आणून त्याचा तिनें ठराविक पद्धतीनें काचा खोचला होता. त्या पोलक्याची आणि परकराची नागमोडी जाळीदार झालर त्याला अतिशय आवडलीच, पण तिच्या त्या कपड्यांचा निर्मळ पांढरे-शुभ्रपणा अगदीं दृष्टींत भरण्याजोगा त्याला वाटला.

ओली विटी घेऊन रंगा धावत मुलांच्याकडे आला. धावतां धावतां त्याचें आपल्या कपड्यांकडे लक्ष गेलें. आणि तेवढ्या त्या क्षणीं, 'आपले हे कपडे पाहून कालिंदीला काय वाटलं असेल?' हें मनाशीं म्हणतां म्हणतांच एक अतिशय विलक्षण विचार त्याच्या मनांत तरळून गेला. 'छे छे! कांहीं तरीच! कालिंदी जर आपली बायको झाली तर तिला आपल्या अंगावरचे असले हे घाणेरडे, मळलेले, गलिच्छ कपडे कधींच आवडायचे नाहींत. आणखीन् मग त्याबद्दल आपल्याला ती खूपच रागावेल...पण कालिंदी आपली कधीं बायको होईल का?......कालिंदी! ए कालिंदी!'

हा विचार करीत मनांतल्या मनांत कालिंदीला साद घालतांना त्याच्या हृदयांतल्या कुठल्या तरी तारा झरारल्या आणि तो विलक्षण अस्वस्थ झाला.

तेवढ्यांत त्याला कुणीसें म्हटलें, "शहाण्या, हातांत विटी घेऊन इतका धावत आलास, तर मग ती तिथनंच फेकून द्यायला लेका, काय झालं होतं? तुला झोडलं पाहिजे!"

रंगा हसला आणि झेलणाऱ्यांच्या रांगेंत शेवटीं जाऊन उभा राहिला. ती त्याची नेहमींची अन् महत्त्वाची जागा होती.

आतां कालिंदी विसळलेलीं भांडीं आंत नेत होती.

"रंग्या, गाढवा, काय करतो आहेस तरी काय तूं? अगदीं हातांत आली होती ना विटी! वेंधळ्यासारखा बघत काय बसला आहेस?" त्याच्या भिडूनें त्याला टाफरलें.

रंगानें ओशाळल्यागत तोंड केलें. मग गलीचा नेम धरून खेळणाऱ्याकडे विटी फेकली आणि गलीपासून एका दांडूच्या अंतरांत ती टाकून आपल्या झेलण्यांतल्या चुकीची भरपाई केली...

त्या दिवशीं 'कावड' कुणावरच झाली नाहीं. कारण, नंतरच्याच डावांत विटी झेलली होती कीं नव्हती यावर भांडण जुंपलें आणि वाद अनिर्णीतच राहून सगळे गडी चिडाचिडी होऊन आपापल्या घरीं निघून गेले. रंगाहि तसा घरीं गेला.

पण त्यानंतर त्याच्या मनांत विस्कटलेल्या डावाविषयीं एकदांसुद्धां विचार आला नाहीं. त्याला आपल्या डोळ्यांसमोर पांढरें शुभ्र पोलकें आणि परकर नेसलेली गुळवेलकरांची कालिंदी उभी असलेली दिसत होती. शुभ्र म्हणजे किती शुभ्र!... फारच!... त्याला एकाएकीं आपल्या अतिशय घाणेरड्या कपड्यांची विलक्षण खंत वाटली. तो झटकन् न्हाणीघरांत गेला, तेथील कपडे धुण्याचा

साबू घेऊन त्यानें आपल्या अंगावरचे सारे कपडे काढून टाकून सकाळीं आईनें धुऊन वाळत घातलेले कपडे आतां घातले आणि त्या मळक्या कपड्यांना खसाखसा साबण लावायला सुरुवात केली. नंतर त्यांत थोडा वेळ साबण मुरूं देऊन ते दोन्ही कपडे त्यानें स्वच्छ धुतले आणि स्वतः वाळत घातले. किती स्वच्छ, लखलखीत दिसत होते आतां ते! अगदीं कालिंदीच्या कपड्यांना साजतीलसे! रंगाची थोड्या वेळापूर्वीची खंत कुठल्या कुठें नाहींशी झाली.

त्या रात्रीं रंगाचा अभ्यासहि अतिशय चांगला झाला.

अभ्यास करतां करतां आपलें व्याकरणाचें पुस्तक दिनू कार्यकर्तेकडेच राहिलें आहे असें त्याला आढळून आलें. त्याला दुपारीं शाळेंत त्यानें तें दिलें होतें. साहजिकच रात्रींच्या भलत्या वेळीं तें पुस्तक आणायला दिनूकडे जाणें त्याला शक्यच नव्हतें. म्हणून दुसरे दिवशीं सकाळीं दिनूकडे जाऊन तें आणायचें त्यानें ठरवलें आणि अंकगणिताचा अभ्यास सुरू केला. त्या रात्रीं त्याचीं उदाहरणें, कशीं कोण जाणे, लवकर सुटत गेलीं. आजपर्यंत इतकीं चटचट त्याचीं उदाहरणें कधींच सुटलीं नव्हतीं. अभ्यासानंतर त्याला झोप तरी किती गाढ लागली!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपलें व्याकरणाचें पुस्तक आणण्याकरितां दिनू कार्यकर्तेकडे तो निघाला. वाटेंत त्याला शिवाजी बाग लागली. शिवाजी बागेच्या काठाकाठानें नीमचमेलीचीं उंचच उंच सडेसोट झाडें पुष्कळ होतीं. उलट्या झुंबरांप्रमाणें झुपक्याझुपक्यांनीं लोंबणाऱ्या नि लांब देठ असलेल्या त्यांच्या शुभ्र फुलांचा अतिशय आल्हाददायक घमघमाट सुटला होता. बागेच्या आंतल्या बाजूला सगळीकडे हिरवीगार हिरवळ होती, तिच्यावर सकाळच्या सूर्याचीं पहिलीं कोवळीं कोवळीं किरणें पडलीं होतीं, तीं तरी किती नाजुकपणानें! जणुं आपल्या वजनानें गवत वाकून, दबून जाईल कीं काय, या शंकेनेंच! आणि त्यामुळें त्या गवताला तरी कसला विलक्षण रंग आला होता!

सभोंवतीं भुईवर सर्वत्र विखुरलेल्या आणि झाडांवर असलेल्या त्या नीमचमेलीच्या फुलांचा सुगंध रंगानें दीर्घ श्वास घेऊन आपल्या छातींत भरून घेतला, त्या कोवळ्या उन्हाकडे आणि त्यांत मधून मधून पडलेल्या लांबलांब सावल्यांकडे पाहिलें आणि त्याच्या हृदयांतील उल्हास ओसंडून जाऊं लागला. त्यानें झपाझप पावलें टाकावयास सुरुवात केली. दिनूकडे गेल्यावर त्याच्याकडून त्यानें आपलें पुस्तक घेतलें आणि सहज कालिंदी गुळवेलकर जिथें राहत होती त्या बाजूकडे, ती कुठें दिसते आहे का या अपेक्षेनें दृष्टि टाकली. तों काय आश्चर्य!

तिच्या बिऱ्हाडाचीं दारें नि खिडक्या सताड उघडीं होतीं. दाराशीं थोडेसे कागदाचे चिटोरे आणि इतर केरकचराहि विखुरलेला होता. रंगा अधिक जवळ जाऊन पाहूं लागला. होय! सामान कुठेंच दिसत नव्हतें, माणसांची वर्दळहि नव्हती आणि प्रत्येक खोलीचें मधलें दार आणि त्याच्या दोन्ही अंगांना असलेल्या दोन खिडक्या एकाद्या कवटींतल्या नाक व डोळ्यांसारख्या भकास व भीषण वाटत होत्या.

रंगानें विचारलें, "हें रे काय? काल तर इथं बिऱ्हाड होतं ना?"

दिनूनं उत्तर दिलें, "होय ना!"

"मग आज काय झालं?"

"काल रात्रीं जागा सोडली त्यांनीं!"

"अशी मध्येंच—एकाएकीं?"

"एकाएकीं कसलं? त्यांची बदली झाली होती आणि आपण जागा सोडणार आहोंत म्हणून त्यांनीं आम्हांला केव्हांच सांगितलं होतं!"

"खरंच?"

"मग काय खोटं सांगतों कीं काय तुला?"

"तसं नव्हे रे! पण काल त्यांची तयारी दिसत नव्हती म्हणून म्हटलं."

"भले शाबास! बरंचसं सामान त्यांनीं पाठवून दिलं होतं, अन् राह्यलेलं ते काल बरोबर घेऊन गेले."

यानंतर मग त्यांच्या शाळेंतल्याविषयीं गप्पा झाल्या आणि थोड्याच वेळानें रंगा आपल्या घरीं गेला.

त्या दिवशीं संध्याकाळीं रंगा शाळा सुटल्यावर पावणेपांच वाजतां घरीं आला. पाटीदप्तर त्यानें खोलींत गेल्यावर खुंटीवर वाटेल तसें अडकवलें अन् माजघरांत येऊन त्यानें आईजवळ खायला मागितलें.

सुमारें पंधरा मिनिटांनीं खाणें आटोपून आंचवल्यावर हात सदऱ्याच्या सोग्याला पुशीत आईकडे जाऊन त्यानें म्हटलें, "आई, मी कार्यकर्त्यांच्या दिनूकडे खेळायला जातों ग!"

आईनें म्हटलें, "जा! मात्र लवकर परत ये हो!" त्याच वेळीं त्याच्याकडे पाहून ती म्हणाली, "रंग्या, वडरा, काय कपडे घाण केले आहेस तूं हे! अगदींच वेंधळा नि गलिच्छ आहेस बाबा तूं!"

·४·

# शेवटच्या दिवशीं

काकासाहेब झांबरे या विमागणितीयांच्या कचेरींत भिंतीवर 'सह्याद्रि' आणि 'विंध्याचल' या दोन विमा कंपन्यांचीं ठोबळ अक्षरांचीं कॅलेंडरें होतीं. त्यांच्यापैकीं प्रत्येकाखालीं दोन अशीं एकंदर चार टेबलें मांडलेलीं होतीं. तीं टेबलें उद्यांपासून रिकामीं राहणार होतीं. कारण, त्यांच्यावर काम करणाऱ्या लोकांचा काम करण्याचा आजचा शेवटचा दिवस होता. ते तेराहि जण कष्टी होते.

पण कष्टी होण्याचा त्यांचा हा कांहीं पहिलाच दिवस नव्हता.

पांच महिन्यांपूर्वी काकासाहेब झांबरे यांजकडे एकदम बऱ्याच विमा कंपन्यांचीं मूल्यमापनाचीं कामें आलीं होतीं, त्या वेळीं हे सारे लोक त्यांच्या कचेरींत लागले होते. काकासाहेबांच्या कचेरीचा हा नेहमींचा शिरस्ता होता. त्यांच्या कचेरींत कांहीं लोक पूर्वीपासून लागलेले होते. हे लोक मोजके असले तरी कचेरींत त्यांची सेवा अखंडितपणें झाली होती. नियमितपणें येणारीं जीं कामें असत त्यांच्यासाठीं ही मंडळी पुरेशी असे. परंतु केव्हां केव्हां एकदम पुष्कळ कामें येत, तीं कांहीं विशिष्ट मुदतींत पुरीं करून देण्याचें बंधनहि पडे. अशा वेळीं नवीन माणसें घेणें भाग पडे. तीं कामें संपून गेलीं म्हणजे या माणसांना डच्चू देण्यांत येई. काकासाहेबांच्या कचेरींत अनुभवाचा कांहीं उपयोगहि नव्हता आणि जरूरीहि नव्हती. साऱ्या गोष्टींचीं कोष्टकें होतीं, सूत्रें होतीं. कारकुनांचा उपयोग फक्त विमाकंपन्यांच्या कार्डांमधील माहिती तक्त्यावर उतरणें, गुणाकार, भागाकार, बेरजा नि वजाबाक्या करणें एवढ्याचसाठीं होई. त्यामुळें कोरीं करकरीत अशीं नवीं माणसें आलीं किंवा रुळलेलीं जुनीं माणसें निघून गेलीं तरी काकासाहेबांचा कांहींच तोटा होत नसे.

ज्या कामांकरितां हे तेरा लोक घेतलेले होते तीं कामें संपत आलीं होतीं. तरी कदाचित् आणखी कांहीं कंपन्यांचीं कामें येतील आणि आपण टिकून राहूं ही त्यांना आशा वाटत होती. परंतु त्यांना या महिन्याच्या एक तारखेस, तुम्हांला महिनाअखेरीस कमी करण्यांत येईल, अशा सूचना मिळाल्या होत्या, तेव्हांपासूनच हे सारे जीव कष्टी होते. मात्र त्यांच्या मनस्तापाच्या अंधारांत आशेची एक क्षीण तिरीप मध्येंच चमके. कुणीं सांगावें, कदाचित् या शेवटच्या महिन्यांतमुद्धां काम येईल आणि आपण टिकूं. आधीं काम येईल कीं नाहीं हेंच जेथें शंकास्पद, तेथें तें किती येईल हें त्यांना कुठून कळणार? त्यामुळें आपण तेराहि जण टिकूं असें कुणालाच वाटत नसलें, तरी निदान आपल्याला तरी परत कामावर घेतील अशी प्रत्येकाला आशा वाटली होती. पण आज शेवटचा दिवस होता. नवीन काम आल्याची किंवा येणार असल्याची वार्ता नव्हती, कुणकुण नव्हती. तेव्हां त्यांची नोकरी संपुष्टांत आली होती, हें उघडच होतें.

दुर्गेश कष्टी या तेरा जणांतलाच एक होता. इतरांच्याप्रमाणें तो कष्टी तर होताच, पण त्याच्या मनांत मनस्वी चीडहि आली होती. या साऱ्या परिस्थितीविषयींच त्याला चीड वाटे. जरूर पडली कीं मागेंं गोळा करायचीं, हवीं आहेत त्यापेक्षां अधिक मिळत असल्यामुळें कमी भावानें त्यांना 'पाडून' घ्यायचें, आणि पुन्हा जरूरी संपली कीं चोथ्याप्रमाणें फेकून द्यायचें! याविषयींच्या विचारांनीं त्याचें मन व्याप्त होई, तेव्हां स्वतःच्या अगतिक परिस्थितीविषयीं त्याला फारच शरम वाटे. त्या शरमेच्या पोटीं त्याचा दुखावलेला अहंकार त्याच्या मनाचा गोंधळ उडवून देई.

या पद्धतींत नवीन असें कांहींच नव्हतें. त्याच्या भोंवतालच्या विश्वांत सगळीकडेच हें घडत होतें. त्याचबरोबर त्या पद्धतीविरुद्ध ओरडहि त्याच्या भोंवतालच्या त्याच विश्वांत चालू होती. परंतु ज्या गोष्टी त्याला ऐकून समजल्या, पटल्या नव्हत्या, त्या त्याला गेल्या पांच महिन्यांच्या अनुभवावरून समजल्या आणि पटल्या.

पण त्याच्या अपक्व मनांत त्यामुळें काकासाहेब झांबरे या व्यक्तीविषयीं तिरस्कार, रोष आणि चीड या भावनांचा उगम झाला. कामांत त्याचें मन लागेना. मन लागण्यासारखें तें काम मुळांतच नव्हतें. तथापि एकदां परिस्थिती-मुळें एखादी गोष्ट पत्करल्यावर तिच्याविरुद्ध फुणफुणण्यांत कांहीं अर्थ नसतो ही जाणीव त्याला नव्हती. त्यामुळें त्यालाच मनस्ताप होई. त्याचें अक्षर

चांगलें होतें, तें तो कार्डावरून तक्ते तयार करतांना मुद्दाम वाईट काढूं लागला. परंतु ते तक्ते तपासण्याचें काम त्याच्या शेजाऱ्याकडे असे, त्यालाच त्यामुळें जेव्हां त्रास होऊं लागला, तेव्हां त्यानें तो खेळ सोडून दिला.

अशा परिस्थितींत आपण फार दिवस इथें राहूं शकत नाहीं हें त्याला समजत होतें. परंतु दुसरीकडे कुठेंच जातां येण्यासारखें नव्हतें म्हणून तो इथें राहत होता. थोडे मिळत असले, मानहानीनें मिळत असले, तरी त्याच्या श्रमाचे, बौद्धिक नसल्या तरी शारीरिक श्रमाचे, त्याला पैसे मिळत होते. त्यामुळें नोकरी जाणार या जाणीवेनें तो कष्टी झाला होता. पण मनाच्या त्या अवस्थेला 'सुटलों एकदांचा' या विचाराची एक सूक्ष्मशी उजळ धारहि होती.

आज शेवटचा दिवस होता. दुर्गेश कट्टीला आज घालवून देण्यांत येणार होतें. 'तेव्हां जातां जातां—एकदांच—काकासाहेबांना झोंबेल असं अद्वातद्वा बोलून, लाथा झाडून, आजपर्यंत जी गोष्ट करतां आली नाहीं ती करून, मनाचं समाधान आपण कां मिळवूं नये?' हा विचार दुर्गेश कट्टीच्या मनांत आज ऑफिसांत येण्याच्या आधींपासून घोळत होता.

दुर्गेश कट्टीला त्या दिवशीं कचेरींत यायला पांच मिनिटें उशीर झाला. काकासाहेबांच्या कचेरीचा एक नियम असा होता, कीं त्यामुळें पांच मिनिटें उशीरां आलेल्या माणसाचे पंधरा मिनिटांचे पैसे कापले जात. त्या कचेरींत नवे-जुने जे लोक लागलेले होते त्या सर्वांचा पगार तासांवर ठरलेला होता. त्यामुळें शिक्षा नि रजाहि त्याच हिशेबानें दिल्या जात. आत्तांच्या या नियमाची अंमलबजावणी सुरुवातीचा पंधरा मिनिटांचा अवधि संपून जाईतोंवर असे. त्यामुळें पांच मिनिटें उशीरां आलेला मनुष्य आंत न येतां उरलेलीं दहा मिनिटें बाहेरच्या बाहेर जवळपास कुठें तरी रेंगाळण्यांत किंवा झाडाखालीं सिगरेट फुंकण्यांत घालवी. त्याचप्रमाणें दुर्गेश कट्टीहि त्या दिवशीं काकासाहेबांच्या बंगल्याच्या बाहेर भटकत राहिला आणि पंधरा मिनिटें होतांक्षणींच त्यानें आंत पाऊल टाकलें.

त्याला साळसकरांनीं जवळ बोलावलें आणि त्याच्या हातांत एक कागद देऊन सांगितलें, "आज ज्यांना रजा मिळायची आहे, त्या सर्वांच्या नांवांचीं प्रशस्तिपत्रं काकासाहेबांनीं तयार करून ठेवलीं आहेत. हें तुझं! बाकीच्यांचीं दिलीं. हें घे!"

दुर्गेश कट्टीनें तें घेतलें नि वाचावयास सुरुवात केली.

कमी करतांना प्रत्येक माणसाला प्रशस्तिपत्र देण्याचा काकासाहेबांचा शिरस्ता होता. त्यासाठीं त्यांनीं तीं छापूनच घेतलेलीं होतीं. रिकाम्या जागांमध्यें नांव आणि कामावर असलेल्या दिवसांची संख्या कारकून भरत आणि खालीं काकासाहेब सही करीत. मजकूर मोजकाच असे.

"दुर्गेश कट्टी हा माझ्याकडे चार महिने कामाला होता. त्याचें काम बरें होतें आणि वर्तणूक ठीक होती." हा मजकूर आणि खालची लफ्फेदार सही वाचून दुर्गेश कट्टी कुत्सितपणें हसला.

साळसकर म्हणाले, "कां? हसलाससा?"

"हसूं नको तर काय करूं? या कागदावरचा मजकूर वाचलात का? असल्या शिफारशीवर मला एकाद्या भटारखान्यांत देखील नोकरी मिळायची नाहीं!"

साळसकर हसले. ते म्हणाले, "असं म्हणूं नकोस तूं! त्याच्याखालीं सही आहे ती काकासाहेब झांवरे यांची आहे."

"असेल. पण वरच्या मजकुरामुळं त्या सहीची किंमत त्या जागीं नुसत्या ओतलेल्या शाईइतकीच आहे."

"पण न मागतां मिळालं आहे तुला तें! नुसतं ठेवून द्यायला काय हरकत आहे?"

"या प्रशस्तिपत्राच्या पोटीं नोकरमाणसांकरितां खरं कांहींहि न करतां, कांहीं तरी मोठं करीत असल्याची जी पोकळ उपकारी आणि मानभावी वृत्ति आहे ती मला सहन होत नाहीं. मला नको तें प्रशस्तिपत्र!"

साळसकरांनीं दुसरा एक कागद त्याच्यापुढें केला आणि म्हटलें, "बरं, पण या कागदावर तुझा पत्ता लिही."

"तो कशासाठीं?"

"एखादे वेळीं कामं येतात आणि माणसांची जरूरी लागते. अशा वेळीं पूर्वी इथं कामावर असलेल्या माणसांना काकासाहेब कटाक्षानं बोलावणीं पाठवतात. ते मोकळे असले तर येतात. हीं बोलावणीं करतांना या पत्त्यांचा उपयोग होतो."

"आत्तां मी देत नाहीं. वाटला द्यावासा तर संध्याकाळीं देईन."

"बरं!" साळसकर म्हणाले.

दुर्गेश कट्टी आपल्या टेबलाशीं जाऊं लागला. पण लागलीच तो परत फिरला आणि म्हणाला, "सर्टिफिकेटाचा कागद द्या इकडे."

साळसकर स्मित करून म्हणाले, "कां? बेत फिरला वाटतं?"

"तसं नाहीं. तो कागद मी जाळणार आहें. तसं केल्यानं त्याला योग्य ती गति दिल्यासारखं होईल." असें म्हणून दुर्गेश कट्टीनें तो कागद घडी न करतां तसाच खिशांत ढोपसला.

सारे कारकून दुर्गेश कट्टीकडे विस्मयानें पाहूं लागले. त्यांना तो इतका क्षुब्ध झालेला कधींच दिसला नव्हता.

पण एकंदरींत दुर्गेश कट्टी त्या दिवशीं, त्या शेवटच्या दिवशीं, जो वागला तो विलक्षणच.

लहान आणि मोठ्या शंकांचें समाधान करण्याच्या मिषानें कचेरीच्या बाहेर खेपा मारण्यांत त्यानें पुष्कळ वेळ घालवला. आदल्या दिवशीं त्यानें चार तक्ते भरले होते ते अजून त्याच्या टेबलांतच होते. त्यांजकडे त्याची दृष्टि गेली, नि सारे इंग्रजी एकचे आंकडे आपण उभ्या रेषेच्या स्वरूपाचे काढले आहेत, असें त्याला दिसलें. वास्तविक एकाचा आंकडा नेहमींच तो तसा काढी, पण आज त्याला त्यांत अपुरेपणा दिसूं लागला आणि त्यांपैकीं प्रत्येकाच्या तळाशीं आडवी रेघ आणि वर माथ्याशीं डाव्या अंगाला तिरपी रेघ मारून त्यानें ते सारे आंकडे छापील एकाच्या आंकड्यासारखे करण्यांत पाऊण तास खर्चला. व्यावहारिक घातांकांनीं गुणाकार करतांना बऱ्याच ठिकाणीं त्यानें वेरजा चुकवून ठेवल्या. त्या चुका दुरुस्त करण्याच्या मिषानें गुणाकाराच्या यंत्राशीं बसून त्यानें तें बराच वेळ उगीच फराफरा फिरवलें. काकासाहेब शांवरे यांचीं विनोदी आणि वेढब चित्रें काढून आजूबाजूच्या लोकांमध्यें त्यानें हशा पिकवला. आणि इतकें केल्यानंतर दुसरें कांहींच सुचेना तेव्हां त्यानें खोलींतले विजेचे दोन्ही पंखे चालू केले व काळोखहि विशेषसा नव्हता तरी सारे दिवे लावून दिवाळी करून टाकली.

ज्या लोकांचा हा शेवटचा दिवस होता ते खिन्नपणें आणि ज्यांचा शेवटचा दिवस नव्हता ते विमनस्कपणें दुर्गेश कट्टीच्या या लीला पाहत होते. त्याच्या या वागण्यामुळें मूल्यमापनाचीं नवीन कामें येणार नव्हतीं किंवा संपत आलेलीं कामें फारशीं रेंगाळणार नव्हतीं—निदान आपल्याला ठेवून घेण्याइतकीं रेंगाळणार नव्हतीं—हें त्यांना ठिमत नव्हतें, असें नव्हे. त्यांना तें करणें बरोबर वाटत होतें, असेंहि नव्हे. पण त्यांनीं दुर्गेश कट्टीला विरोध केला नाहीं. कमीअधिक प्रमाणांत सर्वांच्याच मनांत जी चिडीची भावना होती तिचा हा उद्रेक दुर्गेश

कट्टीला सहन होत नाहीं आणि तिला ही अशी वाचा फुटते आहे असें पाहून सर्व जण त्या बाबतींत उदासीनच राहिले—अगदीं त्या ठिकाणीं सर्वांवर देखरेख करण्यासाठीं असलेले साळसकरसुद्धां.

पंख्याचा वारा अतिशय सुखदायक होता. त्या सुखानें दुर्गेश कट्टीच्या मस्तकांत चक्रें फिरूं लागलीं आणि त्याला गुंगी येऊं लागली. आज शेवटचा दिवस. थोडीशी झोप घेतली तर काय हरकत आहे ? झोपेचा विचार म्हणजे कट्टीच्या आजच्या एकंदर वागणुकीचें भरतवाक्यच होतें. तो विचार त्याच्या मनांतून जाईना. साळसकर बोलतील का ? छे छे ! साळसकर म्हणजे देवमाणूस...

काकासाहेब झांबरे यांची कचेरी त्यांच्याच बंगल्यांत पुढच्या अंगाला असलेल्या खोल्यांमध्यें होती. पाठीमागून दरवाजा होता, तरी पुष्कळ वेळां घरांतल्या माणसांना पुढच्या दरवाज्यानें कचेरीच्या बाजूनें बाहेर पडण्याचा प्रसंग येत असे. अशा वेळीं ऑफिसांत बसलेल्या व्यक्तींच्याकडे जातां जातां त्यांचें लक्ष गेल्यावांचून राहत नसे. याच कारणानें आत्तां काकासाहेबांच्या पत्नी लक्ष्मीबाई बाहेर जात होत्या, त्यांचें लक्ष सहज आंत गेलें, तों त्यांच्या दृष्टीला पंखे आणि दिव्यांची आतषबाजी पडली. त्या थांबल्या आणि चमत्कार वाटल्याचें दाखवून म्हणाल्या, "हें काय हें ? हे पंखे कुणीं सुरू केले ? नि दिवे कुणीं लावले ?"

त्यांना कुणींच उत्तर दिलें नाहीं.

"गेल्या महिन्याला विजेचं बिल सतरा रुपये नि साडेसहा आणे झालं ! तरी मी म्हणत होतं, वीज इतकी खर्च कशी होते ? आमच्या हाताखालचीं माणसं एवढं फक्त म्हणूनच घ्यावं तुम्हांला, नाहीं तर खरं म्हणजे तुम्ही आमच्या घराला लावलेले सुरुंग आहांत सुरुंग ! आमचं दिवाळं वाजवायचं आहे कीं काय मनांत तुमच्या ?"

त्यांचे शब्द जणुं कुणाच्याच कानीं पडले नव्हते तसे सारे जण स्तब्ध बसून होते. एकटा कट्टी मात्र कसलासा कागद फाडीत होता. त्याची जी खजबज होत होती तिच्यांत तो शेजाऱ्याच्या कानांत पुटपुटला, "आपल्या बायकोनं कचेरीच्या कामांत तिथं जाऊन ढवळाढवळ केलेली काकासाहेबांना खपते का ?"

त्याच्या शेजाऱ्यानें त्याच्या पायाला आपला चवडा मारला आणि सुचवलें, "न खपून चालेल कसं ? मालकांच्या माणसांनीं काय वाटेल तें केलं तरी तें

खपतं! निदान त्यांच्या हाताखालच्या माणसांनीं त्यासंबंधीं चर्चा किंवा तक्रार करायची नसते. समजलं? गप्प बैस!"

साऱ्या लोकांच्या स्तब्धतेमुळें चिडून जाऊन लक्ष्मीबाई फणकारल्या, "काय साळसकर, काय म्हणतें मी? दिवे कुणीं लावले?"

बोलणें जोंपर्यंत सर्वांना उद्देशून होतें तोंपर्यंत सर्वांची स्तब्धता खपून गेली. पण आतां कांहीं तरी उत्तर देणें साळसकरांना भाग होतें. ते इथें सर्वांत जुने होते आणि त्यांच्याच हाताखालीं ही कारकून मंडळी असल्याचें समजत. त्यामुळेंच लक्ष्मीबाईनीं हा प्रश्न त्यांना विचारला होता.

आपण लिहीत असलेल्या कागदांवरून दृष्टि उचलून त्यांनीं विचारलें, "अं? काय?"

लक्ष्मीबाई ठसक्यांत म्हणाल्या, "मी बोललें, तें ऐकूं नाहीं वाटतं आलं? मीं विचारलं, 'हे दिवे कुणीं लावले?'"

"अस्सं–अस्सं! दिवे होय?"

"दिवे आणि पंखे!" लक्ष्मीबाई गुरगुरल्या.

"हं हं! इथल्याच लोकांनीं सुरू केले आहेत ते!"

"इथल्याच लोकांनीं म्हणजे कुणीं? आणि कां?"

या पोलिशी प्रश्नाला उत्तर काय द्यावें या विचारांत साळसकर होते, एवढ्यांत दुर्गेश कट्टी उभा राहिला आणि म्हणाला, "काय म्हणणं आहे? दिवे मीं लावले आणि पंखेहि मींच सुरू केले. बाहेर झाडं खूप आहेत, त्यामुळं पुरेसा प्रकाश आंत येत नाहीं. डोळ्यांना त्रास होतो. त्याचप्रमाणं उकडतंयहि खूप. म्हणून दिवे आणि पंखे लावले."

लक्ष्मीबाई तोऱ्यांत म्हणाल्या, "आतां अंधार पडला आहे का? डोळ्यांना काळा चष्मा लावला तरी स्वच्छ दिसेल. नि तुम्ही म्हणतां, दिसत नाहीं. कुणाला खरं वाटेल हें? आणि उकडत असलं तर अंगांतला कोट काढावा! पंख्याची काय जरूरी? काय, आहे काय हें? चाकरांच्या मिजाशी नि मालकाला खर्च! बंद करा ते!"

लक्ष्मीबाईंचें तें सूत्र, शेवटची आज्ञा आणि दोन्ही उच्चारतांना त्यांचा जो स्वर होता त्यांतला अहंकार दुर्गेश कट्टीला सहन झाला नाहीं. त्यानें ठणठणीत उत्तर दिलें, "नाहीं बंद करीत! काय करायचं असेल तें करा! तुम्ही राहतां माडीवर. तिथं अंधार नसेल किंवा उकडतहि नसेल. पण आम्ही आहोंत इथं.

आणि इथं आम्हांला स्वच्छ दिसत नाहीं नि उकाडाहि सहन होत नाहीं. त्यांतून काकासाहेबांनीं आम्हांला कांहीं सांगितलं तर त्यांचं ऐकायचं कीं नाहीं पाहतां येईल. तुम्हीं आम्हांला हुकूम सोडायची जरुरी नाहीं ! समजलं ?"

कल्पना नसतांना केसांची बट खसकन् कुणीं तरी जोरानं ओढावी, त्याप्रमाणें लक्ष्मीबाईंची स्थिति झाली. त्या गप्प झाल्या; पण थोड्याच वेळांत स्वतःला सावरून घेऊन त्यांनीं साळसकरांना विचारलें, "साळसकर, यांचं नांव काय?"

दुर्गेश कट्टीनें त्या क्षणीं उत्तर दिलें, "त्यांना कशाला विचारतां ? मी देतों उत्तर! माझं नांव दुर्गेश कट्टी !"

सगळी मंडळी चकित झाली. आपल्या कानांवर त्यांचा विश्वास बसेना. दुर्गेश कट्टीनं त्यांच्याकडे दृष्टि टाकली. प्रत्येक जण डोळे विस्फारून त्याच्याकडे कांहींशा आदरयुक्त आणि भीतियुक्त दृष्टीनं पहात होता.

लक्ष्मीबाई विलक्षण क्षुब्ध झाल्या. पण त्या कांहीं बोलल्या नाहींत. त्या सरळ पुढें झाल्या आणि स्वतःच्या हातांनीं त्यांनीं दिवे आणि पंखे बंद केले.

त्यांना कुणींच विरोध केला नाहीं.

लक्ष्मीबाई त्यानंतर बाहेर न जातां तडक वर तरातरा निघून गेल्या. त्या वर निघून जातांक्षणीं कट्टी जागेवरून उठला आणि खट्खटा करून त्यानं पुन्हा दिवे लावले. अत्रे त्याला म्हणाला, "कट्टी, काय हें ?"

कट्टी हसून म्हणाला, "हंः ! शेवटचा तर दिवस आहे ! मढ्याला विस्तवाचं कसलं भय ?"

एवढें म्हणून त्यानें पंखे सुरू करण्यासाठीं हात घातला, इतक्यांत त्याला अडवून साळसकर म्हणाले, "थांब, कट्टी, असं कांहीं करूं नकोस ?"

"कां ?"

"ही महामाया आत्तांच येऊन गेली आहे ! ती काय करणार आहे कुणास ठाऊक ! पण माझ्याशीं ती जें बोलली त्यावरून यापुढं जें होईल त्याची जबाबदारी माझ्यावर पडणार आहे."

दुर्गेश कट्टीनें हात मागें घेतला, दिवे मालवून टाकले, नि म्हटलें, "तुम्ही लोक इतकं गोगलगायीसारखं कां वागतां मला समजत नाहीं."

"इतक्या दिवस आमच्यांतच तूं होतास. तूंहि इतकाच शांत आणि धीमा होतास. आजच्यासारखं तूं कुणाशींहि फटाफट बोलशील अशी माझी कल्पना नव्हती. तुला झालं आहे तरी काय ?"

"मी तर चाललोंच आहें. पण तुम्ही हा माजोरीपणा किती दिवस सहन करणार? आज मालकीणबाई आल्या. उद्यां काकासाहेबांचे पुजेचे भटजीहि तुम्हांला येऊन चापूं लागतील. तुम्ही मुकाट्यानं ऐकून घेणार तें?"

सगळे जण गप्प बसून ऐकत होते.

"गेल्या महिन्यांत आपल्यापैकीं अकरा जणांनीं, जळगांवच्या कंपनीचं काम घाईनं पुरं करायचं होतं म्हणून दिवसांतले अठरा तास कामं केलीं. जादा कामाबद्दल काकासाहेबांनीं घसघशीत बोनस देईन म्हणून कबूल केलं नि काम संपल्यावर दिलं काय, तर तासामागं एक पैसा जास्त. नुसते चडफडले, चडफडले नि गप्प बसले ते सारे जण! ओरड कां नाहीं केली? निदान अर्ज, विनंति तरी?"

कुणीहि कांहींहि बोललें नाहीं.

साळसकर कांहीं वेळानें म्हणाले, "अजून बच्चा आहेस तूं! तुझ्या अंगांत तरुणपणचं रक्त आहे, तडफ आहे, म्हणून असं बोलतो आहेस तूं! ही तडफ चांगली आहे. पण मालकापुढं ती दाखवायची म्हणजे एक पाऊल उंबरठ्याच्या बाहेर ठेवून ती दाखवली पाहिजे. इथं माझीं सोळा वर्षं गेलीं नि सोळा वर्षं इथं राहूनहि दुसरीकडे मला उपयोगीं पडेल असं नवीन कांहींच मी शिकलों नाहीं. आतां मला इथंच चिकटून राह्यलं पाहिजे. हें ठिकाण सुटलं तर या वयांत कोण मला कुठं घेणार?"

या बोलण्यानें कट्टी एकदम नरम आला. मधांच्या लक्ष्मीबाईच्या अहंकारामुळें त्याचा झालेला क्षोभ कुठल्या कुठं गेला.

अत्रे त्याला म्हणाला, "कट्टी, तुम्ही इतके खवळाल असं आम्हांला कधींच वाटलं नव्हतं. इतके दिवस तुम्ही शांत होतां. कांहीं न बोलतां आपलं काम बरं कीं आपण बरे, ही तुमची रीत होती. इतके दिवस तुमचा हा फटकळपणा कुठं लोपला होता?"

"मी गप्प होतों, तरी मला दिसत होतं सारं नि मला तें सहन होत नव्हतं. दबून राहिलेलं तें सारं आज उफाळून बाहेर आलं."

"पण आजच्या तुमच्या तोंडाळपणाचे परिणाम चांगले व्हायचे नाहींत."

"आजचा माझा शेवटचा दिवस आहे. काकासाहेब माझं कांहीं पारिपत्य करूं शकत नाहींत."

"पुन्हा कामं आलीं कीं ते तुम्हांला बोलावणं पाठवणार नाहींत."

" इथं कोण अडलं आहे पुन्हा यायला ? "

" मग आधीं तरी कसे आलांत ? "

" कसा आलों तेंच मला कळत नाहीं. नुकताच पदवीधर होऊन बाहेर पडलों होतों. बेकार होतों. कशाची कांहींच कल्पना नव्हती. आलों. पुन्हा असला मूर्खपणा हातून होऊं देणार नाहीं."

" पुढं काय करायचं ठरवलं आहे ? "

" तें अजून ठरवलं नाहीं. पण इथं यायचं नाहीं, अगदीं जीव जायचा प्रसंग आला तरी यायचं नाहीं, एवढं मात्र ठरवलं आहे. "

साठे तेरा वर्षांचे जुने होते. त्यांनीं त्याला विचारलें, " लग्न झालं आहे का तुझं ? "

" नाहीं ! "

" तरीच ! "

" कां ? " दचकून कट्टीनें विचारलें.

" आम्ही देखील प्रारंभीं असंच म्हणत होतों. पण आमचीं लग्नं झालीं होतीं. आमचं हें बोलणं पुढं पुढं बंद पडलं, नि पुन्हा बोलावणं आलं तसे आम्ही येऊं लागलों. "

" माझी तशी स्थिति कधींच व्हायची नाहीं ! लग्नानंतरसुद्धां ! "

" पण कुठंच कांहीं नाहीं जमलं तर ? "

" कुठंच कांहीं नाहीं जमलं तर निदान कुठल्या तरी शाळेंत—"

त्याचं वाक्य पुरें व्हायच्या आधींच सगळे जण खदखदून हसले. पण कट्टी खवळला नाहीं. कारण, तें हास्य बालिश होतें. त्यांत अहंकार, कुत्सितपणा, हेटाळणी नव्हती. ते सारे चेपलेले, दडपलेले लोक होते. असल्या बाबतींत ते एकमेकांची हेटाळणी करूं शकत नाहींत. पण भावनांचे हे धागे ज्याचे तेच अनुभवूं शकतात. आणि त्यावरून मनाच्या घडून येणाऱ्या प्रतिक्रियाहि माणसाच्या नकळतच आपोआप घडत असतात.

" कां ? हसलांत कां ? " त्यानें स्मित करीत विचारलें.

" तें जग तरी तुझ्या मनोवृत्तीला मानवेल का ? " साठे म्हणाले.

" निदान इथल्यापेक्षां तरी खास अधिक ! " कट्टीनें उत्तर दिलें.

एवढ्यांत वरून गडी आला आणि त्यानें निरोप सांगितला, " कट्टी, तुम्हांला काकासाहेब बोलावताहेत. "

"असं का? ठीक आहे. चल!" म्हणत कट्टी उठला आणि गड्याबरोबर वर गेला.

काकासाहेब आपल्या खुर्चीत बसून टेबलावरच्या कागदांवर भराभरा सह्या करण्यांत गुंतलेले होते. कट्टी उभाच राहिला. काकासाहेबांची मान खालीं होती, त्यामुळें त्यांचें टक्कल त्याच्या दृष्टीसमोर होतें. तें त्याला पावसाळ्यांत रस्त्यावर झालेल्या गढूळ पाण्याच्या डबक्याप्रमाणें भासलें. तें बघतांक्षणींच त्याला वाटणारा त्यांच्याविषयींचा तिरस्कार आणि चीड उचंबळून आली आणि गरज संपली कीं रस काढून घेतलेल्या उसाच्या चोयट्यांप्रमाणें माणसांना फेकून देणाऱ्या या दुरात्म्याला काय बोलूं नि काय नको; याचा पाणउतारा आपल्याला कसा करतां येईल; ऐवींतेवीं याचा आपला संबंध तुटतोच आहे, तर तो तुटतांना तडाखा मारून कां तोडूं नये; पुन्हा काय वाटेल तें झालं तरी या माणसापुढं आपण पदर पसरणार नाहीं आहोंतच, तेव्हां आयुष्यांत एकदांच याला दुरुत्तरं कां करून घेऊं नयेत;—या आणि असल्या विचारांनीं त्याचें मन व्याप्त झालें. त्या विचारांत काकासाहेबांचें प्रारंभींचें बोलणेंमुद्धां त्याच्या कानांत शिरलें नाहीं.

तो ऐकूं लागला तेव्हां काकासाहेब म्हणत होते, "...अपमान केलात. तेव्हां त्याचं प्रायश्चित्त म्हणून सर्वांसमक्ष तुम्हीं माझ्या पत्नीची क्षमा मागितली पाहिजे."

दुर्गेश कट्टी म्हणाला, "अपराध करणाऱ्या माणसाला पश्चात्ताप झाला तर तो क्षमा मागतो. इथं मीं अपराधहि केला नाहीं नि मला पश्चात्तापहि झाला नाहीं, तेव्हां क्षमा मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. आणि तसंच पाहूं गेलं, तर आपल्या पत्नीनंच माझी क्षमा मागितली पाहिजे. कारण, कांहीं कारण नसतां त्या मला टाकून बोलल्या. पण मी त्यांच्याकडून क्षमायाचनेची अपेक्षा करीत नाहीं. कारण, आपण काय करीत होतों, तें त्यांना समजत नव्हतं. त्यांच्या डोक्यांत यजमानांच्या पैशाची धुंदी होती. स्वतःची पायरी, स्वतःची लायकी यांचं त्यांना आकलन झालं नाहीं. तथापि—"

आपल्या बोलण्यामुळें काकासाहेबांच्या मुद्रेंत पडत चाललेला फरक दुर्गेश कट्टी निरखून पहात होता. असली भाषा काकासाहेबांनीं कधींच ऐकली नव्हती. ते ओरडले, "तुम्ही काय बोलतां आहां? कुणाशीं बोलतां आहां? कुणाशीं बोलतां आहां तुम्ही?"

"कुणाशीं? आपणाशीं! या विमासंस्थानचे राजे जे आपण, त्यांच्याशीं!

श्रीमन्महाराजाधिराज काकासाहेब झांबरे यांच्याशीं!"

नोकरवर्गापैकीं आपल्याविरुद्ध कुणीं ब्र काढला तरी काकासाहेब त्याला लागलीच कामावरून दूर करीत. ते म्हणाले, "तुम्ही चालते व्हा! तुमचं आमचं जमायचं नाहीं! तुम्हांला एक महिन्याची मी नोटिस देतों. पुढच्या महिन्यापासून तुम्ही कामावर —"

दुर्गेश कट्टी खदखदून हसला. तो म्हणाला, "श्रीमंत, आपल्या या संस्थानी कारखान्यांत कामं परस्पर होतात. त्यामुळं आपल्याकडे कोण कोण लोक आहेत नि त्यांचं काय काय चाललं आहे याची श्रीमंतांना दखल देखील दिसत नाहीं. माझं नांव दुर्गेश कट्टी. श्रीमंतांनीं मला गेल्याच महिन्याच्या शेवटीं एक महिन्याची नोटिस दिली आहे!"

काकासाहेब कडाडले, "निर्लज्ज मनुष्या, बाहेर हो! तुला कांहीं रीतभात आहे कीं नाहीं? आणि तुला मीं चांगल्या वर्तणुकीचं प्रशस्तिपत्र दिलं!"

दुर्गेश कट्टीनें खिशांत हात घातला आणि खिशांत टोपसलेलें तें सकाळचें प्रशस्तिपत्र बाहेर काढून त्याचा बोळा करून तें काकासाहेबांच्या टेबलावर भिरकावलें आणि म्हटलें, "हें घ्या तें आपलं प्रशस्तिपत्र परत. नाहीं तरी घरीं नेऊन त्यावर मी शेगडीच पेटवणार होतों!"

काकासाहेबांना आपला राग अनावर झाला. त्यांनीं दाणकन् टेबलावर आपली मूठ आदळली आणि त्यांच्या तोंडून अस्फुट उद्गार बाहेर पडले, "अगोदर—अगोदर—अगोदर माझ्या डोळ्यांसमोरून दूर हो तूं!"

"दूर होतों नि जातोंहि निघून! पण आधीं माझा पगार चुकता करा!"

"नाहीं देत तुझा पगार! कोर्टांत जा तूं! काय करायचं तें कर!"

"कोर्टांत कशाला जाऊं मी! मी साऱ्या जगाला सांगत सुटेन, कीं काकासाहेबांची श्रीमंती त्यांच्याकडे अर्धपोटीं मान मोडून काम करणाऱ्या नोकरांना न दिलेल्या नि कमी दिलेल्या पगाराच्या पैशावर..."

काकासाहेब दुर्गेश कट्टीच्या अंगावर धावून आले. त्यांचें निवारण करण्यासाठीं त्यानें आपले हात पुढें केले. त्याच्या नकळत त्या हातांच्या मुठी वळल्या आणि त्यानें जोर दिल्यामुळें असो, किंवा काकासाहेब त्याच्या अंगावर वेगानें धावून आल्यामुळें असो, त्यांच्या बरगडींत त्या मुठींचे दोन जोराचे प्रहार लागोपाठ झाले आणि ते किंकाळी फोडून जमिनीवर कोलमडून पडले. त्यांच्या पडण्याचा आणि किंकाळीचा केवढा प्रचंड आवाज झाला आणि त्याबरोबर कुठें

कुणास ठाऊक, केवढयानें तरी घंटा वाजूं लागली !...

दुर्गेश कट्टी तंद्रींतून जागा झाला. अत्रे त्याला विचारीत होता, "काय, झोप लागली होती काय, कट्टी? अडीचाचा टोला पडला ना? मधली सुट्टी सुरू झाली म्हटलं, महाराज!"

दुर्गेश कट्टी खडबडून उठला. त्यानें डोळे चोळले. रुमालासाठीं त्यानें खिशांत हात घातला तों त्याच्या हाताला काकासाहेबांचें सकाळचें प्रशस्तिपत्र लागलें. कसल्या तरी विचित्र आणि संमिश्र भावनांनीं त्याचं मन गोंधळून गेलें. त्यानें तें प्रशस्तिपत्र आंतल्या खिशांत ठेवलें. नीट भानावर येऊन मग तो चहा पिण्यासाठीं बाहेर पडला.

चहा पिऊन तो परत आला तेव्हां सव्वा तीन वाजून गेले होते. त्याला उशीर झाला होता. साळसकरांच्या टेबलाशीं गडी उभा होता. कारकुनांचे टांक खरखरत होते, टेबलांवर विमाकार्डांच्या चळती पडल्या होत्या, लोक तीं कार्डें पहात होते नि तक्ते भरीत होते. खिडकीशीं गुणाकारभागाकाराचें यंत्र फरफरत होतें. व्यावहारिक घातांक, कोष्टकें, सूत्रें यांचीं पुस्तकें उघडलीं मिटलीं जात होतीं.

आंत काम करणाऱ्या माणसांच्याप्रमाणेंच कचेरीचाहि जीवनप्रवाह चालू होता.

दुर्गेश कट्टीनें आंत पाऊल टाकल्याबरोबर त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. या अचानक प्रसंगाचा त्याला अर्थ कळेना. तो दिङ्मूढ होऊन आपल्या टेबलाकडे जाऊं लागला.

साळसकरांनीं त्याला बोलावलें.

त्यांच्याकडून त्याला त्या अभिनंदनाचें कारण समजलें.

थोड्याच वेळापूर्वी काकासाहेबांशीं उर्मट वागणूक केल्याबद्दल माडीवर काम करणाऱ्या साडेकर नांवाच्या कारकुनाला एक महिन्याची नोटिस काकासाहेबांनीं दिली होती. कमी केलेल्या तेरा लोकांपैकीं एकाची निवड करून साडेकरांची जागा भरून काढण्याची व्यवस्था करण्यास त्यांनीं साळसकरांना सांगितलें होतें, तेव्हां निवड करण्याचें काम काकासाहेबांनींच करावें अशी साळसकरांनीं सूचना केली होती. तेव्हां काकासाहेबांनीं त्या तेरा जणांपैकीं कुणाचें अक्षर सर्वांत चांगलें आहे अशी चौकशी केली होती. त्यावर साळसकरांनीं दुर्गेश कट्टीचें नांव सांगितलें होतें आणि त्याचा परिणाम होऊन काकासाहेबांनीं दुर्गेश कट्टीची निवड केली होती.

ही सगळी हकीकत ऐकून आपल्याला काय वाटतें आहे, तेंच दुर्गेश कट्टीला समजेना. मूकस्तंभासारखा तो स्तब्ध राहिला.

साळसकर म्हणाले, "कां रे! गप्प कां? पुढच्या महिन्यापासून तूं येशील असं कळवूं ना काकासाहेबांना?"

दुर्गेश कट्टी कांहीं बोलेना.

"तुझी कुठं कांहीं व्यवस्था झाली आहे का?" साळसकरांनीं विचारलें.

"नाहीं!" कट्टीनें मान हलवून सुचविलें.

"मी सांगूं का तुला? तूं नाहीं म्हणूं नकोस. दुसरीकडे प्रयत्न कर, पण हें हातचं सोडूं नकोस. जमलं दुसरीकडे चांगलं, तर हें देतां येईल सोडून केव्हांहि."

तरीहि दुर्गेश कट्टीनें एक अक्षरहि तोंडावाटे काढलें नाहीं.

"कां रे, विचार काय आहे तुझा? 'येणार नाहीं' म्हणून का कळवणार आहेस?"

कसल्या तरी दीर्घ निद्रेंतून एकदम जागा झाल्याप्रमाणें दचकून मान हलवून दुर्गेश कट्टी म्हणाला, "छे छे! तसं नाहीं! अगदींच कांहीं तसं नाहीं!"

१९४५

## .५.

# अनुराधा विप्रदास

त्या दिवशीं अनुराधा विप्रदास वर्गांत उशीरां आली आणि उशीरां आली म्हणून आपल्या जागेशीं जाऊन ती उभी राहिली.

तास पहिला होता, गणिताचा होता. देवस्थळी मास्तर बीजगणित शिकवीत होते. वर्ग सातवीचा होता. तिमाही उलटून गेली होती. आणि इतके दिवस वारंवार कानांवर पडणारे गुणपृथक्करण, वर्गमूळ, अव्यक्त वर्ण, द्विघात समीकरणें इत्यादि जुने शब्द आणि आतां नवीनच कानांवर येणारे गुणोत्तर, प्रमाण, राशि, परंपरित प्रमाण इत्यादि नवे शब्द कांहीं मुलांच्या मनांत गांभीर्य, कांहीं मुलांच्या मनांत कुतूहल, कांहीं मुलांच्या मनांत भीति, कांहीं मुलांच्या मनांत तिरस्कार, तर कांहीं मुलांच्या मनांत बेपर्वाई निर्माण करीत होते.

मुलांना सोडवण्यासाठीं एक उदाहरण देवस्थळी मास्तर सांगण्यास सुरुवात करणार होते, तेवढ्यांत अनुराधा विप्रदास उभी राहिली आहे हें त्यांच्या ध्यानांत आलें. त्याचबरोबर तिला उभी राहून कांहीं वेळ झालेला असला पाहिजे आणि मजकूर उभ्यानें लिहून घेतां येत नाहीं याहि दोन गोष्टी त्यांच्या ध्यानांत आल्या. म्हणून ते म्हणाले, "विप्रदास, बैस आतां!"

स्वतःच्या तोंडून हे शब्द बाहेर पडलेले कानीं पडतांच त्यांना विचित्र वाटलें. ते शब्द उच्चारतांना आपल्या स्वरांत इतकें विलक्षण मार्दव आणि जणुं ओसंडून जाणारा स्नेहरस कुठून आणि कसा आला, याचें त्यांना आकलन होईना.

रात्रीच्या वेळीं अंधाऱ्या पायवाटेनं चाललेलें असावें आणि कुठून तरी सुगंधाची सूक्ष्म लकेर यावी, पण तो सुगंध कशाचा आहे तें मात्र कळूं नये, तशी त्यांची अवस्था झाली.

त्यांनीं अनुराधेकडे निरखून पाहिलें. आपल्या शेजारीं बसलेल्या उषा मोहितेला ती कांहीं तरी विचारीत होती. पण तितक्यांत उषा मोहितेचें लक्ष त्यांच्याकडे गेलें आणि तिनें लगलीच अनुराधेला डिवचून, "ए, सर बघताहेत! बोलूं नकोस!" असें सुचवलें. त्याबरोबर तिनेंहि तोंड फिरवलें, एकदां देवस्थळी सर आपल्याकडे रागानें पहाताहेत कीं काय तें जाणून घेण्यासाठीं त्यांच्याकडे बघितलें, आणि त्यांच्या मुद्रेवर तसा कांहींच भाव तिला दिसला नाहीं, तेव्हां एखाद्या खोडकर मुलाच्या बालिशपणानें तिनें एकदां किंचित् स्मित केलें आणि वहींत मजकूर लिहून घेण्याची ती घाईघाईनें तयारी करूं लागली.

"एक पिता आणि त्याची कन्या यांच्या वयांचें गुणोत्तर आज पांचास दोन असें आहे. सात वर्षांपूर्वी..."

उदाहरण सांगतांनासुद्धां देवस्थळी मास्तरांची दृष्टि तिच्यावर खिळून राहिली होती.

तिनें कानांत कर्णफुलें घातली होतीं, तीं झुंबरांसारखीं लोंबत होतीं. शाळेंत यायला निघतांना गालाला तिनें मुखराग लावलेला दिसत होता. आकाशी रंगाचें पांचवारी पातळ ती नेसलेली होती आणि उडतीं फुलपांखरें किंवा तसलेंच कांहीं तरी छापलेल्या कापडाचा जो ब्लाऊज तिनें अंगांत घातला होता त्याच्या दोन्ही खांद्यांवरचे फुगे मोठ्या दिमाखानें तुरा काढून उंचावर कोंबडे बसावेत त्याप्रमाणें दिसत होते.

या गोष्टींकडे त्यांचें लक्ष आज प्रथमच गेलें. पण तसें तें गेल्याक्षणींच एक विलक्षण गोष्ट त्यांच्या ध्यानांत आली. नखरेलपणाचे सगळे साज वापरूनसुद्धां अनुराधेच्या मुद्रेवर किंवा हालचालींवर यत्किंचितहि नखरेलपणा दिसत नव्हता. त्यांच्या मनांत एक शंका येऊन गेली— माणसाच्या ठिकाणीं सात्त्विकतेचा गुण हा स्वभावतःच असतो काय? आणि नखरेलपणा हा साजशृंगारावर फारसा अवलंबून नसून त्यासाठीं माणसाची वृत्तीच तशी असावी लागते काय? कीं हें केवळ आपल्यालाच दिसतें आहे? हें म्हणतां म्हणतां ते दचकले आणि त्यांच्या मनांत आलें, 'आपण आजच या मुलीविषयीं हा असा इतका विचार कां करीत आहोंत? आज आपल्याला एकुणपन्नासावें वर्ष चालू आहे. बावीस वर्षें झालीं, आपण शिक्षकाचा व्यवसाय करीत आहोंत. पण आपल्या मनांत हें असलं कधीं आलं नव्हतं. एखाद्या धरणामध्यें नदीच्या उगमाकडून पाणी यावं, कांहीं काळ तेथें तुंबून रहावं आणि नंतर या नाहीं तर त्या वाटेनें निघून जावं तद्वत् मुलांच्या

या ओघाशीं आपल्या जीविताचा फारच थोडा काळ संपर्क येतो.'

आपल्या जीविताला धरणाची उपमा दिल्याबद्दल देवस्थळी मास्तरांना स्वतः-चेंच हसूं आलें. (गणिताबरोबरच ते संस्कृतहि शिकवीत, त्यामुळें ही उपमा त्यांना सुचली.) 'धरणाच्या भिंतीखालच्या मोऱ्यांतून किंवा कालव्यांतून बाहेर पडलेला एकादा तरी जलबिंदु आकाशांत वाफेच्या स्वरूपांत जाऊन परत पावसाच्या रूपानं धरणाच्या तुंबाऱ्यांत येण्याचा संभव तरी असतो, परंतु आपल्या जीवितांतून एकदां विद्यार्थी बाहेर निघून गेला, कीं त्याचं जग नि आपलं जग अगदीं निराळं होऊन जातं.' कुठल्याहि उपमेची इतकी चिकित्सा भाषा-विषयाच्या शिक्षकावांचून कुणी करीत नसेल. त्याचा तो व्यवसायच असतो. मात्र ही चिकित्सा करतांना त्याचें मन सर्वस्वीं अलिप्त असतें. परंतु स्वतःच्या जीविताला दिलेल्या या उपमेंतून साम्याबरोबर हा विरोधहि देवस्थळी मास्तरांच्या ध्यानांत आला, तेव्हां त्यांचें मन पराकाष्ठेचें खिन्न झालें. आणि ते म्हणाले, 'आजपर्यंत शाळेंतल्या मुलांच्या मायापाशांत गुरफटण्याचं मीं प्रयत्नानं टाळलं आणि आजच माझं मन एका साध्या मुलीविषयीं इतकं अस्वस्थ कां होत आहे?'

ही अस्वस्थता कशा प्रकारची आहे, त्यांना कांहीं कल्पना होईना. त्यांना तिची जाणीव आज झाली, तरी अधिक विचारान्तीं अनुराधा विप्रदास या मुलीला बघितलें कीं, आपल्या मनांत अनामिक हुरहूर प्रवेश करीत असते, याची त्यांना आठवण झाली.

मनाची अस्वस्थता घालवण्याच्या हेतूनें, आधीं घातलेलें उदाहरण ज्यांचें सोडवून झालेलें असेल त्या मुलांच्यासाठीं त्यांनीं फळ्यावर मुंबई विद्यापीठाला, कां कुणास ठाऊक, आवडत असलेल्या सरस्वती आणि सावित्री या जुनाट नांवांच्या भगिनीद्वयाच्या वयांचें नवीन उदाहरण लिहावयास सुरुवात केली. मुलें तें सोडवूं लागलीं. देवस्थळी त्यांच्यावर नजर ठेवण्यासाठीं आणि लागल्यास व्यक्तिगत साह्य करण्यासाठीं बाकांच्या रांगांतून फिरूं लागले.

उषा मोहितेच्या जागेपाशीं थोड्या वेळानें ते आले आणि त्यांनीं सहज उभ्या उभ्या तिच्या वहीकडे दृष्टि टाकली तों तिनें दोघां मुलींचीं चित्रें काढलेलीं!

"हें ग काय मोहिते? या कोण? सरस्वती आणि सावित्री का?" त्यांनीं तिला विचारलें.

मोहिते लाजून उभी राहिली. तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

"चित्रं काय काढत होतीस? तुला येत का नाहीं आहे हें उदाहरण?" त्यांनीं न रागावतां विचारलें.

"सर, मला हें कांहीं उलगडत नाहीं!" तिनें कबुली दिली.

अनुराधेची वही त्यांनीं बघितली. तिनेंहि उदाहरण सोडवलें नव्हतें.

"विप्रदास, तुझं काय म्हणणं आहे?"

"सर, मलाहि तें उलगडत नाहीं. गोंधळ उडतो."

"कशाचा गोंधळ उडतो?"

"कशाच्या किती पट करायचं, नि कशाबरोबर दाखवायचं, तें काय तें—म्हणजे..."

देवस्थळी हसले. त्यांनीं लगलीच क्वचित् माहिती प्रत्यक्ष सांगून, क्वचित् प्रश्न विचारून, तिला आणि मोहितेला समीकरण काढण्यास मदत केली. तें समीकरण सोडवून उदाहरण पुरें करावयास त्यांना सांगून ते पुढें चालूं लागले.

दुसरा तास त्यांना मोकळा होता. तेव्हां आरामखुर्चीत पडल्या पडल्या वृत्तपत्र वाचावें म्हणून पलीकडे लोड ठेवलेले होते तेथें पडलेला 'ज्ञानप्रकाश'चा अंक घेऊन ते आरामखुर्चीच्या रांगेकडे वळले.

पण त्यांचें वाचण्याकडे लक्ष लागेना. त्यांचें मन सैराट सुटलें. त्याला पायबंद घालायचा असेल तर कांहीं तरी बोलणें सुरू करावें असा विचार करून, दोन खुर्च्या टाकून पलीकडे पाळंदे मास्तर कसलेंसें पुस्तक वाचीत होते, त्यांना त्यांनीं प्रश्न केला, "काय पाळंदे, कसलं पुस्तक वाचतांहां?"

पाळंदे म्हणाले, "शरद्बाबूंचं 'विप्रदास'! मामा वरेरकरांनीं अनुवाद केला आहे!"

देवस्थळींची जणुं वाचाच नष्ट झाली. कुणी तरी काळजांतून आरपार तीक्ष्ण सुई खुपसावी तसें त्यांना झालें.

पाळंदे पुढें म्हणाले, "पुस्तक झकास आहे! आणि अनुवादहि चांगला उतरला आहे. शरत्साहित्याला मराठींत आणून मामांनीं मराठीची फार मोठी कामगिरी केली आहे! तुम्हांला नाहीं वाटत?"

"हूं!" देवस्थळी म्हणाले.

"विप्रदास नांव छान आहे, नाहीं?"

"हूं!"

"आपल्याकडे सातवीमध्यें अनुराधा विप्रदास म्हणून मुलगी आहे ना?

मला वाटतं, तुम्ही त्या वर्गाला गणित—कीं संस्कृत?"

"संस्कृत नाहीं! गणित!"

"विप्रदास हें बंगाली नांव महाराष्ट्रीयांत कधीं ऐकलं नाहीं!"

"आहे, महाराष्ट्रीयांत तें नांव आहे, पण आडनांव म्हणून. बंगाल्यांत तें व्यक्तीचं नांव म्हणून आहे. अर्थातच आपल्याकडे तें जोशी, कुळकर्णी, देश-मुख नि देशपांडे यांच्याइतकं सामान्यपणानं आढळणारं नाहीं!"

"म्हणजे, सध्यां ही एकच मुलगी आहे तिच्यावरून म्हणतां ना?"

"छे, छे! मी शाळेंत विद्यार्थी असतांना महादेव नारायण विप्रदास म्हणून एक मुलगा होता आमच्या वर्गात."

"त्याची कुणी आहे कीं काय ही?"

"नाहीं! मीं एकदां विचारलं होतं तिला!"

बैठकीच्या पलीकडच्या बाजूला दोघे शिक्षक लोडांशीं अस्ताव्यस्त पडून सिगरेटचा धूर उडवीत होते आणि त्याचबरोबर वाद करीत होते. त्यांचा वाद पाळंदे ऐकत होते कीं नुसताच स्वतःच्या मनाशीं विचार करीत होते, कुणास ठाऊक, पण त्या दोघांच्या वादामध्यें थोडा वेळ खंड पडून जरा शांतता झाली तेव्हां ते अचानक म्हणाले, "देवस्थळी, तुम्ही कांहींहि म्हणा, या अनुराधा विप्रदासच्या चर्येत काय माधुरी असेल ती असो, पण तिच्याकडे बघितलं, कीं एकदम वाटतं, ही मुलगी स्वभावानं अतिशय शांत आणि सालस असली पाहिजे. तुम्हांला काय वाटतं?"

देवस्थळी मास्तरांनीं मनांतून मोठा, पण प्रत्यक्ष सूक्ष्म हुंकार दिला.

वास्तविक पाळंदे मास्तरांनीं ज्या गोष्टीचा उच्चार केला होता तीच गोष्ट देवस्थळी मास्तरांच्या मनांत होती. पण तें शब्द ऐकून त्यांच्या मनांतील हुरहुर शतपटींनीं वाढली. पाळंदे त्यांच्याच वयाचे होते. ते कांहीं अनुराधेला त्यांच्यापासून हिरावून घेणार नव्हते. आणि हिरावून घेणार असते तरी स्वतः देवस्थळी मास्तरांची तिच्यावर काय सत्ता होती? पण त्यांचं मनच अशा कांहीं विकल अवस्थेला गेलेलें होतें कीं, त्याला आपल्या आवडत्या व्यक्तीची दुसऱ्यानं केलेली स्तुति सहन झाली नाहीं आणि पुष्कळ दिवस आपण जिवाभावानं जतन करून ठेवलेल्या रहस्याचा कुणीं भेद केला म्हणजे माणसाला जसा उद्वेग येतो तसा त्यांना आला.

देवस्थळी मास्तरांच्या मनाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती.

त्यांना आपल्याला काय होतें आहे तें कळेना. त्याचप्रमाणें आपल्याला काय हवें आहे तेंहि त्यांना उमगेना. आपलें मन अनुराधा विप्रदासवर जडलें आहे का ? त्यांना हा विचार हास्यास्पद वाटला. निदान इतरांना तो हास्यास्पद वाटेल असें त्यांना वाटलें.

त्यांचें मन विव्हल झालें होतें यांत शंकाच नव्हती. पण आपण अनुराधेवर आसक्त आहोंत अशी त्यांचें मन कांहीं केल्या कबुली देईना. आपल्याला तिच्या सान्निध्यांत परमावधीची मनःशांति आणि सुख मिळतें आणि मिळेल याची त्यांना खात्री वाटत होती; पण त्यामध्यें प्रणयाची मादकता आहे कीं नाहीं, तें त्यांना समजेना. अनुराधा एकाद्या दिवशीं वर्गांत दिसली नाहीं, तर त्यांना हुरहुर वाटे. पण ती हुरहुर कशाची आहे तें त्यांना स्वतःलाच नक्की सांगतां येत नसे.

त्यांनीं मनाला अतिशय चमत्कारिक प्रश्न करून पाहिला.

"मला तिच्या शरीरस्पर्शाची आस लागली आहे का ?"

त्यांचें मन बुचकळ्यांत पडलें.

कारण, शरीरस्पर्शाला जो व्यावहारिक अर्थ आहे त्या अर्थानें त्यांना ती गोष्ट संभवनीय वाटेना. किंबहुना, त्या अर्थाची कल्पना मनांत आल्याक्षणींच त्यांना घृणा वाटली आणि आपल्या मनाचाच त्यांनीं अधिक्षेप केला. पण त्याच वेळीं आपण तिला हृदयाशीं धरलें, तर आपल्याला परमावधीचें सुख होईल, ही गोष्ट त्यांच्या मनाला नाकारतां येईना. हा विचार येतां येतांच तिच्या स्पर्शसुखाच्या मानसिक लाभानें त्यांना अंशतः कां होईना, विकृत कां होईना, पण तृप्ति मिळून त्यांचें शरीर किती तरी वेळां पुलकित झालें.

अनुराधा विप्रदास सहामाही परीक्षेत गणित विषयांत नापास झाली.

दिवाळीच्या सुटीनंतर ज्या दिवशीं शाळा भरली त्याच दिवशीं परीक्षेचा निकाल लागला होता. निकाल लागल्यानंतर आठव्या दिवशीं शाळा सुटल्यावर अनुराधा विप्रदास आणि उषा मोहिते या दोघी जणी देवस्थळी मास्तरांच्याकडे आल्या. त्यांनीं 'काय ?' म्हणून विचारल्याबरोबर अनुराधा रडूं लागली. देवस्थळी मास्तरांच्या हृदयांत कालवाकालव होऊं लागली.

बोलण्याचें काम उषा मोहितेनें केलें. ती म्हणाली, "सर, अनुराधा गणितांत नापास झाली आहे आणि मी पास झालें असलें तरी नांवालाच, म्हणजे अगदीं कांठावरच पास झालें आहें. आमची शिकवणी घेतां का, म्हणून

आम्ही तुम्हांला विचारायला आलों आहोंत. आमच्या वडिलांची आम्हीं परवानगी विचारली आहे. तुम्हांला वेळ होईल का ? आपल्याला माझ्या किंवा अनुराधेच्या घरीं बसावं लागेल."

अनुराधेचें रडणें थांबलें नव्हतें.

शाळा सुटली होती. सगळीकडे शांत होतें. शाळा तिमजली असल्यामुळें आतां जिकडे तिकडे सावलीचेंच साम्राज्य होतें. फक्त पश्चिमेच्या दिशेला जे वर्ग होते त्यांमध्यें तिकडच्या बाजूच्या खिडक्यांतून मावळत्या सूर्याचा प्रकाश आंत येऊन भरून राहिला होता, त्यामुळें त्या वर्गांच्या या बाजूच्या खिडक्यांचीं तावदानें उजळून आंतला प्रकाश दाखवीत होतीं.

दोन दिवसांपूर्वींच सातवीच्या दुसऱ्या वर्गाला संस्कृतच्या तासाच्या वेळीं शिकवीत असतांना वाल्मीकीच्या तपोवनाचा उल्लेख आला होता, तेव्हां देवस्थळी मास्तरांनीं संस्कृत वाङ्मयांतून आढळणाऱ्या तपोवनांचें रसभरित वर्णन केलें होतें. तें आत्तां त्यांना आठवलें. तपोवनांतील सगळे प्राणी शाश्वत वैर विसरून शांतपणानें आपलें आयुष्य तपस्व्यांच्याबरोबर कंठीत आहेत, पाटांच्या पाण्यांनीं मोठमोठ्या वृक्षांचीं मुळें पार धुऊन जाऊन उघडीं पडलीं आहेत, गर्द झाडींत असलेल्या आश्रमांतून होमहवन चाललें असतांना उठणाऱ्या धुराच्या लोटांनीं झाडांच्या पालवीला विलक्षण रंग चढलेला आहे, अशा या शांत आणि निरामय वातावरणांत थंडीच्या दिवसांमध्यें संध्याकाळच्या वेळीं उबाऱ्यासाठीं स्थंडिलाभोंवतीं पोटाशीं पाय घेऊन हरिणबालकें...

या हरिणबालकांचें वर्णन करतांना त्या वेळीं त्यांच्या हृदयांत कसली तरी विलक्षण कालवाकालव झाली होती. आत्तां त्यांच्यासमोर अश्रु ढाळणारी अनुराधा विप्रदास उभी असतांना तशाच प्रकारची कालवाकालव त्यांच्या हृदयांत होऊं लागली. त्या हरिणबालकांप्रमाणें अनुराधेला आपल्या हृदयाशीं घेऊन कुरवाळून, सांत्वन करून...

"सर, तुम्ही गप्प कां? विचार कसला करतां आहांत? तुम्हांला वेळ आहे ना? कधींपासून याल शिकवायला?"

भीमबळानें देवस्थळी मास्तरांनीं आपल्या मनांतला कोलाहल गप्प केला आणि म्हटलें, "माफ करा! तुमची शिकवणी घ्यायला मला वेळ नाहीं."

त्या दोघी कष्टी झालेल्या दिसल्या. अनुराधा म्हणाली, "सर, तुम्ही केव्हांहि आलांत तरी चालेल."

"खरंच सांगतों, अगदीं भिंतीमधल्या विटांच्यासारखा माझा कार्यक्रम बांधलेला आहे. तुम्ही दुसऱ्या कुणाला तरी विचारा."

"सर, पण तुम्हीच आम्हांला शिकवायला हवे होतां."

देवस्थळी मास्तरांच्या मनांत क्षणभर आलें, या मुलींना उत्तर द्यावें, 'आहे, संध्याकाळीं शाळा सुटल्यानंतर मला वेळ आहे. मी येईन शिकवायला. तुम्हांला शिकवायला मला केवढा आनंद वाटेल याची तुम्हांला कल्पना नाहीं.' पण त्यांनीं तसें उत्तर दिलें नाहीं. अनुराधेच्या इतक्या जवळ जर आपण गेलों तर आपल्या मनाच्या सध्यांच्या अवस्थेंत आपल्याला यातनाच अधिक होतील. आपल्या मनांत रुजलेली प्रीतीची, किंवा कशाची कुणास टाऊक, ही जी भावना आहे, ती कधीं सफळ होईल, असं आपल्याला वाटत नाहीं—नि ती सफळ व्हावी असंहि वाटत नाहीं. आपल्याला स्वतःला ती कितीहि हास्यास्पद वाटत असली तरी ती आपली आपल्या मनांतच राहणार. या निष्पाप बालिकांच्या समोर आपलं वर्तन अगदीं निर्लेप राह्यलं पाहिजे. त्यासाठीं त्यांच्या घनिष्ठ संपर्काची ही संधि आपण टाळणं हेंच युक्त. या साऱ्या विचारानें त्यांनीं उत्तर दिलें, "काय करणार? माणसाच्या मनांत असलेल्या साऱ्याच गोष्टी नेहमींच साध्य होत नाहींत."

"सर, पण तुम्हीं वेळ काढला असतान तर बरं झालं असतं!"

"खेद वाटतो, पण निरुपाय आहे!"

"कांहीं करा, पण सर, वेळ काढा ना! केव्हांहि चालेल आम्हांला!"

"बरं मग, काढतों वेळ! पहाटे साडेचारला येईन! चालेल? आणि शंभर रुपये घेईन दोघींचे मिळून! आहे कबूल?"

दोघी त्यांच्याकडे पहातच राहिल्या. उषा मोहिते म्हणाली, "सर, काय बोलतां हें? आम्हांला कसं शक्य आहे हें?"

अनुराधेनें परस्परच तिला उत्तर दिलें, "अग, नाहीं म्हणूनच सांगताहेत ते! पण जरा निराळ्या शब्दांत, एवढंच!"

त्या दोघी जणी परत जाण्यासाठीं वळल्या. तेवढ्यांत अनुराधेच्या हातांतली कंपास पेटी खळ्कन् खालीं जमिनीवर पडली आणि तिच्यांतलीं सारीं उपकरणें, कांहीं पैसे, एक पातें इत्यादि वस्तु इतस्ततः विखुरल्या गेल्या. तिघांनीं मिळून त्या एकत्र करून परत पेटींत भरल्या आणि मग त्या दोघी निघून गेल्या.

देवस्थळी मास्तरहि जरा विश्रांति घेण्यासाठीं बैठकींत जावें म्हणून तिकडे

वळले, तों भिंतीशीं जमिनीवर एक रबर पडलेलें त्यांना दिसलें. त्यांनीं तें उचललें. तें अनुराधेचेंच असलें पाहिजे, यांत शंका नव्हती. तें लुसलुशीत आणि मऊ रबर हातांत घेऊन चाचपतांना कसल्या तरी अनामिक संज्ञालहरी त्यांच्या सर्वांगांतून थरथरून गेल्या. त्यांनीं तें क्षणभर दोन्ही हातांच्या तळव्यांत दाबलें आणि नंतर खिशांत ठेवलें.

जड अंतःकरणानें बैठकींत जाऊन आरामखुर्चीत अंग टाकतांना त्यांचं मन म्हणूं लागलें, 'निसर्गानं माझ्याशीं कसला क्रूर खेळ चालवला आहे हा? तरुणतरुणींच्या प्रणयांतून सृष्टिक्रम चालू राहण्याचं कार्य व्हायचं असतं. पण माझ्या या अनाकलनीय विचित्र प्रीतीच्या लाटेंतून मनस्तापाशिवाय दुसरं कांहींच बाहेर पडणार नाहीं! आणि माझ्यावर आलेली ही प्रीतीची चमत्कारिक लाट टिकणार आहे तरी किती दिवस? चार महिने? सहा महिने? एक वर्ष?...'

शाळेच्या इतर वर्गांची नऊमाही आणि सातवीची पूर्वपरीक्षा जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्याच्या शेवटीं चालू झाली होती. निरनिराळ्या वर्गांचे विद्यार्थी एकाआड एक असे पेरून बसवलेले होते. ज्या वर्गात अनुराधा विप्रदासचा क्रमांक होता त्याच वर्गात देवस्थळी पर्यवेक्षक होते. पेपर गणिताचा होता. बाकांच्या रांगांतून ते हिंडत होते. मुलांनीं लिहिलेला मजकूर ते सहसा वाचीत नसत. पण एकदां हिंडतां हिंडतां त्यांची दृष्टि सहज अनुराधेच्या पेपरावर पडली आणि ते क्षणभर थांबले. पानाच्या पहिल्याच दोन ओळींवर लिहिलेलीं अक्षरें त्यांना दिसलीं :

"वर्तुळाच्या जीवा जर समान असतील तर त्या वर्तुळमध्यापासून समान अंतरावर असतात."

विचारलेल्या प्रमेयाचा ती व्यत्यास लिहीत होती.

या उत्तराला तिला शून्य गुण मिळणार हें उघड होतें.

एकाच जागीं फार वेळ थांबणें अनुचित असतें, या विचारानें ते पुढें सरकले आणि मनाशीं म्हणाले, 'या मुलीला तिची चूक दाखवून द्यावी काय?'

त्यांच्या न्यायी मनानें नकार दिला.

पण मग त्यांच्या मनांत पुन्हा विचार आला, 'परंतु तिची गाडी भलत्याच रुळावर घसरली आहे, तेव्हां तिला सावध करून मार्गावर आणणं म्हणजे उत्तर सांगणं असं कसं होईल?'

'पण मग पर्यवेक्षकांनीं विद्यार्थ्यांशीं एक अक्षरहि बोलायचं नसतं या

नियमाचं काय ? '

तिच्या जागेजवळ जावें आणि तेथें गेल्यावर जें सुचेल तें करावें, असा विचार करून ते परत फिरले, आणि पुन्हा अनुराधेजवळ आले.

पण या वेळपर्यंत तिनें मघांचें पान उलटलें होतें आणि ती नवीन प्रश्नाला सुरुवात करण्याच्या बेतांत होती. आपल्या न्यायप्रियतेची कसोटी पाहण्याची देवस्थळी मास्तरांची ती संधि निघून गेली.

परंतु आणखी पंधराच दिवसांनीं याच आपल्या न्यायप्रियतेची कसोटी पाहण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला.

पूर्वपरीक्षेचा निकाल लागला आणि विद्यापीठाच्या परीक्षेला बसण्याची परवानगी ज्यांना मिळाली नव्हती त्यांचे लागेबांधे शाळेंत येऊन 'पुरवणी यादीं'त आपल्या मुलाचें नांव यावें म्हणून पायताणें झिजवूं लागले, प्रमुखांपाशीं वजन खर्च करूं लागले.

अनुराधेचें नांव 'पहिल्या यादीं'त प्रसिद्ध झालें नव्हतें, कारण ती पूर्व-परीक्षेंत नापास होऊन तिला विद्यापीठाच्या परीक्षेची परवानगी मिळाली नव्हती.

जे शिक्षक सातवीच्या वर्गांना शिकवतात त्यांना या प्रकारचा अनुभव दर वर्षीं येत असतो. याद्यांच्या प्रसिद्धीनें त्यांच्या मनावर फारसा परिणाम होत नाहीं, कारण कोणत्या मुलांना परवानगी मिळणार नाहीं, याची स्थूल मानानें त्यांना वर्षभर कल्पना असते. परंतु देवस्थळी मास्तरांना अनुराधा विप्रदासला परवानगी मिळाली नाहीं याचा खेद वाटला. तिच्यासंबंधांत त्यांचें मनच निराळें झालें होतें. ती बातमी कळल्यावर त्यांच्या मनांत एकदम विचार आला, कीं आपण प्रमुखांची गांठ घेऊन त्यांच्यापाशीं तिच्याबद्दल शब्द टाकावा. पण लगेच 'आपण कोणत्या आधारावर शब्द टाकणार ?' ही शंका त्यांच्या मनांत आली. त्यांना वाटलें, 'तिच्या अभ्यासाचा प्रश्नच नाहीं. परीक्षेनं त्याचा निर्णय दिलाच आहे. आपली तिला शिकवणी असती, तर शब्द टाकणं वाईट दिसलं असतं खरं, पण तें साहजिक तरी दिसलं असतं. आणि शेवटच्या परीक्षेपर्यंत आटोकाट प्रयत्न करून आपण तिची पासापुरती कां होईना, पण तयारी करून घेऊं, अशी ग्वाही देतां आली असती. इथं तसं कांहींच नाहीं. आपला स्वार्थ कांहीं नसला तरी दिसायला कसं दिसेल हें ?'

आपण प्रमुखांजवळ शब्द टाकायचा नाहीं, असा त्यांनीं निर्णय घेतला.

पण त्याच क्षणीं ते चमकले ! असा निर्णय आपण कां घेत आहोंत ? त्याच्या

बुडाशीं केवळ आपली न्यायप्रियता किंवा कसं दिसेल या विचाराची भीति एवढंच कारण आहे काय? कीं ती नापास होऊन खालीं राहिल्यानं आपल्याला तिचा सहवास आणखी एक वर्ष मिळेल हेंहि एक स्वार्थी कारण आहे?

हें म्हणतां म्हणतांच त्यांच्या मनांतला वाङ्मयशिक्षक जागा झाला. गिरणी-मधील साच्यांतल्या धोट्याप्रमाणं माणसाचं मन किती झपाट्यानं उलटसुलट विचार करूं लागतं! पण—पण—साच्यांतल्या त्या धोट्याच्या उलटसुलट गतीमुळं निदान कापड तरी तयार होत असतं, पण आपण मात्र आहोंत तिथंच आहोंत! अशा रीतीनें स्वतःचीच उपमा दोन्ही बाजूंनीं पारखून झाल्यावर सरते शेवटीं त्यांनीं नास्तिपक्षीं निर्णय पक्का करून टाकला.

आरामखुर्चीत बसून ते सिगारेट पेटवण्याच्या तयारींत होते. इतक्यांत शाळेचा गडी त्यांच्याकडे आला आणि म्हणाला, "तुम्हांला थोरले साहेब बोलावताहेत."

देवस्थळी आल्यावर प्रमुखांनीं त्यांना बसायला सांगून एकदम बोलायला सुरुवात केली, "मीं तुम्हांला बोलावणं पाठवलं, तें अशासाठीं, कीं सातवीच्या वर्गात आपल्याकडे अनुराधा विप्रदास आहे ती ठाऊक आहे ना तुम्हांला? तिच्यासाठीं तिच्या वर्गशिक्षकांनीं माझ्याकडे शब्द टाकला आहे. त्यांनीं तिचं इंग्रजी या येत्या दीड महिन्यांत चांगलं, म्हणजे पासापुरतं, करून घ्यायची हमी घेतली आहे. तेव्हां आतां प्रमुख विषय म्हणून गणिताचा विचार करायचा राहिला. त्या बाबतींत तुमचा विचार घ्यावा म्हणून तुम्हांला बोलावलं. गणिताचाहि अभ्यास तिनं केला, तर पास होण्याची तयारी तिच्या हातून होऊं शकेल का? तुम्हांला काय वाटतं?"

देवस्थळी स्तिमित होऊन क्षणभर गप्प झाले. नंतर ते म्हणाले, "सगळ्याच मुलांचा अभ्यास याच दीड महिन्यांत कसोशीनं होत असतो. तेव्हां तिनं तसा कसोशीनं अभ्यास केला तर तिची पास होण्याइतपत तयारी व्हायला कांहीं हरकत दिसत नाहीं. त्यांतून एकाद्या वर्षी प्रश्नहि कमालीचे सोपे येतात. तेव्हां—"

"विचारण्याचा आशय असा, कीं तिला फॉर्म दिला कीं, तिच्याचसारखे मार्क पडलेल्या आणखी दोघांना पाठवावं लागणार आहे. तेव्हां कुणाची संधीहि जाऊं नये आणि कुणावर अन्यायहि होऊं नये. मग काय? तुमचं म्हणणं त्यांना पाठवावं?"

"मला वाटतं, कांहीं हरकत नाहीं पाठवायला."

"ठीक आहे. एवढंच विचारायचं होतं मला. तुम्हांला जायला हरकत नाहीं!"

शाळा सुटल्यावर अनुराधा विप्रदास त्यांच्याकडे आली आणि म्हणाली, "सर, मला तुमचे आभार मानायचे आहेत."

"कशाबद्दल?"

"तुम्हीं मला फॉर्म मिळवून द्यायला मदत केलीत."

"मला भलतं श्रेय देऊं नकोस. मीं कांहीं केलं नाहीं!"

"पण सर, मला सारं कळलं. आमच्या वर्गशिक्षकांच्याबरोबरच तुमचंहि मत विचारलं होतं. तेव्हां तुम्हीं रुकार दिलात ना?"

"असो. झालं तें चांगलं झालं! आतां चांगला अभ्यास कर नि पास हो म्हणजे झालं."

"सर, तुमची आम्ही निराशा करणार नाहीं. पण सर, आतां हा शेवटला दीड महिना तरी मला नि उपेला गणित शिकवा ना! तुम्ही म्हणाल तें, नि म्हणाल तितकं, आम्ही करूं सर!"

"मला खरंच वेळ नाहीं विप्रदास! परीक्षेला थोडे दिवस राहिले आहेत. तेव्हां शिक्षकांचं अगदीं मरण..."

या वेळीं मात्र देवस्थळी मास्तरांना खरोखरच वेळ नव्हता.

अनुराधा कष्टी झालेली दिसली.

देवस्थळी म्हणाले, "पण तुम्हांला मी एका गृहस्थाचं नांव सांगतों. त्याचं शिकवणं तुम्हांला पसंत पडेल, याची मला खात्री आहे. माझे ते एके काळचे शिष्य आहेत. ते माझ्याइतकंच चांगलं—म्हणजे माझं शिकवणं तुम्हांला चांगलं वाटत असलं तर..."

"सर, काय म्हणतां हें?"

"आतां या थोड्या अवकाशांत तत्त्वं शिकणं अवघडच असतं. आणि त्याची फारशी जरूरीहि नसते. परीक्षेच्या दृष्टीनं आडाखे बसवलेल्या मार्गानं पास होण्याइतपत तयारी करायची म्हणजे त्या मानानं काम सोपं आहे. ते तुमची तशी तयारी चांगली करून घेतील याची मला खात्री वाटते."

ती निघून गेली तसा कांहींसा सुटकेचा निःश्वास देवस्थळी मास्तरांनीं टाकला.

उन्हाळ्याची सुटी आली आणि गेली. पहिला पाऊस पडला आणि जून महिना आला. पहिल्या आठवड्यांत विद्यापीठाच्या प्रवेशपरीक्षेचा निकाल बाहेर पडला. वर्तमानपत्रांत देवस्थळी मास्तरांनीं तो वाचला. त्यांत अनुराधा

विप्रदास हें नांव त्यांना दिसलें.

पण तें पाहून त्यांना कांहीं म्हटल्या कांहींच वाटलें नाहीं. त्यांना आश्चर्य वाटलें! अनुराधा विप्रदास शाळेंत दिसली किंवा नाहीं दिसली, कुणाच्या बोलण्यांत तिचा उल्लेख आला किंवा तिचें नांव दृष्टीस पडलें, तर मन निर्विकार राहण्याचा, त्यांनीं आठवून पाहिलें, गेल्या दहा महिन्यांतला हा पहिलाच प्रसंग होता. आपल्यामध्यें हा फरक केव्हां आणि कसा झाला हें त्यांना कळेना. सातवीच्या वर्गांतलीं कांहीं मुलें दर वर्षी पास होतात नि कांहीं मुलें नापास होतात, तेव्हां त्यांत हर्षविषाद वाटण्यासारखें फारसें नसतें, याच विचारप्रणालीनें सामान्यतः शिक्षक निर्विकार असतात. पण अनुराधेच्या बाबतींत असें होईल, असें त्यांना वाटलें नव्हतें. निदान उन्हाळयाच्या सुटीसाठीं शाळा बंद होण्याच्या वेळीं वाटलें नव्हतें. पण आज तर त्यांना तो अनुभव प्रत्यक्ष येत होता. पूर्व-परीक्षेच्या निकालाच्या दिवशीं झालेल्या त्यांच्या मनांतल्या हुरहुरीचा आतां मागमूसहि नव्हता!

'ती पास झाली आणि आपल्या आयुष्यांतला तिचा सहवास संपला म्हणून असं वाटतं आहे का आपल्याला?' मनाशीं त्यांनीं प्रश्न करून पाहिला.

त्यांचें मन होय म्हणेना. तें म्हणालें, '—नाहीं. कारण गेल्या आठ महिन्यांत आपल्या मनावर जें अभ्रपटल आलं होतं तें जर कायम असतं, तर या प्रसंगानं आपण अधिक व्याकुळ झालों असतों; अनुराधा आपल्या जीवनांतून बाहेर पडली असती तर आपण तिच्या जीवनांत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला असता.'

पण त्यांच्या जीवितांतला तिचा सहवास अजून संपला नव्हता. आणखी एकदां त्यांना ती भेटायची होती. त्यांना शाळेंत पेढे द्यायसाठीं ती त्या दिवशीं आली तेव्हां भेटली. त्यांनीं तिचें मनापासून, म्हणजे आधीं येऊन गेलेल्या तिघां विद्यार्थ्यांच्यासारखें, अभिनंदन केलें.

अनुराधा म्हणाली, "सर, मी पास झालें, पण उषा नापास झाली!"

देवस्थळी मास्तरांना हे शब्द नवीन नव्हते. अशा वेळीं ते असें म्हणणाऱ्याला जें उत्तर देऊन त्याचें सांत्वन करीत तेंच त्यांनीं तिला दिलें, "वाईट झालं! पण या परीक्षा म्हणजे खऱ्या परीक्षा नव्हेतच. सगळं जमून यावं लागतं. वर्षभर केलेल्या अभ्यासाची परीक्षा शेवटच्या त्या तीन तासांत व्हायची. त्यांत मध्यें किती तरी गोष्टी येतात! प्रकृति बरोबर नसते, घरचं कुणी आजारी असतं

म्हणून मन स्वस्थ नसतं, आयत्या वेळेला मन गांगरून जातं, एकाद वेळेला प्रश्न अडला म्हणजे माणूस इतकं बावरून जातं कीं पुढचं कांहींच सुचत नाहीं, आणि हें सगळं चालू असतांना तीन तासांतला एकेक मोलाचा क्षण मात्र झिरपून जात असतो! याला काय परीक्षा म्हणायची? पण जिथं सगळंच बिघडलं आहे तिथं कशाला चांगलं म्हणणार नि कशाला वाईट म्हणणार? तूं सुटलीस या कचाट्यांतनं, बरं झालं!" यानंतर इतर मुलांच्याप्रमाणेंच त्यांनीं तिला विचारलें, "पुढं काय करणार आहेस?"

"बघायचं आतां! वडील काय म्हणतात, काका काय म्हणतात त्याच्यावर ठरेल."

देवस्थळी मास्तरांनीं "ठीक!" असा उद्गार काढला आणि अनुराधा विप्रदास निघून गेली.

इतर विद्यार्थ्यांप्रमाणेंच तिच्याशीं आपली वागणूक झाली हा देवस्थळीं मास्तरांना आपल्यावरचें अभ्रपटल गेल्याचा पुरेसा पुरावा होता. पण त्यानंतर आपल्या मनामध्यें एक विलक्षण शांति आली आहे याची त्यांना जाणीव झाली. त्यांनीं सहज चाळा म्हणून आठवण करून पाहिली. आपली ही अस्वस्थता कधीं सुरू झाली तें त्यांना आठवेना, ती संपली कधीं तें आठवेना. आणि आठवेना म्हणजे ते तिचा प्रारंभ आणि शेवट विसरले होते म्हणून नव्हे. त्यांना त्यांची जाणीवच कधीं झाली नव्हती! त्यांना जेव्हां तिची जाणीव झाली तेव्हां त्यांची स्थिति वावटळींत सांपडलेल्या एकाद्या सुकलेल्या वृक्षपर्णासारखी झाली होती. आणि आज तर, ती वावटळ निघून गेल्यानंतर भिरभिरत तिच्यांतून बाहेर उडालेलें तें पान कुठें तरी पडलेलें असावें, असा प्रकार झाला होता!

अनुराधेनें आणून दिलेला पेढा देवस्थळी मास्तरांनीं तोंडांत टाकला आणि मनांत म्हटलें, 'मानवी मन, आणि त्याच्यावर होणारे सृष्टींतल्या वस्तूंचे, व्यक्तींचे आणि कल्पनांचे आघात-प्रत्याघात किती विलक्षण! आणि यांच्यांतून मानवी जीवनाचा जो पट निर्माण होतो तो सुखाच्या आणि दुःखाच्या प्रसंगांनीं भरलेला असला, तरी तोहि किती विलक्षण! किती रम्य!...'

आपल्या मनाला हुरहुर वाटते आहे का तें पाहण्यासाठीं त्यांनीं मनाशीं पुनःपुन्हा उच्चार करून पाहिला, 'अनुराधा विप्रदास—अनुराधा! अनुराधे!...'

पण कांहीं नाहीं!

दुसऱ्या दिवशीं सातवीच्या त्या वर्गांत उषा मोहिते त्यांना खालीं मान घालून बसलेली दिसली. त्यांना खेद वाटला. पण त्यांत अनुराधेच्या सान्निध्याच्या स्मृतीमुळें उत्पन्न होऊं शकणारी मनोव्यथा नव्हती. नापास झालेल्या दुसऱ्या विद्यार्थ्यांबद्दल ज्या प्रकारचा आणि जेवढा खेद त्यांना वाटला असता त्या प्रकारचा आणि तेवढाच त्यांना वाटला.

आणि यानंतर तर थोड्याच वेळांत निर्विकार आणि निर्विकल्प होऊन ते शिकवूं लागले, "गेल्या वर्षी सहावींत असतांना तुम्ही $क^{३}+ख^{३}+ग^{३}-३\,कखग$ या पदावलीचं गुणपृथक्करण केलें आहे, हें तुम्हांला आठवतच असेल. आज आपण त्याचा उपयोग करून नवीन सिद्धांत शिकणार आहोत; तो हा, कीं जर $क+ख+ग=०$, तर $क^{३}+ख^{३}+ग^{३}=३\,कखग$. तो कसा तें आतां आपण पाहूं."

हा सिद्धांत फळ्यावर लिहिण्यासाठीं ते खडू घेऊन वळले....

१९४६

· ६ ·

# भिडस्त माणूस

बस्स! फक्त अकरा रुपये आणि साडेसहा आणे!

बैठकीच्या दारासमोरून शाळेचा गडी चालला होता, त्याला मुकुंद हरीनें हांक मारली, आणि त्याच्या हातावर एक आणेली ठेवून समोरच्या पानपट्टीवाल्याकडून तीन सिगरेटी आणायला त्याला सांगितल्यावर, एकाएकीं कसला तरी विचार येऊन खिशात हात घालून त्यानें पैसे मोजले, ते फक्त अकरा रुपये आणि साडेसहा आणे भरले.

तारीख तेरावी होती. महिन्याच्या सुरुवातीचीं मोटीं देणीं भागवून झालीं होतीं, तथापि आतां सटरफटर खर्च एवढ्या अकरा रुपये साडेसहा आण्यांत भागवणें भाग होतें. तेवढ्यांत आपल्याला खर्च भागवतां नाहीं आला, तर कुणाकडून तरी हातउसने घ्यावे लागणार.

पण हा विचार कांहीं आजच पहिल्यांदा आपल्या मनांत आलेला नाहीं. आपल्यासारख्या भिडस्त माणसाला जिथें स्वतःचे येणें असलेले पैसे मागायला देखील कष्ट होतात, तिथें दुसऱ्याकडे हातउसने मागायला कुठून जमणार? आजपर्यंत कधीं तें जमलें नाहीं आणि यापुढेंहि जमणार नाहीं. मुकुंद हरीला आपल्या या दुर्बलतेचें कारणहि ठाऊक होतें. तसे पैसे मागतांना आपल्याला परमावधीची खंत वाटेल हें तर खरेंच, परंतु ज्याच्याजवळ आपण मागूं त्यानें जर नकार दिला तर त्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक खंत आपल्याला वाटेल. किंबहुना, त्याच्याजवळ खरोखरीच पैसे नसल्यामुळें त्यानें नाहीं म्हटलें असलें, तरी आपल्याला वाटत राहणार, कीं आपण त्याचे पैसे बुडवूं असें वाटत असल्यामुळेंच आपल्याला पैसे द्यायला तो नकार देत आहे. स्वतःच्या मनाची ही विचित्र

घडण ठाऊक असल्यामुळेंच मुकुंद हरीनें आजवर कुणापाशीं हातउसने पैसे मागण्याचें धाडस केलें नव्हतें. सामान्य माणसाच्या धाडसाच्या कल्पनाहि किती सामान्य असतात!

यामुळेंच पैसे मोजल्यावर मुकुंद हरि जरासा शहारला. आतां सटरफटर खर्च एवढ्या अकरा रुपये साडेसहा आण्यांतच आपल्याला भागवायला पाहिजे. त्यांतले सुमारें तीन रुपये तर सिगरेटींवरच खर्च होतील. म्हणजे उरले—

तेवढ्यांत गड्यानें त्याच्या हातांत तीन सिगरेटी ठेवल्या; त्यामुळें त्याचा हिशेब, हातउसने न घ्यायचे पैसे आणि सटरफटर खर्चाची चिंता यांचे विचार थांबले. त्याच्या शेजारींच आरामखुर्चीवर पुरंदरे मास्तर बसला होता, त्याला त्यांतली एक सिगरेट देऊन मुकुंद हरि म्हणाला, "काड्यापेटी काढ!"

दोघांनीं एका काडीवर सिगरेटी चेतवल्या आणि दोघेहि जण समाधानानें धूर सोडूं लागले.

मुकुंद हरीच्या मांडीवर पडलेल्या पैशांकडे दृष्टि जाऊन पुरंदरेनें विचारलें, "चहाचे पैसे देतोस का?"

पुरंदरेच्या आवाजांत तगाद्याचा वासहि नव्हता. पण आपण किती उशीर केला पैसे द्यायला या विचाराचा जणुं दंश झाल्याप्रमाणें मुकुंद हरीनें चटकन् उत्तर दिलें, "देतों." आणि त्या अपराधाबरोबर आणखीहि एक अपराध व्हायला नको म्हणून तो पुढें म्हणाला, "साखरेचे पैसेहि त्याचबरोबर घेऊन टाक! किती द्यायचे साखरेचे?"

"सव्वा रुपया!" पुरंदरे म्हणाला.

शाळेंत या मंडळीचा चहाचा खाजगी क्लब होता. त्याची मासिक वर्गणी दीड रुपया आणि अर्धा शेर साखर इतकी असे. शिधावाटप खात्यानें क्लबांना साखर देण्याची प्रथा बंद केल्यापासून प्रत्येकाकडून महिन्याची साखर घेणें या मंडळीला भाग पडलें. बहुतेक जण साखर घरून आणून देत; परंतु ज्यांना ती देतां येणें शक्य नसे ते पुरंदरेला काळ्या बाजारांतून आणण्यास सांगत आणि तिची किंमत ते देत. पुरंदरे क्लबचा चिटणीस होता.

मुकुंद हरीनें त्याच्या हातावर पावणेतीन रुपये ठेवले आणि म्हटलें, "काय रे ए पुरंदरे! अर्ध्या शेराला सव्वा रुपया? कुणी तरी अंगाचा लचका तोडल्यासारखं वाटतं!"

"काय करणार? झाली आहे खरी परिस्थिति तशी! मी साखर आणतों, पण

ती येते कुठून आणि किती लोकांच्या हातून त्याचा कांहींच पत्ता मला लागत नाहीं. पण त्याचबरोबर जो मला ती प्रत्यक्ष आणून देतो त्याला तोडतां येत नाहीं असं कांहीं विचित्रच प्रकरण झालं आहे! आपलेच दांत नि आपलेच ओठ! साखर घरून आणणं तुला शक्यच नाहीं का अगदीं?"

"कसं शक्य होणार? घरांत इनमिन तीन माणसं! तिघांच्या साखरेंतून अर्धा शेर साखर काढणं जमत नाहीं. माणसं अधिक असतीं तर तितकी साखर निघाली असती."

"होय. तेंहि खरंच!"

"मला वाटतं, पुढच्या महिन्यापासून चहा घेणंच बंद करावं. इतके दिवस मी म्हणत असें, अर्ध्या शेराच्या पावणे चार आण्यांवर जेवढे पैसे अधिक पडतील तेवढे चोरीला गेले असं मानायचं नि स्वस्थ बसायचं! पण आतां मनाचं सांत्वन करण्याची त्या विचाराचीहि शक्ति नाहीशी होत चालली आहे."

दोघांचा थोडा वेळ सिगरेटीचा धूर फुंकण्यांत गेला.

नंतर मध्येंच धुराचा एक मोठा लोट सोडून तो झटक्यासरशीं बोटानें कापीत मुकुंद हरि म्हणाला, "तुरुंगांतून सुटका झाल्यावर जवाहरलाल नेहरूंनीं प्रथम उद्गार काढले, कीं काळा बाजार करणाऱ्या एकदोघां व्यापाऱ्यांना सुरुवातीलाच फाशीं दिलं असतं तर बंगालमध्यें दुष्काळानं एवढा हाहाःकार मांडला नसता. माझ्या हातांत सत्ता असती तर मीं काळा बाजार करणाऱ्या साऱ्या व्यापाऱ्यांचीं डोकीं कुऱ्हाडीनं तोडलीं असतीं! धारहीं पडलेल्या अगदीं बोथट कुऱ्हाडीनं!"

त्याचें तें भाष्य ऐकून पुरंदरे म्हणाला, "तुझ्यासारख्या भिडस्त माणसाच्या तोंडून इतके प्रखर उद्गार बाहेर यावे ही आश्चर्याची गोष्ट आहे!"

मुकुंद हरि हसला. नंतर आत्मनिंदेच्या स्वरांत त्यानें म्हटलें, "ज्यांना प्रत्यक्ष कांहींच करतां येण्यासारखं नसतं ते नुसते प्रखर विचारच करीत बसतात!"

पुरंदरे म्हणाला, "पण तुझ्या म्हणण्याप्रमाणं, समजा, काळा बाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांचीं डोकीं तोडलीं, तर सध्यां काळ्या बाजारांत कां होईना, पण जी साखर मिळते आहे तीसुद्धां मिळेनाशी होईल!"

मुकुंद हरि क्षणभर विचारमग्न झाला आणि म्हणाला, "साखर मिळो न मिळो, पण समाजाचं रक्तशोषण करणाऱ्या या जळवा तरी नष्ट होतील! तें काय थोडं झालं?"

धुराच्या त्या लोटाचे दोन भाग झटकण्याच्या झोतामुळें या वेळपर्यंत भिरभिरत

हवेंतून उडत गेले होते आणि थोड्याच वेळांत ते विरूनहि गेले होते. त्यांच्या क्षीण अवशेषांकडे पहात मुकुंद हरि उद्गारला, "खरं म्हणजे मला या बाबतींत फारसं कांहीं कळत नाहीं! पण एवढं मात्र नक्की, कीं माझा एक रुपया नि एक पैसा चोरीला गेला! तुला काय वाटतं?"

पुरंदरेनें सिगरेटची राख झाडली आणि नंतर एक चांगला दम घेऊन धुराचा मोठा लोट सोडला.

दहा मिनिटांच्या मुदतींत बैठकीच्या दाराशीं मुकुंद हरीच्या वर्गांतला एक मुलगा आला आणि खूण करून त्यानं त्याला बाहेर बोलावलं. त्याच्या हातांत पावती-पुस्तकासारखी कसलीशी लांबट वही होती आणि बरोबर कुणी तरी प्रौढसा गृहस्थ होता.

"काय रे बुवा? काय म्हणणं आहे? बोला?"

"सर, आमच्या आळींत राहणारे हे दाबके. परवांच्या दिवशीं बेबंदशाही नाटकाचा एक धर्मार्थ प्रयोग व्हायचा आहे, त्याची व्यवस्था यांच्याकडे आहे. त्या प्रयोगाचं एकादं तिकीट तुम्हीं घ्यावं म्हणून विचारायला आम्ही आलों आहोंत."

"कोणत्या संस्थेच्या मदतीसाठीं व्हायचा आहे हा प्रयोग?"

"नादब्रह्म संगीत विद्यालय. या विद्यालयांत गायन, पेटी, तबला, सतार, दिलरुबा, फिडल, बांसरी, झालंच तर बुलबुल-तरंगसुद्धां..." दाबके यांनीं माहिती द्यायला प्रारंभ केला.

"या विद्यालयाचं नांवसुद्धां ऐकलं नाहीं मीं अजून कधीं! कोण आहे त्याचा चालक!"

"उत्तर हिंदुस्थानांतले बाळाभैया कुतरवाडकर म्हणून एक गवई इथं आले आहेत. त्यांनीं काढलं आहे तं."

"कोण? बाळाभैया कुतरवाडकर? हें नांवहि माझ्या कानांवर कधीं आलं नाहीं!"

"म्हणून तर मदतीची त्यांना अपेक्षा आहे! सर, तुम्हीं निदान एक तरी तिकीट घ्यायला पाहिजे."

खालीं शाळेच्या चौकांत मुलें खेळत, हुंदाडत होतीं. संमेलनाच्या किंवा इतर समारंभाच्या प्रसंगीं चौकांत सावली करण्यासाठीं पालें टाकण्यास उपयोगीं पडाव्यात म्हणून तिसऱ्या मजल्याच्या वर समोरासमोरच्या कठड्यांना जाड तारा ताणून कायमच्या बसवलेल्या होत्या, त्यांची सावली खालीं चौकांत पडली होती.

त्यांतल्या एका तारेच्या सावलीवरून तोल सावरीत हात ताठ करून एक मुलगा खरोखरीच्याच तारेवरून चालावें त्याप्रमाणें संथपणें एकापुढें एक पावलें टाकीत चालला होता. त्याच्याकडे विमनस्कपणें पाहत मुकुंद हरि म्हणाला, "नाहीं! मला तिकीट नाहीं घेतां येणार!"

"कां पण सर?"

"त्या दिवशीं मला काम आहे."

"सर, पण तें काम तुम्हांला इतर वेळीं केव्हां तरी करतां येईल कीं! त्यांतून त्याच वेळीं काम व्हायला हवं असं आयत्या वेळीं आढळून आलं तर घेतलेलं तिकीट दुसऱ्या कुणाला तरी देतां येईल तुम्हांला!"

"परंतु मला काम आहे हें फक्त एक कारण झालं. दुसरं कारण असं, कीं माझ्याजवळ तिकिटासाठीं पैसे नाहींत."

"लोकोपयोगी कार्य आहे सर हें! तुम्ही एक तरी तिकीट —"

"आणि तिसरं कारण असं, कीं ही मदत आपण कुणाला करतों आहोंत त्याची मला कांहींच माहिती नाहीं."

यावर दावके म्हणाले, "तथापि दोन अडीच रुपयांची बाब आहे ही! दोन अडीच रुपये म्हणजे कांहीं फार नाहीं! याच्या दुप्पट तिप्पट खर्च देखील कदाचित् तुमचा विडीकाडीवर..."

त्या गृहस्थाचें हें बोलणें ऐकून मुकुंद हरि अतिशय संतापला आणि म्हणाला, "कुणीं कशावर किती पैसे खर्चावेत हें तुम्हीं मला सांगायची अजून पाळी नाहीं आली, समजलं? विडीकाडीवर मी पांच नाहीं पन्नास रुपये खर्च करीत असेन. पण जोंपर्यंत ते तुझ्या बापाकडून मी मागून आणीत नाहीं तोंपर्यंत तुला त्यांत पडायचं कांहीं कारण नाहीं! इतका वेळ मीं तुला आडवाटेनं सांगायचा प्रयत्न केला, पण आतां स्पष्टच सांगतो, तुझं बेबंदशाही नाटक आणि बाळाभैया कुतरवाडकर यांचं नादब्रह्म संगीत विद्यालय यांची वाऱ्यावर वरात निघाली तरी मला त्याचं सुखदुःख कांहीं नाहीं! कळलं? चालायला लाग!"

मुकुंद हरीच्या या फटाफटा होत असलेल्या वाक्प्रहारांमुळें ते दोघेहि जण चमकून...

पण आपण हें इतकें टाकून कसें बोललों, अपरिचित असलेल्या दावके यांना शेवटीं एकेरी हाक मारून त्यांना घालवून देण्याची तयारी करण्याइतके आपण कसे वाहवलों, याचें मुकुंद हरीला परमावधीचें आश्चर्य वाटलें. कितीहि आवश्यक

असलें तरी फटकळपणें बोलायला आपली जीभ वाहवणें शक्य नाहीं याची त्याला जाणीव होती.

चौकांत तारेच्या सावलीवरून कसरत करणारा मुलगा शेवटपर्यंत पोंचून आतां परत फिरला होता आणि परत येतां येतां पुन्हा तीच कसरत त्यानें चालू ठेवली होती. त्या क्षणीं मुकुंद हरीच्या ध्यानांत आलें, कीं आपण हें कांहींच बोललों नसून, तसें बोलतां येत नसल्यामुळेंच केवळ स्वतःशींच चिडलेल्या आपल्या मनानें परस्परांच्या अधिक्षेपानें भरलेला हा संवाद निर्माण करण्याचा खेळ केला होता. आणि त्याच्या हेंहि ध्यानांत आलें, कीं आपण स्तब्धपणें चौकांतल्या त्या मुलाची कसरत पाहत आहोंत आणि ते दोघे जण आपल्या होकाराची वाट पाहत आहेत.

मात्र फटकळपणें बोलण्याची स्वतःची तहान मनांतल्या मनांत कडक संभाषण करून भागल्यानंतर आलेल्या विलक्षण आणि विकृत तृप्तीनंतर मुकुंद हरीच्या भिडस्त स्वभावानें पुन्हा त्याच्यावर पगडा बसवला आणि तो गुळमुळीत बोलूं लागला, "आत्तांच मी तुम्हांला होय म्हणून सांगत नाहीं. पण शेवटचं तिकीट केवढ्याचं आहे?"

"फार नाहीं! फक्त एक रुपया!"

"बाप रे! शाळेंतल्या आणखी कुणीं कुणीं तिकिटं घेतलीं आहेत?"

"हे तुमच्याकडेच प्रथम आलों आहोंत पहा आम्ही!"

"मग आधीं दुसऱ्यांना विचारून या! मी नंतर सांगेन."

"तुम्हींच पहिल्यांदा तिकिट घ्यावं अशी आमची मनीषा आहे. तुम्हीं तिकीट घेतल्याचं सांगूनच इतरांना आम्ही आग्रह करायचा म्हणतों आहोंत."

मुकुंद हरीची चुळबुळ सुरू झाली.

सपाटून तापलेल्या तव्यावर पोळी भाजणाऱ्या आचाऱ्याच्या कौशल्यानें ही संधि त्या दोघांनीं साधली. दाबके म्हणाले, "किती? अडीच रुपयांचं फाडूं?"

यंत्रांत सांपडणारा हात झटक्यासरशीं मागें घ्यावा त्याप्रमाणें करीत मुकुंद हरि म्हणाला, "नको नको! एक रुपयाचंच घेतों तिकीट मी!" आणि जणुं आपल्याला अधिक महाग तिकीट घेण्याचा आग्रह होईल नि मग तो नाकारणें आपल्याला जड जाईल या भीतीनें मुकुंद हरीनें पटकन् एक रुपया काढून दाबक्यांच्या स्वाधीन केला.

"बरं! तुमची मर्जी!" तो रुपया घेतांना दाबके म्हणाले.

हा शेवटचा चमत्कारिक आवाजांतला कृतघ्न उद्गार ऐकून मुकुंद हरीला राग आला. पण कुणाला कांहीं विरुद्ध बोलणें त्याच्या स्वभावांतच नव्हतें. त्यामुळें त्यानें दाबक्यांना डाफरलें नाहीं. उलट त्या क्षणीं त्याचें मन स्वतःच्या या विलक्षण स्वभावाच्या खंतानेंच व्याप्त झालें आणि त्यामुळें कांहींसा खिन्न होऊन त्यानें या चमत्कारिक आणि कृतघ्न उद्गाराचा किंवा त्यामागच्या प्रसंगाचा नंतर कुणापाशींच उल्लेख केला नाहीं. मात्र बैठकींत परत जाऊन आरामखुर्चीत अंग टाकून देतांना स्वतःशींच त्यानें उद्गार काढले, "एक रुपया पाण्यांत गेला!"

शाळा नुकतीच सुटली होती. दारापाशीं मधमाशांचें मोहोळ उठल्यासारखा मुलांचा प्रचंड गलगा होई, तो उच्च बिंदूला पोंचून आतां मंदावला होता. कांहीं शिक्षक त्या गर्दीतूनच जात, तर कांहीं जण मुलांची ती गर्दी ओसरल्यानंतर जात. नंतर जाणारे शिक्षक बैठकींत बसले होते आणि त्यांच्या गप्पा चालू होत्या.

थोड्याच वेळांत लोक उठूं लागले. उठतां उठतां नेने म्हणाला, "चला, जावें आतां! डायरी मांडायची राहिली आहे तेवढी मांडावी नि जावें. कुणी येणार का रे?"

बहुतेक जण गप्पांत रंगलेले होते, त्यामुळें नेनेनें दिलेली ही साद कुणीं ऐकली नाहीं. एकटा मुकुंद हरि मात्र कुणीतरी हलवून जागा केल्याप्रमाणें दचकून म्हणाला, "अरे होय! नेने, मी देखील डायरी मांडायला विसरलों आहें. भरशील का तूं तेवढी? म्हणजे तेवढाच चढउतार वांचेल माझा! सहावी 'ब' बरं का? छत्तीस हजर, एक रजा, तीन गैरहजर--एकंदर चाळीस! राहील ना लक्षांत?"

दारांतून पाऊल बाहेर टाकतांना नेने म्हणाला, "लक्षांत राहलं काय न् न राहलं काय, एकंदर आंकडा चाळीस ना? तेवढा कसाहि करून जमवला म्हणजे झालं!"

मुकुंद हरि हसला आणि म्हणाला, "कांहीं कर, पण मांड म्हणजे झालं!"

तें ऐकतांक्षणीं नेने बाहेर गेलेला परत येऊन म्हणाला, "हें पहा! पण डायरी फुकट नाहीं लिहिणार मी बरं का? चहा द्यावा लागेल!" नंतर जरा पुढें येऊन थांबलेल्या लोकांना उद्देशून तो म्हणाला, "काय मंडळी, आमची चहाची मागणी रास्त आहे कीं नाहीं?" त्यानें सर्वांकडे दृष्टि टाकली. नेहमींचेच त्याच्या विशिष्ट गटांतले ते सातआठ जण होते.

त्याच्या अपेक्षेप्रमाणें त्यांच्यापैकीं एकानें भाष्य केलें, "आमची म्हणजे

कुणाची? तुझ्या एकट्याबद्दलचीच ही मागणी असेल तर ती आम्हांला साफ नामंजूर आहे. परंतु सर्वांच्याबद्दल असेल तर मग कांहीं अर्थ त्यांत आहे असं आम्ही म्हणूं!"

त्यांचें बोलणें कोणत्या वळणावर जाणार तें ओळखून मुकुंद हरि उठला.

"कां रे?" त्याला मघांच्यानें विचारलें.

"फार महाग वाटते आहे ही डायरी!"

"हें म्हणतो आहेस म्हणजे तुला त्याची कल्पना आली आहे. आणि कल्पना आली आहे, तेव्हां थोडीबहुत कां होईना, पण मनाची तयारी तूं करून ठेवलेली असणारच. एकाद्या गोष्टीची माणूस चिंता करूं लागला कीं ती घडून येण्याची त्याच्या मनानं अर्धी तयारी करून ठेवलेली असतेच!"

"भले! मुकुंद हरि देशपांडे, कुठं जातां आतां! बसा झालं इथंच!" हातानं त्याला खालीं ओढून बसवीत तिसरा एक जण म्हणाला, "असा चुकवायला पाहतोस काय? मग बचमजी, तूं स्वतः जरी जाऊन डायरी भरलीस तरी चहा चुकायचा नाहीं! बऱ्याच दिवसांत तुला 'कापायला' मिळालं नाहीं!"

"अरे, पण हें काय?—" करीत मुकुंद हरि खुळ्यासारखा हसला.

"परंतु मित्रांनो, माझं म्हणणं असं, कीं मुकुंद हरि आज चहा द्यायला तयार झाला असला तरी नुसत्या चहावरच आपलं कसं भागेल? चहाबरोबर बटाटेवडा किंवा पुरीभाजी किंवा तसलंच कांहीं तरी—" दुसऱ्यानं पुन्हा म्हटलें.

"बरोबर आहे, बरोबर आहे!" असा सगळीकडून होकाराचा गजर झाला आणि एका जणानें तेवढ्यांत नेनेला सूचना केली, "नेने, डायरी लिहायला वर जातोच आहेस तर ती लिहून परत येतांना गड्याला घेऊन ये!"

मुकुंद हरीनं क्षीण प्रतिकार केला, "गड्यांनो, पैसे खर्च होणार माझे, तर निदान एक अक्षर तरी बोलायची—"

त्याचें बोलणें लागलीच दुसऱ्यानं तोडलें, "बोलण्यासारखं आतां कुठं काय राह्यलं आहे? आम्हांला वाटलं, आपण पैसे खर्च करणार नाहीं असं तूं म्हणणार आहेस. परंतु 'पैसे माझे खर्च होणार' असा तूंच उल्लेख केलास आत्तां, तेव्हां तीहि शंका राह्यली नाहीं!"

"आणि खर्चायला माझ्याजवळ पैसेच नसले तर?" मुकुंद हरीनें विचारलें.

"खर्चायची तुझी तयारी असल्यावर आत्तां पैसे नसले तरी चालतील! तात्पुरते कुणीहि देईल तुला पैसे! इतके काय नादान आहोंत का काय आम्ही? आणि तूं देखील कांहीं 'हातीं धरल्यास रोडका नि शेंडी धरल्यास बोडका' या अवस्थेला पोंचला नाहींस!"

"आपली तुला पैसे उसने द्यायची तयारी आहे. पण बुवा, व्याज म्हणून प्रत्येकाला ताज्या कांदेपोह्याची एक बशी मिळाली पाहिजे! अन् तीसुद्धां ठरलेले दोन जिन्नस खाऊन झाल्यावर!"

"काय मुकुंद हरि? आहेत कीं नाहींत आतां तुझ्याजवळ पैसे?"

मुकुंद हरीनं खांदे वर केले आणि म्हटलें, "मीं नाहीं कधीं म्हटलं होतं?"

"अस्सं! आतां कसं! पण आधींच ताळ्यावर आला असतास तर?"

या सगळ्या कार्यक्रमांत मुकुंद हरींचा खर्च सव्वा दोन रुपये झाला होता. त्यानें हिशेब केला. चहा, नाटक आणि हा कार्यक्रम यांचा खर्च वजा जातां त्याच्या खिशांत आता पांच रुपये आणि साडेमहा आणे शिल्लक राहिले होते. काळ्या बाजारामुळें साखरेचे जादा द्यावे लागलेले पैसे आणि नाटकाचा एक रुपया हा खर्च वायां गेल्यासारखाच होता. त्याबद्दल त्याच्या मनांत कोणतीच शंका नव्हती. परंतु आत्तांच्या कार्यक्रमाचा खर्च वायफळ म्हणायचा कीं नाहीं याचा त्याच्या मनाशीं निर्णय होईना. पैसे खर्च झाल्याचं त्याला दुःख होत नव्हतं. कारण, इतर लोक 'कापले' जात नव्हां त्यांत तो भाग घेई, तेव्हां स्वतःवर केव्हां तरी 'कापून' घेण्याचा प्रसंग त्याला अनपेक्षित नव्हता. परंतु एकंदरींतच असल्या कार्यक्रमांत आपण भाग घेतो ही गोष्ट चांगली कीं वाईट याविषयीं त्याचं मन निश्चित कांहीं सांगेना. त्याच्या मनानं एक झोका घेतला, 'परंतु आत्तांचा खर्च, तसं म्हटलं तर, आवश्यक खर्च या सदरांत मोडणार नाहीं, तेव्हां त्याला वायफळ नाहीं तर काय म्हणायचं? आणि वायफळ म्हणून पुन्हा तो होऊ द्यायचा नसेल तर यापुढं मंडळीच्या असल्या कोणत्याच कार्यक्रमांत आपण भाग घेणं इष्ट होणार नाहीं.'

परंतु हें म्हणतां म्हणतांच त्याच्या मनांत हाहि विचार आला, 'पण मग तसं केलं तर आपलं हें 'कापणं' टळूं शकेल. मात्र आपल्याला त्यामुळं एका मोठ्या आनंदाला मुकावं लागेल! आपल्या जीवनांतल्या या रम्य हिरवळी नाहींशा होतील.'

अशा प्रकारें उलटसुलट विचार त्याच्या मनांत येऊन गेल्यामुळें आपलं

कांहीं चुकलं आहे का, नि चुकलं असल्यास कुठं चुकलं आहे, याविषयीं त्याचें मन साशंक राहिल्यामुळें त्याचा गोंधळ उडाला.

सूक्ष्मग्राही ताजव्याचा पासंग संथ श्वासानेंसुद्धां बिघडावा तद्वत् कमी उत्पन्न असलेल्या माणसांच्या मनांचे पासंग लहानशा खर्चानेंहि बिघडून तीं हेलकावे खाऊं लागतात.

खर्च वायफळ असो कीं नसो, तो झाला होता ही गोष्ट खरी होती. त्याच्या खिशांत आतां पांच रुपये साडेसहा आणे शिल्लक होते.

रस्त्यांतून तो स्वतःच्या घराच्या दिशेनें चालला होता. तेवढ्यांत त्याला नेनेची हांक ऐकूं आली तसा तो थांबला.

"पुढंसा निघून आलास?" जवळ आल्यावर नेनेनें त्याला विचारलें.

"कांहीं नाहीं! उगीचच!" मुकुंद हरीनें उत्तर दिलें.

कांहीं वेळ ते स्तब्धपणानें चालत होते.

वाटेंत त्यांना शनीचें देऊळ लागलें. त्यापाशीं कित्येक भिकारी रांगेंत बसलेले असून आपलीं दुखावलेलीं अंगें आणि व्यंगें उघडीं करून दाखवीत केविलवाणे ओरडत होते. त्या देवळाच्या पलीकडे असलेल्या पुस्तकाच्या दुकानाशीं, कशानें कुणास ठाऊक, बरीच गर्दी जमली होती आणि त्याच्या समोरच्या अंगाला उसाच्या रसाचें जें गुऱ्हाळ होतें, त्याच्या समोरून जाणारायेणाराला उग्र आंबूस वासाचा भपकारा येत होता...

नेने म्हणाला, "सव्वादोन रुपयांना आज तूं 'चिरला' गेलास, त्याला कारण मी झालों. विचारूं नये, पण विचारतों, तुझी अडचण नाहीं ना होणार? या दिवसांत सव्वा दोन रुपयांना रस्त्यावरचा कचरा देखील मिळायचा नाहीं. तरी पण आपल्यासारख्यांना ते..."

"नाहीं नाहीं! माझी अडचण नाहीं व्हायची."

"खरं सांगायला तुला संकोच वाटायचं कारण नाहीं. तुला लागले कधींमधीं पैसे तर मी देत जाईन...मी एकटा आहें नि मला शिकवण्याहि चांगल्या मिळतात. याच्या उलट तुझी स्थिति...तुझ्या माथ्यावर मराठी, इतिहास नि भूगोल हे विषय कायमचे मारून शाळेनं तुझा गळा कापला आहे!"

मुकुंद हरि कांहीं बोलला नाहीं.

"तुला मानहानि वाटायला नको. पैसे लागले तर उसने म्हणून घे. सवडीप्रमाणं फेडलेस तरी चालतील."

मुकुंद हरि स्तब्ध राहिला.

"तूं भिडस्त आहेस. कधीं कांहीं बोलायचा नाहींस, मागायचा नाहींस, म्हणून सांगितलं. हें सांगितल्याबद्दल रागावला असशील तर—"

"छे छे! काय बोलतोस हें? रागवायचं कशासाटीं? मला जरूर पडली तर सांगेन मी तुला."

त्या दोघांच्या वाटा फुटल्यानंतर आपल्या घराच्या दिशेला नेने वळला. मुकुंद हरीचें मन आपले सव्वा दोन रुपये वायफळ खर्च झाले कीं नाहीं या विचारानें पुन्हा व्यग्र होऊन गेलें.

मुकुंद हरि घरीं परत आला तेव्हां त्याचा मित्र देवल त्याच्या घरीं आधींच येऊन त्याची वाट पहात बसला होता. देवल हा मुकुंद हरीचा फार वर्षांपासूनचा मित्र. त्यानें सगळे पाश तोडून स्वतःला सर्वस्वीं कामगारांच्या कार्याला वाहून घेतलें होतें. आणि त्याच्या या त्यागवृत्तीमुळेंच या दांपत्याच्या मनांत त्याच्याविषयीं आत्मीयता आणि भक्ति निर्माण झाली होती. अंधारांत पेटलेल्या आगकाडीच्या ज्वालेप्रमाणें तो अचानक प्रकट होई आणि क्षणमात्र त्या दोघांच्या जीवनांत स्निग्ध काश टाकून परत नाहींसा होई.

"शाळा सुटल्यावर तूं लगेच परत घरीं येतोस हें मला टाऊक होतं म्हणून त्या बेतानं मी आलों. तर तूं आलेला नव्हतास. पण वहिनी म्हणाल्या, 'येतील हे आत्तां इतक्यांतच,' म्हणून थांबलों." देवल म्हणाला.

खरें म्हणजे यांत लागण्यासारखें कांहींच नव्हतें. पण भिडस्त माणसें हीं नेहमींच हळवीं असतात. किंबहुना, तीं हळवीं असतात म्हणूनच त्यांचा स्वभाव भिडस्त बनलेला असतो. देवलनें जें घडलें होतें तें सहज म्हणून सांगितलें होतें. परंतु मुकुंद हरीला आपला त्यांत अधिक्षेप झाल्यासारखें वाटलें. आणि हेलकावे खाणाऱ्या त्याच्या मनाला हें एक जणुं कारणच मिळाल्यासारखें होऊन त्याच्या मनानें आपण खर्च केला तो वायफळ होता हें पक्कें घेतलें आणि त्याला त्याबद्दलची परमावधीची खंत वाटूं लागली. शाळा सुटल्यानंतर मंडळीच्या गप्पाष्टकांचा मोह आपल्याला आवरत नाहीं त्यामुळेंच हें असें घडलें, तेव्हां उद्यांपासून शाळा सुटल्याक्षणीं मुलांच्या गर्दीबरोबरच बाहेर पडायचें, असा एक निश्चयहि त्यानें त्या क्षणीं मनाशीं करून ठेवला.

मुकुंद हरीची पत्नी वर आली आणि खुंटीवर त्याचा कोट होता त्या दिशेनें जाऊं लागली.

"काय पाहिजे आहे तुला?" मुकुंद हरीनें विचारलें.

"तीन आणे घेतें. भाऊजींना रस आणावा म्हणतें."

"गुऱ्हाळापर्यंत जाऊन रस आणायची यातायात करायची त्यापेक्षां चहाच कां नाहीं करीत?"

"करतें. पण त्यांत निम्मा हिस्सा गूळ घालावा लागतो. चालेल का तुम्हांला भाऊजी?"

"मला चालेल वाटेल तें! पण वहिनी, कशाला चहाच्या न् रसाच्या भानगडींत पडतां?"

"माझ्या घरीं आलेल्या पाहुण्याला, नि त्यांतून लोकांची सेवा करणाऱ्या पाहुण्याला मी तसाच जाऊं द्यायची नाहीं!"

"या कल्पना या दिवसांत ठेवून चालायचं नाहीं वहिनी!"

वहिनींनीं नकारार्थी मान हलवली. देवल हसला.

"मग उकडलेल्या आंब्यांचं थंडसं पन्हंच करीनास!!" मुकुंद हरि म्हणाला.

"होय कीं! आधींच कसं नाहीं सुचलं मला हें?"

"नवऱ्याला यायला उशीर झाला त्यामुळं तुमचं मन व्यग्र झालं असलं पाहिजे, वहिनी!" देवलनें म्हटलें.

"असल्या कल्पना आतांच्या दिवसांत टाकून दिल्या पाहिजेत भाऊजी!" हसत हसत वहिनी म्हणाल्या.

"मीं टाकून दिल्याच आहेत. पण तुमच्या दृष्टीनं विचार करून म्हटलं मीं तसं!"

"बरं बरं! समजलं बरं का!"

तिघेंहि जणें हसलीं. पन्हें करायला वहिनी खालीं गेल्या.

मुकुंद हरि म्हणाला, "मला यायला उशीर झाल्यामुळं तुझी गैरसोय नाहीं ना झाली?"

"छे छे! गैरसोय कुठली! मी कांहीं कामाकरतां तुझ्याकडे आलों होतों. तूं भेटलास हें बरं झालं, नि त्यांतच सारं कांहीं आलं!

"मग बोल! कसलं काम आहे?"

"इथं सध्यां पगारवाढ, महागाईभत्ता, काम करण्याचे तास कमी करणं आणि कामाच्या जागेची सुधारणा याबद्दलच्या मागण्या पुऱ्या करून घेण्यासाठीं विडी-कामगारांचा संप चालू आहे, हें तूं वाचलं असशीलच. त्या संपासाठीं मदत

गोळा करण्याकरतां सध्यां मी हिंडतों आहें. असल्या संपासाठीं मदत मिळायची ती गरीब नि खालच्या मध्यम स्थितींतल्या लोकांकडूनच. तेव्हां त्यासाठीं तूं कांहीं तरी—मी येईन दोनतीन दिवसांनीं ! तूं तोंपर्यंत मनाशीं विचार करून, वहिनींचा सल्ला घेऊन..."

तेवढ्यांत वहिनी पन्ह्याचें सामान घेऊन वर आल्या.

"हें काय ? झालं इतक्यांत पन्हं ?"

"इथंच बोलतां बोलतां करावं म्हटलं ! भाऊजींच्या गप्पा ऐकण्यासारख्या असतात, त्या ऐकायला मिळतील म्हणून आलें."

कांहीं वेळानंतर देवल घरीं जायला निघाला. मुकुंद हरि त्याला पोंचवण्यासाठीं दारापर्यंत गेला आणि तिथें त्यानें त्याच्या हातावर पांच रुपयांची नोट ठेवली.

देवल दचकला आणि म्हणाला, "तूं इतके देशील अशी माझी कल्पना नव्हती."

मुकुंद हरीनें कांहींच उत्तर केलें नाहीं.

"अपमान समजूं नकोस, पण तूं एक रुपया, दोन रुपये देशील, असं मला वाटलं होतं. या कार्याला काय मिळतील तेवढे पैसे हवेच आहेत. पण त्यासाठीं तुझी अडचण—"

मुकुंद हरीनें नकारार्थी मान हलवली.

"हे पैसे देतांना आपल्यावर व्यक्तीचं मानसिक दडपण पडलं असं पुसटतं देखील तुझ्या मनांत येतां कामा नये म्हणून मी—"

"छे छे ! तसं मुळींच नाहीं !"

देवलनें प्रश्नचिन्हांकित मुद्रा केली.

कांहींसा गोंधळल्यासारखा मुकुंद हरि बोलूं लागला,

"माणसाच्या हातून कांहीं गोष्टी नाहक घडल्या...अं हं ! तसं नव्हे, कांहीं कांहीं वेळेला माणसाला उगीचच अपराध्यासारखं वाटायला लागतं, तेव्हां—तसंच—नाहीं ! कधीं कधीं नको त्या ठिकाणीं आपल्या हातून आपली इच्छा नसतांनासुद्धां पैसे खर्च होऊन जातात आणि त्यामुळं नेमकं आपल्याला हवं त्या ठिकाणीं पैसे खर्चतांना हात आखडता घ्यावा लागतो. आणि मग—पण तसं म्हटलं तर मला स्वतःला विडीकामगार पिळला जातो म्हणून—म्हणजे आपलं—"

देवल हसूं लागला.

"तुला म्हणायचं आहे तरी काय?" त्यानं विचारलें.

एक क्षणभर मुकुंद हरीनं विचार केला आणि उत्तर दिलें, "कांहीं नाहीं! एवढंच, कीं विडीकामगारांच्या संपाला मीं पैसे दिले ते अगदीं राजीखुषीनं आणि अक्कलहुशारीनं!"

१९४६

# . ७ .

# घाणेरीचीं फुलें

मी आणि जगदीश वाळकेश्वर पर्वतीच्या पायथ्याशीं आलों तों अंधार पडला होता. कांहीं पायऱ्या चढून गेल्यावर आम्हांला समोर निंबोणीच्या प्रशस्त वृक्षाखालीं विश्रांतीसाठीं ठेवलेला लोखंडी बाक दिसला, त्यावर आम्ही जाऊन बसलों. फारसे दमलेलों नव्हतों, तरी पण आम्हांला आतां पुढें जायची इच्छा नव्हती.

आमच्या डाव्या अंगाला वर पर्वती होती. आजूबाजूचें सारें जग अंधारांत लुप्तप्राय होऊन काळेंकभिन्न दिसूं लागलें होतें. दूर, अगदीं दूर क्षितिजापाशीं बरेचसे दिवे एका रांगेत लुकलुकत होते, ते लहान मुलानें काळ्या पाटीवर फर्रर्र करीत दुध्या पेन्सिलीनें काढलेल्या तुटक्या रेषेप्रमाणें दिसत होते. त्यांच्याकडे किती तरी वेळ मी पहात राहिलों. वर नगारखान्यांत टिपरी खण-खणत होती आणि संध्याकाळच्या शांत वेळीं अतिशय मधुर लागणाऱ्या पूरिया रागांतली गत सनईवर वाजत होती, तिच्यामुळें कान तृप्त होत होते.

अंधुक प्रकाशांत समोर डाव्या अंगाला कसलेंसें एक झुडुप मला दिसलें. त्याच्याकडे जरा वेळ मीं निरखून बघितलें. इवल्याशा फुलांच्या पुष्कळशा झुपक्यांवरून तें घाणेरीचें आहे हें मीं ओळखलें. घाणेरीचीं फुलें मला आवड-तात. मात्र त्यांचा एक लहानसा दोष मला आवडत नाहीं. आपल्या देठांशीं तीं फुलें फारच थोडा वेळ टिकतात.

गप्पाच मारायला आम्ही इकडे आलों होतों, तेव्हां हे सारे विचार मीं जगदीशला बोलून दाखवले.

कर्नाटकांतल्या विहिरींतून यावा तसा खोल आवाज जगदीशनें काढला, “ घाणेरीचीं फुलें ! ”

त्याचा चमत्कार वाटून मीं विचारलें, "कां? असं कां बोललास?"

प्रथम जगदीश कांहींच बोलला नाहीं. नंतर म्हणाला, "मला काय म्हणायचं आहे तें स्पष्ट करून कसं सांगावं, कळत नाहीं. आत्तां घाणेरीच्या फुलांसंबंधीं बोललांत त्यावरून मला सिंधूची आठवण झाली. वाटलं, सिंधू घाणेरीच्या फुलांच्या झुपक्यासारखी होती. तिच्याशीं त्यांचं साम्य कसं जुळवून दाखवायचं तें मला समजायचंहि नाहीं नि जमायचंहि नाहीं. मनांत कधीं कधीं विचार येतात, पण त्यांचं स्पष्टीकरण करतां येत नाहीं, त्यांतलंच हें!"

जगदीश पुढें म्हणाला, "हें जसं मला स्पष्ट करतां येत नाहीं, त्याचप्रमाणं माझ्याशीं ती ज्या रीतीनं वागली त्यामागं कारणं कोणतीं होतीं किंवा हेतु कोणते होते त्यांचंहि मला स्पष्टीकरण करतां येत नाहीं. कारण, त्यांचं मला आकलनच झालं नाहीं. अजून होत नाहीं. माझ्या आयुष्यांतलं तें एक विचित्र गूढ आहे."

उत्सुकता वाटत होती तरी मी कांहीं बोललों नाहीं. ती संध्याकाळची वेळच अशी होती आणि त्या वेळचें तें एकांत वातावरणच असें कांहीं विलक्षण होतें, कीं हृदयाला कसली तरी अनामिक आर्तता येऊन दुःखें साकळून यावींत आणि आपल्या हृदयाचें रहस्य कुणाला तरी उकलून सांगावेंसें वाटावें.

कांहीं आग्रह करून न घेतांच जगदीशनें सिंधूचा इतिहास मला सांगितला...

* * *

सिंधूची आणि माझी ओळख झाली, तिला फडक्यांच्या कादंबरींतल्याप्रमाणें आगगाडीचा किंवा मोटारीचा अपघात यांसारख्या गोष्टींची जरुरी पडली नाहीं. नेहमीं घडून येणाऱ्या अगदीं साध्या पद्धतीनेंच तिची आणि माझी ओळख झाली.

साताऱ्याच्या बाजूला 'प्राजक्ताची वाडी' नांवाचें एक लहानसें खेडेगांव आहे. त्या गांवीं माझी मावशी राहते. त्या गांवाला मोटार देखील जात नाहीं. फार काय, मोटारचा रस्ता तेथून चार कोसांवर आहे.

प्राजक्ताच्या वाडींतलीं बहुतेक कुटुंबें शेतकऱ्यांचीं आहेत. पण कांहीं सुखवस्तु ब्राह्मणांचीं कुटुंबेंहि तेथें थोडींशीं आहेत. त्यांच्या आश्रयानें निर्वाह करणारें गंगारामशास्त्र्यांचेंहि एक कुटुंब तिथें आहे. सिंधू ही या गंगारामशास्त्र्यांची मुलगी. माझ्या मावशीचें घर आणि गंगारामशास्त्र्यांचें घर एकमेकांना लागूनच आहेत.

मी अगदीं लहानपणीं एकदां मावशीकडे गेलों होतों. त्यानंतर बरींच वर्षें

माझी तिकडे खेप झाली नव्हती. मावशी मला नेहमीं सुटीच्या दिवसांत बोलवी. पण मला जायला जमत नसे. गेल्या उन्हाळ्याच्या सुटींत मात्र तिनें मला येण्याचा फारच आग्रह केला. माझी परीक्षा संपली होती आणि यापुढें माझ्या बाबतींत परीक्षाहि संपणार होत्या. कारण, माझें शिक्षण संपून मला रोजगार पहावा लागणार होता. तेव्हां परीक्षेचा निकाल लागेपर्यंत जी सवड होती ती साधून मीं एक दिवस प्राजक्ताच्या वाडींत पाऊल टाकलें.

हें करतांना आणखी एक गोष्ट मीं केली. माझ्या ज्या मावशीचें घर प्राजक्ताच्या वाडीला आहे तिचीच एक पद्मा म्हणून मुलगी आहे. या माझ्या मावसबहिणीचें लग्न झालेलें असून तिचें सासर इथें पुण्यालाच शनवार पेठेंत आहे. तिच्या नवऱ्याला आग्रह करून तिला आपल्याबरोबर प्राजक्ताच्या वाडीला नेण्याची संमति मीं मिळवली. प्राजक्ताची वाडी म्हणजे नव्या जगाच्या संपर्कापासून दूर राहिलेलें एक खेडें. शहरांतल्या माणसाला वेळ घालवायला करमणुकीचीं साधनें आपल्या बरोबरच न्यावीं लागतात अशा जागीं. अर्थातच बरोबर थोडींशीं पुस्तकेंहि घेतलीं होतीं मीं.

सिंधू ही पद्मेची बालमैत्रीण. एका भिक्षुकाची मुलगी ती. त्या खेड्यामध्यें तिला शिक्षण कुठलें मिळणार आहे? तरी पण लहानपणीं ती लिहायला-वाचायला शिकली होती. तेंच तिनें पुढेंहि आपल्या मगदुराप्रमाणें चालू ठेवलें होतें. वयानें ती पद्मेएवढीच, पण अठरा वर्षांच्या वयाच्या मानानें एकाद्या खोल डोहासारखी ती गंभीर वाटे. घरकामाला ती चांगलीच वाकबगार होती. दुपारचा बहुतेक स्वयंपाक तिच्याकडेच असे. संध्याकाळचा तिच्या धाकट्या बहिणी करीत. त्यामुळें पद्मा तिथें असतांना संध्याकाळच्या वेळीं ती पुष्कळ वेळां तिच्याकडे येई. आम्ही तिघेंहि मग दूर कुठें तरी फिरायला जात असूं. सिंधू येत असे पद्मेकडेच, आणि ती होती म्हणूनच ती फिरायला येऊं शकत असे. स्वतः एकटी किंवा माझ्याबरोबर एकट्यानें त्या गांवामध्यें हिंडायला तिची कधींच प्राज्ञा झाली नसती.

या फिरण्याच्या प्रसंगामुळेंच सिंधूची आणि माझी ओळख झाली.

सिंधू देशस्थ ब्राह्मण कुळांतली होती.

प्राजक्ताच्या वाडीला गेल्याच्या सहाव्या कीं सातव्याच दिवशीं माझ्या कानांवर एक चमत्कारिक संवाद पडला. चमत्कारिक म्हणजे अगदींच अनपेक्षित

होता तो. मी वरून जिना उतरून खालीं येत होतों. खालीं सोप्यावरच्या झोपाळ्यावर पद्मा आणि सिंधू बोलत बसल्या होत्या.

"सिंधू, इतके दिवस कसं तुला लग्नावांचून ठेवलं तुझ्या वडिलांनीं? तुझं कुठं कांहीं जमवताहेत कीं नाहींत ते?"

"काय जाणे बाई! गेल्या वर्षी तीन ठिकाणीं त्यांनीं मला दाखवलं. सगळं कांहीं जमलं, पसंतहि पडलें मी; पण प्रत्येक ठिकाणीं हुंड्यापायीं मोडलं."

यावर पद्मेनें हुंड्याच्या चालीविरुद्ध थोडेंसें भाष्य केलें. चार हजार रुपये हुंडा घेतल्याबद्दल आपल्या सासऱ्यालाहि तिनें शिव्या दिल्या.

सिंधूनें तें सारें ऐकून घेतलें आणि म्हटलें, "काय करणार? आहे ही परिस्थिति अशी आहे खरी."

"तुझ्यासारख्या मुलीच्या बाबतींत तर घरकामाची कुशलता हाच हुंडा मानायला पाहिजे. पण आपल्याकडच्या पुरुषांना त्याची किंमत कळेल तेव्हां ना?"

सिंधूनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. जरा वेळ दोघीहि स्तब्ध होत्या. नंतर सिंधूनें विचारलें, "पण काय ग पद्मा, तुमच्या पुण्याच्या तिकडे देशस्थकोंकणस्थांमध्यें लग्नं होतात का?"

"होतात तर काय झालं! आतांशा पुण्या-मुंबईसारख्या शहरांत हीं बंधनं कुणी फारशीं पाळीनातशीं झालीं आहेत. माझ्या ओळखीची तर यंदा ब्राह्मणाशीं लग्न केलेली एक प्रभु जातीची मुलगी आहे."

"बरं आहे बाई तुमचं पुण्याचं!"

"बरं नि वाईट!—पण तूं कां विचारते आहेस हें? तुझ्या मनांत कुणी कोंकणस्थांपैकीं भरलेला आहे कीं काय?"

"इश्श, पद्मा, कांहींच्या बाहीच काय विचारतेस?"

त्या क्षणीं पद्मेनें टाळी वाजवली आणि चीत्कार काढीत म्हटलें, "बरं का बाईसाहेब! आम्हांला समजलं!"

"काय समजलं?"

"सगळं कांहीं समजलं!"

"अग, पण काय समजलं तें तर सांगशील?"

"तुला ठाऊक असून मला कशाला विचारतेस?"

"अशी छळूं नकोस बाई!"

"कशाला बोलतेस उगीच असं? मला समजलं आहे, हेंहि तुला समजलं आहे! माणसानं उगीच खोटीं वेडं पांघरूं नयेत!"

"कमाल आहे बाई तुझी पद्मा!"

"तुझ्या मनांतून मीं विचारायला हवं आहे का त्याला? तो हुंडा मागायचा नाहीं. दिला तरी घ्यायचा नाहीं. त्याचं-माझं बोलणं झालं आहे पुष्कळ यावर. विचारूं का त्याला? कां ग? आतां कां बोलत नाहींस? मला कांहीं समजलं नव्हतं ना? माझी अगदीं कमाल होती! मीं तुझा छळ मांडला होता!"

माझें हृदय क्षणभर थांबलें आणि नंतर जोरजोरानें धपधपूं लागलें.

एकादी भांड्यांची उतरंड कोसळावी तशी पद्मा हसली, त्या गडगडाटांत मी झपाझपा पावलें टाकीत परत वर निघून गेलों.

मी मनाचा शोध घेऊं लागलों. आपल्याला सिंधूबद्दल काय वाटतें?

फडक्यांच्या कादंबऱ्या मीं वाचलेल्या होत्या. कॉलेजच्या विश्रामध्यें भोंवतालीं मुलींचे ताफे वावरत होते, त्यांतल्या एकीशींदेखील माझी ओळख नव्हती, तरी पण प्रणयाचीं रम्य, मधुर चित्रें मीं मनाशीं रंगवलीं होतीं. माझ्या चित्रांतली माझी प्रियतमा रंभा, तिलोत्तमा, उर्वशी, मेनका यांच्या कोटींतली नव्हती, पण तिचं माझ्यावर आणि माझें तिच्यावर पराकाष्ठेचें प्रेम होतं. माझ्या त्या स्वप्नांतली माझी वल्लभा वधूपरीक्षा करून मीं पसंत केलेली नव्हती. मंडईतल्या भाजीप्रमाणें निवडलेल्या वधूवर लग्नाच्या पहिल्या रात्रीं बलात्कार करून मला प्रीतीचीं फुलें चुरगाळून टाकायचीं नव्हतीं...

मी विचार करूं लागलों—सिंधू या चित्रांत आहे का?

मला पैशाचा हव्यास नव्हता. मला वाटे, पतिपत्नींनीं एकमेकांना सुख दिलें, कीं त्यापुढें पैशाची मातब्बरी नाहीं. तो पोटापुरता मिळाला तरी पुरे. नाहीं तरी हत्ती, घोडे नि वाडे गडगंज जमा केले तरी कोण बरोबर घेऊन जाणार आहे?

प्रीतीच्या सुखी संसाराच्या या माझ्या मानसचित्रांत सिंधू आहे का तें मी निरखून पाहूं लागलों.

सिंधू आपल्याला सुख देईल असें ज्या क्षणीं मला वाटे, त्याच क्षणीं तिचें कमी शिक्षण ध्यानांत येई. मग त्यावर उलट विचार येई, आपण तिला शिकवून तयार करूं शकणार नाहीं का? पण मग पुन्हा शंका येई, तिचें मन विकास पावल्यावर आपले मनांचे पिंड एकमेकांशीं नाहीं जुळले तर?

आणि मग यावर उत्तर सुचे...

आणि अशा रीतीनें मनांतल्या मनांत बराच वेळ पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष झाल्यावर एक मोठाच प्रश्न उभा राही, तो हा कीं, आपण इतकी चिकित्सा करतों आहोंत नि उत्तर शोधतों आहोंत, तर मग कसलें आलें आहे प्रेम? जी धुंद करीत नाहीं, दुसरें कांहीं सुचूं देत नाहीं, हुरहूर लावून जिवाला कासावीस करीत नाहीं, ती कसली प्रीति?

पुष्कळ विचारान्तीं मीं मनाशीं निर्णय घेतला, कीं आपल्या मनाचा पक्का थांग लागेपर्यंत आपल्या बाजूनें आपण सिंधूच्या वागण्या-बोलण्याला होतां होईल तों उत्तेजनहि द्यायचें नाहीं, त्याचप्रमाणें तिच्या भावनेला प्रत्यक्ष प्रतिकूल असेंहि आचरण करायचें नाहीं.

माझ्याप्रमाणें सिंधूनेंहि आपल्या मनाशीं अशींच कांहीं चित्रें मन मानेल तसे रंग भरून काढलीं असतील का?

तिनें चित्रें काढलीं असोत किंवा नसोत, तिला त्या दिवशीं पत्रानें छेडलें होतें त्याचें प्रत्यंतर म्हणून असो किंवा परिणाम म्हणून असो, पण तिच्या मनाचे वारे कोणत्या दिशेनें वहात होते तें मला स्वतःला लवकरच कळून आलें.

त्या प्रसंगानंतर तीनच दिवसांनंतरची गोष्ट. मावशीच्या वाड्यांतील परसांत एक बेलाचें झाड आहे. त्यावरचा बेल काढण्याकरतां सिंधू आली होती. बेल तिच्या आजीला हवा असे आणि तो काढण्यासाठीं रोज तिच्या दोन धाकट्या बहिणी येत.

"कां? आज बेल काढायची कामगिरी तुझ्यावरशी आली? धाकट्या बहिणी कुठं गेल्या?" मीं विचारलें. मी त्याच वेळीं परसांत होतों.

"जाताहेत कुठं? आहेत कीं घरांतच! पण त्या दोघी जणी आजीवर रुसल्या आहेत, म्हणून मग मी आलें—तिनं सांगितलं म्हणून."

"मी देऊं का काढून बेल?"

'नको' अशा अर्थानें ओठ एकमेकांवर दाबून सिंधूनें मान हलवली.

"कां?" जणुं हट्टास पेटल्याप्रमाणें मीं विचारलें.

"मला मिळेल त्या पुण्यांतला वांटा द्यावा लागेल ना तुम्हांला!" हसत हसत सिंधू म्हणाली.

"अगदीं कष्ट होतील नाहीं का मनाला?"

माझ्या या चेष्टेच्या प्रश्नानें सिंधूला आनंद झाला असला पाहिजे हें हर्षानें तरारलेल्या तिच्या मुखचर्येवरून मला दिसलें. त्या हर्षाची प्रतिक्रिया माझ्याहि मनावर झाली. जणुं बोलणें चालू ठेवण्यासाठींच सिंधू म्हणाली, "पुरे झालं! पुण्य असं देतां येतं वाटतं दुसऱ्याला? मीं मघाशीं उगीचच म्हटलं होतं तसं! तें कांहीं खरं नव्हतं."

"मनांत असलं तर देतां येतं बरं का पुण्य!"

"वाऽऽ!" असा भलताच दीर्घ उद्गार काढीत सिंधूनें मान वेळावली.

मीं म्हटलें, "पुण्याचं राहूं दे क्षणभर बाजूला, पण झाडावरून पडलीस म्हणजे?"

"एवढी कांहीं मी 'ही' नाहीं आहें एवढ्याशा झाडावरून पडायला! म्हटलं, चढलें आहें मी पूर्वीं झाडांवर बऱ्याच वेळां, बरं का! आणखीन् व्हायचंच असेल एकादं व्यंग तर होऊं दे बापडं! दैवांत असेल तें कधीं चुकेल का?"

"आत्तां करते आहेस दैवाच्या वार्ता, पण मग पत्करणार नाहीं कुणी तुला!"

"कुणी असं कशाला म्हणतां?" तिनें म्हटलें आणि एकदम जीभ चावली.

"बरं, बरं!" दटावल्याप्रमाणें मी म्हणालों. पण त्या वेळचें तिचें बोलणें ऐकल्यावर तिच्या मनाचे वारे कोणत्या दिशेनें वहात असावेत याविषयीं शंका तरी असणें शक्य होतें का?

सिंधू झाडावर चढली. आपण झाडांवर पूर्वीं पुष्कळ वेळां चढलों होतों असें तिनें म्हटलें होतें, तरी मी तिथेंच राहिलों. तिच्या पायांकडे माझी दृष्टि गेली, तों लक्षण कांहीं ठीक दिसेना. ते थरथर कांपत आहेत हें मला स्वच्छ दिसत होतें. झाडावरून पडण्याच्या गोष्टी आम्हीं नुकत्याच केल्या होत्या आणि मनांतले भाव अचानक प्रकट झाल्यानंतरचें माझें तिथें उभें राहणें याचा तो परिणाम होता कीं काय कुणास ठाऊक! कुणास ठाऊक कशाला? नक्कीच!

पण सरतेशेवटीं मीं म्हटलें होतें तेंच खरें झालें. "आई! पडलें, पडलें, संभाळा!' करून एक मोठी भयंकर किंकाळी मला ऐकूं आली. तत्क्षणीं मी पुढें झालों आणि सिंधूला झेलण्याचा प्रयत्न केला. पण झेलणं कसचें तें! तिच्या नि जमिनीच्या मध्यें मी आलों एवढेंच. माझ्या अंगावर ती कोसळल्यामुळें मला तडाखा चांगलाच बसला. तिला तर पुष्कळच मुका मार लागला. एवढेंच, कीं मी जर मध्यें आलों नसतों तर तिला याहून किती तरी अधिक लागलें असतें.

यानंतर सिंधू दोन तीन दिवस पडूनच होती.

आमचा परिचय आतां बराच वाढला होता. संध्याकाळीं सिंधू पद्मेकडे येई आणि मग आम्ही तिघेंहि दूर कुठें तरी फिरायला जात असूं. त्या दिवसांतल्या संध्याकाळच्या वेळच्या किती तरी रम्य आठवणी माझ्या स्मृतिसंपुटांत सांठवलेल्या आहेत.

पण स्मृतीला संपुटाची काय उपमा दिली मीं ही! स्मृति म्हणजे, खरें म्हटलें तर, एक छोटेंसें खाजगी ग्रंथालयच म्हटलें पाहिजे आपलें! कोणतेंहि पुस्तक आपल्याला लहर येईल तेव्हां काढावें, त्यांतला हवा तेवढा भाग मन मानेल तितका वेळ घोळघोळून वाचावा आणि पुनःप्रत्ययाचा आनंद मनसोक्त लुटावा...

एक दिवस मला जरा बरें नव्हतें. हें सिंधूला कळलें त्या वेळीं तिचा आणि पद्मेचा झालेला संवाद मी शेजारच्याच खोलींत पडलेलों असल्यानें मला स्पष्ट ऐकूं आला.

"जगदीश आज दिसत नाहींत कुठं?" सिंधूनें विचारलें.

"मघाशीं डोकं दुखतं आहे म्हणून म्हणत होता खरा! कुठं आहे कुणास ठाऊक!"

"फिरायला येणार नाहींत ते आज आपल्याबरोबर?"

"नाहीं म्हणाला मघाशींच तो."

"खरंच? काय होतंय त्यांना?"

"तापबीप यायचा असेल!"

"मग कांहीं औषधबिवपध दिलंस कीं नाहीं त्यांना?"

"द्यायला कशाला हवं? तो काय परका आहे कीं काय इथं? त्याला ठाऊक आहेत औषधांच्या सगळ्या जागा. घेईल काढून."

"हें काय बोलतेस, पद्मे! किती बेपर्वाई!"

"मग तूं कर कीं शुश्रूषा त्याची! तुझी वाटच पहात असेल तो!"

"जाऽऽ!"

"खरं सांगूं का? त्याला कांहींसुद्धां झालेलं नाहीं. उगीच कांहीं तरी थोडंसं अस्वस्थ वाटलं असेल, तर तूं आपलं त्याचं उगीचच मनानं वाढवीत बसली आहेस!"

"तुझं आपलं कांहीं तरीच पद्मे! वडाची साल पिंपळाला!"

"नाहीं नाहीं! पिंपळाचीच साल पिंपळाला!"

शेजारच्या खोलींत सामसूम झाली. पडल्या पडल्या मी स्वप्न रंगवूं लागलों, चित्रें रेखाटूं लागलों, मनाचा शोध घेऊं लागलों...

त्या रात्रीं मला ताप आला.

रात्रीं नऊ-साडेनवाचा सुमार असेल. मीं खोलींत दिवा लावला नव्हता, कारण मला अंधारांतच स्वस्थ पडून विचार करणें आवडतें. घरांतली सगळी मंडळी स्वयंपाकघरांत जेवायला गेली होती. मला जेवायचें नव्हतें. मी डोळे मिटून अर्धवट गुंगींत राहिलों होतों.

माझ्या कपाळावर कुणाचा तरी अत्यंत थंड हात पडला.

माझ्या तोंडून 'कोण आहे?' असा उद्गार बाहेर पडणार, तोंच दुसरा हात माझ्या तोंडावर बसला नि तें बंद झालें. त्याबरोबर कंकणांचा मधुर किण-किणाटहि झाला. यानंतर अगदीं हळू आवाजांत, कानांत गुजगोष्ट सांगितल्या-प्रमाणें सिंधूचे शब्द माझ्या कानीं आले, "हें मुसुंबं आणलं आहे, तें खा चटकन्! म्हणजे मग बरं वाटेल तुम्हांला!"

"कुठून आणलंस तूं हें?" मीं तिला विचारलें.

"कुठून कां असेना! आधीं खा तें! चटकन् खा! कुणाला न सांगतां आलें आहें मी! मला थांबायला मुळींच वेळ नाहीं. ताबडतोब गेलं पाहिजे!"

"मला मावशीकडे कांहीं खायला मिळत नाहीं असं वाटलं कीं काय तुला?" मीं खोट्या तीव्र स्वरांत विचारलें.

पण प्रेमानें विद्ध झालेल्या माणसाला असला कृत्रिमपणा समजत नाहीं. बावरून ती म्हणाली, "तुमच्यासाठीं मीं हें आणलं याचा हा अर्थ होईल ही कल्पनाच नव्हती मला! अगदीं वेडी आहें मी! खरंच, कांहीं म्हटल्या कांहींच कसं कळत नाहीं मला? पण आतां मीं हें आणलं आहे खरं. परत न्यायचं का तें?" सिंधू रडकुंडीला आली.

मी एकदम विरघळलों. माझा सारा उसना राग विरून गेला. मीं तिच्या हातून तें मुसुंबं घेतलें.

एवढ्यांत स्वयंपाकघरांत कांहीं तरी विनोद झाला असावा. कारण, सर्वांच्या मोठ्या हसण्याचा आवाज, त्यांतल्या त्यांत पद्मेचें फारच मोठ्यांदा खदखदां हसणें ऐकूं आलें. मी भानावर झालों. सिंधू म्हणाली, "जातें मी! जाऊं?"

मीं हुंकार दिला.

तिनें माझ्या तोंडाजवळ तोंड आणलें आणि म्हटलें, "जातं!"

तिला त्या क्षणीं जवळ ओढून हृदयाशीं धरावें आणि तिच्या तहानलेल्या ओठांचें चुंबन घेऊन ते तृप्त करावेत अशी तीव्र इच्छा एक क्षणभर माझ्या मनाला चाटून गेली.

पण एक क्षणभरच. आपल्या मनाचा थांग आपल्याला लागला नाहीं तोंपर्यंत या भोळ्या जिवाला खोटें प्रेम दाखवून फसवणें अनुचित होईल, हा विचार एकदम मनांत बळावला आणि मीं म्हटलें, "लवकर जा! कुणी तरी येईल! आणखीन् अशी वेड्यासारखी भलत्या वेळेला येत जाऊं नको!"

सिंधू गेली. पण जाण्यापूर्वी माझा हात हातांत घेऊन दोन्ही हातांनीं दाबून गेली. मीं आपल्या हाताची यत्किंचितहि हालचाल केली नाहीं.

यानंतर दोन दिवसांनीं पद्मेला तिच्या नवऱ्याचें एकाएकीं पत्र आलें. तिचा सासरा आजारी होता. दुखण्याचें स्वरूप तसें गंभीर नव्हतें, पण मदतीला माणूस म्हणून त्यानें पद्मेला बोलावलें होतें. पत्र आल्याच्या तिसऱ्याच दिवशीं जायचें असा तिचा बेत ठरला.

पत्र आल्याच्याच दिवशीं मला एकीकडे गांठून पद्मेनें विचारलें, "जगदीश, पुष्कळ दिवस विचारीन म्हणतें आहें, पण विचारायला झालं नाहीं. आज विचारतें, सिंधू तुला कशी काय वाटते?"

"चांगली आहे कीं!"

"चांगली म्हणजे कशी?"

"कुणाहि चांगल्या पुरुषाचा संसार ती चांगला करील."

"कुणाहि पुरुषाच्या संसाराविषयीं माहिती नको आहे मला. तुझ्याविषयीं उत्तर दे!"

"तें मला कसं सांगतां येईल?"

"भोळी आहे बिचारी! तिचं तुझ्यावर मन जडलं आहे, म्हणून विचारण्याचा प्रश्न आला."

"मला ठाऊक आहे तें."

"मग तुझा विचार काय आहे?"

"माझ्या मनाचा अद्याप मला कयास लागत नाहीं."

पद्मेनें सिंधूच्या घरच्या परिस्थितीचें वर्णन केलें आणि म्हटलें, "तिला सोडवण्याकरितां तरी तूं तिच्याशीं लग्न करावंस असं मला वाटतं."

"पद्मे, रागावूं नकोस. पण मीं पाहून ठेवलं आहे, सोडवण्याच्या दयाबुद्धीनंच केवळ लग्न केलं तर संसार सुखाचा होत नाहीं. आपण उपकार केला आहे ही अहंपणाची जाणीव जन्मभर मनांत राहते. सिंधूविषयीं उत्कट प्रेम वाटल्याशिवाय मी होकार कसा देऊं?"

"तुला उत्कट प्रेम वाटत नाहीं?"

"अद्याप वाटूं लागलेलं नाहीं."

"कधीं वाटणार नाहीं?"

"तें कसं सांगतां येईल मला? अद्याप वाटत नाहीं एवढंच."

"तिनं वाट तरी किती दिवस पहायची?"

"भवितव्याविषयीं कधीं कुणाला सांगतां आलं आहे?"

"माझ्या लग्नाच्या वेळेला माझी नि यांची ओळखहि नव्हती, नि तूं इतका चोखंदळपणा नि खळखळ करतो आहेस!"

"माझीं मतं नि विचार, तुला सगळं कांहीं ठाऊक आहे, पद्मे! मग असं कसं बोलतोस? मी कांहीं ही मुलगी चांगली कीं ती चांगली असला खेळ करत नाहीं आहें."

"गाढव आहेस!"

"मनांतलं खरं बोलून दाखवलं म्हणून का?"

"सात गाढव आहेस! मनाचा कानोसा घेतों आहें म्हणून म्हणत चांगली मुलगी हातची घालवशील अन् नंतर कुठल्या तरी आगगाडीच्या इंजिनाला माळ घालशील!"

मी हसलों. पण कांहीं बोललों नाहीं.

पद्मा खालीं निघून गेली.

तो दिवस माझ्या चांगला लक्षांत राहिला आहे.

दुसऱ्या दिवशीं जायचें म्हणून पद्मा मावशीबरोबर एका घरीं बसायला गेली होती. मी घरांतच वाचीत पडलों होतों. माझें लक्ष लागत नव्हतें. नानाप्रकारचे विचार डोक्यांत गर्दी करीत होते.

बराच वेळ प्रयत्न करूनहि मनाची व्यग्रता कमी होईना, तेव्हां मी

सरळ उठलों आणि गांवाबाहेर पडलों. लहानसें खेडें तें. पंधरावीस घरें मागें टाकल्याबरोबर एकदम वस्ती संपून शेतें सुरू झालीं. मी, सिंधू आणि पद्मा याच बाजूला पुष्कळ वेळां फिरायला आलों होतों. दूरपर्यंत जाऊन एका शेता-मधल्या प्रचंड डेरा असलेल्या आंब्याच्या झाडाखालीं काळ्या शार जमिनींत मी पहुडलों. नांगरणी अद्याप झाली नव्हती. जिकडे तिकडे शिसवीच्या रसाचा समुद्र पसरल्यागत वाटत होतें. या आंब्याला या वर्षी कैऱ्या लागल्या नव्हत्या, त्यामुळें राखणदार कुणी नव्हता.

सगळीकडे कसें शांत, शांत होतें.

सिंधू... लग्न... प्रेम... सुख... जीवित... माणूस जगतो कशासाठीं?... जीवनाचें साफल्य... ध्येय... देशभक्ति... त्याग... मरण... काळ... विश्व... आकाश... तारे... दाटून आलेला संधिप्रकाश...

कुणाचीं तरी पावलें वाजलीं. मी उठून बसलों आणि पाहूं लागलों. सिंधू येत होती. ती जवळ आली तसा मी पुन्हा पहिल्यासारखा लवंडलों आणि आकाशांत नुकत्याच प्रकट होणाऱ्या तारकांकडे दृष्टि लावली.

"पद्मा नाहीं आली आज?"

मीं तिला कारण सांगितलें.

"तिच्याबरोबर तुम्हीहि जाणार ना उद्यां?"

"होय!"

"आतां पुन्हा कधीं?"

"अन्नोदकाचा ऋणानुबंध असेल तव्हां!"

"साधुपुरुष आहांत तुम्ही, पण एक विचारतें,—ओळख राहील का सिंधूची?"

"हें काय सांगायला पाहिजे?"

"कांहीं कांहीं वेळेला माणसाला गोष्टी सांगाव्या लागतात."

मी आतां आकाशांत दिसूं लागलेले तारे मोजूं लागलों. ते मोजतां मोजतां मन सारखें भ्रमण करीत होतें. वेळ किती गेला कुणास ठाऊक?

अनपेक्षितपणें सिंधू एकदम माझ्याजवळ सरकली, मला लपेटून तिनें माझें मस्तक वर उचललें आणि हृदयाशीं घट्ट धरलें. अननुभूतपणामुळें माझ्या मना-वर भीतीची सावली एक क्षणभर तरळून गेली. आणि नंतर लागलीच सावरीच्या कापसाच्या उशींत मस्तक दाबलें गेल्यासारखें होऊन कसली तरी विलक्षण

तृप्तीची आणि त्याच क्षणीं अतृप्तीचीहि संवेदना मात्र शिल्लक राहिली. मी सुन्न झालों आणि गुदमरलों होतों तरी, कसें कोण जाणे, तिच्या लसलसणाऱ्या हृदयाला आवेगानें मस्तक दाबून मीं क्षणमात्र प्रत्युत्तर दिलें. तेवढ्यांत सिंधूनें आपला बाहुपाश न सोडवतां हृदयापासून मला बाजूला करून माझ्या मुखावर, गालावर, नेत्रांवर, कपाळावर चुंबनांचा वर्षाव केला.

एकादी जोराची लाट अनपेक्षितपणें यावी आणि तिचा वेग सहन न होऊन माणसानें तिला डोक्यावरून जाऊं द्यावें तशी माझी स्थिति झाली.

सिंधू मला पुन्हा हृदयाशीं ओढणार तेवढ्यांत मोठी धडपड करून तिच्या पाशांतून मीं सुटका करून घेतली आणि म्हटलें, "सिंधू, बरं नाहीं झालं हें!"

"कां? माझं मन तुम्हांला ओळखूं नाहीं आलं का?"

"आलं. पण—"

"पण काय? लवकर सांगा!" कातर आवाजांत तिनें विचारलें.

"सिंधू, रागावूं नकोस. पण माझं मन अद्याप तूं मला हवी आहेस याची ग्वाही देत नाहीं. माझी स्थिति मोठी चमत्कारिक झाली आहे."

मान खालीं घालून विद्ध आवाजांत सिंधू म्हणाली, "क्षमा करा मला! मीं मनाशीं भलतीच समजूत करून घेतली. केवढा वेडेपणा झाला माझा हा! माझी पायरी समजून मी वागलें नाहीं. विसरून जा सगळं!"

माझ्या जिभेवर किती तरी शब्द गोळा झाले. माझा आपल्या मनाशीं अद्याप निर्णय झाला नाहीं ही गोष्ट खरी, तरी पण पुढें तो नास्तिपक्षीं झाला तरी आपणां दोघांमध्यें मित्रत्वाचें नातें तरी चालू रहायला कांहीं हरकत नाहीं, हें मी सिंधूला समजावून देणार, पण मला फारसें कांहीं बोलूं न देतां ती म्हणाली, "चला, आपण जाऊं या आतां!"

घर जवळ आलें, तसें मीं तिला म्हटलें, "ओळख असूं दे."

ती कांहीं बोलली नाहीं. तिची मान खालीं होती. मला अपराध्यासारखें वाटूं लागलें.

रात्रीं मी अंथरुणावर पडलों तेव्हां माझें मन सारखा प्रश्न करूं लागलें, 'तुझं कुठं कांहीं चुकलं का? तुझं कुठं कांहीं चुकलं का?'

यांतच एक क्षणभर माझ्या मनांतला पशूहि जागृत झाला आणि म्हणाला, "काय वेडा आहेस! चांगलं पांखरूं आपणहून जाळ्यांत आलं होतं. वेळहि झकासपैकीं जमून आली होती. संधि घालवलीस!"

या दोन्ही विचारांना तोंड देतां देतां माझ्या मनाला फार श्रम झाले.

आपल्या परीक्षेचा निकाल सुटी संपली कीं लागणार आणि नंतर कुठें तरी आपल्याला रोजगार करावा लागणारच आहे, तर मग आधींपासूनच खडे टाकून पहायला काय हरकत आहे अशा विचारानें, पद्मेला घेऊन पुण्याला आल्यानंतर मीं खटपट सुरू केली. माझ्या परीक्षेचा निकालहि समाधानकारक लागला. त्यामुळें आणि एक दोन ठिकाणीं माझ्या ओळखी होत्या त्यामुळें, मला प्रकाश विमा कंपनींत नोकरी मिळाली.

या दिवसांत सिंधूला मी विसरलों होतों असें कसें म्हणूं? पण प्राजक्ताच्या वाडीला असतांना वाचण्याखेरीज दुसरा कांहींच उद्योग मला नव्हता, त्यांतून सिंधू जवळहि होती, त्यामुळें दिवसांतला पुष्कळ वेळ तिनें माझें मन व्यापून टाकलें होतें यांत कांहीं आश्चर्य नव्हतें. पण या एकदोन महिन्यांत तिची मला फारशी आठवण झाली नाहीं हें मात्र खरें होतें.

पण एका पहाटे असा एक प्रसंग घडला, कीं त्यामुळें माझें मन हादरून गेलें.

त्या दिवशीं पहाटे मला कसलें तरी चमत्कारिक स्वप्न पडलें होतें, त्यामुळें मी जागा झालों होतों. आणि नंतर मला कित्ती तरी वेळ झोप आली नव्हती. माझ्या माथ्याशींच खिडकी होती, तिच्यामधून नुकत्याच सुरू झालेल्या पाऊस-काळांतला गार वारा वाहत होता. झोप येईना म्हणून बराच वेळ अंथरुणावर तळमळत काढून सरतेशेवटीं मी अंगाभोंवतीं ब्लँकेट लपेटून घेऊन खोली-मागच्या सज्ज्यांत आलों आणि कठड्याला टेकून उभा राहिलों.

माझ्या पुढ्यांत बंगल्याचें मागचें अंगण होतें. त्यापलीकडे शेजारच्या सावदे-करांचा बैटा बंगला आणि त्यापलीकडे डॉ. श्रीगोंदे यांच्या तारकासदन नांवाच्या तिमजली बंगल्याची आडवी बाजू होती. त्यापलीकडे कांहींच दिसत नव्हतें. पूर्व दिशा त्या बाजूला होती. तेथें पहाटेची उज्ज्वल प्रभा फाकूं लागली होती आणि त्यामुळें तारकासदन काळेंकभिन्न आणि केवढें तरी अजस्र दिसत होतें.

थोडा वेळ मी असा तिकडे पहात राहिलों होतों, तेवढ्यांत तारकासदनाच्या तिसऱ्या मजल्याच्या एका खोलींत खटकन् आवाज होऊन दिवा लागला आणि आणि माझें लक्ष तिकडे वेधलें गेलें. दिवा लागूनहि एका खिडकीखेरीज बाकीच्या खिडक्या उजळल्या नव्हत्या, त्याचप्रमाणें समोरच्या भिंतींतलें दार

खिडकीपासून अगदीं जवळ दिसत होतें, यावरून तें न्हाणीघर असलें पाहिजे हें मीं ओळखलें. त्या न्हाणीघरांत एक तरुण मुलगी आली. (डॉक्टरांच्या घरच्या मंडळीशीं माझी जानपछान नव्हती, त्यामुळें माझ्या ती माहितीची नव्हती.) साहजिकच ती काय करते आहे याविषयीं जिज्ञासा जागृत होऊन मी तिच्या प्रत्येक हालचालीकडे लक्षपूर्वक पाहूं लागलों.

तिनें आधीं ब्रशानें दात घासले आणि नंतर थोडा वेळ बाहेर जाऊन ती परत आली. येतांना एका अंगाला कललेल्या तिच्या शरीरावरून तिनें बादलींतून कढत पाणी आणलें असावें हें माझ्या ध्यानांत आलें. न्हाणीघरांत एक आरसाहि असावा, कारण ती सारखी त्या दिशेकडे पहात होती.

तिनें मग आपल्या अंगावरचे कपडे उतरायला सुरुवात केली. प्रथम तिनें पोलकें काढलें, त्याच्या आंत असलेली कांचोळीहि काढली. नंतर मग निसर्गानें दिलेल्या आपल्या उघड्या रेखीव देहाकडे समोरच्या आरशामधून ती मनसोक्त पाहूं लागली. तिचा वर्ण गौर होता, त्याकडे तर मी पहात होतोंच, पण त्यांतल्या त्यांत तिच्या पुष्ट स्तनभागाकडे माझी दृष्टि खिळून राहिली होती. तिचा पदर तर कामिनीच्या चतुर सर्वांप्रमाणें केव्हांच दूर झाला होता.

मी दुसऱ्या मजल्यावर आणि ती तिसऱ्या मजल्यावर होती. मध्यें आमचें मागील अंगण, एक बैटा बंगला इतक्यांचें मिळून अंतर असल्यामुळें मला त्या तरुणीच्या कमरेवरच्याच भाग फक्त दिसत होता. ती आरशांत पहात होती आणि मी तिच्याकडे पहात होतों. आपल्याकडे कुणी असें पहात असेल याची तिला कल्पनाहि नसेल. थोड्याच वेळांत अंगावर पाणी घेण्यासाठीं ती खालीं बसली आणि खिडकीची उभी प्रकाशित चौकटच तेवढी मला दिसूं लागली...

या प्रकारानंतर माझ्या मनांत काय काय प्रकारची घालमेल झाली त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. पण सिंधूनें मला जवळ ओढलें होतें, त्या वेळच्यापेक्षां फारच मोठा हादरा माझ्या मनाला बसला होता. मी खोलींत येऊन अंगावर पांघरूण घेऊन पडलों, तेव्हां माझ्या बाहुपाशांत माझी कल्पनामय सिंधू मला बिलगून निजलेली होती.

त्या दिवशीं संध्याकाळीं कचेरी सुटल्यावर मी पद्मेच्या घरीं गेलों. सिंधू-विषयींचा माझा निर्णय तिला कळवायचें मीं ठरवलें होतें.

चहापाणी आणि अवांतर गप्पा झाल्यावर पद्मेला मीं प्राजक्ताच्या वाडीची हकिकत विचारली. तिनें माझी निर्भर्त्सना करून सांगितलें, "सिंधूचं नुकतंच

लग्न झालं. इथंच पोस्टखात्यांत कुणी वाळिंबे म्हणून आहेत, त्यांच्याकडे तिला दिली आहे."

पद्मेच्या घरून मी परत आलों तों मला काय वाटत होतें त्याचें आकलन मला स्वतःलाच होत नव्हतें.

असेच कित्येक दिवस निघून गेले. सिंधूला विसरण्याचा मी प्रयत्न करूं लागलों.

एके दिवशीं सिंधू मला इथेंच रस्त्यांत भेटली. कुठें तरी देवदर्शनाला किंवा तसल्याच कांहीं कामाला ती चालली असावी. तिच्याबरोबर तिच्याच वयाची एक मुलगीहि होती. खरें म्हटलें, तर सिंधूनें मला टाळायचा प्रयत्न केला असावा असें मला वाटलें. पण मी थांबलेला दिसल्याबरोबर ती एकटीच माझ्या बाजूला आली. तिचे डोळे एकदम पाणावले.

"इथंच सासर आहे वाटतं तुझं?" मीं तिला विचारलें.

"हं!" तिनें एकाक्षरी उत्तर दिलें.

आतां पुढें काय बोलावें तें न समजल्यामुळें त्या विचित्र ठिकाणीं आमचा थोडा वेळ स्तब्धतेंत गेला. मग अनपेक्षितपणें सिंधूनें विचारलें, "तुम्ही राहतां कुठं?"

माझी राहण्याची जागा मीं तिला नीट सांगितली आणि विचारलें, "येणार आहेस? संध्याकाळीं ये. साडेपांचनंतर सामान्यतः मी घरीं असतों."

याचें कांहींच उत्तर न देतां ती फक्त एवढेंच म्हणाली, "जातें. वन्सं वाट पहात उभ्या आहेत."

यानंतरची गोष्ट आठच दिवसांपूर्वीची आहे. संध्याकाळीं मी आपल्या खोलींत बसलों असतांना माझ्याकडे कुणी तरी आलें. मीं दार उघडून बघितलें, तर बारा तेरा वर्षांचा एक मुलगा. माझ्या हातांत त्यानें चिठ्ठी दिली.

त्या चिठ्ठीवरचें अक्षर अगदीं कष्टानें काढल्यामुळें कांपरें कांपरें दिसत होतें. चिठ्ठी सिंधूची हें तळच्या सहीवरूनच मला कळलें. तिनें लिहिलें होतें:

"या जगांत आतां माझें आयुष्य किती आहे तें मला सारें दिसतेंच आहे. ही चिठ्ठी पाहतांक्षणींच मला भेटायला आलां नाहींत तर या जन्मीं तरी आपली भेट पुन्हा नाहीं. ही चिठ्ठी

तुमच्या हातीं धड पडेल कीं नाहीं याविषयीं मला शंकाच आहे, तरी पण प्रयत्न करतें. शेवटच्या क्षणीं वाटेल तो प्रयत्न करायला माणसाचें मन मागेंपुढें पहात नाहीं...

—सिंधू

वाचून झाल्यावर चिठ्ठी आणणाऱ्या मुलाकडे मीं बघितलें. त्यानें सिंधूच्या घरचा पत्ता सांगितला आणि सूचनाहि दिली, "दारांतून आंत गेल्याबरोबर उजव्या बाजूला जो जिना लागेल त्यानं सरळ तिसऱ्या मजल्यावर जा. तिथं सिंधू एकटी निजली असून तिच्याजवळ कुणीहि नाहीं." एवढें सांगून तो निघूनहि गेला.

मी चकित झालों. सिंधू मरणाच्या वाटेवर ? तिला हें असें लिहायला काय झालें असावें याचें आश्चर्य करीत धडधडत्या हृदयानें कपडे करून मीं सिंधूचें घर गांठलें आणि तिसऱ्या मजल्यावर गेलों. मजला कसला ! साधें खपरेल होतें तें. तिथेंच एक अंथरूण टाकलें होतें आणि त्यावरच सिंधू एकटी—अगदीं एकटी पडली होती.

मी एकदम धावत जाऊन तिच्याजवळ बसलों. तिच्यांत केवढा बदल झाला होता ! थोड्या महिन्यांपूर्वी माझ्याशीं परिचय झालेल्या सिंधूची, किंवा मला रस्त्यांत भेटलेल्या सिंधूची सावलीदेखील तिच्यांत राहिली नव्हती. पण तिच्या त्या परिस्थितींत तिची अशी ही दशा कशामुळें झाली हें मला विचारतां येणें शक्यच नव्हतें.

"आलांत ?—फार बरं झालं ! आतां मला सुखानं मरण येईल !" ती म्हणाली.

तिचा हात हातांत घेऊन मी खदखदां हसून बोलूं लागलों, "काय वेडी आहेस सिंधू ! मरायच्या कसल्या वार्ता करते आहेस ? मी मनाशीं एक योजना आंखतों आहें. पुष्कळ दिवसांपासून माझ्या मनांत होतं, पण आज बोलतों आहें. माझ्या योजनेंत असल्या वार्तांना स्थान नाहीं. ओळख पाहूं माझी योजना !"

सिंधूनें थोडा वेळ विचार केला नि मान हलवून सुचवलें, "नाहीं ओळखतां येत ! सांगा !"

"सिंधूला मी तिच्या माहेरीं घेऊन जाणार आहें."

"म्हणजे काय ?" सिंधूनें क्षीण आवाजांत विचारलें.

"सिंधू उगम पावते हिमालयांत. मग तेथून ती काश्मिरांत जाते. मी

तुला काश्मिरांत घेऊन जाणार आहें."

"तें कशाला?"

"तूं बरी झालीस म्हणजे आपण दोघं कुणाला न कळवतां अचानक काश्मिरांत जाऊं. तिथं आपल्याला कुणीहि ओळखणार नाहीं."

सिंधूनें डोळे विचित्र केले आणि म्हटलें, "मग त्या दिवशीं—त्या दिवशीं संध्याकाळीं—" ती एकदम गप्प झाली.

तिच्या अर्धवट बोललेल्या वाक्यांतला अभिप्राय ध्यानांत येऊनहि मी तिच्या-पुढें अधिकाधिक चित्रें रंगवूं लागलों, "महाराष्ट्रांतून तिकडे इतक्या दूर गेल्या-वर तिथं आपल्याला निश्चिंतपणानं राहतां येईल. आपण तिथं सरोवरांच्या काठाकाठानं हिंडूं, निसर्गाच्या लाडक्या बागबगीचांतून, लताकुंजांतून, झेलम नदीच्या पात्रावरून संथपणानं तरंगणाऱ्या नौकागृहांतून आपण प्रवास करूं..."

सिंधूच्या डोळ्यांत कसलें विलक्षण तेज चढलें!

"तिथं एकाद्या छोट्याशा घरांत आपण बिऱ्हाड करूं. मी खटपट करून काम मिळवीन. तिथल्या एका वजनदार माणसाशीं माझी नुकतीच ओळख झाली आहे. आपल्याला चटकन् पैसे मिळूं लागतील. संध्याकाळीं मी घरीं परत येईन आणि मग आपण कुठं तरी रम्य ठिकाणीं फिरायला जात जाऊं. किंवा कधीं फिरायचा कंटाळा आला तर घराच्याच अंगणांत खुर्च्या टाकून बसूं. आजुबाजूला बघत राहलं तरी भोंवतालच्या डोंगरांवर आणि त्यांच्या शिखरांवर सांचलेल्या हिमाच्या थरांवरून संध्याकाळच्या मावळत्या सूर्याचे नाजूक किरण पडलेले दिसतील. अशा वेळीं सगळीकडे होत असलेली रंगांची वारेमाप धनदौलत पाहूनसुद्धां आपलं भान हरपून जाईल. सारे कष्ट, सारीं दुःखं, साऱ्या निराशा पार मागें हजार मैलांवर राहतील...काश्मीर उत्तरेकडे पहाडांच्या कुशींत आहे हें माहीत आहे ना तुला?"

उत्तरासाठीं मी सिंधूकडे पहातों, तों तिच्या डोळ्यांतून घळघळां अश्रु वहात होते. स्फुंदत स्फुंदत ती म्हणाली, "जगदीश, ते सुखाचे दिवस बघायला या माझ्या संपत चाललेल्या आयुष्यांत जागा नाहीं—एवढी देखील जागा नाहीं."

मी म्हणालों, "तूं बरी होशील या आजारांतून!"

ती बोलली नाहीं. तिनें फक्त माझा हात धरून ठेवला होता.

दिवस मावळला असावा. माळ्यांत अंधार सांचूं लागला होता.

जरा वेळानें क्षीण आवाजांत सिंधू म्हणाली, "तुम्ही आलांत, फार बरं झालं!

मला वाटलं होतं, तुम्ही येणार नाहीं!"

"तूं स्वस्थ पड कशी! तुझं औषध कुठं आहे?"

"औषध अजून यायचं आहे!"

"कुठल्या डॉक्टरांचं औषध चालू आहे तुला?"

"मी स्वतःच आतां त्याच्याकडे जाणार आहें आणि घेणार आहें औषध!"

"असं काय बोलतेस! तुझ्याजवळ कुणीच कसं नाहीं?"

ती कांहींच बोलली नाहीं.

"थांब, मी खालून कुणाला तरी बोलावून आणतों."

सिंधूनें मला उठूं दिलें नाहीं. "कृपा करून या वेळीं तरी मला सोडून जाऊं नका!"

तिला फार शीण आला होता. तिला काय झालें होतें आणि तिच्या या अवस्थेंतहि तिच्याजवळ कुणीच कसें नव्हतें याबद्दल मला आश्चर्य वाटत असूनहि चौकशी करतां येत नव्हती. या विचित्र परिस्थितीबद्दल हसावें कीं दुःख करावें, मला समजेना.

ती गप्प होती. मीहि गप्प होतों. काय बोलणार अशा वेळीं? सुमारें पंधरा मिनिटांनीं माझा हात आपल्या हातांत ठेवून सिंधू शांतपणें जगाचा निरोप घेऊन गेली.

खालीं कुणाला तरी कळवावें म्हणून मी उठून जाऊं लागलों तोंच कुणी तरी कंदील घेऊन वर येत होतें.

मी थांबलों.

ती व्यक्ति वर आली. सिंधूचा तो नवरा असावा बहुतेक. त्यानें माझ्याकडे एकदां निरखून बघितलें, सिंधूच्या दिशेनें दृष्टि टाकली आणि कुत्सितपणानें म्हटलें, "एकंदरींत तुम्हीच ते वीर म्हणायचे! बरं झालं, समजलं!"

मला कांहीं अर्थबोध होईना म्हणून मीं विचारलें, "काय म्हणतांहां तुम्ही? कोण? कसला वीर?"

पिसाळलेल्या जनावरासारखा तो ओरडला, "शरम नाहीं वाटत विचारायला? तिला तोंडघशीं पाडून आपलं पाप माझ्या नांवावर—"

त्याच्या ओंगळ आरोपामुळें माथं भडकून मी त्याच्या अंगावर धावून गेलों आणि त्याला गचांडी दिली. तो कंदिलासकट धाडकन् खालीं कोसळला. कंदील विझून गेला. त्या अंधारांत त्याला उठवून बसवून त्याचे खांदे गदगदा हलवीत

मी त्याच्यावर खेकसलोंच, "मूर्खा, नुकताच तिचा प्राण गेला, म्हणून तिच्यावर वाटेल ते आरोप करतोस?"

तो गुरगुरला, "मेली? बरं झालं! पण तुला एवढी चाड होती तिच्या अब्रूची, तर तूंच कां नाहीं तिच्याशीं लग्न केलंस?"

मला कांहीं उत्तर सुचेना. पण मीं त्याला एकदां खूप पुढें ओढून मागें ढकलून दिलें आणि तिरिमिरीसरशीं धडाधडा जिन्याच्या पायऱ्या उतरून रस्त्यावर आलों.

किती वेळ मी भटकत होतों कुणास ठाऊक! बऱ्याच वेळानंतर स्मशानांत गेलों. चिता जळत होती. दहाबारा माणसांचें कोंडाळें जवळच बसलेलें होतें. दूर एका शिलाखंडावर विमनस्कपणानें बसून मी त्या विचित्र खोल्या आगेपाचा विस्मय करीत राहिलों होतों.

तीन दिवसांनीं पद्मेनें मला सिंधूच्या मरणाची बातमी सांगितली. आणि त्याचा इतिहासहि सांगितला. सिंधूला कुणींतरी फसवलें होतें. संशय येऊनच तिच्या बापानें तिचें लग्न तडकाफडकीं आणि घाईघाईनें उरकून घेतलें होतें. पण लवकरच तिच्या नवऱ्याला सारें कांहीं कळलें. तेव्हां त्यानें त्या माणसाचें नांव विचारलें. पण सिंधूनें एक अक्षरहि तोंडावाटे काढलें नाहीं. तेव्हां मग त्यानें तिला गुरासारखें झोडपलें. त्यामुळें तिच्या मुलाचा अकालीं आणि मृतावस्थेंत जन्म झाला होता. या प्रकारानंतर तिला माळ्यावर नेऊन टाकण्यांत आलें होतें आणि तिथेंच ती तीनचार दिवस अन्न, पाणी किंवा औषध यांवांचून तडफडून मेली म्हणे...

त्या दिवशीं सिंधूच्या सान्निध्यांत घालवलेल्या शेवटच्या क्षणांची हकीकत मीं पद्मेपासून लपवूनच ठेवली.

* * *

जगदीशनें हें एवढें सगळें सांगितलें आणि मग तो स्तब्ध झाला. मी पण कांहीं बोललों नाहीं. बोलायची जरुरी नव्हतीच.

कुणाचीं तरी पावलें आम्हांला ऐकूं आलीं. त्याबरोबरच काठी आपटल्याचा लयबद्ध आवाजहि ऐकूं आला. मग वरून संथपणें चालत येणाऱ्या वृद्धाची अंधुक आकृति आम्हांला ओळखूं आली. तो आवाज अधिकाधिक स्पष्ट झाला. आमच्यापुढून तो वृद्ध खालीं गेला. नंतर त्याच्या पावलांचा आवाज व काठीची खणखण मंदावत जाऊन अंधारांत विरून गेली.

समोर दिवे अजून लुकलुकत होते, आकाशांत तारा चमचमत होत्या आणि वल्लभाच्या बाहूचें उपधान करून शांत झोपीं गेलेल्या कामिनीच्या श्वासाप्रमाणें वारा मंदपणें वहात होता.

आम्ही उठलों.

जातां जातां जगदीश म्हणाला, "माझ्या मनांत राहून राहून प्रश्न येतो, तो हा, कीं सिंधू फसली ती माझी भेट होण्याआधीं कीं नंतर? आणि आधीं फसली असेल तर तिची माझ्याशीं झालेली प्रीतीची वागणूक म्हणजे वादळांत सांपडलेल्या नौकेनं जवळ असेल तें बंदर गांठण्याचा प्रयत्न करावा तसं होतं कीं काय? पण ही कल्पना फार वेळ मनांत टिकत नाहीं. कारण, शेवटच्या क्षणीं तिनं मला बोलावलं. पण मग...ती अशी फसली तरी कशी?..."

"साराच प्रकार विलक्षण आहे!" मीं म्हटलें. "स्त्रियांच्या मनाचा थांग लागणं मोठी कठिण गोष्ट आहे. पण ती आधीं फसलेली असो किंवा नंतर असो, तिचा जीव तुमच्यावर होता हें निश्चित!"

जगदीश म्हणाला, "मला कांहीं सुचत नाहीं! मनाचा संभ्रम उडाला आहे. मघांशीं तुम्ही घाणेरीचीं फुलं दाखवलींत त्यावरून मला सिंधूची आठवण कां झाली तें कळत नाहीं. आणखीन् कधीं कळेल कीं नाहीं तेंदेखील कळत नाहीं..."

१९४७

.८.

# आगीच्या धगींत

त्याचें नांव गणेश जोशी. तसा तो शांतपणाबद्दल फारसा प्रसिद्ध कधींच नव्हता. परंतु तो इतका भडकेल असें मात्र कुणालाच वाटलें नव्हतें.

गांवांत आदल्याच दिवशीं लष्करानें भरमसाट गोळीबार करून माणसें मारलीं होतीं. मोडतोड करणाऱ्या लोकांबरोबरच निरपराध आणि गडबडीशीं संबंध नसलेलीं माणसेंहि गोळ्या लागून ठार झालीं होतीं. 'आतां गांवांत वावरणं देखील धोक्याचं झालं आहे, तेव्हां आम्हां शांतताप्रिय शिक्षकांना शाळेंत येण्याच्या वेळीं संरक्षण देण्याची व्यवस्था सरकारनं करावी,' असें विधान डबीर मास्तरांनीं केलें मात्र, तोंच कमालीचा क्षुब्ध होऊन गणेश जोशी म्हणाला, "तुम्हांला शरम नाहीं वाटत, डबीर मास्तर, असले शब्द तोंडांतून काढायला? चळवळ करणारे लोक प्राण पणाला लावून बंद पाडायचा प्रयत्न करताहेत सरकारचं यंत्र. ते तुमच्यासारख्या क्षुद्र कीटकांना कसला उपद्रव देणार! आणि तुम्ही त्यांच्यापासून संरक्षण मिळावं म्हणून मागणी करतां! आणि ती देखील कुणाकडे? तर पावलोपावलीं आपल्याला पायदळीं तुडवणाऱ्या परकी सरकारकडे! शी शी! तुमच्या नाकावर बसायला हिंदुस्तानांतल्या चिलटालासुद्धां लाज वाटेल!"

डबीर अगदीं वरमून गेले. इतर शिक्षकांच्यामध्यें एकदम स्तब्धता निर्माण झाली. त्यामुळें तर त्यांना फारच शरमिंदे झाल्यासारखें झालें. जरा वेळानें ते एवढेंच म्हणाले, "माझी आज शाळेंत अठ्ठावीस वर्षं नोकरी झाली. माझ्या वयालाहि आतां साठ वर्षं होतील. पण मला इतकं टाकून या वेळपावेतों कुणीच–शाळेचे प्रमुखदेखील–कधीं बोलले नव्हते!"

गणेश जोशी यावरहि कांहीं उत्तर देण्याच्या बेतांत होता, पण त्याला शेजारच्यांनीं अडवलें आणि गप्प केलें.

शिक्षकांमधील स्तब्धता आतां फारच भेसूर वाटूं लागली. ती सहन न होऊन डबीर मास्तर बैठकींतून बाहेरच निघून गेले.

सोहोनी मास्तर म्हणाले, "तूं फारच केलंस, जोशी!"

गणेश जोशी अजून उतरला नव्हता. तो म्हणाला, "मग? भलतंच कांहीं तरी बोलायचं म्हणजे काय?"

सोहोनी अगदीं हलक्या आवाजांत म्हणाले, "पण इतकं बोलत जाऊं नकोस तूं! एकाद्याला संशय यायचा भलताच! पोलिसांचे हस्तक रोगराईच्या दिवसां-मधल्या डांसापिसवांसारखे सध्यां हवेंतूनमुद्धां वावरताहेत, हें टाऊक आहे ना तुला? पण इतका कसा एकदम तोल गेला तुझा? चळवळीशीं किंवा चळवळींत असलेल्या कुणाशीं तुझा दाट संबंध..."

"छे छे! तसलं कांहीं एक नाहीं. पण त्यांत काम करणारे हिरू विलये आणखी नाना थोरे वगैरे लोक माझ्या बरोबरीचे. आम्ही याच शाळेंत एकत्र शिकलों आणि खेळलों. ते कशी धडपड करताहेत तें मला दिसतं. त्यांच्या डोक्यावर सारखी तलवार टांगलेली. आणि त्यांच्याविषयीं या माण-सांनीं...जाऊं द्या! माझ्या तोंडून पुन्हा कडू शब्द बाहेर पडतील!"

एवढ्यावरच त्या दोघांचें बोलणें थांबलें.

पण सोहोनी मास्तरांना आपला चळवळीशीं कांहीं संबंध नसल्याचा गणेश जोशीनं निर्वाळा दिला होता तरी तो खरा नव्हता. त्याचा चळवळीशीं संबंध होता. प्रत्यक्ष म्हणा, अप्रत्यक्ष म्हणा, पण तो बराच घनिष्ठ होता.

कारण, गणेश जोशीचें घर म्हणजे चळवळीमधल्या वाऱ्यावरच्या वाटसरांचें मोठें आश्रयस्थान होतें. ते त्याच्या घरीं अचानक येत, एकादा किंवा दुसरा दिवस रहात आणि तसेच नाहींसे होत. त्यांच्या कार्यासाटीं विश्वास ठेवण्या-लायक आणि देशप्रेमी माणसांकडून तो पैसेहि जमा करी. या दोन कामां-व्यतिरिक्त तिसरेंहि एक महत्त्वाचें काम तो करी. त्याच्या पत्त्यावर त्याच्याच नांवानें पत्रें येत. त्यांच्या आंत बंद लिफाफे असून ज्यांच्याकडे तीं पोंचतीं करायचीं असत त्यांचीं सांकेतिक नांवें त्यांजवर लिहिलेलीं असत. तीं पत्रें पोंचतीं करण्याचें काम गणेश जोशी करी.

त्या दिवशीं शाळा सुटल्यावर गणेश जोशी घरीं गेला, तेव्हां त्याला एक

गृहस्थ दाराशींच भेटला. त्याच्या ओळखीचा आणि पोलिस खात्यांतला. तो एकदम चरकला. एके काळीं हाच मनुष्य गणेश जोशीचा वर्गबंधु होता. पण पोलिस खात्यांत वर्गबंधूच काय, सख्खा भाऊ असला तरी अशा प्रसंगीं जें वाटायचें तें वाटल्याशिवाय कसें राहील ?

"कां रे बुवा ? तुझी दृष्टि आज या वाड्याकडे कशी काय वळली ?" त्यानें विचारलें. "कुणाला वेध लागणार आहे तुमच्या ग्रहणाचा ?"

खासगी वेषांतल्या त्या पोलिस खात्यांतल्या गृहस्थानें उत्तर दिलें, "तसं म्हणजे विशेष असं कांहीं नाहीं. पण मी आलों होतों तुझ्याचकडे !"

"माझ्याकडे असं काय काम निघालं तुझं ?"

"आमच्या साहेबांना तुझी भेट कांहीं माहितीसाठीं घ्यायची आहे. तुला कुणीं घेऊन यावं याचा आज दुपारीं खल चालला होता, तेव्हां मींच म्हटलं, माझ्या ओळखीचा आहे तो, मी आणीन त्याला."

"काय, भानगड कसली आहे रे ?"

"मलाहि अजून नीटसं कळलं नाहीं. पण ज्याअर्थी तुझ्यावर पकडवॉरंट न काढतां नुसतं बोलावून आणण्याचंच बोलणं चालू आहे, त्याअर्थी तसं कांहीं गंभीर नसावं. मला उडत उडत कळलं आहे तें एवढंच, कीं लष्करांतल्या थिएटरामधील बॉंबस्फोटाबाबत नुकत्याच ज्या धरपकडी झाल्या त्यांत विश्वास देशमुख नांवाच्या इसमाला अटक झाली आहे. त्याच्या झडतींत जे कागद सांपडले, त्यांत म्हणे गणू जोशी म्हणून नांव सांपडलं आहे. त्यासंबंधांत कांहीं तरी असलं पाहिजे. तुझा कांहीं चळवळीशीं संबंध नाहीं ना ?"

"छे रे ! अरे, मी साधा शाळेंतला शिक्षक ! माझा कुठला संबंध असायला !"

"तें मात्र सांगूं नकोस ! कुठले कुठले लोक—"

"त्यांतून तुमच्या खात्याला इंद्रासारखे हजार डोळे असणार. त्यांच्या कचाट्यांतून थोडंच कांहीं सुटणार आहे !"

"तसं नव्हे रे ! पण आपलं सहज विचारलं. इतक्या अनपेक्षित ठिकाणांहून लोकांचा संबंध असल्याचं दिसून येत आहे सध्यां, कीं एकादे वेळीं वाटतं, आपणसुद्धां—बरं पण, उद्यां सकाळीं दहा वाजतां तयार रहा. मी येईन नि मग आपण जाऊं. तुझा कांहीं तरी जबाब लिहून घेतील नि सोडून देतील."

"कोण आहेत साहेब तुझे ?"

"बोमनसाहेब. थिएटर लष्करांतलं. तेव्हां गुन्ह्याची सगळी चौकशी लष्करांतल्या पोलिस ठाण्यावर चालली आहे. आपल्याला तिकडे जावं लागणार आहे."

गणेश जोशीनें त्याला निरोप दिला.

तो गेला मात्र, आणि गणेश जोशीचें माथें गरम झालें. त्याला विश्वास देशमुखचा मनस्वी संताप आला. त्याचें सांकेतिक नांव गंगासागर, आणि त्या नांवाचीं कित्येक पत्रें त्याला पोंचवण्याची व्यवस्था त्यानें केली होती. त्याची आणि त्याची पुष्कळदां भेटहि झाली होती. विश्वास देशमुख बेछूटपणाबद्दल नांवाजलेला होता. त्याला गणेश जोशीनें आणि इतर साथीदारांनीं अनेक वेळां बजावलं होतं, "तोऱ्यांत जाशील नि भोंगळपणा करून बसशील एखाद्वेळेला!"

तरीदेखील हा मूर्खपणा त्यानें करून ठेवला होता. आतां किती लोकांना त्याचा गाढवपणा भोगावा लागणार आहे कुणास ठाऊक! चळवळींत असले लोक शिरले आहेत म्हणूनच तिचा विचका होण्याचीं लक्षणं आतांशा दिसूं लागलीं आहेत...

या क्षणीं विश्वास देशमुख आपल्यासमोर असायला हवा होता. प्रथम त्याच्या दोन सणसणीत मुस्कुटांत भडकावून दिल्या असत्या आपण...

पण हें मनाशीं म्हणतांच गणेश जोशीच्या मनश्चक्षूंपुढें दुसरींहि दृश्यें तरळूं लागलीं. त्याच्या मुस्कुटांत आपण भडकावण्याच्या अगोदर पोलिसांतल्या लोकांनीं किती भडकावल्या असतील! आत्तां त्याची काय दशा झाली असेल? आणि नुसत्या तोंडांत भडकावण्यावरच प्रकरण कुठून संपणार?—ती तर नुसती सुरुवात...

त्या क्षणीं पोलिसांच्या 'समज' देण्याच्या नामांकित पद्धति गणेश जोशीच्या मनांत गर्दी करून जमून आल्या आणि लागलीच त्याचें मन परमावधीच्या मार्दवानें ओथंबून गेलें.

हीं माणसें आपला जीव धोक्यांत घालून हा यज्ञ करीत आहेत, त्यांत स्वतःची आहुतिहि देताहेत. त्यांच्या परिसरांत मी गेलों आणि त्या यज्ञांतल्या अग्नीची धग आपल्याला लागते आहे म्हणून संतापतों आहें. ते प्रत्यक्ष जळताहेत, मला नुसती धगच लागते आहे.

विश्वास देशमुखचा वेडेपणा झाला खरा! पण तरुण वय—असल्या गोष्टींचा अनुभव नाहीं...चालायचेंच!

आतां त्याच्यावर जळफळण्यापेक्षां पुढें पावलें कशीं टाकायचीं तें ठरवणें अधिक चांगलें...

हे सगळे विचार करीत गणेश जोशी जिन्याच्या पायऱ्या चढून घरांत गेला आणि त्यानें कपडे काढले.

त्याच्या पत्नीनें चहासाठीं शेगडी पेटवली व तिच्यावर आधण ठेवलें.

गणेश जोशी तेवढ्यांत टेबलाशीं गेला. त्यानें त्यांतून भराभरा बरेचसे कागदपत्र काढून गोळा केले आणि ते शेगडीखालच्या झडपेमधून आंत घालून जाळायला सुरुवात केली. कागद जळत होते व ते पाहून प्रिय माणसाचा अग्निसंस्कार पाहतांना व्हावी तशी त्याची मनःस्थिति झाली होती.

पण मध्येंच त्यानें नुकताच झडपेंत सारलेला एक लहानसा कागद मागें ओढला. त्याचें वरचें टोक पेटलें होतें. लागलीच हात मारून त्यानें तें विझवलें. तो कागद नष्ट करायला त्याचे हात वाहवेनात. तीस सालच्या चळवळीच्या दिवसांत हिरू विल्ये येरवडा तुरुंगांत होता, तेथून त्यानें पाठवलेलें तें पत्र होतें. त्या पत्राचा गणेश जोशीनें ठेवीप्रमाणें संभाळ केला होता.

सगळेच दिवस कांहीं सारखे असत नाहींत. हें पत्र आपण दुसरीकडे कुठें तरी सुरक्षित ठेवूं आणि सैतानी थैमानाचे हे दिवस संपले कीं परत आणूं हा विचार करून त्या कागदाची गणेश जोशी पूर्ववत् घडी करूं लागला. त्याचा वरचा कोपरा जळला होता. खाकी रंगाच्या त्या सरकारी कागदावरची कोपऱ्यांतली तुरुंगाच्या अधिकाऱ्याची सही अर्धवट जळली होती आणि थोडासा मजकूरहि भस्मसात् झाला होता. मागल्या बाजूला कागद संपल्यामुळें उरलेला मजकूर बारीक अक्षरांत हिरू विल्येनं पुढच्या पानावर वरच्या अंगाला रिकाम्या जागेत लिहिलेला होता, त्यांतलीं एवढीं अक्षरें शिल्लक राहिलीं होतीं—

'...रीर खंगलं, कमकुवत झालं असलं तरी आमचं मन यत्किंचितहि... अढळ श्रद्धा असून सुटून परत आल्यावर...'

गणेश जोशीनं तें पत्र एकदां सगळें वाचून काढलें आणि मग पुन्हा त्याची उभी अरुंद घडी करून प्रतिपक्ष्याच्या छाताडांत खंजीर खुपसावा तशी शेगडीच्या झडपेंत खुपसली.

दुसऱ्या दिवशीं आपल्याला कोणत्या प्रसंगाला तोंड द्यावें लागणार आहे याची गणेश जोशीला कांहींच कल्पना नव्हती. पोलिसांशीं त्यानें आजपर्यंत पुष्कळ तंटे केले होते. पण त्यांत त्याची बाजू बरोबर असे आणि तशी ती असे तेव्हांच

तो शेवटपर्यंत भांडून आपलें खरें करून घेई. उद्यां ज्याच्यापुढें त्याला उभें राहावें लागणार होतें तो वरिष्ठ अधिकारी होता. अर्थात् अधिकारी वरिष्ठ म्हणून तसें कांहीं वाटण्याचें कारण नव्हतें. पण त्याची बाजूदेखील कायद्याच्या विरुद्ध होती. तेव्हां नाहीं म्हटलें, तरी त्याला थोडी धाकधुक ही वाटत होतीच. आपण जें कांहीं केलें तें मनाला पटलें म्हणून, बरोबर वाटलें म्हणून. मनोभूमिकेचें नैतिक बल हेंच त्याचें भांडवल. आणि त्याच्याच आधारावर त्याला सामना द्यावा लागणार होता. आपल्याला कोणत्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं लागणार आहेत, किंवा विश्वास देशमुखनें पोलिसांना आपल्याविषयीं काय व किती सांगितलें असेल याचा त्याला कांहीं पत्ता नव्हता. तो लागणें शक्यहि नव्हतें. तेव्हां कल्पित प्रश्न तयार करून त्याचीं उत्तरें तयार करण्याचा नाद त्याला सोडून द्यावा लागला.

मात्र, आपल्याला उद्यां असें असें बोलावणें आलें आहे, ही गोष्ट त्यानें आपल्या एका मित्राला सांगितली. तो मित्र डॉक्टर, त्याची परिस्थिति चांगली, तेव्हां पोलिसांचा पाहुणा होऊन आपल्याला रहावें लागलें तर आपल्या गैरहजेरींत आपल्या बायकोवर व दोघां मुलांवर त्याचें लक्ष राहील ही त्याची खात्री होती.

पत्रें किंवा 'पाहुणे' येणें तूर्त कांहीं दिवस बंद ठेवण्याबद्दलची धोक्याची सूचनाहि त्यानें सगळ्या अपेक्षित ठिकाणीं रवाना केली.

यामुळें, दुसऱ्या दिवशीं तो लष्करांतल्या पोलिस ठाण्यावर गेला, आणि तिथें एका गोल मेजापाशीं नेऊन त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती करण्यासाठीं त्याला सहासात पोलिस अधिकाऱ्यांनीं घेरलें, तेव्हां त्याचें मन अगदीं शांत होतें. किंबहुना, जरूर तेथें उर्मट उत्तरें द्यायलाहि मागेंपुढें पाहायचें नाहीं, हाहि एक विचार त्यानें मनाशीं योजून ठेवला होता.

पहिल्यांदां नांव वगैरे विचारून झाल्यावर त्याला एकदम सरळ प्रश्न विचारण्यांत आला, "तुमचा या चळवळीशीं कितीसा संबंध आहे?"

"कसली चळवळ?"

"सध्यां कॉंग्रेसवाले करताहेत ती!"

"तिच्याशीं माझा कसला आला आहे संबंध!"

"विचारलेल्या प्रश्नाचें फक्त उत्तर द्या! तुमचा या चळवळीशीं कितीस संबंध आहे?"

"माझ्या उत्तराचा अर्थ कळला नाहीं तुम्हांला? चळवळीशीं माझा कांहींएक संबंध नाहीं."

"तुम्ही घाबरलां आहांत काय?"

"तुम्हांला काय वाटतं?"

"तुम्ही घाबरलेले दिसतां!"

"गळेपडूपणानं अशी भीति लादून माणसाला घाबरवण्याची कल्पना आहे चांगली. पण इथं तिचा उपयोग व्हायचा नाहीं. कारण, मी घाबरलेलां नाहीं. संबंध असता तरी घाबरलों नसतों. इथं तर काय, कांहींच संबंध नाहीं."

"तें समजलं, तरी पण तुम्हांला घाबरायचं कांहीं कारण नाहीं. तुम्ही सांगाल ती माहिती आम्ही अगदीं गुप्त ठेवूं. तुमच्यावर कसलीच तोहमत येऊं देणार नाहीं. जें माहीत असेल तें निश्चित मनानं सांगा."

"मला कांहीं माहीत नाहीं."

"वा वा! असं कसं म्हणतां? तुम्हांला पुष्कळ माहिती आहे!"

"ठीक आहे, मग घ्या लिहून!—पृथ्वी गोलाकार आहे. कारण चंद्रग्रहणाच्या वेळीं तिची सांवली वर्तुळाकार पडते. त्याचप्रमाणं दूर अंतरावरून एकादी बोट येत असली तर आधीं तिचा नुसता धूरच..."

"हें काय चालवलं आहे तुम्हीं?"

"मला ठाऊक असलेली माहिती सांगतो आहें."

"आम्हांला चळवळीसंबंधांतली तुम्हांला असलेली माहिती पाहिजे."

"ठीक आहे! मुंबईला गांधीजींचा चले जाव हा ठराव पास झाल्यानंतर सरकारनं त्याच पहाटे..."

"पुरे!" मिशांच्या एका झुपक्यांतून उग्र आणि तुटक आवाज आला.

"असं काय करतां! तुम्हांला पुष्कळ माहिती आहे हें आम्हांला ठाऊक आहे." चष्मेवाल्या आणि सौम्य चर्येच्या एका अधिकाऱ्यानें म्हटलें.

"मग जिथून तुम्हांला हें कळलं तिथूनच मला काय काय ठाऊक आहे तेंहि शोधून काढा! मला कशाला बोलावलं? कांहीं माहीत नाहीं म्हणून सांगितलं तरीं एकाद्याच्या अंगाला उगीचच चिकटवायचं म्हणजे काय!"

"असे रागावतां काय? विश्वास देशमुख तुमच्या ओळखीचे आहेत ना?"

"कोण विश्वास देशमुख?"

"फर्ग्युसनमध्यें एम्. ए. चा अभ्यास करतात ते?"

"नाहीं! या नांवाचा कुणी इसम मला माहीतदेखील नाहीं, तर ओळख कुठून असायची आहे?"

"पहा, पहा आठवण करून!"

"केली!"

"मग काय?"

"माहीत नाहीं, तर काय डोक्यांत माणूस तयार करूं का काय?"

"किती लवकर चिडतां हो तुम्ही?"

"पोलिसांच्या शब्दकोषांत नाहीं म्हणणं याचा अर्थ चिडणं होत असेल तर चिडलों आहें खरा मी!"

"तुम्ही चिडा किंवा चिडूं नका, होय म्हणा नाहीं तर नाहीं म्हणा, पण आमच्यापाशीं पुरावा आहे. हे विश्वास देशमुख तुमच्या माहितीचे आहेत, एवढंच नव्हे, तर त्यांची तुमची चांगली जानपछान असून तुम्हीं त्यांना पुष्कळ पत्रंहि पोंचवलीं आहेत."

"मग इतका भरघोस पुरावा असतांना मला इथं बोलावण्याचे श्रम तरी कशाला घेतले? सरळ अटक करायची, खटला भरायचा, शिक्षा ठोठावायची नि मोकळं व्हायचं!"

मिशांचे पुंजके असलेला बोमनसाहेब गुरगुरला, "वेळ आली म्हणजे तें करावं लागणारच आहे आम्हांला! पण म्हटलं, आधीं सामोपचारानं बघावं. मग काय? तुम्ही या देशमुखांना नाहीं ओळखीत?"

गणेश जोशीनें नकार दिला.

यावर बोमनसाहेबानें एका शिपायाला खूण करून कांहीं कागद आणायला सांगितले. ते आल्यावर त्यानें ते गणेश जोशीच्या पुढं ठेवीत म्हटलें, "हे कागद वाचा. विश्वास देशमुखांनीं आमच्यापुढं दिलेला जबाब आहे तो. सहावं पान काढा. त्यांत स्पष्ट—हें पहा इथं—हें स्पष्ट म्हटलं आहे: 'गणू जोशी मला पत्रं आणून देत असे.' आणखी पुढं वाचा, सगळी माहिती आहे तुमची!"

गणेश जोशीनें ती वाचली आणि म्हटलें, "मला ती लागू पडत नाहीं."

"मग यांतले गणू जोशी कोण?"

"मला काय माहीत? कुणीहि असतील! ते कोण हें मला काय सांगतां येणार?"

"बरं बरं! ओळख दाखवायची नाहींच असा निश्चय केलेला दिसतो तुम्हीं.

त्यांना बघितल्यावर पटेल तुम्हांला ओळख! उद्यां बोलावून घेऊं त्यांना इथं."

'कुठं आहेत ते?' हा जिभेवर आलेला प्रश्न मोठ्या प्रसंगावधानानें गिळून गणेश जोशीनें म्हटलें, "घ्या बोलावून! माझी काय हरकत असायची आहे?"

"त्यांना इथं आणायची यातायात कशाला करायला लावतां आम्हांला? नाहीं तरी सगळं कांहीं कळल्यावांचून राहायचं नाहींच! त्यापरतं मोकळेपणानं सारं सांगून मोकळे कां होत नाहीं तुम्ही?"

"मला कांहीं टाऊकच नाहीं, तर पुनःपुन्हा विचारलं म्हणून थोडंच सांगतां येणार आहे मला!"

"मग तुम्ही आम्हांला हें करायला लावणारच!"

"तें तुमचं तुम्हीं ठरवायचं आहे! माझ्याकडून कांहीं हरकत नाहीं."

"ठीक आहे! मग उद्यां याच वेळेला तुम्हांला यायला पाहिजे."

"ठीक आहे! येईन मी."

"नक्की?"

"माझ्या शब्दावर विश्वास ठेवावासा वाटत असला तर नक्की."

"खात्रीनं?"

"पुन्हा पुन्हा तेंच तेंच काय विचारतां? मला पळायचं असतं तर कालच पळून गेलों असतों. तथापि तुम्हांला खात्री नसली तर आपल्या अधिकारांत जें काय करतां येत असेल तें खुशाल करा! यापेक्षां जास्त काय पाहिजे?"

पोलिस ठाण्याच्या इमारतींतून गणेश जोशी बाहेर पडला तेव्हां त्याच्या मनांत कांहींसा विजयाचा आनंद होता, तर कांहीं अंशीं 'उद्यां आपल्याला विश्वास देशमुखनं ओळख दाखवली तर काय?' या विचाराची धाकधुक भरून राहिली होती. पण त्यांतहि आजच्या दिव्यांतून सहीसलामत पार पडल्याचें समाधानहि होतें.

गणेश जोशी पोलिस ठाण्यावरून तडक शाळेंत गेला. तो तेथें पोंचला त्या वेळीं छोटी सुटी झालेली होती. बैठकींत शिरल्याबरोबर त्याला प्रथम सोहोनी मास्तर भेटले.

ते चकित होऊन म्हणाले, "अरे, तूं आलास? तुझ्या नांवानं चटावर जाऊन आलों मी दुसऱ्या तासाला!"

गणेश जोशीनें त्यांचे आभार मानले.

"कुठं कामाला गेला होतास?"

"हूं!"

"आज डबीर देखील रजेवर आहेत. मघांशीं एकानं तर्क केला, कीं डबीर मानहानीच्या आघातानं खचून आले नसावेत—नि जोशी पश्चात्तापाच्या दुःखानं!"

गणेश जोशी फटकन् बोलून गेला, "काल मी जें कांहीं बोललों, त्याचा एवढासुद्धां पश्चात्ताप माझ्या मनांत नाहीं."

हें बोलणें कुणाच्या कानांवर गेलें कीं काय या शंकेनें सोहोनींनीं आजूबाजूला वळून बघितलें. जवळ कुणी नव्हतें. सोहोनी म्हणाले, "गणू, मला वाटतं, तुझ्या हातून अतिरेक होतो आहे. चळवळींतल्या एकाद्या कार्यकर्त्यानं हे उद्गार काढले असते तर त्यांत कांहीं वावगं झालं नसतं. पण चळवळींत नसतांना—तूं चळवळींत नाहींस म्हणून तुला मी दोष देत नाहीं. कारण, भोंवतालीं विशिष्ट परिस्थिति असते म्हणून म्हण, किंवा मनोवृत्तीचा एक पिंड बनलेला असतो म्हणून म्हण, माणसाला देशाविषयीं केवढाहि अभिमान वाटत असला तरी त्याच्या आचरणाला मर्यादा पडलेल्या असतात. त्यांच्या पलीकडे तो जाऊं शकत नाहीं. मायभूमीविषयीं तुला वाटणाऱ्या अभिमानाचं मला कितीहि कौतुक वाटलं, तरी कालचा तो प्रकार मला उग्र वाटतो. रागावूं नकोस, पण तुझ्या बोलण्याच्या पाठीशीं क्रियेचं अधिष्ठान असतं तर तें शोभलं असतं. तसंच पहायला गेलं, तर मलाहि काल डबीरांचा राग आला होता. पण मीं तो गिळला. कारण, मला स्वतःच्या मर्यादा कळतात. रागावलास काय?"

गणेश जोशीनें मान हलवून नकार दर्शवला.

"आपल्या पुढाऱ्यांना अटक झाली, तेव्हां मीदेखील क्षुब्ध झालों होतों. नंतर जी आग पेटली.तींत आपणहि आपल्या कुवतीप्रमाणं भाग घ्यावा अशी इच्छा मला झाली होती. हिरू विलयेच्या बरोबर काम करणारा हरिहर शर्मा तुला ठाऊक आहे ना?"

"ऐकून ठाऊक आहे."

"त्या वेळीं तो मोकळा होता. त्याची मीं गांठ घेतली आणि सांगितलं, 'तुमच्या लढ्यांत भाग घ्यायची माझी इच्छा आहे. माझं अक्षर चांगलं आहे, तेव्हां तुमचीं पत्रकं लिहिण्याचं काम मी करीन.' तेव्हां तो म्हणाला, 'सध्यां जरूरी आहे प्रत्यक्ष मोडतोडीचं काम करणाऱ्या लोकांची. त्याला तयारी असली

तर तुमचं स्वागत करतों. पत्रकं लिहिण्याचं काम आमच्यांतलंच कुणी तरी सवडीनं करूं शकतं.' हरिहर शर्मांचं म्हणणं बरोबर होतं. त्यानं सांगितलं तेंदेखील करायची माझी इच्छा होती. पण स्वतःच्या मर्यादा मीं ओळखल्या आणि इतक्या आंत शिरून काम केलं तर आपल्यामुळं चळवळीला फायदा होण्याऐवजीं तोटाच होण्याचा संभव जास्त हें ओळखून मी दूर झालों...सहज ओघानं आलं म्हणून हें सांगितलं, नाहीं तर अद्याप कुणाजवळ याचा उच्चार मीं केलेला नाहीं. कारण मानानं सांगावं असं यांत कांहींच—"

एवढ्यांत छोटी सुटी संपल्याची घंटा झाली आणि सोहोनी व गणेश जोशी आपापल्या वर्गावर निघून गेले.

गणेश जोशीच्या मनांत आलें, 'आपल्या मर्यादा कोणत्या? समजा, विश्वास देशमुखनं हाच तो गणेश जोशी म्हणून आपल्याला ओळखलं, त्यामुळं समजा, आपल्याला अटक झाली आणि मग पुढं अधिक माहिती काढण्यासाठीं पोलिसांनीं आपल्यावर निकृष्ट दर्जाच्या उपायांचा अवलंब केला, तर आपलं मन व शरीर किती टिकाव धरतील?'

पण असल्या शंकांमुळें उलटसुलट विचार करीत डोकं पोखरून घेण्याची गणेश जोशीची वृत्तिच नव्हती. त्यानें ती शंका कपड्यावर पडलेला केरोसा झटकून टाकावा तशी दूर सारली. पुढचं पुढें बघतां येईल. विश्वास देशमुखनं आपल्याला ओळख देऊं नये यासाठीं काय करावें एवढा एकच विचार त्याच्यापुढें होता.

दुसऱ्या दिवशीं पोलिस ठाण्यावर तो गेला. तिथें एका अधिकाऱ्यानें त्याला बऱ्याचशा सज्जांतून आणि दालनांतून नेऊन शेवटीं एका खिडकीशीं उभं केलें. त्या खिडकींतून त्याच इमारतींतला चौक दिसत होता. त्या विस्तीर्ण चौकांत त्या दोघांपासून सुमारें वीस हातांवर तीन चार माणसें उभीं होतीं. त्यांतच विश्वास देशमुखहि होता. त्या घोळक्याकडे बघायला सांगितलें, तेव्हां गणेश जोशीनं मुद्दामच विश्वास देशमुखला वगळून बाकीच्यांना उद्देशून 'हेच का ते देशमुख' असा प्रश्न केला. त्यावर मग बरोबरच्या अधिकाऱ्यानें खादी टोपी व चष्म्याची खूण सांगून हे ते देशमुख म्हणून दाखवलें.

हा क्षण गणेश जोशीला परमावधीचा कष्टदायक गेला.

कारण, उत्तर तत्काळ द्यायलाच हवें होतें. पण होकार दिला तरी प्रकरण गळ्याशीं येतणार आणि नकार दिला तरी लागलीच आपल्यासमोर देशमुखला

आणून त्याच्याकडून आपली ओळख पटवून घेणार!—पोलिसांचा हा दुहेरी कावा उघड दिसत होता.

त्यांतून, आपली ओळख पटवावी म्हणून विश्वास देशमुखला पोलिसांनीं आपल्याविषयीं काय काय खोट्यानाट्या गोष्टी सांगितल्या असतील, तेंहि ठाऊक नव्हतें. किंबहुना, आपण सर्व कबूल केलें असून आतां फक्त रुजुवातच काय ती राहिलेली आहे हेंदेखील पोलिसांनीं त्याला सांगितलें असण्याचा दाट संभव होता...

तेव्हां आतां यानंतर कदाचित् अटक...तुरुंग...बेदम चोप...सहनशक्तीची परीक्षा...करेंगे या मरेंगे...!

हे सारे विचार गणेश जोशीच्या डोक्यांत क्षणमात्र दवळून निघाले. मग त्याचा परिपाक म्हणून असो किंवा कुठली तरी अंतःप्रेरणा त्याच्या मनांत तत्क्षणीं उत्स्फूर्त झाली म्हणून असो, आपला आवाज भरमसाटच चढवून बरोबरच्या पोलिस अधिकाऱ्याच्या अंगावर तो किंचाळला, "हे विश्वास देशमुख? छे! या गृहस्थांना जन्मांत आजच मी पहिल्यांदा पाहतों आहें!"

त्या अधिकाऱ्यानें दचकून त्याला दटावलें, "केवढ्यानं किंचाळतां आहां? नाहीं ना ओळखीत तुम्ही त्यांना?...समजलं, समजलं! चला! उगीच दंगा करायचं कारण नाहीं!"

गोलमेजाकडे परत गेल्यावर गणेश जोशी विश्वास देशमुखला ओळखीत नसल्याचें वृत्त बोमनसाहेबाला कळवण्यांत आलें. त्यानंतर अर्थातच अपेक्षे-प्रमाणें विश्वास देशमुखला बोलावणें गेलें. त्याला एका शिपायानें आणलें.

"हे गणेश जोशी. यांना ओळखतां ना तुम्ही? तुमच्या जबाबांतले गणेश जोशी हेच ना?"

क्षणभर गणेश जोशीचें हृदय थांबलें.

आतां हा काय उत्तर देणार आहे? आपण मारलेली किंकाळी याच्या कानांवर पडली असेल का?

"नाहीं. यांना मी ओळखीत नाहीं! हे ते नव्हेत. मीं यांना कधीं पाहिलेलं नाहीं!"

गणेश जोशीचा जीव भांड्यांत पडला. त्याचबरोबर विश्वास देशमुखविषयीं कृतज्ञतेची भावनाहि मनांत भरून आली. आतां आपण नक्की सुटलों हें त्याला पूर्णपणें कळून चुकलें.

पण त्याच क्षणीं, हा आपल्या इतक्या जवळ दिसतो आहे, परंतु थोड्याच वेळांत आपण मोकळ्या जगांत जाऊं आणि हा मात्र बंदीखान्यांत, कदाचित् फांसावर देखील...

त्याच्या मनाला सुटकेच्या सुखाबरोबरच या दुःखाच्या तीव्र वेदनाहि झाल्या. पुढचीं बोलणीं त्यानें ऐकलीं तीं संभ्रांत मनानेंच.

"मग तुम्ही जबानींत लिहिलेत ते गणेश जोशी कोण?"

"कुणीच नाहीं! तोंडाला आलीं तीं दोन नांवं एकत्र केलीं नि सांगितलीं!"

"असं खोटं कां सांगितलंत?"

"पोलिसांनीं दमदाटी केली, चोप दिला, तेव्हां त्यांतून सुटण्यासाठीं!"

"पण मग तें नांव यांच्याशीं कसं जुळलं? तुम्ही हें खोटं बोलतांहांत."

"गणेश जोशी हें नांव इतकं सर्वसामान्य आहे, कीं पांढरपेशा वस्तींतल्या रस्त्यावर तुम्ही गणेश जोशी म्हणून हाक मारलीत तर कमींत कमी चार पांच माणसं तरी ओ देतील!"

मिशावाला बोमनसाहेब चवताळून ओरडला, "गाढव आहे तो! घेऊन जा त्याला!"

पोलिस विश्वास देशमुखला नेऊं लागले. जातां जातां गणेश जोशीला उद्देशून त्यानें म्हटलें, "माफ करा हं मला! मीं वाटेल तें लिहिलं, पण तुम्हांला मात्र व्यर्थ त्रास भोगावा लागला!"

निरोप घेऊन वळलेल्या माणसाला पाठमोरा पाहतांना नेहमींच माणसाच्या मनांत कालवतें, मग इथें तर काय?...

गणेश जोशीचा गळा दाटून आला आणि त्याच्या मनांत एकदम आलें, 'अरेरे! काय म्हणालास हें विश्वास? अरे, तुझा कपाळीं याच्यापुढं कसल्या हालअपेष्टा लिहिल्या आहेत नि तरीदेखील तूं मला या साध्या दोन खेपा पडल्या तर खेद व्यक्त करतोस, माफी मागतोस!...नको! मला हें स्वातंत्र्य नको!...मी सारं कांहीं कबूल करतों!—मला तुझ्याबरोबर कष्ट सोसायला येऊं दे!'

आणि मनाची अवस्था ही असल्यामुळें नंतर पोलिसांनीं गणेश जोशीकडून आपला चळवळीशीं कांहीं संबंध नसल्याचा जबाब लिहून घेतला, तेव्हां मजकुरांत 'नाहीं' च्या जागीं दोन वेळां 'आहे' येऊन उलटा अर्थ झाला. शेवटीं

सही करण्याआधीं मजकूर वाचण्याच्या वेळीं ही चूक त्याला आढळून आली.

त्याच वेळीं, विश्वास देशमुखनें जातां जातां आपले आभार कां मानले त्याचा अर्थहि गणेश जोशीच्या ध्यानांत आला.

माझ्या सुटकेसाठीं त्यानें केलेला हा शेवटचा प्रयत्न. त्यासाठीं कां होईना, आपण बाहेर मोकळें राहिलें पाहिजे...

सही करण्यासाठीं दउतींत तो टाक बुडवीत होता, त्याच वेळीं हाताला झटका देऊन त्यानें साऱ्या कागदावर दऊत उपडी केली आणि मग नव्या कोऱ्या कागदावर पुन्हा व्यवस्थित जबाब लिहून दिला.

मग पोलिस टाण्यावरून तो बाहेर पडला तेव्हां त्याचें मन आनंद, उत्साह, अभिमान यांनीं भरभरून ओसंडून जात होतें. त्याला दुःखाची कड होती, तरी ती कडूपणा निर्माण करण्याइतकी प्रबल नव्हती.

१९४७

· १ ·

# निर्वासित

गंगाधरच्या कामाची किंमत नाहींशी झाली होती. कारण त्याची नोकरी सुटली होती. त्याचा कांहीं अपराध झाला होता म्हणून ती सुटली नव्हती किंवा त्याच्या वरिष्ठाची त्याच्यावर नाराजी झाली होती म्हणूनहि सुटली नव्हती. ती सुटली होती केवळ आतां त्याच्या कामाची कुणाला गरज नव्हती म्हणून.

अर्थशास्त्राचें असें सांगणें आहे कीं, एकाद्या कामानें सामूहिक जीवनाचा प्रवाह चालू रहायला साह्य होत असेल, तर त्या कामानें प्रत्यक्ष वस्तु निर्माण होत नसली तरी, किंवा त्या कामाचें मूल्यमापन व्यवहारांत पैशांत होत नसलें तरी, त्याचा समावेश राष्ट्रीय उत्पादनांत करायला पाहिजे. गंगाधर अर्थशास्त्रांत वावरत नव्हता. आणि व्यवहारांत, त्याच्या कामानें वस्तूहि निर्माण होत नव्हती किंवा त्याच्या कामाचें मूल्यमापनहि पैशांत होत नव्हतें. बाहेर, तो काम करायला तयार, नव्हे उत्सुक होता, पण त्याची कार्यशक्ति हिमालयांतल्या नद्यांप्रमाणें वायां जात होती. आणि घरांत, तो संधि सांपडेल तसें काम करीत होता, तर त्या कामाची कदर होत नव्हती...

उदाहरणार्थ, कांहीं दिवसांपूर्वी त्यानें एकदां रेशन आणलें होतें तर वहिनी म्हणाली होती, "तुम्हीं स्वतः कशाला आणलंत? वाण्याचा गडी नेहमीं आणतो, त्यालाच आणूं द्यायचं. दोन आणे तर पडले असते!" गंगाधरनें कांहीं उत्तर दिलें नव्हतें. पण नंतरच्या आठवड्यांत वहिनी एकदां बाहेर पडली असतांना स्वतःच वाण्याकडे कार्ड टाकून आली होती.

एक दिवस अण्णा घाईघाईनें कचेरींत गेला होता आणि वहिनी कामांत होती म्हणून आपल्या धोतराबरोबरच त्याचाहि सदरा आणि धोतर गंगाधरनें

धुऊन टाकलें होतें. दोनतीनदां असें झालें तेव्हां अण्णा लवकर स्नान करूं लागला आणि स्वतःच आपलें धोतर धुऊं लागला किंवा त्याचें स्नान आटोपल्यावर स्वयंपाक सोडून वहिनी धुऊं लागली. गंगाधरनें मग एक दिवस वहिनीला सांगितलें, "तुझी धांवपळ होऊं देऊं नकोस. मी अण्णाचे कपडे धुणार नाहीं."

अशा स्थितींत सकाळ-संध्याकाळचा चहा करण्याचें त्याच्या हातीं राहिलें होतें हेंच त्याला भाग्य वाटत होतें. दुपारीं तो नोकरीच्या शोधार्थ बाहेर पडे. एखाद्या दिवशीं बरेचसे नकार मिळाल्यानें निराशेनें तो लवकर परत येई आणि मग कधीं धाकट्या बापूला, कधीं मालीला, तर कधीं दोघांनाहि तो फिरायला घेऊन जाई. वहिनी हेंहि त्याला करूं देत होती.

अर्थातच असलींच कामें तो जन्मभर करीत राहणार नव्हता. तथापि फुकटच्या खाण्यामुळें मनाला जाळीत राहणारा मिंधेपणा आणि शरमिंधेपणा अंशतः तरी दूर व्हावा एवढीच त्याची इच्छा होती. तिचा उच्चार मात्र त्यानें कधीं आपल्या श्वासानें देखील केला नव्हता.

अण्णा गप्प होता. वहिनीच्या वागण्याचा अर्थ गंगाधरला कळत होता, पण तो मनाला समजावीत होता.

काल रात्रीं त्याला घरीं यायला उशीर झाला. सज्जांतून तो दाराशीं आला तों त्याच्या कानांवर अण्णा आणि वहिनी यांचे कांहीं शब्द पडले. तेव्हां तो थबकून उभा राहिला. "...पण त्याची नोकरी सुटलेली आहे. पुन्हा मिळे-पर्यंत आपण त्याला आधार नको द्यायला?"

"हो! समजलं सगळं! प्रयत्न मनापासून केलाच नसेल त्यांनीं! प्रयत्नांतीं परमेश्वर म्हणतात, तें काय खोटं आहे? इथं तर नुसती नोकरीच आहे."

"तें झालं एक सुभाषित. सगळींच सुभाषितं सर्वच काळीं खरीं ठरत नाहींत असं एक नवीन सुभाषित रूढ व्हायला हवं आहे."

"मला तें सांगूं नका! मी म्हणतें, त्यांना वेगळं रहायला कां सांगत नाहीं? पोटाला चटके बसले म्हणजे आपसूक प्रयत्न होईल!"

"किती चटकन् बोललीस तूं! पण त्याच्या दृष्टीनं विचार केला आहेस का?"

"माझी दृष्टि असतांना त्यांच्या दृष्टीनं कशाला विचार करूं मी?"

"तो माझा भाऊ आहे. मी त्याला कांहीं केल्या..."

गंगाधरच्या डोळ्यांत पाणी आलें. पुढचे शब्द त्याच्या कानांत शिरले

नाहींत. जरा वेळानें त्याला ऐकूं आलें, "समज, माझी नोकरी सुटली..."

"पण तुमची नोकरी सुटली आहे का?"

"एक क्षणभर समज तसं! तर तूं असंच सांगशील का?"

"मी तुमची बायको आहें! तुम्हांला जें सांगेन तेंच मीं भाऊजींना सांगावं असं कसं म्हणतां? त्यांतून आतांशा महागाई..."

गंगाधर मागें परतला—अगदीं हलक्या पावलांनीं. मग जिना उतरून तो खालीं गेला आणि मोठ्यानें पावलें वाजवीत परत आला. अण्णा-वहिनी गप्प होतीं.

मग वहिनी म्हणाली, "भाऊजी, तुमची वाट पाहून आम्हीं जेवून घेतलं. तुमचं झाकून ठेवलं आहे. जेवून घ्या म्हणजे मग मी आवरून ठेवीन."

गंगाधरनें म्हटलें, "माझं खाणं झालं आहे. मित्राकडे गेलों होतों. पोट भरलं आहे. आतां वासना नाहीं."

"संध्याकाळीं सांगून गेलां असतांत तर?"

"चुकलं खरं! पण मित्रानं फार आग्रह केला. तो कधीं सांगत नाहीं म्हणून त्याचा शब्द मोडवला नाहीं."

या साऱ्या कालच्या गोष्टी.

आज जेवायच्या वेळीं त्याला वहिनी म्हणाली, "कालची शिळवड आपण दोघं जणं सारखी वांटून घेऊं." गंगाधरनें कांहीं न बोलतां ती आपल्याच पानांत घेतली आणि भरभरा संपवून टाकली. अण्णा जेवण करून गेला होता. त्याच्याबरोबरच दोघां मुलांचींहि जेवणें झालीं होतीं. आज केलेली वांग्याची भाजी 'अडूक' झाली होती म्हणून तिघांनींहि तिला हात लावला नव्हता. ती वायां जाणार हें ठरल्यासारखेंच होतें. पण गंगाधरनें भाजीचें भांडें जवळ घेतलें आणि बहुतेक सारी ती संपवून टाकली. वहिनी त्याच्याकडे बघतच राहिली.

"भाऊजी, इतकी भाजी कशाला खाल्लीत? अडूक नाहीं का लागली तुम्हांला? तरी मी यांना नेहमीं सांगत असतें, बारीक वांगीं आणत जाऊं नका म्हणून. नेहमीं कडू निघतात."

"कांहीं बिघडलं नाहीं, वहिनी! मला असलीं वांगीं आवडतात."

जेवण झाल्यावर गंगाधरनें एका बॅगेमध्यें आपले कपडे भरले आणि ती घेऊन बाहेर जातांना तो म्हणाला, "वहिनी, मला कांहीं दिवस गांवाला जावं लागणार आहे."

वहिनी चपापली.

"एके ठिकाणीं जागा आहेत. मी प्रयत्न करून पहाणार आहें."

"ह्यांना सांगितलं आहे का तुम्हीं?"

"काल रात्रीं तर कळलं मित्राकडे! सकाळच्या धांदलींत सांगायला जमलं नाहीं. आतां तूं सांग. जमलं तर मीहि पत्र पाठवून कळवीनच."

"निदान खुशाली तरी कळवा."

गंगाधरनें होकार दिला.

गंगाधर गांवाला गेलाहि नाहीं आणि जाणारहि नव्हता. तो मित्राकडे गेला. गंगाधरनें कॉलेज सोडून नंतर पांच वर्षें केलेली त्याची नोकरीहि सुटली होती तरी त्याचा मित्र अद्याप विद्यार्थिदशेंतच होता. त्यानें खोली घेतलेली होती. तो एकटाच होता.

गंगाधरची नोकरी चालू होती तेव्हां सांठवलेल्या आणि सुटली होती तेव्हां एकदम जादा मिळालेल्या पैशांतले खर्च होऊन आतां त्याच्याजवळ त्र्यहात्तर रुपये आणि कांहीं आणे राहिले होते, ते त्याच्यापाशीं होते. त्यांच्यावर निभतील तितके दिवस निभतील, ते संपेपर्यंत नवी नोकरी मिळाली तर ठीकच, नाहीं तर...त्याचा विचार आतांच कशाला?

गंगाधरचा मित्र खोलींत झोंपलेला होता. त्याला त्यानें हांक मारून उठवलें. तो उठला आणि पुन्हा झोंपीं गेला. गंगाधरनें त्याला गदगदां हलवलें आणि म्हटलें, "अरे ऊठ! तुझ्याकडे मी पाहुणा म्हणून आलों आहें."

"ये कीं! तुला कुणीं नको म्हटलं आहे?" त्याच्या मित्रानें गुंगींत म्हटलें.

"तुझ्याकडे मी जेवणारदेखील आहें आज रात्रीपासून!"

"समजलं!"

"किती दिवस असं राहूं देणार आहेस मला? सांग!"

"ब–यू–जे जं–ब–ब–र–यं–द!" त्याचा मित्र झोंपेच्या कुशींत जोरानें शिरत गुदमरून म्हणाला.

"कुणाचे? तुझे कीं माझे?"

मित्र गाढ झोंपीं गेला होता. त्याच्या तोंडून उत्तर आलें नाहीं.

मग गंगाधरनें कपडे केले आणि तो बाहेर पडला. कुणीकडे जायचें तें कांहींच ठरलेलें नव्हतें. ठरणार तरी काय आणि जाणार तरी कुठें?—एंप्लॉयमेंट एक्सचेंजमध्यें त्यानें नांव नोंदवलें होतें, पण ती स्तब्धच होती. वृत्तपत्रांतल्या

जाहिराती वाचून, अर्ज लिहून आणि त्यांवर तिकिटें चिकटवून त्याचे डोळे दुखूं लागले होते, हात थकले होते आणि जीभ कोरडी पडली होती. नुसतें टपालखात्याचें उत्पन्न वाढवण्यांतच त्याचे पैसे खर्च झाले होते. आतां आंधळे-पणानें वाटेल तिथें जाऊन तो विचारूं लागला होता. आणि याच आंधळे-पणांतून जिना संपल्यावर जें पाऊल जमिनीवर पहिल्यांदा पडेल त्या पावलाच्या दिशेनें जाण्याचें त्यानें ठरवलें.

पाऊल डावें पडलें. डाव्या दिशेनें गंगाधर चालूं लागला. रस्ता डांबरी होता. चालायला बरें वाटत होतें. पण नुसतें चालायलाच. गंगाधर एक मैलाहून अधिक चालून गेला. आतां वस्ती विरळ होती. चित्रमंदिराची ही वसाहत होती.

रस्त्यावर फारशी रहदारी नव्हती. मधून मधून मोटारी येत जात होत्या. गंगाधरला समोरून घाईघाईनें चालत येणाऱ्या व्यक्तीचा चेहरा ओळखीचा वाटला. पण त्याचें नांव त्याला आठवेना. तो त्याच्याकडे बघून हसला, तेव्हां गंगाधरनेंहि त्याला हास्यानें प्रत्युत्तर दिलें. तो गंगाधरच्या पुढून गेला.

गंगाधरनें त्याला हाक मारली, "अहो!" आणि तो थांबल्यावर तो म्हणाला, "इतक्या घाईनं कुठं?"

"सिगरेटी आणायला चाललों आहें."

"सध्यां कुठं असतां?"

"खरं सांगूं कीं खोटं सांगूं?"

"काय तुम्ही सांगाल तें मी खरं मानीन. मात्र तें खरं आहे कीं खोटं आहे तेवढं सांगूं नका!"

"तुमचं उत्तर आवडलं आपल्याला. खरंच सांगतों मग मी."

"सांगा."

"मी असतों इथंच. इथून जवळच 'निशिगंध चित्रमंदिर' म्हणून निघालं आहे, त्यांत आहें मी."

"कोणत्या नात्यानं? दिग्दर्शक? नट? संकलन? छाया? ध्वनिमुद्रण?— रागावूं नका, पण हे शब्द पडद्यावर येतात म्हणूनच मला माहिती. याहून अधिक कांहींच ठाऊक नाहीं मला."

"याहून त्यांत पुष्कळ शब्द आहेत. पण कोणत्या नात्यानं मी काम करतों तेवढं मात्र विचारूं नका."

"सध्यां चित्र कोणतं चालू आहे?"

"पौराणिक आहे. कच-देवयानी...!"

"कंपनी नवीन आहे म्हणतां म्हणून विचारतों. तिथं कांहीं काम मिळण्यासारखं आहे का? कोणत्याहि नात्यानं!"

"कुणाला हवं आहे?"

"मलाच! इंटर पास झालों आहें. पांच वर्षं लष्कराच्या हिशोबखात्यांत—"

"आलं लक्षांत! पण मनापासून विचारतां आहांत कीं चेष्टा?"

"चेष्टा नाहीं! मनापासून विचारतों आहें."

"माझ्याबरोबर सिगरेटच्या दुकानापर्यंत चला. तुम्हांला चालतां चालतां सांगतों."

गंगाधर त्याच्याबरोबर मागें वळला.

"या ठिकाणीं काम करायला लागून मला तीन महिने होऊन गेले. इथं मी शिरलों तो आगगाडीच्या डब्यांत रेटून शिरल्यासारखा. आणि काम कोणतं म्हणून विचाराल तर दिग्दर्शक सांगतील तें. आतां त्यांच्याच सिगरेटी आणायला मी चाललों आहें. कुणी बडी मंडळी आली तर हॉटेलांत चहा सांगायलाहि मलाच जावं लागतं. याचे निरोप त्याला पोंचवायचे, त्यांचीं उत्तरं आणायचीं, शेटजींकडून चेक आणायचे, साथवाल्यांना वेळा कळवायच्या, संगीतनियोजकाकडे टांगा घेऊन जायचं आणि त्याला घेऊन यायचं, हीं आणि असलीं कामंहि माझींच. तरी मी इंटर नापासपर्यंत शिकलों आहें! कधीं कधीं दिग्दर्शक मला घरीं बोलावतात त्या वेळीं मला त्यांच्या अंगाला मालिशदेखील करावं लागतं! तें मला येत नाहीं, पण तसंच करतों."

"मग हे तुमचे दिग्दर्शक तुम्हांला देतात तरी किती?"

"नोकरीच्या शोधांत असलेल्या माणसाला खोटं सांगणं पाप आहे. पण सांगायला लाज वाटते. देतात पस्तीस, पण सही घेतात साटांवर! आधींपासून कबूल करून घेतलं आहे, तेव्हां तक्रारीला जागाच नाहीं."

"हे मधले पंचवीस कुणाच्या खिशांत जातात?"

"तें तुम्हीच ओळखा. हल्लीं बोलपटांचा धंदा म्हणजे एक 'और काम' होऊन बसलं आहे. त्या जगांत थोडंबहुत वावरलेल्या कुणाहि धूर्तानं उठावं, दिग्दर्शक बनावं, पैसे गुंतवण्यास हपापलेला एखादा काळाबाजारवाला गांठावा, आणि त्याच्या नांवानं कंपनी काढावी. आपल्या पुढ्यांतले लोक जमवावेत, त्यांना वाटेल तितका पगार द्यावा आणि काळाबाजारवाल्या शेठला वाटेल ते

हिशेब दाखवावेत. त्याला कांहीं माहिती नसते म्हणून संशय येत नाहीं. आणि आला तरी तो बोभाटा करूं शकत नाहीं. मग एकमेकांना निपटून काढण्याची शर्यत सुरू होते. आणि त्यांत भरडून निघतात कोण, तर अगदीं तळच्या थरांतले, सुतार, रंगारी यांच्यासारखे तात्पुरत्या कामावर घेतलेले लोक!"

लष्करी हिशेबखात्यांतल्या 'गंमती' गंगाधरला ऐकून ठाऊक होत्या. पण हें विश्वरूपदर्शन त्याला पेललें नाहीं. त्यानें विचारलें, "खरं सांगतां?"

"पटलं नाहीं तर खरं मानूं नका. पण मग हल्लींच्या चित्रांची लायकी पहा आणि एक चित्र काढून झाल्यावर दुसरं काढायला बहुतेक कंपन्या जिवंत रहात कां नाहींत त्याचीं कारणं सांगा."

गंगाधर हें ऐकून स्तब्ध झाला. मग त्यानें शंका काढली, "हें ठाऊक असून तुम्ही कसे इथं रहातां?"

"एक तर सुरुवातीला हें इतकं ठाऊक नव्हतं. दुसरं असं, कीं या विश्वांत सामान्य लोकांना उकिरडा तुडवल्याशिवाय शिरतां येत नाहीं हें मला ठाऊक होतं, आणि मला या विश्वाचं एवढं जबरदस्त आकर्षण आहे, कीं पडद्यावर काम करायला मिळावं म्हणून वाटेल तें करायची माझी तयारी आहे. एवींतेवीं वाऱ्यावरच संसार करायचा, तर कुठल्या तरी ढगावर चढायलाच पाहिजे. अजून मला 'फटक्पाटी' सुद्धां हातांत धरायला मिळाली नाहीं. मिळालं आहे फक्त एका गर्दीत किंकाळी फोडायचं काम. पण मी प्रयत्न सोडणार नाहीं. मघाशीं तुम्हीं विचारलंत म्हणून सांगतों, तुम्हांला या विश्वांत यायचं असलं तर डोळे उघडे ठेवून या. पुढं वाईट वाटतां कामां नये...आणि निराशाहि होतां कामां नये..."

गंगाधरनें त्याचे आभार मानले आणि घाईघाईनें निरोप घेऊन तो चालूं लागला.

मग परत गर्दीच्या रस्त्यावर गंगाधर आला आणि नशिबाची परीक्षा पहायला त्यानें सुरवात केली. महेंद्र विमा कंपनीच्या कचेरींतल्या एका अधिकाऱ्यानें (कीं कुणी तरी, कारण तो कोण होता तें त्याला कळलें नाहीं.) त्याच्याशीं अर्थशास्त्राच्या गोष्टी केल्या, 'माल्थस'चा सिद्धांत त्याला सांगितला, जागतिक राजकारणावर मत प्रदर्शित केलें. शेवटीं माझ्याशीं हें बोलण्यांत वेळ दवडण्यापेक्षां हा माणूस सरळ होय कीं नाहीं तें चटकन् कां सांगत नाहीं याचा गंगाधर विचार करूं लागला होता, तेव्हां त्याच्या कानांवर 'जगांतील धकाधकीच्या

मामल्यांत सर्वांत वर जागा नेहमींच सांपडूं शकते,' हें इंग्रजी सुभाषित पडलें होतें आणि नंतर 'वर जाण्याचा सतत प्रयत्न करीत रहा' या उपदेशाला सुरुवात झाली होती.

तो ऐकल्यावर गंगाधरनें म्हटलें, "पण आपणाकडे मला एकादी जागा मिळाली तर मला प्रयत्न करायला संधि मिळणार आहे."

"कळवण्यास खेद होतो, पण आमच्याकडे तशी जागा नाहीं. आमचा व्याप अजून मर्यादित आहे."

"एकादी होण्याचा संभव आहे का?"

"मला दिसत नाहीं. पण निराश होऊं नका. मीं मघाशीं सांगितलं तें लक्षांत असूं द्या."

"त्यानं माझ्या उपजीविकेचा प्रश्न सुटणार आहे का?"

"आज नाहीं उद्यां सुटेल."

"सगळे जण हेंच सांगतात. आपणांवर कधीं बेकारीचा प्रसंग आला होता काय?"

"नाहीं! कां बरं?"

"तरीच! काम करायची इच्छा असूनहि तें मिळत नसलं म्हणजे कसा कोंडमारा—"

"कोंडमारा कसा म्हणतां? माझा एक सिद्धांत आहे. रागावणार नसलांत तर सांगतों."

गंगाधर कांहीं बोलला नाहीं.

"पाणी ज्याप्रमाणं आपल्या पातळीकडे वहात जातं त्याप्रमाणं माणूसहि आपल्या पातळीकडेच जातो. म्हणजेच, ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या लायकी-प्रमाणं काम मिळतं!"

"आजकाल 'किर्लोस्कर' मासिकानंसुद्धां असली भाषा सोडून दिली आहे!" हें म्हणून गंगाधर एवढ्या मोठ्यानें हसला कीं बाहेरच्या शिपायानें दार किलकिलें करून आंत डोकावून पाहिलें.

गंगाधर नंतर एका शाळेंत गेला. एक तर तेथें जागा नव्हती आणि असती तरी त्याला अध्यापनाचा अनुभव किंवा पदवी नसल्यामुळें मिळाली नसती, असें स्पष्ट सांगण्यांत आलें. शाळेंत नकार मिळण्याची त्याची ही पहिलीच खेप नव्हती. पण प्रयत्न केला नाहीं असें स्वतःलाच सांगण्याची पाळी येऊं

नये म्हणूनच केवळ तो तेथें गेला होता.

शाळेंतून बाहेर येऊन तो थोडें अंतर चालून गेल्यावर ज्या रस्त्याला लागला तेथें दुकानें दिसूं लागलीं. दुकानांच्या बाहेर पदपथावर किंवा रस्त्याच्या कडेला छोटे छोटे गाळे मांडून नाना प्रकारचा माल खपवण्याची खटपट निर्वासित करीत होते. चिवटपणानें उपजीविकेसाठीं चाललेली त्यांची धडपड पाहून गंगाधरचें मन त्यांच्याविषयीं आदरानें भरून आलें. '...पण त्यांच्यापैकीं ज्यांना हा व्यापारी पेशा पत्करतां आला नाहीं त्यांची काय स्थिति झाली असेल? कितीशा जणांना कामं मिळालीं असतील? निर्वासितांतले ते निर्वासित... निर्वासित...निर्वासित...'

एका दुकानांत गिऱ्हाईक नव्हतें आणि मालक लोडाशीं टेकून बसला होता हें पाहून गंगाधर त्या दुकानांत शिरला. शेटजींनीं विचारलें, "तमे निर्वासित?"

आपण निर्वासित आहोंत कीं नाहींत याविषयीं गंगाधरच्या मनामध्यें संभ्रम उडाला. त्यानें मराठींत आपली माहिती दिली आणि मुनिमाचें काम करण्याची तयारी दर्शवली.

शेटजींनीं मान हलवली.

गंगाधरनें आजपर्यंत कधीं लाचारीची भाषा काढली नव्हती. आज मात्र तो म्हणाला, "आपल्यासारख्यांनीं असं म्हटल्यावर आमच्यासारख्या लोकांनीं करावं तरी काय?" परंतु हें म्हणतां म्हणतांच स्वतःच्या कानफटांत मारून घेतल्या-सारखें गंगाधरला वाटलें. पण शेटजींनीं तर त्याच्या कानफटावर घण मारला. विषारी हास्य करीत ते म्हणाले, "अरे, काय करावा म्हणून कशाला विचारते? सरळ जावा आणि संगमापाशीं नदीच्या पाण्यामंदी उडी मारून द्यावी. तरायला येते काय तुमांला? तरायला येत असला तर झाडची फांदी...ह्यः ह्यः ह्यः!"

गंगाधर एकदम परत फिरला. थोडा वेळ रस्त्यांत उभा राहिला आणि मग कर्णरंध्रांतल्या कानठळया मंदावल्यावर मित्राच्या खोलीच्या दिशेनं त्यानें पावलें टाकायला सुरुवात केली.

परंतु मित्राच्या खोलीवर तरी जायचें कशाला? वाटेंत त्यानें चहा घेतला. पण त्याला तरतरी वाटली नाहीं.

दुपारचे साडेचार वाजून गेले होते. ऊन स्वच्छ पडलें होतें आणि त्यामध्यें रस्त्याच्या कडेला असलेल्या श्रीमंती उंच हवेल्या तळपत होत्या.

पक्वान्नाच्या जेवणावळींत पंक्तीला बसलेल्या भोजनभाऊंसारख्या त्या दिसत होत्या. तुकतुकीत अंगकांतीचीं माणसें त्यांतून वावरत होतीं, जिने चढतउतरत होतीं. घाई, गर्दी, धांवपळ...सर्व जण कसे कुठल्या तरी कामांत गुंतलेले दिसत होते. लेकुरवाळ्या पुरंध्रीला पाहून बालविधवेच्या मनाची व्हावी तशी गंगाधरच्या मनाची स्थिति झाली.

आकाशांत त्याला मग विमानाची घरघर ऐकू आली. एक विमान संथपणें सरकत असलेलें त्याला दिसलें. त्याकडे क्षणभर थांबून तो पहात राहिला. आणि त्याला तेव्हां एका इंग्रजी साप्ताहिकांत बघितलेल्या विनोदी चित्राची आठवण झाली. त्या चित्रांत आकाशांत 'नांगराच्या फाळाची रचना' करून विमानें उडत होतीं. अलीकडे जमिनीवर झाडाच्या फांदीच्या टोकावर दोन पक्षी बसले होते. त्यांतली मादी नराला म्हणत होती, "कितीहि उंच उडूं देत, कितीहि वेगानं उडूं देत, पण त्यांच्यांत कांहीं राम नाहीं! त्यांना अंडीं कुठं घालतां येतात?"

संथपणें तरंगणारें तें विमान बघणाऱ्याच्या छातींत धसका बसेल इतकें एकाएकीं पंगुळलेलें गंगाधरला दिसलें. परंतु त्या क्षणीं त्याच्या छातींत धसका न बसतां त्यांतल्या वैमानिकाचा त्याला हेवा वाटला. पण मग त्या विमानानें विलक्षणच मोठा आवाज केला, तें पुन्हा सरळ झालें आणि लहान होत होत रस्त्यावरच्या 'लँडोदरां'च्या आड दिसेनासें झालें.

समोरून मालानें शिगोशिग भरलेल्या मोटारीचें अजस्र धूड येत होतें. गंगाधर झटकन् पुढं झाला. तेवढ्या त्या क्षणांत त्याला वर्तमानपत्रें दिसलीं, त्यांतल्या प्रत्येकांत आलेली विशिष्ट बातमी त्यानें वाचली. मग वहिनी दिसली. तिच्या डोळ्यांतून अश्रु येत होते, शिळवड आणि कडू वांग्यांची भाजी त्याला खाऊं दिल्याबद्दल स्वतःला ती दोष देत होती. पलीकडे अण्णा खुर्चीवर बसला होता. त्याची मान खाली झाली होती. त्याचा मित्र आश्चर्यानें थक्क होऊन स्वतःच्या ओळखीच्या इतर लोकांना तो दुपारीं येऊन गेल्याचें आणि त्या वेळीं त्याच्यासंबंधांत अशी कांहीं कल्पनाच आली नसल्याचें पुनः पुनः सांगत होता. आणि कुठल्या तरी अनोळखी कुटुंबांत दुपारच्या वेळीं हातांत वर्तमानपत्र घेतलेली एक प्रौढ वयाची बाई कष्टी मनानें कुणाला तरी म्हणत होती, "साने-गुरुजींच्यानंतर आतांशा हें फारच..."

पण काय झालें आणि कसें झालें हें गंगाधरला कळलेंच नाहीं. तो त्या

क्षणाच्या धुंदींतून जागा झाला, तेव्हां मोटारीचें धूड थांबलें होतें. तिच्या पुढच्या दिव्याला हात टेकून तो उभा राहिला होता. आजूबाजूनें चालणारे लोक एकदम थांबले होते आणि मोटारीच्या आंतल्या माणसाच्या शिव्या ऐकूं येत होत्या...

गंगाधर झटकन बाजूला होऊन पद्पथावर आला आणि भराभर चालूं लागला. मेंदूतला कणन् कण तपासून त्यानें विचार केला. आयत्या वेळीं आपलीं पावलें अशीं कशीं कचरलीं? मग त्याच्या लक्षांत आलें, ज्या वेळीं तीं विविध दृश्यें आपल्या डोळ्यांपुढें उभीं राहिलीं, त्याच वेळीं आपले पाय खचले. किंबहुना, तीं दृश्यें दिसलीं होतीं त्यांतच आपली जगण्याची अनिवार लालसा एकवटून आली होती आणि तिनेंच आयत्या वेळीं आपल्या पायांना मागें खेचलें असलें पाहिजे...

पण आपल्याला उपजीविकेचें साधन द्यायला जग तयार नाहीं. फार काय, आपण जिवंत रहावें अशीदेखील जगाची इच्छा नाहीं. मग जगायचं तरी कशासाटीं?...कशासाटीं?...कशासाटीं?...

जग आणि जगणें या शब्दांवर एखादें मर्मभेदक सुभाषित जुळवण्याच्या नादांत गंगाधर रस्ता ओलांडीत होता आणि तेवढ्यांत सर्व आकाश विव्हळावें तसे, कसले तरी राक्षसी चीत्कारांसारखे प्रचंड आणि भयाण आवाज झाले, मग सारें जग क्षणभर फिरून उलटें झाल्याप्रमाणें वाटलें, मग कुठें तरी विलक्षण कळ आली आणि सगळीकडे अंधार झाला...

तो शुद्धीवर आला तेव्हां कुठल्या तरी अरण्यांत आपण पहुडल्यासारखें त्याला वाटलें. जरा वेळानें ते भोंवतालच्या गर्दीतल्या माणसांचे पाय आहेत हें त्याच्या ध्यानांत आलें. कुणी तरी त्याच्या छातीचा कानोसा घेत होतें. मग तें कुणी तरी म्हणालें, "आहे. आशा आहे. प्रयत्न केला तर जिवंत राहील. ताबडतोब मदत मात्र मिळाली पाहिजे."

'मीं जिवंत रहावं म्हणून ही खटपट चालली आहे काय?' हे शब्द उच्चारायचा गंगाधरनें प्रयत्न केला. परंतु त्याच्या तोंडून नुसतींच "मी...मी" हीं अक्षरें बाहेर पडलीं.

मग आणखी कुणी तरी टॅक्सी बोलावली. भराभर आज्ञा-शब्द उच्चारले गेले. लागलीच पांच सहा माणसें तत्परतेनें पुढें होऊन त्यांनीं गंगाधरला अलगद मोटारींत उचलून ठेवलें. तो पहिला कुणी तरी त्याच्याशेजारीं त्याला

सावरून धरण्यासाठीं बसला. जीवश्चकंठश्च मित्रासारखा.

तेवढ्यांत कुठून तरी एक पोलिस आला आणि 'चक्रधरा'शेजारीं बसत म्हणाला, "प्रकरण गंभीर आहे. मला बरोबर यायला पाहिजे आणि जमलं तर 'जबाब'हि लिहून घेतला पाहिजे. मरणापूर्वींच्या जबाबांतून पुष्कळ वेळां महत्त्वाची माहिती बाहेर पडते......"

मोटार सुरू झाली ती अलगद. पण स्थितिरूपांतून गतिरूपाकडे जातांना सीमारेषा सूक्ष्म असली, तरी गंगाधरला लहानसा हिसका बसल्यासारखा वाटला आणि मग पुढल्याच क्षणीं एकदम दाट अंधार झाला...

त्याच वेळीं गंगाधरचे ओठ जिवणीपाशीं किंचित् मुडपले. त्यांकडे पाहून वाटेल ते अर्थ काढतां येण्याजोगे होते......

१९५०

## . १० .

# कल्याणी

नाना विलायतेला जाऊन आले आणि 'नानासाहेब' झाले. नाना विलायतेला जाऊन आले आणि त्यांच्या मनाला इस्त्री झाली. नाना विलायतेला जाऊन आले आणि मग त्यांना कल्याणीचें मन मुरकुतलेलें वाटूं लागलें. नाना विलायतेला जाऊन आले आणि त्यांना कॉलेजांत चटकन् नोकरी लागली.

कॉलेजांत त्यांची प्रमिलेशीं ओळख झाली. प्रमिलेच्या मनाला भारतांत राहूनसुद्धां इस्त्री झालेली त्यांना दिसली. एक वर्षभर तें प्रकरण गाजत होतें. कल्याणीनें अनुनय, रुसवा, राग, त्रागा आणि अश्रु या सर्व अस्त्रांचा उपयोग केला. पण कांहीं उपयोग होत नाहीं असें आढळून आल्यानंतर शेवटीं तिनें आपला रस्ता धरला. वरून पडदा येणार हें ओळखून पुढील प्रवेशांत अनावश्यक असणाऱ्या पात्रानें रंगभूमीच्या मागच्या अंगाला सरकावें, त्याप्रमाणें ती निघून गेली. मग नानासाहेबांनीं प्रमिलेशीं लग्न केलें. प्रमिलेच्या बापानें विरोध करून पाहिला, पण कांहीं उपाय नाहीं हें ओळखून त्यानेंहि तो सोडून दिला. मुलीचें कृत्य (त्या वेळीं) कायद्याविरुद्ध नव्हतें हें एक, आणि तो स्वतः सेवानिवृत्त न्यायाधीश होता हें दुसरें. तेव्हां मुलीवरच्या प्रेमानें तो तिच्या हितांत लक्षहि घालूं लागला. असल्या संबंधांतून केव्हां कसलीं लफडीं निर्माण होतील कुणास ठाऊक, तेव्हां सावध असावें, हा आपला त्याचा विचार.

कल्याणी कांहीं दिवस माहेरीं राहिली. मग ती स्वतंत्रपणें राहूं लागली. एकटी. आकाशांतल्या तारकेसारखी. पृथ्वीनें सूर्याभोंवतीं एक फेरी मारली म्हणूनच काय तें दिवस संपला असें मानायचें...

मग तिच्या आयुष्यांत केशव आला आणि दिवसांना दिवसपणा आला.

तिचें मन बहरलें, पण त्याचबरोबर बावरलेंहि. नवीन कायदा झाला होता; तिच्यासारख्या कांहीं जणी सुटल्याचेंहि तिनें ऐकलें होतें; पण पहिला पति जिवंत असतांना नवीन पति कुणींच केला नव्हता. त्यामुळें या दोघांनाहि मन मारावें लागत होतें. गांवांतल्या गांवांत असूनहि भेटी पत्रद्वारेंच आणि तीं पत्रेंसुद्धां मोजक्या, ठरलेल्या दिवशींच पाठवावीं लागत. प्रत्यक्ष भेटीचा दिवस तर पर्वणीसारखाच!

आज ती पर्वणी आलेली होती. केशवचें मन उल्हासानें ओसंडून चाललें होतें. बोलण्याची संधि मिळवून देत असलीं तरी बोलूनचालून पत्रेंच तीं. त्यांतून कितीसें लिहितां येणार आहे? सरोवरांतलें पाणी नुसत्या कमंडलूंनीं भरभरून नेलें तरी दुसरीकडे असें कितीसें पोंचवतां येणार?

केशव आला तेव्हां दिवस टळून गेला होता. कल्याणीच्या खोलींत पाऊल टाकतांच त्यानें विचारलें, "दिवा लावूं काय?"

कल्याणीनें मान हलवून नकार दिला.

केशव म्हणाला, "माणसानें अंधारांत बसूं नये. बाहेर काळोख तर मनांत काळोख!"

"मला आत्तां दिवा हवासा वाटत नाहीं. अंधारच बरा वाटतो आहे."

"होय! तुझ्या मनांतल्या कोनाकोनांतून प्रीतीचा प्रकाश कोंदून भरलेला आहे, हें लक्षांतच नव्हतें माझ्या."

"असं नको ना बोलूंस केशव!"

"एकदम कबूल! प्रीतीचे पाश घट्ट झाले, कीं माणसाला नुसतं बोलतच राहणं पुरेसं वाटत नाहीं."

"केशव!"

केशव हसला आणि म्हणाला, "कल्याणी, तूं अशी पिसाळलीस म्हणजे तुझ्याकडे बघायला नि तुझं बोलणं ऐकायला मजा वाटते. कुठल्याशा ग्रंथकारानं म्हटलं आहे, कीं 'स्त्रिया थंड असतात तेव्हां मजा असते, पण त्या चेकाळतात तेव्हां तर अधिकच मजा असते!'...मूळचे शब्द इंग्रजी, तेव्हां चेकाळतात याचा अर्थ जरा सांभाळूनच..."

"केशव, पाचकळपणा पुरे कर!"

"काय करूं तर मग? तुझी भेट म्हणजे कपिलाषष्ठी, तूं अशी जवळ, त्यांतून अंधार, मग आणखी काय पाहिजे?"

"केशव, तुला हवा तर दिवा लाव, पण पायां पडतें, हें बोलणं आतां बस्स कर! माझं मन आज स्वस्थ नाहीं."

धगधगत्या विस्तवावर पाणी पडावें तशी केशवची स्थिति झाली. तो एकदम गप्प झाला. तेवढ्यांत रस्त्यावर कुणीं तरी 'आलेपाक'ची ललकारी दिली. तो आवाज एवढा कर्कश होता, कीं अंधारांतल्या शांततेला कुणी तरी ओचकारल्यासारखें वाटलें.

कल्याणी विरघळली. ती म्हणाली, "आपण आतां इथं बसूं या नको. चलतोस? दूर जाऊं या. मला खूप सांगायचं आहे तुला."

केशवनें मूक संमति दिली आणि तीं दोघें बाहेर पडलीं. वाटेनें दोघंहि स्तब्धच होतीं, तरी पण त्यांचीं मनं काम करीतच होतीं, आणि काळ त्या मनांवर आपल्या रसायनाचें सिंचन करीत होता.

पाताळेश्वर हें ठिकाण असें आहे, कीं जनसंमर्दापासून दूर न जातांमुद्धां तेथें निवांतपणा आणि एकांत हवा तेवढा मिळूं शकतो. पाताळेश्वराच्यावरील सपाट आणि विस्तीर्ण कातळाच्या कडेशीं जाऊन कपारीवरून पाय सोडून दोघंहि जवळजवळ शेजारीं बसलीं. कुणाला खरें वाटो वा न वाटो, शेजारीं बसल्यावेरीज प्रीतीचें कूजन करतां येत नाहीं आणि गाढ प्रीति असल्यावांचून कुणी एकमेकां-शेजारीं बसतहि नाहीं. माणसें समोरासमोर बसलीं म्हणजे वाद तरी घालतात किंवा भांडतात तरी; निदान त्यांच्या हृदयांत एकरूपता निर्माण झालेली नसते.

पश्चिमेकडून थंड वारा आला आणि त्यानें दोघांच्याहि मनावर अंजनाचा लेप दिला.

कल्याणी म्हणाली, "केशव, रागावलास माझ्यावर? मी—म्हणजे माझ्या बोलण्यामुळं तुला पर्वताच्या शिखरावरून खालीं खोल दरींत कोसळल्यासारखं वाटलं असेल—पण—पण मी त्या दरींत आहें आणि तुझी मला सोबत, आधार हवा आहे रे!..."

जवळ सरकून केशवनें म्हटलें, "तूं हें म्हणालीस यांत सगळं कांहीं आलं. खालीं कोसळलों होतों तरी तुझ्या बोलण्यानं आतां पर्वतशिखरावर गेल्यासारखं वाटलं, असं मला म्हणतां येईल. पण त्याच्या आधीं तुझं मन स्वस्थ कां नाहीं तें सांग."

आतां सभोंवतालीं चांगलाच अंधार पडला होता. दिवे...असंख्य दिवे... एकाच वेळीं माणसाच्या हृदयांत निरामय शांति आणि गूढ हुरहुर निर्माण

करणारे दिवे...उंच जागेवर बसून पाहिलेले दिवे...

केशवनें कल्याणीच्या हातावर आपला हात ठेवीत विचारलें, "मी तुझ्याकडे आलेला पाहून ठेवून त्यावरून तुला कुणी कांहीं बोललं काय?"

"काय सांगू तुला?"

"माझं एखादं पत्र कुणाच्या हातीं लागून—"

"नाहीं."

"शाळेंत बरोबरीच्या बायकांबरोबर किंवा वरिष्ठ—"

"नाहीं!"

"तुम्हां बायकांच्या विशिष्ट तक्रारी असतात त्यांपैकीं—"

कल्याणी हसून म्हणाली, "इश्श! कांहीं तरीच्च काय!"

"मग जें कांहीं आहे तें मला सांगण्याजोगं आहे ना?"

"तुला न सांगण्याजोगं माझ्यापाशीं काय असणार आहे?"

"मग सांग ना लवकर!"

"सांगतें—आज ते आले होते."

कुणी तरी दंश केल्यासारखें वाटून केशव उद्गारला, "कोण?—ते? म्हणजे—म्हणजे—"

"नव्हे!—स्स्! सोड!—केव्हढ्यानं दाबलास माझा हात? ते नव्हेत!"

"मग कोण?"

"त्यांचे सासरे! 'ति'चे वडील!"

"तो वृद्ध कपि? आणि तो कशासाठीं आला होता?"

"त्यांनीं मला खूप सहानुभूति दाखवली—फारच! स्वतःच्या मुलीची निंदादेखील केली त्यांनीं!"

"बाप जेव्हां स्वतःच्या मुलीची निंदा करूं लागतो, तेव्हां त्याच्या बुडाशीं खास कांहीं तरी काळंबेरं..."

"आधीं पुरतं ऐकून घे तरी. अन् मग हवी तेवढी मल्लिनाथी कर तुझी!"

"बरं सांग!"

"ते मला म्हणाले, तुझ्या,—म्हणजे माझ्या—परिस्थितीबद्दल तिला फार दुःख होत आहे. तिला आतां पश्चात्ताप झाला आहे. तूं पुन्हा सुखी झाल्याखेरीज तिच्या मनाला स्वस्थता वाटायची नाहीं. तूं सुखी व्हावीस याकरतां

ती वाटेल तें करायला तयार आहे. त्यासाठीं माझीदेखील मदत तिला पाहिजे आहे. तूं सुखी व्हावीस म्हणून मानवी प्रयत्न जेवढे म्हणून—"

"इत्यादि इत्यादि! समजलं सगळं! नोटांचं पुडकं हातांत होतं काय त्यांच्या?"

"नाहीं! पैशांनीं माझं सुख परत येण्यासारखं नाहीं हें तिला आणि स्वतःला कळत असल्याचं त्यांनीं बोलून दाखवलं."

"भलत्याच माणसानं केलेला सत्याचा उच्चार भयानक असतो."

"पण ते बोलले तें सगळं मनापासून बोलले असं दिसलं."

"मग ते मदत कसली करणार कपाळाची? आणि कोणत्या बाबतींत?"

"ज्या गोष्टीबद्दल तुझा आग्रह आहे, पण माझ्या मनाचा निश्चय होत नाहीं—"

"आपलं कांहीं कळलेलं आहे का त्यांना?"

"त्यांनीं माझ्याबरोबर तुला कधीं तरी बघितलेलं आहे. तें अनुमान काढून विचारीत होते—किंबहुना, त्यासाठींच मला बंधनांतून मोकळं करण्याकरतां ते मदत करणार म्हणत होते."

"तूं त्यांची मदत घेण्याचं मान्य केलंस?"

"मी फारसं कांहीं बोलले नाहीं. बहुतेक वेळ त्यांचंच बोलणं चाललं होतं."

रस्त्यावरून एक फटफटी विलक्षण मोठ्यानं फडफडाट करीत वेधशाळेच्या बाजूनें येऊन नव्या पुलाकडे गेली. तिच्या आवाजाला अंधार गिळून घेईपर्यंत कल्याणीला गप्प बसावें लागलें. आकाशांतून एक तारा निखळला. कुठल्या-तरी पेट्रोल-पंपाजवळ विजेच्या नळ्यांचीं अक्षरें प्रकाश ओकीत होतीं तिथें अंधाराला भगदाड पडल्यासारखें वाटत होतें.

कल्याणीनें त्या दिवशीं दुपारीं एकंदर घडलेल्या गोष्टी सांगितल्या.

बाबासाहेबांनीं म्हटलें होतें, 'तूं तिला क्षमा केली पाहिजेस.'

कल्याणी म्हणाली होती, 'त्यांनीं जीं पावलं टाकलीं, तीं सर्व गोष्टींचा सर्व बाजूंनीं विचार करून टाकलीं. मग आतां क्षमा मागण्याचा किंवा करण्याचा प्रश्न कुठं येतो?'

'तिला अपराध्यासारखं वाटतं आहे, पश्चात्ताप होतो आहे, हें तरी खरं वाटतं ना तुला?'

'तें मी खोटं कसं म्हणूं?'

'तुझ्या मनांत कांहीं किल्मिष आहे का?'

कल्याणीच्या जिभेवर शब्द आले होते, 'माझ्या मनांत काय आहे त्याची फार उशीरां चिकित्सा होते आहे ही.' पण ती कांहीं बोलली नाहीं.

बाबासाहेब पुढें म्हणाले, 'आणखी असा विचार कर, नानासाहेबांनीं तुला मोकळं करण्याच्या बाबतींत अडवणूक करायची म्हटलं, तर ती अनेक प्रकारांनीं करतां येईल त्यांना. तूं हैराण होऊन जाशील. त्या बाबतींत तुला निश्चित करण्याचं काम प्रमिला करील, तें काय थोडं झालं? पण त्यासाठीं दोन गोष्टी व्हायला पाहिजेत. एक म्हणजे तूं प्रमिलेला क्षमा करायला पाहिजेस, आणि तिनं मदत केली तर ती नाकारतां कामा नये.'

कल्याणी म्हणाली, 'ठीक आहे. मीं क्षमा केली.'

हें तिनें म्हणतांच बाबासाहेबांनीं एक कागद काढला आणि प्रमिला व नानासाहेब लोणावळ्याला गेले असल्याची माहिती देऊन, त्या कागदावर तिच्याकडून प्रमिलेला पत्रहि लिहवून घेतलें. त्याचा मजकूरदेखील त्यांनींच सांगितला. त्यांत तिनें प्रारंभीं प्रमिलेला क्षमा केली होती आणि अखेरीस आपल्या परिचितांपैकीं एखाद्याशीं पुन्हा विवाह करण्याचा आपण विचार केला तर त्या वेळीं मोकळेपणा असावा म्हणून पहिल्या बंधनांतून सुटका करून घेण्या-साठीं जी कांहीं मदत तुम्ही द्याल ती मी घेईन असा मजकूरहि तिनें लिहिला.

हा पत्रांतला मजकूर आठवून सांगायला कल्याणीला फार प्रयास पडले. पण सगळें सांगून झाल्यावर थक्क होऊन केशव म्हणाला, "कमाल आहे तुझी!"

कल्याणी म्हणाली, "वेडेपणा झाला कीं काय ही शंका मला आली,—पण पत्र लिहून झाल्यावर—आणि म्हणूनच तर माझं मन बावरून गेल्यासारखं झालं आहे."

"पत्र पेटींत पडलं काय?"

"कुणास ठाऊक! ते स्वतः पाकीट घेऊन आले होते आणि त्यांत घालून ते स्वतःच तें पेटींत टाकण्यासाठीं घेऊन गेले."

"पत्राची नक्कल तरी जवळ ठेवली आहेस?"

"त्या वेळीं मला सुचलं नाहीं. आणि सुचलं असतं तरी—आतां वाटतं, मला ती करून घेतां आली नसती—अविश्वास दाखवल्यासारखं झालं असतं तें."

"पत्र लिहितांना तूं एक क्षणभरसुद्धां सावध झाली नाहींस?"

"माझं मन ठिकाणावर नव्हतं."

"कसला विचार करीत होतीस एवढा?"

"माझ्यासारखी दुसरा कसला विचार करणार? कालचे दिवस, आजचे दिवस आणि उद्यां येणारे दिवस—"

"एखाद्या गोष्टींतमुद्धां इतकी भोळी नायिका सांपडायची नाहीं, कल्याणी!"

"त्याचं कारण, मी तशी गोष्टींतली नाहीं आहें."

"तेंच तर वाईट आहे. तशी असतीस तर लेखकाचा उद्धार करून मोकळं होतां आलं असतं. इथं आतां कांहीं तरी लवकर करायला हवं."

"ते गेले आणि मग नाहीं-नाहीं ते विकल्प माझ्या मनांत यायला लागले. तूं आलास तेव्हां थोडा जिवांत जीव आला. पण तूं आलास तो भलतंच गाणं गायला लागलास!"

"आतां गाणंच काय, गोंगाट करावा लागणार आहे!"

"म्हणजे काय करणार तूं?"

"मी नव्हे,—तूं! पहिल्या प्रथम 'कांड तोडायचं'!"

कल्याणीच्या लक्षांत याचा अर्थ एकदम आला नाहीं. पण जेव्हां आला तेव्हां ती अस्वस्थ होऊन केशवकडे पाहूं लागली.

केशव म्हणाला, "म्हाताऱ्यानं तुझ्या रेंगाळणाऱ्या मनाला गति दिली हें एका परीनं बरंच झालं. आतां दुसरं कांहीं करतां यायचं नाहीं. विश्वनाथ पानसेला मीं सर्व सांगितलं आहे. तो सगळं व्यवस्थित करून देणार आहे. कायदा झाल्यापासून आत्तांपर्यंत त्यानं तेवीस 'कांडीं तोडलीं' आहेत!"

गारठ्याच्या वाऱ्याचा झोत अंगावरून जावा त्याप्रमाणें कल्याणी हे शब्द ऐकून शहारली आणि उठली.

एखाद्या माणसानें पोहोण्याचे कपडे करून तयार असावें, पण मग गार पाण्याची भीति वाटून कांठाशीं ऊन खाणेंच बरें वाटून तो बसून राहावा, अशा वेळीं अचानक कोणीं तरी पाठीमागून त्याला आंत पाण्यांत ढकलून द्यावें, तशी कल्याणीची स्थिति त्या दुपारच्या प्रसंगामुळें झाली होती. तिच्या उध्वस्त आयुष्यांत केशवनें प्रवेश केला आणि पुढं पुढं तिचं मन जसजसें उमलूं लागलें तसतशी हा प्रसंग आपल्यावर केव्हां तरी येणार याची तिला जाणीव होऊं लागली होतीच. पण तो या प्रसंगानें जेव्हां जवळ येऊन ठेपला तेव्हां—तेव्हां मात्र ती बावरून गेली. आतांपर्यंत ती प्रवाहांत वहात होती. प्रवाहांत

वहाणाऱ्या माणसाला प्रवाहांत रहाणेंच बरें वाटत असतें. महत्त्वाचे निर्णय घेणें त्याच्या जिवावर येऊन तो तें शक्य तितकें दूर टाकण्याचा प्रयत्न करीत असतो. आतांपर्यंत कल्याणीनें हेंच केलें. पण आतां निर्णय घेण्याचा प्रश्न उभा टाकल्या-बरोबर उलटसुलट विचार, स्वतःचीं व आपल्या आयुष्यांत गुंतूं पहाणाऱ्या केशवचीं सुखदुःखें आणि लहानपणापासून तिच्या मनावर झालेल्या संस्कारांच्या भुतावळी तिच्या मनांतल्या प्रवाहाच्या कांठच्या घाटावर धुण्याचे कपडे जोरजोरानें आपटल्यासारखे मोठमोठे आवाज करून तिला अस्वस्थ करूं लागल्या.

परत येतांना वाटेंत कल्याणी स्तब्धच राहिली होती. केशवनें विचारलें, " तुझं मन स्वस्थ दिसत नाहीं, कल्याणी! सोबत म्हणून तुझ्याकडे थांबूं काय?"

"नको हं महाराज!"

"कुणी कांहीं म्हणेल याची भीति वाटते?"

"माझं सगळं आयुष्य भीतीनंच भरलेलं आहे."

"असं म्हणूं नकोस. निर्भेळ भीति ही कुणाच्याच वांट्याला येत नाहीं. त्यांतून शुद्ध प्रीतीच्या पोटीं तर भीति अमूंच शकत नाहीं. माझी भीति वाटते का तुला?"

कल्याणीनें खालीं वाकून चपलेचा सैल झालेला पायावरील पट्टा वर सरकवून घट्ट केला. दोन पावलें पुढें जाऊन केशव थांबला. मागून एक रिकामा टांगा रेंगाळत आला. टांगेवाल्यानें टांगा हवा आहे का त्याची चौकशी केली, आणि कुणाकडूनच उत्तर न मिळाल्यानें तो तसाच रेंगाळत निघून गेला.

केशवनें पुन्हा विचारलें, "सांग ना कल्याणी! माझी भीति वाटते का तुला? तुझ्या आयुष्यांत आलेल्या पहिल्या पुरुषानं जसं केलं तसं मीदेखील करीन असं—"

"नको केशव! त्याची आठवण काढूं नकोस!—तुझ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे."

"झालं तर मग! आतां भीति कशासाठीं? आणि 'त्या'ची आठवण न काढून कसं चालेल? त्याचं नांवच जर आपण तुझ्या आयुष्यांतून कायमचं काढून टाकणार आहोंत..."

कल्याणीच्या बिऱ्हाडाची जागा जवळ आली. आतां निरोप घ्यायला हवा होता. रस्त्यावरील दोन शेजारच्या दिव्यांच्या मधोमध जेथें सर्वांत कमी प्रकाश

होता तेथेंच एक मोठा वटवृक्ष होता. त्याच्याखालच्या मंद उजेडांत तीं दोघें थोडा वेळ उभीं राहिलीं. प्रीति करणारीं माणसें वियोगाच्या क्षणाच्या जसजशीं जवळ येतात तसतसा तो क्षण क्षितिजाप्रमाणें दूर दूर जावा असें त्यांना वाटत असतें.

"कल्याणी, ज्याला तूं बिचकत होतीस तें करायला तुझं मन तयार झालं. आतां पुढच्चं उत्तर केव्हां देणार तूं? तुझा एकच शब्द—"

"केशव, उत्तर अद्याप मनांत तयार होत नाहीं. एवढंच फक्त सांगतें, माझ्या आयुष्यांत कुणी रहाणारच असला तर तो तुझ्याशिवाय दुसरा कोणी असणार नाहीं. एवढ्यानं तुझं समाधान होत नाहीं का?"

"हें तूं मला पूर्वीच, एकदां नव्हे अनेकदां सांगितलं आहेस. वाढत्या प्रीतीनं एवढ्यावरच किती काळ काढायचा?"

कल्याणीनें मान खालीं घातली आणि उजव्या पायाचा चवडा उचलून टांचेभोवतीं फिरवीत म्हटलें, "माझ्या मनांत सारखं येतं, तूं विधुर असतास तर बरं झालं असतं. माझ्या मनानं मग निर्णय चटकन् घेतला असता!"

कल्याणीच्या मनावर येणाऱ्या असल्या लाटेला कसा प्रतिकार करायचा तें केशवला ठाऊक होतें. तो म्हणाला, "बरं झालं असतं, पण नाहीं त्याला काय करायचं? त्यासाठीं एक लग्न करून पहिल्या बायकोला मारून टाकूं का काय तरी?"

"कांहीं तरीच बोलूं नकोस! जुन्या पद्धतीनं, दुसऱ्यांनीं जुळवून झालेलं असलं तरी, माझं एक लग्न होऊन चुकलेलं आहे. एवढंच नव्हे..."

"पुरे! सगळं ठाऊक आहे मला. तरीदेखील मला तूं हवी आहेस. एवढा एकच विचार करून तूं होकार देत नाहीं आहेस का? एकमेकांचं प्रेम जुळून माझं एका मुलीशीं लग्न ठरलं होतं, पण तिनं मला आयत्या वेळीं फसवलं आणि ती दुसऱ्याशीं संसार करूं लागली, असं एखाद्या गोष्टींतल्यासारखं खोटंच सांगून तुझ्या हृदयाला मीं पाझर फोडायला हवा आहे का? तूं हेलकावे खाते आहेस, पण त्यामुळं आपल्या सहजीवनाचे किती तरी दिवस वायां जाताहेत आणि ते पुन्हा कधीं येणार नाहींत हें लक्षांत येत नाहीं का तुझ्या? प्रियेला जवळ घेण्यासाठीं आतुर होऊन हात पुढं केलेला प्रियकर चित्रांत काढलेला असला तरी त्याचे हात अवघडून जात असतील; मग मी तर हाडामांसाचा, हृदय, उत्कंठा असलेला माणूस आहें..."

"या दिव्यांतून मला एकदां बाहेर पडूं दे रे! मग मी तुला शक्य तितक्या

लवकर कांहीं तरी सांगेन."

"दिव्य नव्हे! नुसता मामुली विधि! 'त्या'नं दुसरं लग्न केलं आहे. तुला कसलीहि आडकाठी यायची नाहीं."

जड पावलांनीं कल्याणी आपल्या खोलींत आली. तिला जेवायची इच्छा नव्हतीच. तिनें खाटेवर अंग टाकून दिलें. दारांतून थंड वारा येत होता, तो बरा वाटत होता म्हणून तें उघडें ठेवून दिवा न लावतां अंधारांतच ती थोडा वेळ नुसती पडून राहिली. तिला झोंप येईलसें वाटेना. वाचण्यासाठीं कांहीं पुस्तक काढण्याचें तिनें ठरवलें.

मग उठून दिव्याजवळ जाऊन ती तो लावणार इतक्यांत तिच्या खांद्यावर हात पडला. ती विलक्षण दचकली आणि किंचाळणार तेवढ्यांत केशव म्हणाला, "भिऊं नकोस, कल्याणी! मीच आहे!" हें म्हणत तिला बाहुपाशांत घेण्याचा त्यानें प्रयत्न केला. कल्याणी दूर झाली.

"नको केशव! इतक्यांत नको!"

"मग केव्हां?"

"मोकळी झाल्याशिवाय हें असं करणं बरं नव्हे, असं माझं मन मला सारखं बजावतं आहे. तुला हातांत हात घेऊं देण्यापलीकडे मी कधीं गेलें नाहीं. तें व्रत मला पाळूं दे."

"ज्याच्या नांवानं तूं ही तपश्चर्या करते आहेस त्यानं मनानं तर राहूं देच, पण आपल्या कृतीनं तरी या तपश्चर्येला साजेसं आचरण ठेवलं आहे का?"

"वाद करूं लागलास तर मला पड खावी लागेल. पण मनानं म्हण, संस्कारानं म्हण—किंवा 'त्यां'चं आडनांव अजून लावावं लागतं आहे म्हणून म्हण, हें करवत नाहीं."

"धीर नाहीं म्हणून, कीं इच्छा नाहीं म्हणून?"

"कांहींहि असलं तरी परिणाम एकच!" असें म्हणतां म्हणतां कल्याणीनें दिवा लावला आणि केशवला निःशस्त्र करून टाकलें.

"तूं अगदीं कालची 'बाई' आहेस, कल्याणी!"

"कालची म्हणजे केव्हांची?"

"जो काळ गेला आणि पुन्हा कधीं येणार नाहीं त्या काळची."

"म्हणजे कशी?"

"तुळशीवृंदावन, नंदादीप, वटवृक्ष, प्रदक्षिणा—"

"या गोष्टी मीं कधींच—निदान 'त्या'नंतर तरी कधींच केल्या नाहींत, हें तुला ठाऊक आहे."

"पण तुझं मन बदललेलं नाहीं."

"मग तुला आपली बायको कशी हवी होती?"

"वाटेल तिच्याविषयीं मी हें बोलत नाहीं. मला एकच व्यक्ति दिसूं शकते आणि ती उद्यांची नाहीं तरी निदान आजची तरी तरुणी असायला पाहिजे आहे मला!"

"'उद्यांची' म्हणजे कशी? आणि 'निदान आजची' म्हणजे तरी कशी?"

"उद्यांची तरुणी स्वतःला नको असलेल्या माणसाशीं एक क्षणभरसुद्धां संसार करायची नाहीं. त्याचप्रमाणं तिला दुसऱ्या एखाद्याशीं संसार करायचा असला आणि त्याची त्याला संमति असली तर तिला कोणी अडवूं शकणार नाहीं. पण ही परिस्थिति येईल तेव्हां सारा समाजच बदललेला असेल. स्वैरणा येणार नाहीं, इतपत बंधनं राहतील, पण त्या वेळीं विवाह ही केवळ ऐच्छिक गोष्ट राहील आणि विवाहानं किंवा त्यावांचूनहि संसार करूं इच्छिणाऱ्या जोडप्याची आर्थिक किंवा सामाजिक कोंडी कुणाला करतां यायची नाहीं. आजच्या तरुणीला हें शक्य नाहीं. तरी पण नवीन मिळणारे हक्क तुटपुंजे असले तरी ते उपभोगण्यासाठीं मन घट्ट करून भूतकाळांत गाडल्या गेलेल्या भुतांची भीति दूर करून ही गोष्ट सहज—"

"म्हणजे तुझ्या मतानं मीं तुझ्या गळ्यांत गळा घालून तुला कवटाळलं असतं तर मी आजची तरुणी ठरलें असतें. आणि असं एकदां केल्यानंतर तूं तेवढ्यावरच थांबला असतास?"

"चुकतेस तूं! कुणीं कुठल्या मर्यादेपर्यंत जावं हें ज्यांचं त्यांनीं ठरवायचं असतं. पण भलतींच बंधनं आणि जुनाट कल्पना पावलोपावलीं मनाला दुबळं करून मारूं लागल्या तर त्यांना निर्धारानं दूर सारायला हवं, एवढंच माझं म्हणणं, आणि तूं आजची तरुणी असायला मला हवी आहेस असं म्हणण्यांतला माझा अभिप्रायहि एवढाच."

"या सगळ्या कल्पना तुझ्याच कीं कुणीं तसं म्हटलं आहे?"

"कुणीं म्हटलं असलं तर मला ठाऊक नाहीं."

"मग तुझ्या या कल्पना तुलाच लखलाभ! ज्या प्रसंगांतून मी गेलें आहें त्यांनीं माझ्या मनाचा पिंड तयार केलेला आहे. मोकळी झाल्यावर तोच मला

काय करायचं तें सांगेल."

"पण तो 'पिंड' आज काय सांगतो आहे?"

"तो सांगतो आहे, कीं एक माणूस अगदीं वेडं आहे. त्याला एवढंच कबूल कर, कीं 'नंतर' संसार केलाच तर तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणाचा करणार नाहीं! बस्स! एवढंच! आणि तोंपर्यंत—"

"एवींतेवीं वेडा ठरवलंच आहेस, तर त्यासारखं वागून तरी घेतों!"

"पुरे पुरे! समजलं सगळं! घरीं जा आतां! मला झोंप यायला लागली."

यावर केशव कांहीं तरी बोलणार होता, पण कल्याणीनें त्याला बोलूंहि दिलें नाहीं आणि थांबूंहि दिलें नाहीं.

मनांत आणलें तर लग्नविच्छेदाच्या बाबतींत पति हा अनेक प्रकारांनीं अडथळे आणूं शकतो आणि त्याला शेवट जरी बदलतां येण्यासारखा नसला तरी तो शक्य तितका लांबवून पत्नीला उपद्रव आणि मनस्ताप देतां येणें सोपें असतें. तेव्हां त्या दृष्टीनें, न मागतां त्या बाजूनें मिळणारें साह्य वायां जाणार नाहीं. तथापि दावा दाखल करण्यापूर्वी प्रमिलेच्या पित्यानें लिहून घेतलेल्या पत्राचें गूढ उकलणें जरूर आहे. त्याचप्रमाणें केवळ सावधगिरी म्हणून जमल्यास तें हस्तगत तरी केलें पाहिजे किंवा तें नष्ट होण्याची तरी व्यवस्था झाली पाहिजे, हें विश्वनाथ पानसेचें मत. पत्र लिहून घेण्यांत म्हाताऱ्याचा हेतु काय असावा याची मात्र तिघांनाहि कल्पना येत नव्हती.

एकाच गांवांत रहात असल्यामुळें कल्याणीला प्रमिला आणि नानासाहेब यांची दृष्टिभेट टाळतां आली नव्हती, तरी पण असा प्रसंग कधीं आलाच तर तिनें त्यांच्याशीं ओळखहि दाखवली नव्हती, किंवा एका शब्दानें भाषणहि केलें नव्हतें. किंबहुना, एकदोनदां एकाच बसमधून जाण्याचा प्रसंग येत होता तो देखील तिनें ती चुकवून टाळला होता. तथापि आज तिला 'प्रमिलेच्या घरीं' जाण्याचें दिव्य करावें लागत होतें.

एकेका माणसाचा स्वभाव कसा विलक्षण असतो पहा! वास्तविक ओशाळल्यागत वाटायला हवें असेल कुणाला, तर तें प्रमिलेला. पण प्रमिला लोणावळ्याहून परत आलेली कळल्यावर कल्याणी तिच्याकडे (प्रथमच) गेली तेव्हां, तिला ओशाळल्यागत वाटण्याचें कारण आपण होणार या विचारानें कल्याणीलाच ओशाळल्यागत झालें. उलट, दार उघडून 'आंत या' असें

म्हणतांना किंवा नंतरहि प्रमिलेच्या चर्येवर ओशाळल्याचें यत्किंचितहि लक्षण दिसत नव्हतें. हाहि एक निराळयाच स्वभावाचा नमुना म्हटला पाहिजे.

बराच वेळ दोघी स्तब्ध बसल्या होत्या. प्रमिला खिडकींतून बाहेर पहात होती. कल्याणी भिंतीवर नानासाहेब आणि प्रमिला यांचा एकत्र फोटो होता त्याकडे पहात होती. मग प्रमिलेनें विचारलें, "स्वयंपाकघरांत चालतां? चहा टाकतें."

कल्याणीनें विचारलें, "परत कधीं आलांत?"

"सहा दिवस झाले."

"माझं पत्र मिळालं तिकडे?"

"नाहीं बाई! तुम्ही लिहिलं होतंत?"

"हो! तें लिहिलं होतं मात्र मीं, पण तें पेटींत टाकायला माझ्याकडून घेऊन गेले होते तुमचे वडील."

"आश्चर्य आहे! मला कसं तें मिळालं नाहीं? पोस्टांत गहाळ झालं कीं काय तरी! काय होतं त्यांत?"

कल्याणी थक्क होऊन, खोटेपणा बापानें केला कीं मुलगी खोटें बोलते आहे याचा थांग लावायचा प्रयत्न करूं लागली. तिनें विचारलें, "माझ्याकडे तुम्हीं आपल्या वडलांना पाठवलं नव्हतं?"

"मी? मी कशाला पाठवूं बाई? ते आले होते तुमच्याकडे?"

कल्याणीनें थोडक्यांत सर्व हकिगत सांगितली. सगळें ऐकून झाल्यावर प्रमिला म्हणाली, "थांबा, बाबा इथंच आहेत. त्यांनाच मी विचारून येतं."

"इथंच असले तर खालींच बोलवा त्यांना!" हें म्हणतां म्हणतां कल्याणीला आपलें मस्तक तापल्याची स्पष्ट जाणीव झाली.

"बरं तर, मी घेऊन येतें त्यांना." म्हणून प्रमिला वर जायला निघाली. तेवढ्यांत तिचे बाबाच खालीं आले. कल्याणी दृष्टीस पडल्याबरोबर एक क्षणमात्र त्यांच्या चर्येत चलबिचल झाली. पण लागलीच स्वतःला सावरून घेऊन ती चलबिचल स्वतःचें नाक खाजवीत त्यांनीं बुजवून टाकली आणि ते म्हणाले, "बरं झालं तुम्ही भेटलांत. केव्हां तरी बोलायचंच होतं मला तुमच्याशीं."

प्रमिलेनें 'पत्राची भानगड' हे दोनच शब्द उच्चारले. पण लागलीच तिला गप्प करून बाबा म्हणाले, "तें मी तुला नंतर सांगेन. आत्तां मला एक अक्षरदेखील विचारूं नकोस. तूर्त मला यांच्याशींच बोलायचं आहे." आणि

त्याच श्वासांत कल्याणीला त्यांनीं विचारलें, "हिच्या देखत बोलूं?"

"यांच्या देखतच बोला. आणि मग मलाहि जें कांहीं बोलायचं आहे तेंदेखील मी यांच्या देखतच बोलणार आहें."

"ठीक आहे! एका परीनं तेंहि चांगलंच होईल. तुम्ही काय बोलणार आहांत तें मात्र मला ठाऊक आहे आणि त्यासंबंधांतच मी बोलणार आहें."

"म्हणजे त्या पत्रासंबंधांतच ना?"

बाबा कोर्टातल्या वकिलासारखे हंसले आणि मग त्यांनीं जोरजोरानें नाक खाजवलं. त्याचा खराखरा आवाजसुद्धां झाला. ते म्हणाले, "नवीन कायद्यानं तुम्ही घटस्फोट केव्हां घेणार आहांत?"

मघाशीं तापलेली कल्याणी आतां बाबांच्या धिमेपणानें पेटली. तिची प्रारंभींची ओशाळगत कुठल्या कुठें गेली. तिनें फटकन् विचारलें, "त्याचा पत्राशीं संबंध?"

"संबंध मग सांगतों. पण घटस्फोट घेणार असलांत तर त्यानंतर नवीन लग्न करणार आहांत काय?"

"याचादेखील पत्राशीं काय संबंध?"

"आणि लग्न करणार असलांत तर तुमचं कुणाशीं ठरलं आहे काय?"

"पत्राशीं या चौकशीचा संबंध कळल्याखेरीज मी कांहीं बोलणार नाहीं."

"मग तुम्हांला स्पष्ट सांगायला हरकत नाहीं. तुम्ही घटस्फोट घेणार असलांत तर तुम्हाला पोटगीचं लफडं निर्माण करतां येऊं नये अशी व्यवस्था त्या पत्रानं मीं करून ठेवली आहे. त्या पत्रावरून तुमच्याविरुद्ध वाटेल त्या गोष्टी सिद्ध करतां येण्याजोग्या आहेत.—विशेषतः कोर्टात! तुम्हांला माहीत नसेल, पण कोर्टात धूर्त वकिलाला सावित्रीचं पावित्र्यसुद्धां कुत्रीच्या पावित्र्याच्या मोलाचं ठरवता येतं."

"पण हा सारा खटाटोप तुम्हीं कशासाठीं केलात?"

"आपल्या मुलीच्या हितासाठीं बाप काय करणार नाहीं?"

"नुसत्या पोटगीचाच प्रश्न होता तर मला तसं स्पष्ट सांगायचं होतंत. पत्राऐवजीं 'पोटगी मागणार नाहीं' हेंच त्या वेळीं लिहून दिलं असतं."

"हें आत्तां म्हणतांहां! आणि तेंदेखील पत्र आमच्या हातीं आहे म्हणून. त्या वेळीं तुम्हीं निराळी भाषा केली असती. तथापि अजून वेळ गेलेली नाहीं. मी सांगेन तें लिहून देणार असलात तर तें पत्र तुम्हांला परत मिळेल. नाहीं

तरी तुम्ही त्या पत्रासाठींच आलेल्या असाल ना? कधीं न येणाऱ्या, दुसऱ्या कशासाठीं येणार आहांत?"

कल्याणीनें प्रमिलेला विचारलें, "हें तुम्हांला पसंत आहे का? बोला! केवळ एक स्त्री या नात्यानं उत्तर द्या!"

बाबा हिंस्रपणें म्हणाले, "माझ्याशीं बोला! तिला यांतलं कांहीं ठाऊकहि नाहीं आणि तसा तिचा कांहीं संबंधहि नाहीं. त्यांतून तिनं जेव्हां तुमच्या संसारावर निखारे ठेवले, तेव्हांच स्त्री या नात्यानं आवाहन करून घेण्याचा तिचा अधिकार संपलेला आहे!"

बाबांनीं एकाच घावांत दोघींना जखमी केलें. त्यांतल्या त्यांत 'त्या प्रसंगा'वर घासून धार लावलेल्या शस्त्राचा हा प्रहार कल्याणीला सर्वस्वीं अनपेक्षित होता. ती चिडून म्हणाली, "मला कुणाशींच बोलायचं नाहीं! मी जातें."

प्रमिला म्हणाली, "तुम्ही कशासाठीं आलां होतांत तें मला धड कळलंहि नाहीं. थांबा ना! चहा करतें, तो पिऊन मग जा!"

"एवढं बोललांत हेंच पुष्कळ आहे. जातें."

"थांबा. कुंकू तरी लावतें."

प्रमिला घाईघाईनें आंत गेली आणि परत बाहेर येऊन म्हणाली, "काय वेंधळी आहें मी? आतांशा ओलंच कुंकू लावतें हें लक्षांतच नाहीं माझ्या! कोरडं कुंकू नाहीं, तर काय करायचं आतां?"

"कांहीं करूं नका! कुंकूहि पोंचलं मला!" कल्याणीनें हे शब्द चुरगाळले, त्यांचा गोळा करून प्रमिलेकडे भिरकावले आणि ती भराभरा निघून आली.

साऱ्याच प्रसंगानें तिला उबग आली होती. त्यांतल्या त्यांत तिच्या पोळलेल्या मनानें शेवटच्या ह्या कुंकवाच्या प्रसंगांतून नाहीं-नाहीं ते अर्थ काढायला सुरवात केली. आपलें भविष्य...केशव...

या भेटीमधून दुसरें कांहीं निष्पन्न झालें नाहीं तरी पत्राचा हेतु कळला होता. एक तर पोटगीचा हक्क कल्याणीला मिळाला असता तरी त्याचा उपयोग तिला पुन्हा लग्न नाहीं केलें तरच होणार होता, आणि दुसरें असें कीं, तो वसूल करण्याचें तिच्या मनांत असतें तर तिनें तो पूर्वींच केला असता. पण मानीपणामुळें ती त्या भानगडींत पडली नव्हती आणि आतांहि त्यासंबंधांत तिची कोणत्याच प्रकारची अपेक्षा नव्हती. "एक वेळ पाणी गेलेल्या नळाचीदेखील 'धार काढून' पाणी

मिळवतां येईल, पण कोर्टांतून पुरेशी पोटगी मिळवतां येणं अशक्य आहे," ही वकील मंडळींत प्रचारांत असलेली म्हण चर्चेच्या ओघांत विश्वनाथ पानसेनें सांगितली होती. तेव्हां केवळ सूड घ्यायचा म्हणूनच पोटगीच्या मागें लागावें असा आग्रह तिला केशवकडून होण्याचा संभवदेखील दूर झाला होता. आणि शेवटीं तर तें पत्राचें प्रकरणसुद्धां अचानकपणें आटोपलें होतें. कारण, त्या विचित्र भेटीनंतर सुमारें आठवड्यानें नानासाहेबांचें तिला एक पत्र आलें होतें. त्यांत एवढाच मजकूर होता : "आम्हीं तें पत्र नष्ट केलें आहे. घटस्फोट घेणार असलीस तर कोणताहि अडथळा येणार नाहीं याविषयीं निःशंक रहावें."

कल्याणी फार थोड्या अवधींत मोकळी झाली.

त्या दिवशीं केशव तिला भेटला तेव्हां म्हणाला, "तुला आनंद झाला आहे कीं नाहीं, कल्याणी?"

"तुला काय वाटतं?"

"मला काय वाटतं तें सारं सारं सांगूं?"

कल्याणी हसून म्हणाली, "नको नको! मीच सांगतें आपली!"

"सांग तर मग!"

"खरं म्हणजे माझी स्थिति परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यासारखी झाली आहे. एक प्रश्न संपला कीं दुसरा उभा. प्रश्न संपल्याचा आनंद वाटायला फुरसतच नसते."

"पण आतां फक्त शेवटचाच प्रश्न तर उरला आहे."

"होय."

"होय नाहीं नि नाहीं नाहीं! तुझा पिंजरा आतां मोडून पडला आहे. माझ्या प्रश्नाचं उत्तर तूं लवकर दिलं पाहिजेस."

"पिंजरा मोडला असला तरी पंखांत शक्ति यायला 'सहा महिन्यांचा अवधि' आहे. तोंपर्यंत इतके दिवस थांबलास तसाच थांब, आणि—"

"आणि काय?"

"रागावूं नकोस. माझा मला विचार करूं दे! त्याचप्रमाणं आपल्या पत्रांच्या नि भेटींच्या कार्यक्रमांतहि वाढ होतां कामा नये."

"अजूनदेखील?"

"अजूनदेखील!"

"कल्याणी, तुझ्या काळजांत डांबर वहातं आहे का ग?"

केशवनें कांहीं मजकूर लिहिला होता; पण आडव्यातिडव्या रेघा मारून तो इतका खोडून टाकला होता, कीं त्यांतलें एक अक्षरसुद्धां लागत नव्हतें.

हें पत्र, शेवटच्या कुंकवाचा प्रसंग, आणि स्वतःला घ्यावा लागणारा निर्णय या तिहींमुळें कल्याणीची मनःस्थिति मोठी विलक्षण झाली होती. आपलें मन खोदखोदून तिनें तपासलें. तिला केशव हवा होताच; पण तेवढा एकच विचार तिचें मन फार काळ व्यापूं शकत नव्हता. केशवच्या पुढील सुखाचा विचार ती करूं लागली, कीं सारेंच कांहीं तिला अनिश्चित वाटूं लागे. आणि केवळ त्याच्या सुखासाठीं कां होईना, आपण त्याला आपल्या जीवितांत गुरफटूं देतां कामा नये असें तिचें मन तिला सांगूं लागे. कुंकवाच्या प्रसंगाची आठवण झाली कीं ती भयभीत होई. त्या प्रसंगानें पुढील भविष्य सुचविलें होतें काय? केशवनें उल्लेख केलेलीं तिच्या मनांतलीं भुतें हीं होतीं.

आणि या स्थितींतच केशवनें वर्णन केलेलें तिचें 'कालचें' मनहि मध्येंच डोकें बाहेर काढून तिला सतावीत होतें. पतीनें दुसरें लग्न केलें, तेव्हांपासून लौकिक अर्थानें तुटलेला संबंध आतां कायद्यानें तोडून घेतलेला असला, तरी पहिला पति जिवंत असतांना दुसरा पति करण्याचा प्रसंग येतांच तें 'कालचें' मन तिला मागें खेंचूं लागलें.

लहान असतांना कल्याणीनें एकदां एका ठिकाणीं पिंजऱ्यांत चाकाच्या आकाराची शिडी आणि त्यावर चढणारा एक पांढरा उंदीर बघितला होता. तो उंदीर सारखा वर चढायचा प्रयत्न करी आणि तें चाक सारखें फिरत खालीं येत राही. अशा रीतीनें तें चाक सारखें फिरे, पण तो उंदीर मात्र जागच्या जागींच राही. आपल्या स्थितीवरून कल्याणीला त्या प्रसंगाची आठवण झाली.

या ओढाताणींत तिचा निर्णय कांहीं होईना, आणि तिचें मन मात्र थकून गेलें. इकडे दिवस तर अंगणांत जमलेल्या कबुतरांसारखे एकेक उडत वीस उलटून गेले. आपल्याला निरपेक्षपणें सल्ला देणारें कोणी भेटेल तर किती चांगलें होईल, हा विचार राहून राहून तिच्या थकलेल्या मनांत येऊं लागला.

एके दिवशीं, शाळेंत मासिकांचे बरेचसे अंक साचले होते ते तिनें क्रमानें लावून त्यांचे वर्षावर्षाचे गठ्ठे तयार केले आणि बांधणी करण्याकरितां पाठवून दिले. शेवटीं कांहीं फुटकळ अंक उरले. त्यांतले तीनचार तिनें घरीं वाचण्याकरतां आणले. त्यांत सुमारें सतरा वर्षांपूर्वीचा एक 'स्त्री'चा अंक होता. त्यांत 'विमला' नांवाची गोष्ट आली होती, ती तिनें वाचली.

विमला सालस आणि सुस्वरूप होती. तिच्या आईच्या आजारामुळें एका डॉक्टरशीं तिची ओळख जमली आणि त्यांचें लग्नहि ठरलें. ज्या उन्हाळ्याच्या सुटीनंतर त्यांचें लग्न होणार होतें, त्या सुटींत विमला आपल्या मामाकडे गेली होती. तिथें तिला देवी आल्या. त्यांतून ती बरी झाली, पण तिच्या तोंडावर वण राहिले आणि एका डोळ्यांत फूल पडून ती विद्रूप झाली. अशाहि परिस्थितींत डॉक्टर आपल्याशीं लग्न करील याविषयीं तिला खात्री होती. इतर कुणी सोडाच, पण प्रत्यक्ष आपण त्याला परावृत्त करायचा प्रयत्न केला तरी उपयोग होणार नाहीं हें विमलेला दिसत होतें. विमलेनें मग आपली धाकटी बहीण सिंधू हिला एकटीलाच पुढें पाठवून तिच्याकडून आपण डॉक्टरला टाळत असल्याचें नाटक करवलें. डॉक्टर भेटायला येई तेव्हां, 'विमल बाहेर गेली आहे, नुकतीच मैत्रिणीकडे गेली आहे,' अशा सबबी ठरल्याप्रमाणें सिंधूनें सांगितल्या. तीनचारदां असें झाल्यानंतर एक दिवस वेळ देऊन डॉक्टर आला आणि विमला घरांत नाहीं असें पाहून वाट पहात थांबला. तेव्हां (पूर्वयोजनेनुसार) बैठकीजवळ पडलेलें एक पत्र सहज रीत्या त्याच्या दृष्टीस पडलें. त्यांतला मजकूर भयंकर होता. एका धनाढ्य माणसानें तें पत्र विमलेला लिहिलेलें असून त्यांत दरिद्री डॉक्टराचा नाद सोडण्याचा आग्रह होता. (हा मजकूरहि विमलेचाच.) आधींची टाळाटाळी आणि हें पत्र यांचा विलक्षण परिणाम होऊन डॉक्टरचें मन विमलेविषयीं इतकें कलुषित झालें, कीं त्यानें तिचें नांव टाकलें व दुसऱ्या मुलीशीं संसार केला. आणि मग कित्येक वर्षांनीं विमला मृत्युशय्येवर पडलेली असतांना तिनें त्याला बोलावणें पाठवलें, व तेव्हां त्याला तें औषधासाठीं वाटून त्यानें 'दुसऱ्या कोणाला तरी बोलवा' असें फटकन् बोलून बोलावणाऱ्याला वाटेला लावलें...

गोष्ट वाचून झाल्यावर कल्याणी विलक्षण गंभीर झाली, आणि मग तिनें डोळे मिटून घेतले. तिचें मन गहिंवरून आलें होतें. ती बराच वेळ स्तब्ध पडून राहिली. मग तिचा निश्चय ठरला. कारणें निराळीं असलीं तरी, पुढील आयुष्यांत आपल्या भावी पतीला आपल्यामुळें दुःखाचीच प्राप्ति होणार, ह्या बाबतींत आपणां दोघींमध्यें साम्य नाहीं काय?... मग आपणहि विमलेप्रमाणेंच केशवला दूर करायला नको काय?

पण विमला गोष्टींतली होती. तिच्याइतक्या अघोरी उपायांनीं केशवला तोडायचा कल्याणीला धीर होईना. तिचें मन तिला सांगूं लागलें, 'सरळ आणि

स्पष्ट नकाराचं पत्र तो गांवाहून परत येईल तेव्हां त्याला मिळालं पाहिजे... पण...कारण काय लिहायचं ? खरंच—कारण काय लिहायचं ?

तिच्या मनानें उत्तर दिलें, 'माझ्यापासून तुला सुखाची प्राप्ति होणार नाहीं.'

त्याच मनानें शंका काढली, 'हें का तूं पत्रांत लिहिणार आहेस ? हें असलं कारण तो झुगारून देईल, हें जर तुला ओळखतां येत नसेल, तर तो तुझ्या इतक्या जवळ आला होता तें फुकटच ! आणि आपल्यापासून त्याला सुख मिळणार नाहीं असं तरी तुला कां वाटतं ?—कां वाटतं ? सांग, कां वाटत ?'

'सांगतें ! थांब !...नाहीं !...हो, तसंच ! पहिला पति जिवंत आहे ही जाणीव दुसऱ्या पतीशीं संसार करतांना सारखी...नको ! पहिल्यापासूनच त्याला जवळ येऊं द्यायला नको होतं, पण आपण मोहांत सांपडलों ! आपल्या वैराण जीवनांत त्याचं साहचर्य गार सावलीसारखं होतं, तें आपल्याला दूर करवेना...'

'तरीच ! निर्णय शक्य तेवढा दूर ढकलायला दुसरं काय कारण ? स्वार्थी !'

'नाहीं ! नाहीं !...होय ! होय !'

'आतां नाहीं-नाहीं होय-होय करतेस ! प्रायश्चित्त घे !'

'घेतें ! काय करूं ?'

'केशवला होय म्हण !'

'धीर होत नाहीं !'

'हृदय घट्ट कर !'

'तसं होऊं शकतं, तर इतकी धडपड कां होती ?'

...कल्याणीनें दोन्ही हातांनीं डोकें दाबून धरून आंतल्या दोन्ही आवाजांचें भांडण थांबवायचा प्रयत्न केला. पण तें तिला कायमचें थांबवतां आलें नाहीं.

तेरा तारखेला सुटीचा दिवस होता. त्या दिवशीं तिनें ओठ घट्ट दाबून केशवला अखेरचें पत्र लिहिलें. पत्राच्या शेवटीं तिनें लिहिलें :

"वर हें सर्व मीं लिहिलें तें अगदीं पूर्ण विचार करून. माझ्या निर्णयांत आतां बदल होणार नाहीं. तुझ्या कल्पनेप्रमाणें माझें मन 'कालचें' आहे हें खरें, पण त्यांत आतां कोणतेंहि स्थित्यंतर न होण्याइतकें तें पक्कें बनलें आहे. माझें मन वळवायचा प्रयत्न करूं नकोस. त्याचा उपयोग होणार नाहीं. कांहीं दिवसांनीं मला तूं विसरूं शकशील,—तूं विसरावेंस अशीच माझी इच्छा आहे. तुला अनुरूप मुलगी सहज मिळेल, तिच्याशीं तूं सुखानें संसार कर..."

याच मनाच्या अवस्थेंत, आपल्या निर्धाराला दृढपणा येण्यासाठीं आणखी

एक पत्र लिहिण्याचा विचार तिच्या मनांत आला. तो तिनें लागलीच पारहि पाडला. तें पत्र तिनें आपल्या पतीला लिहिलें. त्यांत तिनें घटस्फोट मागितल्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त केला आणि नंतर, 'अद्याप हा निकाल वज्रलेप व्हायला पांच महिन्यांचा अवधि आहे. तुम्ही त्याविरुद्ध वरच्या कोर्टांत अपील करा. मी तें लढवणार नाहीं. कायद्यानें आपलें पूर्वीचेंच नातें चालू राहूं दे—' अशी विनवणी केली.

हीं दोन्ही पत्रें लिहून झाल्यावर कल्याणीला विलक्षण शीण आला. तिनें त्यांच्या घड्या करून तीं लिफाफ्यांत घातलीं, त्यांच्यावर पत्ते लिहिले आणि मग ती खाटेवर बराच वेळ पडून राहिली. पत्रें टपाल-पेटींत टाकायला जाण्याआधीं तरतरी यावी म्हणून चहा तयार करण्यासाठीं तिनें स्टो पेटवला.

संध्याकाळ झाली होती आणि ती तिला खायला उठली होती. इतके दिवस धरून ठेवलेला पाश तिनें आतां तोडून टाकला होता. पण तो केवळ बाह्यतः ! त्याचीं पत्रें ती नष्ट करणार नव्हती. आतां एकट्यानें रेटाव्या लागणाऱ्या तिच्या पुढील आयुष्यांत तीं विश्रांतिस्थानें होणार होतीं. त्यानें दिलेल्या वस्तूहि ती जपून ठेवणार होती. त्यानें तिला एक टेबलावरचें कापड दिलें होतें. तें आणलेल्या दिवशीं त्यानेंच तें टेबलावर अंथरलें होतें. त्यानंतर टेबलावर उदबत्तीचें घर होतें त्यांत त्यानें एक उदबत्ती पेटवून लावली होती. पण तें करतांना गडबडींत जळती काडी कापडावर पडली होती, ती कल्याणीनें पाहून धांवत पुढें होऊन झटकून टाकली होती. तरी त्या जागीं एक जळका डाग राहिला होता. त्या वेळीं केशवला ती त्याच्या वेंधळेपणाबद्दल बोलली होती. त्यावर हसून त्यानें म्हटलें होतें, 'म्हणून तर कल्याणी, माझ्या आयुष्यांत तूं यायला पाहिजेस ! लवकर यायला पाहिजेस.'

तो काळा डाग अद्याप कायम होता. जन्मखुणेसारखा. पण आतां त्या साध्या प्रसंगाची केवळ स्मृतिच काय ती त्या जळलेल्या भागाकडे पाहून यापुढें होणार होती...आणि...आणि अशासारखे प्रसंग यापुढें दुसऱ्याच कुणाच्या तरी वांट्याला येणार होते...

केशव उद्यां येईल, त्याच्या हातीं पत्र पडेल, तो आपल्याकडे आल्यावांचून रहाणार नाहीं...काय वाटेल तें करून ती भेट टाळली पाहिजे...

चहाचें पाणी केव्हांचें उकळून चाललें होतें. कल्याणीनें चहा तयार केला आणि तो कसाबसा ती प्यायली.

आतां अंधार पडला होता. कल्याणीनें दिवा लावला, आणि टेबलाशीं बसून पुन्हा एकदां तीं पत्रें वाचून काढलीं. एकदोन ठिकाणीं मामुली दुरुस्त्या केल्या आणि लिफाफे बंद करून टाकले. घड्याळांत आठ वाजायला दहा मिनिटें कमी होतीं. पत्रें टाकण्यासाठीं बरोबर आठ वाजतां निघायचें तिनें ठरविलें. तेवढींच आणखी दहा मिनिटें केशवची आपुलकी आपल्यापाशीं राहील...तिनें दिवा मालवला आणि त्या आपुलकीला गोंजारत ती टेबलाशीं बसून राहिली.

दारावर टकटक वाजलें. कल्याणीनें उठून दिवा लावून दार उघडलें, तों केशव!

"एक दिवस आधीं आलास तूं केशव!"

"मग! कुणाची भीति आहे कीं काय मला?" म्हणून केशव टेबलापाशीं जाऊन बसला. "हें काय? मला पत्र? मग वाचलंच पाहिजे."

"अं हं! आत्तां नको! उद्यां वाच!"

"उद्यां तर वाचीनच. पण आत्तांहि वाचतों." त्यानें तें फोडून वाचलें, आणि तें वाचून झाल्यावर कल्याणी 'नको नको' म्हणत असतांनाहि दुसरें पत्रहि फोडून वाचलें. त्यानंतर दोन्ही पत्रें पुन्हा एकदां त्यानें वाचलीं.

केशव टेबलाजवळून एकदम उठला तेव्हां कल्याणीच्या पोटांत धस्स झालें. तो दाराच्या बाजूला गेला तेव्हां तर तिच्या जिभेवर शब्दहि आले, 'केशव, थांब! जाऊं नकोस. मी सगळं कांहीं तुला समजावून सांगतें.'

पण केशव बाहेर गेला नाहीं. दाराजवळ जाऊन त्यानें फक्त दिवा मालवला आणि दाराला आंतून कडी घातली. नंतर संथपणें पावलें टाकीत तो तिच्या-जवळ आला आणि त्यानें तिला बाहुपाशांत घेऊन घट्ट आलिंगन दिलें. त्या क्षणीं कल्याणीनें स्वतःभोवतीं उभे केलेले सगळे तट तिला नकळत कोसळून पडले. ते उभे करण्यानें आणि टिकवून धरण्यानें सांचत आलेला थकवा तिला त्या क्षणीं पेलेनासा झाला आणि तिनें असाहाय्यपणें केशवच्या खांद्यावर मान टाकून दिली.

पण एक क्षणभरच. पुढल्याच क्षणीं ती सावध झाली. तिच्या मनानें अखेरचा जोराचा प्रयत्न केला. केशवच्या पाशांतून ती सुटका करून घेऊं लागली. केशवनें तिला सोडलें तर नाहींच, पण तिला अधिकच जवळ ओढून तिचें चुंबन घेतलें. तिला बाहुपाशांत तशीच धरून ठेवून मग केशव अंधारांत तिच्याकडे पाहूं लागला, तेव्हां तिनें विचारलें, "तूं हें काय केलंस?"

"तुला कळलं नाहीं? पुन्हा एकदां पाहिजे काय?"

"गाढव आहेस! हें करून काय मिळालं तुला?"

"जें मिळालं त्याहून किती तरी अजून मिळवायचं आहे! तूर्त तुला 'आजच्या' काळांत आणून सोडलं हें कांहीं कमी नाहीं!"

"मोठा शहाणपणा केलास!"

"मग काय करणार? कांहीं कारण नसतांना तूं मागं रेंगाळायला लागलीस; तेव्हां मग दांडगाई करून तुला पुढं ओढल्याखेरीज दुसरा उपाय नव्हता."

"माझीं कारणं तुला काय माहीत?"

"मला सगळीं कारणं माहीत आहेत. त्याचप्रमाणें त्यांच्यावरचे उपायहि माहीत आहेत!" हें म्हणतां म्हणतां केशवनें निःसंकोचपणें कल्याणीला ताज्या, नव्या, रसरशीत आवेशानें अधिकच जवळ ओढलें.

"केवढयानं कवटाळलंस मला! राक्षस आहेस! पोलक्याच्या आंतली चोळी पाठीवर फाटून गेली ना!"

"चांगलं झालं! जुनीच झाली असेल ती! तिच्याबद्दल कांहीं खेद वाटायला नको."

केशवनें मग दिवा लावला आणि टेबलाजवळ जाऊन त्या दोन पत्रांतलें एक पत्र हातीं घेत म्हटलें, "हा अपिलाचा मूर्खपणा कुणीं सांगितला तुला? आणि ज्यानं कुणीं तुला हें सांगितलं, त्यानं, ही साधी गोष्ट कशी ध्यानांत घेतली नाहीं, कीं एखाद्या पक्षाला निकाल अमान्य असला तरच अपील करण्याचा प्रश्न उद्भवतो. विरुद्ध पक्षाकडून तुला विरोधदेखील झाला नाहीं तर त्याला निकाल अमान्य कुठून होणार?" तें पत्र मग फाडतांफाडतां तो म्हणाला, "मी आज आलों नसतों तर हसं करून घेतलं असतंस!"

कल्याणीनें म्हटलें, "दुसरंहि पत्र फाडून टाक कीं!"

"तेंहि फाडलं असतं. पण तें मला तूं लिहिलं आहेस, म्हणून नाहीं फाडत!"

१९५०

# •११•

# दिवे

मीनेनें पांच वर्षांपूर्वी मला सुरेश दिला होता. या खेपेला तिला माहेरीं पोंचवून परत यायच्या दिवशीं माझ्या कानांत तिनें सांगितलें, "या खेपेला शरयू कीं शंतनु असं तुम्ही नेहमीं विचारीत होतां ना? आज सांगतें, घरीं परत येतांना मी तुमच्यासाठीं इवलीशी सुरेख शरयू घेऊन येणार आहें. लक्षांत राहूं दे बरं का! तिचं स्वागत मस्तपैकीं झालं पाहिजे!"

"शरयूच कशावरून? शंतनु कशावरून नाहीं?" मीं विचारलें.

"मी सांगतें, तुम्ही आपलं नुसतं ऐकून ठेवा."

"पण तुला हें कळलं कसं?"

"तें आमचं गुपित आहे. तुम्हीं फक्त विश्वास ठेवायचा."

"पण हें कुणीं सांगितलं सांग ना!"

"कुणी कशाला सांगायला हवं? तिनंच!"

"ती बोलली वाटतं तुझ्याशीं?"

"हो!"

"शरयू असो कीं शंतनु असो...बरं, बरं शरयूच!...तिनं तुझ्या ठिकाणीं बालिशपणा मात्र छान पेरून ठेवला आहे." आणि मी झटकन् मीनेचें चुंबन घेऊन म्हटलें, "मात्र शरयूचा पहिला पापा घेण्याचा हक्क माझा. आत्तांची ही 'ठेव' समज तिच्या मालकीची. तिनं जगांत प्रवेश केल्याबरोबर तिची तिला पोंचती झाली पाहिजे. नाहीं तर विसरशील...पण थांब, त्यापेक्षां आत्तांच्या आत्तां व्याहेरूनच..."

मी खालीं वांकत होतों, तोंच मीनेनें मला झटकून टाकलें आणि म्हटलें,

"चला! तुमचं आपलं कांहीं तरीच! परत येईपर्यंत माझ्या नांवाचा एकदेखील पापा घेणार नाहीं मी तिचा, मग तर झालं?"

परतलों आणि मला घर खायला उठलें. सुरेश मीनेबरोबरच आपल्या आजोळीं राहिला होता. आतां उरलेले पंधरावीस दिवस कसे जातील, या काळजीनें मी अगदीं कासावीस झालों. कामाकडे लक्ष लागणें शक्यच नव्हतें. म्हणून मीं पुन्हा आणखी रजा घेतली. माझा मित्र पंडित, त्याच्या कॉलेजला सुटी असल्यानें मोकळा होता. म्हणून तो आणि मी प्रवासाला निघालों. पंडितची पत्नी कालिंदी येऊं शकत नव्हती. कारण, ती शाळेंत नोकरीला होती आणि तिच्या सुटीला अवकाश होता. ती रुष्ट देखील झाली. पण माझी कासाविशी तिला समजावून दिल्यावर उदार मनानें तिनें पंडितला माझ्या-बरोबर येण्याला संमति दिली.

प्रथम आग्रा, मग दिल्ली आणि शेवटीं हरिद्वार...

हरिद्वारला आम्ही दोन दिवस खूप भटकलों. कनखल बघितलें, ज्वालापुरांतून फेरी मारली, हृषीकेशला जाऊन लक्ष्मणझुला बघितला, आणि स्वर्गाश्रमाच्या दिशेनेंहि दहा पावलें चालून आलों. मग दिवसभर विश्रांति घेऊन आम्ही संध्याकाळीं नदीकांठीं आलों. रोजहि आम्ही या ठिकाणीं येत होतोंच, परंतु आजचा दिवस मुद्दाम तेवढ्यासाठीं राखून ठेवला होता. उद्यां आम्हांला परतायला हवें होतें.

बाजारांतून कुशावर्त घाटाच्या बाजूनें आम्ही नदीवर आलों. ती दुथडी भरून वेगानें वहात होती. हरिद्वारचा नदीकांठचा घाट एकच प्रशस्त पायरीवजा आहे, आणि गंगेचें पाणी इतकें वर असतें, कीं चांदण्या रात्रीं एखादा अनोळखी माणूस पदपथावरून काँक्रीटच्या रस्त्यावर उतरल्याप्रमाणें घाटावरून नदीच्या पात्रावर उतरून चालायला देखील लागेल!

समोरच माळी फुलांनीं भरलेले द्रोण विकीत होते. कांहीं लहान, कांहीं मोठे. त्यांत नाना रंगांचीं फुलें. पांढरीं, तांबडीं, गुलाबी, पिवळींपिवळीं धमक. प्रत्येक द्रोणांत मातीची लहानशी कच्ची पणती आणि तिच्यांत इवलीशी वात. गेल्या दोन दिवसांत घेतला नव्हता, पण आज मीं एक मोठा घसघशीत द्रोण घेतला. जवळजवळ ओंजळीच्या दुप्पट, हिरव्यागार पानांचा बनवलेला. लहान मुलांच्या होडीच्या आकाराचा.

पंडित म्हणाला, "वा भई, वा! तुम तो आज बिलकुल गंगादास बन गये!"

माळी म्हणाला, "क्यों नहीं? यहाँपर जो कोई आते हैं, वे गंगादासही बन जाते हैं! आपभी लीजिये न!"

मीं विचारलें, "घेणार का रे?"

पंडित म्हणाला, "नको नको! तूं घेतलास तो पुरे आहे."

मीं म्हटलें, "आज माझा सुरेश माझ्याबरोबर आहे असं मानून हा द्रोण मी गंगेंत सोडणार त्याचा म्हणून. पण तुला यांतलं काय कळणार? चांगली आली होती संधि, ती करंटेपणानं घालवलीस!"—पण हें सारें अर्थात् मनांतच.

सूर्य मावळला होता. गर्दीतून वाट काढीत आम्ही 'हरिकी पौड़ी'च्या दिशेनें चालू लागलों.

वाटेंत एका भैयाचें पुरी-पकौडे इत्यादि विकण्याचें दुकान लागलें. पंडित म्हणाला, "नाना, इथं धूळ नाहीं. माणूसहि स्वच्छ दिसतो आहे. पाणीपुरी खायची का?"

"खाऊं या कीं! पण धुळीचं म्हणत असशील तर त्याचाहि मला फारसा विधिनिषेध नाहीं. अगदींच गलिच्छ नसलं तर मला चालतं. अगदीं वैद्यकीय स्वच्छता निदान प्रवासांत तरी पाळणं कठिणच असतं. त्यांतून मूल झालेल्या माणसाच्या स्वच्छतेच्या कल्पना जरा शिथिलच झालेल्या असतात."

दुकानाशेजारच्या बाकावर बसून आम्हीं पाणीपुरी तर खाल्लीच, पण इतरहि पदार्थांची चव पाहूं लागलों.

इतक्यांत एक गुटगुटीतसा मुलगा कुठूनसा आला आणि जवळ उभा राहिला. अंगांत नेहरू शर्ट आणि चुणीदार पायजमा. पांढरा पांढरा शुभ्र. आम्ही दोघेहि त्या चिमुकल्या मूर्तीकडे कौतुकानें पाहूं लागलों.

पंडितनें त्याला जवळ घेऊन विचारलें, "तुम्हारा नाम तो बताओ बेटा!"

दोन-तीनदा विचारल्यावर त्यानें लाजत सांगितलें, "रामसरूप."

पंडितनें दीर्घ 'अच्छा!' केलें आणि म्हटलें, "बहुत बहुत मीठा है नाम तुम्हारा! अब मैं तुमको पकौड़े खिलाता हूँ. पसंद आते हैं न?"

रामस्वरूप लाजला आणि म्हणाला, "अगर माँ बिगड़ेगी तो?"

मला कल्पना नव्हती इतका पंडित चांगला हसला आणि म्हणाला, "अच्छा! माँकी डर लगती है? तो मैं उनसे कह दूँगा! तुम फिकिर मत करो."

मी थक्क होऊन हें सारें आणि नंतर रामस्वरूपची आई तिथें आल्यानंतरचें

पंडितचें वागणें पहात होतों.

मी थक्क व्हावें याला कारण होतें.

लग्नानंतरच्या पहिल्याच वर्षात सगळी सावधगिरी बाळगूनहि पंडितची फसगत झाली होती. त्याला त्याची तयारी नव्हती. मीं परोपरीनें समजावलें होतें, पण त्याला किंवा त्याच्या बायकोलाहि तें पटलें नव्हतें. अखेरीस त्यानें वैद्यकीय मदत घेऊन अडचण दूर केली होती. सुरुवातीलाच सर्व कांहीं होत होतें, त्यामुळें त्याच्या बायकोच्या जिवाला फारसा धोका नव्हता; पण जो होता तो त्यानें पत्करला. गुपचुपीचा मामला म्हणून पैसे मात्र बरेच द्यावे लागले. मग मध्यें चार वर्षे गेलीं, तरी अद्याप तो कोराच राहिला होता. यासंबंधांत जेव्हां जेव्हां त्याला कांहीं सांगायला जावें तेव्हां तेव्हां तो हसून म्हणे, "तुम्ही शेपूट तुटलेले कोल्हे आहांत. दुसऱ्यांच्या धड शेपट्या तुम्हांला पहावत नाहींत..."

हरिकी पौड़ीवरून 'घंटाघर' असलेल्या बेटवजा घाटावर जातांना छोटासा पूल लागतो, त्यावर आम्ही रेंगाळलों. लोक गंगामाईला दीपदान करीत होते. हें दीपदानाचें दृश्य इतकें रम्य होतें, कीं त्याला उपमादेखील द्यावीशी वाटत नव्हती.

संधिप्रकाश...माणसाला खिन्न करणारा संधिप्रकाश...देवळांत आतां घोष आणि घंटानाद सुरू झाले होते. संधिप्रकाशानें उत्पन्न होऊं पाहणारी खिन्नता त्यांनीं नाहींशी होऊन विलक्षण गंभीर शांति मनाला व्यापीत होती.

मीं द्रोणांतला दिवा लावला आणि हलक्या हातांनीं द्रोण नदींत सोडून दिला. प्रवाहाबरोबर तो झरझर वहात जाऊं लागला आणि तरंगत जाणाऱ्या इतर असंख्य दिव्यांत तो नजरेंतून निसटूं नये म्हणून दृष्टि दूर न करतां मी त्याच्याकडे एकटक पहात राहिलों.

कुणाला विचित्र वाटेल, पण मनाला विलक्षण मार्दव आलेल्या त्या स्थितींत त्या दिव्याचा मीं सुरेशच्या जीविताशीं संबंध जोडला होता. त्यामुळें तो द्रोण दिव्यासहित दूरपर्यंत न विझतां गेला तें पाहून मीं एक समाधानाचा सुस्कारा टाकला आणि म्हटलें, "दीर्घायुषी होणार बेटा!"

पंडितनें विचारलें, "काय म्हटलंस?"

मीं त्याला सारें सांगितलें आणि विचारलें, "रामस्वरूपचा प्रसंग पाहून माझ्या मनांत एक शंका आली आहे. तूं कांहीं 'प्रगति' केली आहेस काय?"

"छे रे! कुठली आली आहे प्रगति!" आणि नंतर त्यानें जो निःश्वास टाकला त्याचें आश्चर्य वाटून मी त्याचा अर्थ लावीत होतों, तेवढ्यांत तो पुढें म्हणाला, "तुझं बरं आहे. वहिनींची तारीख कधीं आहे?"

मीं तारीख सांगितली आणि मला एकदम आठवण झाली. परप्रांतांत भाषेच्या अनोळखीपणामुळें गर्दींतहि मिळालेल्या त्या विलक्षण एकांतांत, मीनाला माहेरीं पोंचवून परत येण्याच्या दिवशीं आम्हां दोघांमध्यें झालेलें बोलणें त्याला मी सांगितलें. माणसानें एकदां रहस्य सांगायला सुरुवात केली, कीं त्याला भान उरत नाहीं. मनाच्या त्या धुंद अवस्थेंत बोलण्याच्या भरांत पूर्णगर्भ पत्नीच्या आलिंगनाचें सौख्यहि पंडितला मीं विशद करून सांगितलें.

पंडित कांहीं वेळ गप्पच होता. मग तो म्हणाला, "तुला आठवतं आहे, नाना, एक दिवशीं संध्याकाळीं आपण फिरायला निघालों होतों आणि दिवस अगदीं संपूर्ण भरल्यामुळं विशेषच सुस्तावलेली एक बाई समोरून संथपणानं रस्ता ओलांडून गेली तेव्हां तूं म्हणाला होतास, 'इतकं इमानानं आणि झकास काम केलं आहेन् तरी बरोबर घेऊन दिमाखानं हिंडत नाहीं, तेव्हां अगदींच अरसिक असला पाहिजे हिचा नवरा!' आहे आठवण? त्या वेळेस मी कांहीं बोललों नव्हतों, पण तुझ्या त्या पाचकळपणानंहि माझ्या काळजांत लसलसलं होतं."

या खडकांत झुळुझुळू पाणी वहात असलेलें उमजून मला अचंबा आणि समाधान वाटलें.

त्याच तंद्रींत पंडित पुढें म्हणाला, "माणूस साऱ्या गोष्टी करतो त्या आज किंवा भविष्यकाळांत सुख लाभावं म्हणून,—आपल्याला किंवा आपल्या प्रिय माणसांना सुख लाभावं म्हणून. पण कांहीं कांहीं वेळेला अमुक एक परिस्थिति सुखाची होणार आहे कीं दुःखाची, हेंच कळेनासं होतं. एकच पाणी कढत पाण्यांतून काढलेल्या हाताला गार लागावं आणि थंड पाण्यांतून काढलेल्या हाताला कढत लागावं तसं होतं. चार वर्षांपूर्वी आम्हीं जें केलं, तें कांहीं दिवस तरी मोकळेपणानं आयुष्य घालवायला मिळावं म्हणून केलं. कालिंदीच्या प्रकृतीला तें दिव्य झेपेल कीं नाहीं याचीहि धाकधुक वाटत होती. तूं बजावीत होतास, तरी त्या वेळीं आमचा निश्चय पक्का होता; पण सगळं व्यवस्थित झालं तेव्हां मात्र वाटायला लागलं, हातून मूर्खपणा तर नाहीं झाला?"

"मूर्खपणा असो, शहाणपणा असो. या साऱ्या गोष्टी चार वर्षांपूर्वीच्या. आज काय आडकाठी आहे?" मीं विचारलें.

"कांहींहि ठरवायच्या आधीं, म्हटलं, डॉक्टरचा सल्ला घ्यावा. जिनं आमचं आधींचं काम केलं होतं ती डॉक्टरीण पैशाची फार लोभी आहे. आमचं निदान लग्न तरी झालं होतं. पण अविवाहित स्त्रीकडून तर ती फारच पैसे उकळते. त्या वेळीं गेलों, पण आतां तिच्याकडे जावंसं वाटेना. आणि इतरांना विचारलं, तर एकेकीचीं एकेक मतं."

"माणसानं एका देवावर, त्याचप्रमाणं एकाच डॉक्टरवर श्रद्धा ठेवावी. पहिलीला सोडलंस तें ठीक केलंस, पण नंतर तरी एकीलाच विचारायचंस."

"नाना, हृदयाचीं जीं मर्मस्थानं असतात तिथं सिद्धांतांची मात्रा चालत नाहीं. आणि सिद्धांतच हवा असला तर 'एकसे दो भला' असं मीं म्हटलं तर तूं काय म्हणशील?'

"सिद्धांत राहूं दे. वहिनींच्यामध्यें तसा कांहीं दोष निर्माण झाल्याचं कुणीं सांगितलं आहे का?"

"नाहीं."

"मग तरीदेखील तूं अजून कोरडाच..."

पंडित हसला आणि मग गंभीर झाला.

"एक दिवस मला पेन हवं होतं म्हणून मी कालिंदीच्या पिशवींत तें शोधूं लागलों. तेव्हां मला एक चिठ्ठी सांपडली. तिच्या एका विद्यार्थिनीच्या आईनं वर्गांतल्या दुसऱ्या कुणा तरी विद्यार्थिनीबरोबर ती पाठवून, आपल्या मुलीच्या वार्षिक परीक्षेचं निकालकार्ड तिच्याबरोबर मागवलं होतं. त्या चिठ्ठींतल्या मजकुराचं सहीसही अनुकरण करून खालीं वेगळ्या अक्षरांत मजकूर लिहिला होता: 'श्री. मुख्याध्यापक यांस, आमचा मुलगा चि. अनिल हा बाहेरगावीं गेलेला असल्यानें शाळेंत येऊं शकत नाहीं. तरी त्याच्या वार्षिक परीक्षेचें निकालकार्ड हें पत्र घेऊन येणाराबरोबर पाठवण्याची कृपा करावी...' आणि या मजकुराखालीं कालिंदीनं माझी आणि स्वतःची सही केली होती—"

हें ऐकून मी जरा हादरल्यासारखा झालों. क्षणभरानें मीं म्हटलें, "याचा अर्थ तुला मीं सांगायला नको, पंडित."

"सांगायला नको. आणि त्याचप्रमाणं या मजकुरावरून आडव्या, उभ्या, तिरप्या रेघा मारून तो नष्ट करायचा प्रयत्न कालिंदीनं केला होता, त्याचाहि सांगायला नको."

"हा प्रसंग केव्हांचा?"

"दीड वर्ष झालं. पण ती चिठ्ठी बघितली असल्याची जाणीव मीं कालिंदीला कधींच दिली नाहीं. मात्र कांहीं दिवसांनंतर निराळ्याच संदर्भांत बोलणं निघालं, तेव्हां आम्हीं परस्परांशीं ठाम निश्चय केला, कीं यापुढं योगायोगानं निसर्गानं फसवलं तर त्याला विरोध करायचा नाहीं. पण पूर्वीं, नको असतांना त्यानं फसवलं आणि आतां, आम्ही फसायला उत्सुक आहोंत तर तो फसवीत नाहीं, हीच काय ती अडचण आहे!"

गंगाकांठ आतां विद्युद्दीपांनीं नुसता फुलून निघाला होता. सभोंवार कोंदून राहिलेला जनसंमर्दाचा आवाज सारखा दवळला जात होता, पण त्यामुळें कानांना होणारें सुख तिळमात्रहि कमी होत नव्हतें. दीपदान करणाऱ्या गंगाभक्तांची संख्या मात्र आतां तुरळकच राहिली होती.

आठवण होऊन मी एकदम उठलों आणि म्हटलें, "अरे, मीं सुरेशचा द्रोण सोडला, पण शरयूचा द्रोण सोडायचं राहून गेलं. मीना भयंकर रागावेल ना! चल, आपण कुशावर्त घाटापर्यंत जाऊन द्रोण घेऊन झटकन् परत येऊं."

"मी इथंच बसतों. तूं एकटाच जाऊन ये."

मग मीं पंडितला अधिक आग्रह केला नाहीं. मात्र परत येतांना मीं दोन द्रोण आणले. एकांतली वात पेटवून काड्यापेटी पंडितकडे देत मीं म्हटलें, "आतां हा दुसरा तूं पेटवायचा आहेस! आटप!"

चकित होऊन पंडितनें विचारलें, "याचा अर्थ काय?"

"अर्थ एवढाच, कीं माणसाचं मन निर्णयाच्या बाबतींत हेलकावे खाऊं लागतं, तेव्हां त्यानं आपल्या मित्राचा निरपेक्ष सल्ला घ्यावा, आणि तो सांगेल त्याप्रमाणं वागावं. अगदीं डोळे मिटून—म्हणजे अगदीं डोळे उघडे ठेवून. याचा तरी अर्थ कळतो का?"

पंडित हसला आणि म्हणाला, "कळतो आहे. अगदीं चांगला कळतो आहे." त्याच्या हातांत क्षणभर काड्यापेटी घोटाळली. मग त्यानें निर्धारानें काडी ओढली.

दोन्ही दिवे दूरपर्यंत तरंगत जातांना त्यांकडे पहात पहात मीं म्हटलें, "पंडित, पहिल्या काडीलाच तुझा दिवा लागला, तेव्हां..."

पण माझें भाष्य पुरें व्हायच्या आधींच पंडित लाजऱ्या पोरीप्रमाणें म्हणाला, "समजलं, समजलं, महाराज! आतां जास्त पाघळूं नका!"

१९५२

## .१२.

# कोप

जयरामचा कावेरीशीं झालेला विवाह प्रेमांतून उद्भवलेला नव्हता. त्यासाठीं अनेक गोष्टी जुळून याव्या लागतात. तें भाग्य जयरामच्या वांट्याला आलें नाहीं. तशी परिस्थितीच त्याला लाभली नाहीं आणि लाभणें शक्यहि नव्हतें. वाङ्मय वाचून त्यानें निर्माण केलेलीं स्वप्नें शेवटीं वाङ्मयांतच राहिलीं. आणि मग चारचौघांसारख्या झालेल्या त्या विवाहामधून चारचौघांसारखेंच सहवासोत्तर प्रेम त्या दोघांत निर्माण झालें. या प्रेमाला मग कुणी शारीरिक म्हणोत किंवा शेकडों वर्षांपासून रोमरोमांत रुळलेल्या संस्कारांनीं स्त्री-पुरुषांच्या मनाला जो एक प्रकारचा घाट येतो त्यांत रुजलेलें प्रेम म्हणोत. आणि मग या चारचौघांसारख्या प्रेमाच्या पोटींच, चारचौघांच्या बायकांसारखीच, लग्नानंतर एक वर्षाच्या आंतच वेगळ्या बिऱ्हाडाची भाषा कावेरीनें सुरू केली.

जयरामच्या डोक्यांत गिधाडें घिरट्या घालूं लागलीं. त्याला आई होती, आणि एक धाकटा भाऊ होता—शांताराम. बस्स. हे दोघे जीव. जयरामला आईनें वाढवलें तें लोकांचे कपडे शिवून आणि अशींच इतर कामें करून. त्याचें शिक्षणहि त्यावरच पुरें केलें. आतां तो स्वतः आपल्या पायांवर उभा राहिला होता, तरी अद्याप शांतारामचें शिक्षण पुरें व्हायचें होतेंच. वेगळ्या बिऱ्हाडाची भाषा ऐकली, कीं जयराम कावेरीला म्हणे, "हें कसलं भूत तुझ्या डोक्यांत शिरलं आहे? घराची मालकीण तूं. मला पैसे मिळूं लागले आहेत, त्यानं आईचे हात आतां मोकळे झाले, त्याचा मला आनंद वाटतो; तो मला पुरेसा घेऊं तरी देशील कीं नाहीं? तुला कुणापासून त्रास होतो का?"

"नाहीं." कावेरी उत्तर देई.

"जाच होतो का?"

"नाहीं."

"मालकीण हा शिक्का तुला हवा आहे का?"

"हें काय बोलणं! शिक्का म्हटलं तर सगळेच जण मारतात. तीच तर अडचण आहे! पण मला हें घर माझं वाटत नाहीं."

जयराम यावर गप्प बसे. विचार करीत राही. मनाशीं म्हणे, बायका नवऱ्याचं घर आपलं कधींपासून म्हणायला लागतात?—सासरकडून खूप दागिने मिळाले म्हणजे?—कीं नवऱ्यानें खूप पैसे सांठवून तिच्या नांवावर केले म्हणजे?—कीं आपल्यावर नवऱ्याचं नितांत प्रेम आहे याची साक्ष मनोमन पटेल असा एखादा प्रसंग घडला म्हणजे?—कीं माहेरीं भावांच्या बायकांचा अधिकार चालू झाला म्हणजे?—कीं स्वतःला मूल झालं म्हणजे?...

प्रश्नांची संख्या कितीहि वाढली तरी त्यांचीं उत्तरें सांपडत नव्हतीं. जयरामच्या डोक्यांत गिधाडांचा फडफडाट चाले तो हा असा. शेवटीं तो म्हणे, "अजून तुझा नवीनपणा दूर झाला नाहीं, कावेरी! तूं थोडे दिवस वाट पहा."

यामुळें वाद थांबत असे. पण नंतरच्या प्रीतिकूजनांतसुद्धां त्याचें मन डहुळलेलेंच राही. कावेरीला तो कुशींत घेई तेव्हांदेखील त्याच्या थरारणाऱ्या शरीरांतलें मन त्याला सांगत राही, 'ज्या नाटकाची नांदी ही असते, त्याचं भरतवाक्य कडू असतं. जगांत आज जिकडेतिकडे हेंच चालू आहे. चालत असेल तर त्याचंच समाधान मानून घ्यावं...जिथं अणु-परमाणूसुद्धां छिन्नभिन्न होताहेत, तिथं चार माणसांच्या संसाराची काय कथा!'

एक दिवस जयरामची आईच म्हणाली, "जया, मला वाटतं बाबा, आतां तूं वेगळं बिऱ्हाड करावंस. कावेरी इतके दिवस माझ्या हाताखालीं वावरली; आतां पुरे. नवी नवलाई आहे, स्वतंत्रपणा चांगला. तुझं एकट्याचं म्हणत नाहीं मी, सर्वांचंच असं आहे. हल्लींच्या तरुण माणसांना वेगळे संसार आवडतात. ठीक आहे तोंवरच आपलं दूर व्हावं. आणखी, माणसं दूर राह्यलीं तरी माया दूर होते असं थोडंच आहे?"

जयरामनें आईकडे एकदां बघितलें : खोंचून बोलते आहे का ती? मग त्यानें स्वतःचाच धिक्कार केला आणि म्हटलें, "तुला नको झालों आहोंत का आम्ही आई?"

"भलतंच कांहीं तरी बोलूं नकोस बाबा!"

"कावेरी तुझ्यापाशीं कांहीं बोलली का?"

"ती कशाला कांहीं बोलणार आहे रे? आजूबाजूला मी बघतें आणि मनांत येतं. तेंच आत्तां बोललें. वाटलं, एखाद वेळेला तुझ्या मनामध्यें असलं आणि कसं बोलूं म्हणून तुला संकोच—"

"माझ्या मनामध्यें तसलं कांहींएक नाहीं."

"असो, मी कांहीं बोलत नाहीं त्या बाबतींत, मग तर झालं?"

"नाहीं झालं! शांताराम स्वतःच्या पायावर उभा राहीतोंवर ही असली भाषा तूं काढतां कामा नये."

आईनें तें कबूल केलें आणि जयरामला आपण जें बोललों त्याबद्दल समाधान वाटलें.

जयरामला समाधान वाटलें, कारण त्याच्या काळजाचें वटवाघूळ झालें नव्हतें. पण कावेरीच्या मानससरोवरांत राजहंस तरंगत होते, त्याचें काय? आईला त्यानें गप्प केलें, पण कावेरीला तो किती दिवस गप्प करीत राहणार होता? आणि कसा? आईला गप्प करण्याइतकें बायकोला गप्प करणें सोपें असत नाहीं.

त्याच रात्रीं कावेरी जयरामला म्हणाली, "आजचं तुमचं नि सासूबाईचं बोलणं मीं ऐकलं. जवळच होतें मी."

"ऐकलंस ना? मग फारच चांगलं झालं!"

"चांगलं काय झालं हो? होकार कां नाहीं दिलात तुम्हीं?"

"मनांत नसतांना होकार कसा देऊं?"

"मनांत कुणाच्या नाहीं?"

"कुणाच्या काय? माझ्या! तुला ठाऊक आहे."

"एक क्षणभरदेखील माझा सल्ला घ्यावासा वाटला नाहीं ना तुम्हांला? आणि म्हणे, स्त्री पुरुषाची अर्धांगी! पुरुषांच्या मनांतला अर्धा भाग बायकोनं व्यापलेला असतो. त्या अर्ध्या भागाची तरी बूज राखायची!"

"बायकोच्या मनांत अर्धा भाग नवऱ्याचा असतो, त्याचा उपयोग मीं करून घेतला! एकूण एकच!"

"एकच कसं? नुसती शब्दांची फिरवाफिरव केली म्हणजे कांहीं बोलणं खरं ठरत नाहीं. मी म्हणतें, तुम्हांला अगदींच कशी कल्पनाशक्ति नाहीं?"

"ठीक आहे! तूं म्हणतेस तेंच खरं! माझ्या ठिकाणीं कल्पनाशक्ति नसू दे. तुझी कसला प्रकाश पाडते आहे तो तरी दिसू दे."

खोलींतला दिवा मालवलेला होता. कावेरी जयरामच्या कुशींत शिरली आणि म्हणाली, "अस्सं सारखं खोंचून काय बोलतां? माझ्या मनांतलं घड ऐकून तरी घ्या ना!"

कावेरीनें हे शब्द ज्या स्वरांत उच्चारले, त्याचा परिणाम होऊन जयरामनें तिला घट्ट लपेटून घेतलें. त्या क्षणीं तिच्या केसांचा मंद सुवास त्याला आला आणि त्याच्या हृदयांत तिच्यावरील प्रीतीची एकमेव भावना उचंबळून आली. भिंतींत वरच्या बाजूला दोन खिडक्या होत्या, त्यांतून बाहेरच्या दोन दिव्यांचा प्रकाश विरुद्ध दिशांनीं येऊन त्याचे चौकोन समोरच्या भिंतीवर एकमेकांवर सरकते पडले होते. त्यांकडे पहात जयरामनें कावेरीला घट्ट कवटाळलें आणि तिचें मस्तक हुंगीत म्हटलें, "काय सांगत होतीस, सांग ना!"

कावेरी गुदमरून गेली होती. सुखामुळें आणि जयरामनें छातीशीं दाबून धरल्यामुळें. त्याचा पाश मग थोडा सैल करून घेऊन त्याच्या कुशींत डोकें खुसळीत ती म्हणाली, "आम्ही नाहीं जा! तुम्ही चेष्टा कराल! हसाल!"

"अग, नाहीं चेष्टा करणार! नाहीं हसणार!"

कावेरी मग थोडा वेळ स्तब्ध राहिली आणि नंतर तिनें म्हटलें, "सांगूं का? कधीं कधीं रात्रीं मला अवचित जाग येते. तुम्ही शेजारीं असतां, पण तुम्हांला गाढ झोप लागलेली असते. मला अशा वेळीं बराच वेळ झोप येत नाहीं. समोर अंधारांत मला चित्रं दिसतात. वाटतं, आपण एका छानशा चिमुकल्या घरांत रहातों आहोंत. आवारांत एक अगस्तीचं अन् एक सोन-चाफ्याचं डवरलेलं झाड आहे. फुलझाडांच्या कुंड्या पण ठिकठिकाणीं मांड-लेल्या आहेत. तुम्ही संध्याकाळचे दमूनभागून घरीं आलेले आहांत आणि आरामखुर्चीत वाचीत बसलेले आहांत. रेडियोवर कुणाचं तरी भावगीत चालू आहे—बाईचं. तिचा गळा गोड आहे, पण आवाज आपण मंद केलेला आहे. आपल्याला दोन मुलं आहेत. एक मुलगा आणि एक मुलगी. मुलगी तुमच्या मांडीवर बसून छातीवर डोकं टेकून पेंगते आहे आणि मुलगा बागेंत खेळतो आहे—आणि मी अशा ठिकाणीं बसलें आहें कीं, तुम्ही तिघं मला दिसतां आहांत. तुमच्याकडे बघतां बघतां माझं लोकरीचं विणकाम चालू आहे..."

जयराम स्तब्ध झाला. तो बराच वेळ कांहीं बोलला नाहीं.

"कसं आहे माझं चित्र?"

"तुझं चित्र सुंदर आहे. त्यांतले रंगहि सुंदर आहेत—फारच सुंदर आहेत. इतके, कीं माझे डोळे दिपून जाताहेत. पण कावेरी, मला विचार करायला अवधि दे."

कावेरीनें त्याला हुंकार दिला. मग त्या रात्रीं दोघे जणें एकमेकाच्या बाहुपाशांत समाधानानें झोंपीं गेलीं.

कावेरी शहाणी होती. तिनें दुसऱ्या दिवशीं राहोच, पण नंतर कित्येक दिवस जयरामला छेडलें नाहीं. तिचीं चित्रें खरीं होतीं, पण म्हणूनच जयरामचें मन अस्वस्थ झालें होतें. तो परोपरीनें विचार करीत होता. कावेरीचीं सारीं दृश्यें त्याला लोभस वाटत होतीं, पण कोणत्याहि प्रकारें तीं तूर्त शक्य कोटींत येतीलसें त्याला वाटेना. कारण, गोष्टी अगदीं सरळ होत्या. दोन बिऱ्हाडें करायचीं म्हटलें तर जागा मिळण्याचा प्रश्न होताच, पण ती मिळाली असें गृहीत धरलें, तरी दोन बिऱ्हाडें संभाळण्याची ऐपत जयरामपाशीं नव्हती. कावेरीचा हट्ट मोहक होता; पण तो केवळ शाब्दिक अर्थानें—तो मोठा मोह निर्माण करीत होता या अभिप्रायानें. शेवटीं जयरामनें मनाचा निर्धार केला आणि तीं चित्रें पुसून टाकलीं. त्याला कष्ट झाले, पण समाधानहि वाटलें.

दिवस निघून जात होते. जयरामच्या मनांतील निर्णयाला पीळ पडून तो अधिक कणखर बनत होता.—इकडे कावेरीचें मन मात्र आपल्या चित्रांत अधिकाधिक रंग वापरून तपशील भरीत होतें.

एक दिवस जयरामनेंच तिला जवळ घेऊन सांगितलें, "तुझं चित्र, कावेरी, कितीहि सुंदर असलं तरी सध्यां तें चौकटींत बंदिस्त करून आणि भिंतीवर टांगून ठेवून त्याकडे बघत रहाण्याखेरीज आपल्याला कांहींहि करतां येईलसं दिसत नाहीं."

"म्हणजे काय?" कावेरीनें दूर होऊन विचारलें. तिची निराशा एवढी तीव्र होती, कीं तिच्या स्वरांत तुसडेपणा आला.

तिच्या त्या तुसडेपणाची प्रतिक्रिया जयरामवर एकदम भडकून उठली; आणि आपण आपलें मन चिरडून टाकीत आहोंत आणि तें कांहींच कसें हिच्या लक्षांत येत नाहीं या विचारानें तो पण त्याच स्वरांत म्हणाला, "म्हणजे काय तें उघड

आहे. वेगळं बिऱ्हाड करण्याची योजना अंमलांत आणणं तूर्त आपल्याला कठिण आहे."

मग एखादा भिजलेला कपडा दोन टोकांशीं धरून भराभरा फिरवल्यावर ठिबकणाऱ्या पाण्यासारख्या शब्दांच्या धारा झरूं लागल्या:

"कठिण आहे, कबूल! पण अशक्य नाहीं ना?"

"निर्णय तापदायक असला म्हणजे तो सौम्य भाषेंत सांगावा लागतो. ऐकणारानं तें ओळखून तिचा योग्य अर्थ काढायचा असतो."

"मला या सौम्य भाषेची जरुरी नाहीं; स्पष्ट सांगा."

"मग, 'कठिण' म्हणजे अशक्य."

"आणि मग त्याचप्रमाणं 'तूर्त' म्हणजे कायमचं असा अर्थ घ्यायचा काय?"

"तुला काय वाटतं, मला हें सांगतांना सुख होतं आहे?"

"मला काय वाटतं याचा उहापोह पुष्कळ झाला आहे! आतां अधिक ऐकायची मला इच्छा नाहीं."

जयरामला त्या दिवशीं वेगळ्या शय्येवर निजावें लागलें. त्याच दिवशीं नव्हे, तर नंतरचेहि किती तरी दिवस.

दिवसां कामापुरतें बोलणें. इतर वेळ अबोला. आगगाडींतसुद्धां एकमेकाशीं कांहीं संबंध नसलेलीं माणसें बोलतात, गप्पा मारतात. दिवस कांहीं कुणाचे रहात नव्हते; पण ते हे असे जात होते. शांतारामला किंवा आईला कशाचीच कांहीं वार्ता नव्हती. त्यांचेहि दिवस चालले होते.—त्यांच्या परीनें सुखाचे, समाधानाचे, भावी आशांचे, आजच्या दिवसांत सर्वसामान्य माणसाला जेवढी निश्चितता लाभते तेवढ्या निश्चिततेचे...

कोणत्या गोष्टीचा परिणाम काय होतो पहा! एक दिवस संध्याकाळीं कावेरी भाजी आणण्याकरितां मंडईत गेली होती. तिथें तिला तिची मैत्रीण सरला भेटली. तिच्याबरोबर तिचा नवरा होता. दोघें मिळून दुपारच्या सिनेमाला गेलीं होतीं आणि परत जातांना वाटेंत मंडईत आलीं होतीं. सरला कावेरीशीं बोलत राहिली; एकमेकांच्या परिस्थितीचें वर्णन झालें. त्यांत जेवढा भाग सांगण्या-सारखा होता, तेवढा दोघींनीं एकमेकांना सांगितला, आणि सरलेनें आपला राजाराणीचा संसार बघायला जयरामसह तिला निमंत्रण दिलें. कावेरीनें

'होय'हि म्हटलें नाहीं नि 'नाहीं' पण म्हटलें नाहीं; तथापि आधींच पीळ पडलेल्या तिच्या मनाचे त्या वेळीं आणखी पुष्कळच धागे तटातट तुटले.

जयरामला त्या दिवशीं तिनें सांगितलें, "या एक तारखेपर्यंत तुम्हांला मुदत आहे, तोंपर्यंत आपलं वेगळं बिऱ्हाड झालं पाहिजे."

जयरामनें उलटा पवित्रा घेतला, "ठीक आहे. आईला काय सांगायचं ?"

कावेरीनें सारा विचार आधीं करून ठेवलेला होता. ती म्हणाली, "तें मी जाणत नाहीं. वाटेल तें सांगा. सरळ वेगळीं रहाणार आहोंत म्हणून सांगा."

"समज, आपण वेगळीं राहूं लागलों. आई आणि शांताराम यांनीं काय करावं ?"

"तुम्हांला वेगळं बिऱ्हाड करायला त्या आपणहून सांगत होत्या, तेव्हां त्या काय करणार होत्या ?"

"कावेरी, खरं सांगूं ? वेगळ्या संसाराच्या रम्य स्वप्नाचा एक कोष तूं स्वतःभोवतीं निर्माण केला आहेस. त्यामुळं बाहेरचं जग आणि त्यांतलं आपलं स्थान तुला दिसत नाहीं. मी पैसे मिळवतों त्याचा आईला आणि शांतारामला कांहीं उपयोग व्हायला नको का ?"

"झाला तितका पुरे झाला. थोडे कष्ट पडतील. पण स्वावलंबन कांहीं वाईट नाहीं."

जयराम उठला आणि अधिक कांहीं न बोलतां बाहेर फिरायला निघून गेला.

महिन्याच्या शेवटच्या दिवशीं कावेरीनें विचारलें, "तुमचं काय ठरलं ?"

"माझं कर्तव्य मला करायला पाहिजे. तुझ्या बाबतींत फार तर त्याला त्याग म्हणतां येईल. पण माझ्यासाठीं तो तूं करावास अशी माझी इच्छा आहे. तुला इथं मानसिक त्रास असा कोणताच नाहीं; तेव्हां तो त्यागहि फारसा कठिण नाहीं."

"मानसिक त्रास ! तुम्हांला काय ठाऊक माझा मानसिक त्रास ?"

"जो होतोसा तुला वाटतो, तो तुझ्या त्या कोषामुळंच. तो कोष फोडून तुला बाहेर यायला पाहिजे."

"तुमचं हें उत्तर अखेरचं समजायचं ?"

"हो. अखेरचं समजायचं !"

"मग मी उद्यां माहेरीं जाणार आहें."

"किती दिवस रहाणार आहेस ?"

"तुम्ही नवीन बिऱ्हाड करीपर्यंत."

"वेडी तर नाहींस तूं?"

"वेडी म्हणा, शहाणी म्हणा; माझा निश्चय ठरला आहे."

जयरामनें समजावणीच्या स्वरांत म्हटलें, "हें बघ, स्वतंत्र बिऱ्हाड मला आवडत नाहीं असंहि नाहीं, किंवा आपण मिळवीत असलेले पैसे स्वतःकरतांच खर्च व्हावेतसं मला वाटत नाहीं असंहि नाहीं. मला पण हौस आहे—खंडीभर हौस आहे! पण माझी आई आतां म्हातारी होत चालली आहे. तिनं माझ्यावर केलेलं ऋण या तिच्या वयांत तिला सुख देऊन मला फेडायला पाहिजे, हें मला विसरतां कसं येईल?"

कावेरी भुंवया वांकड्या करून स्तब्ध राहिली.

जयराम पुढें म्हणाला, "आज अशीं किती तरी कुटुंबं आहेत, कीं त्यांतलं सर्वांत मोठं अपत्य मुलगी आहे, तिचं शिक्षण संपलेलं आहे, तिचं लग्नाचं वय होऊन केव्हांच पिकलेलं आहे, त्यांतल्या कांहींना तर आपले सहचर भेटलेहि आहेत, पण घरचीं लहान भावंडं आणि पैसे मिळवायला असमर्थ झालेले आपले वडील यांच्यासाठीं त्यांना आपलीं मनं मारून दिवस रेटावे लागताहेत, धापा टाकाव्या लागताहेत, अश्रू, निःश्वास...त्यांचा विचार मनांत येतो तेव्हां वाटतं, माझी स्थिति शंभर पटींनीं चांगली, हजार पटींनीं चांगली..."

कावेरीनें एकदां नाकांतून हुंकार काढला आणि म्हटलें, "तुलनाच करायची म्हटलं, तर किती तरी सुखी संसारांचीं वर्णनं तुमच्यापुढं करून त्यांच्याहून आपली स्थिति किती तरी वाईट आहे नि आपली किती तरी कुचंबणा होते आहे तें मी दाखवून देऊं शकेन. तुलनेनं कांहींच सिद्ध होऊं शकत नाहीं. आणि तसंच पहायला गेलं तर ज्यांनीं मुलांना जन्म दिला त्यांनीं सारा विचार आधीं करायला पाहिजे. आपण नाहीं हा विचार करून आपल्या इच्छा मारीत? खरं म्हणजे, तुम्हांला नसत्या गोष्टींचा बाऊ वाटतो. अंगावर पडलं कीं सारं ठीक होतं. तुम्हीच फार हळवेपणा करतां. मला माझा संसार हवा आहे—एकटीचा. आणखी मला एखाददुसरं मूल पण हवं आहे. यांत वावगं काय आहे? पण तुम्हांला तो 'कोष' वाटतो! दिवस आणि आयुष्य आपल्या परिस्थितीचा विचार करून थांबत नाहींत, त्याला आपण काय करणार?"

"तुझं म्हणणं बरोबर असेलहि कदाचित्. पण तेवढाच कर्कश विचार करून

कठोर बनणारा माझ्या मनाचा पिंड नाहीं."

"मग बोलणंच संपलं!"

"हो, संपलं!"

"मग उद्यां मी जाणार आहें."

"जा. आनंदानं जा. रागावून जाऊं नकोस. तुझं जाणं हाहि माझ्या परिस्थितीचाच एक पैलू असं मानायचा मी प्रयत्न करीन."

"तुम्ही रामाचे अवतार आहांत. मला तसं होतां येत नाहीं."

कावेरी दुसऱ्या दिवशीं निघून गेली.

त्याच दिवशीं संध्याकाळीं तिचा भाऊ जयरामकडे आला. म्हणाला, "ताई घरीं आली आहे. तिला आम्ही कुणी अद्याप कांहीं बोललों नाहीं. पण तिचं हें वागणं आम्हांला पसंत नाहीं."

"तुम्ही समंजस आहांत..."

"पण तिच्यापुढं कुणाचं कधीं कांहीं चाललं नाहीं. ती अशीच हेकट आहे."

"असतो एकेका व्यक्तीचा स्वभाव."

"मी एवढंच सांगायला मुख्यतः आलों, कीं तुम्ही आमच्यावर राग धरूं नये. पूर्वीसारखंच येत-जात असावं. आणि हें पण ध्यानीं घ्यावं, कीं आमचे हात बांधले आहेत. कितीहि झालं तरी मुलगी, तिला घराबाहेर तर काढतां येत नाहीं!"

"माझा कुणावरच राग नाहीं. तेव्हां तसं येणं-जाणं टाकण्याचा प्रश्नच नाहीं. मात्र तुम्ही कावेरीवर इकडे येण्याची जबरदस्ती करूं नका. कारण, त्यानं तिलाहि सुख व्हायचं नाहीं नि आम्हांलाहि नाहीं. स्वतःच्या इच्छेनं ती आली तर येऊं दे."

त्या दिवशीं जयरामच्या आईला कुणकुण लागली आणि नवराबायकोच्या मार्गांतून दूर होण्याचा निश्चय जाहीर करून तिनें गोंधळ घातला. तिला सारें पटवून गप्प करायला जयरामला पुष्कळ प्रयास पडले.

आणखी कांहीं दिवस गेले, आणि दिवसांचे महिने झाले. जयरामचा प्रारंभींचा मनस्ताप आतां कमी होऊं लागला होता. एक दिवस तो कचेरींतून बाहेर पडला, तों रस्त्याच्या वळणापासच्या पिंपळाखालीं कावेरी उभी होती.

तिला टाळून तो आपल्या रस्त्यानें पुढें जाणार होता, पण तीच पुढें झाली आणि त्याच्याजवळ आली. दोघेंहि एकमेकांकडे पाहून नकळत एकाच वेळीं हसलीं. जयरामनें विचारलें, "आज इकडे कुणीकडे?"

"तुम्हांलाच भेटायला!"

"अगदीं चकित केलंस!"

"कां? आम्ही तुम्हांला भेटायलासुद्धां येऊं नये वाटतं?"

"कोण म्हणतं असं?"

"आणखी, तुम्हीं आम्हांला चहा पाजावा अशी आम्हांला इच्छा व्हायला तरी कुणाची हरकत आहे? कितीहि झालं तरी आपलं नवरा-बायकोचं नातं आहे, म्हटलं!"

"किती चांगलं बोललीस! चल! घरीं जाऊं या! मी चहा करतों, तूं माझ्याशीं नुसती बोलत रहा!"

"नको ना! त्यापेक्षां आपण कुठं तरी जवळच चहा घेऊं या! आयता! आणि दोघंहि बोलत बसूं या."

जयराम स्तब्ध झाला. कावेरी त्याच्याकडे पहात राहिली. मग म्हणाली, "चला कीं!"

जयराम पुन्हा थोडा वेळ स्तब्ध झाला. मग त्यानें म्हटलें, "बरं चल."

तीं दोघें एका स्वच्छशा हॉटेलांत गेलीं, आणि दोघां प्रेमिकांसारखीं बोलत बसलीं. दोघांनीं एकमेकांच्या चौकशा केल्या. स्वतःच्या कचेरींतल्या गंमती जयरामनें सांगितल्या. कावेरीनें आपण पुढच्या परीक्षेचा अभ्यास सुरू केल्याचें सांगितलें. ती बाहेरून बसणार होती. मध्यंतरींच्या काळांत ती एक हिंदीची परीक्षा पण पदरांत पाडून घेणार होती...

सुमारें अर्ध्या तासानें दोघें हॉटेलांतून बाहेर पडलीं, तेव्हां कावेरी प्रसन्न झाली होती. जयरामला आनंद झाला होता. तथापि भुकेलेल्या माणसाला ऊन-ऊन चपात्या खायला मिळाव्यात, पण त्यांत घांसागणिक कचकच लागावी तसें त्याला झालें होतें. मात्र या साऱ्या वेळांत एकत्र रहायला येण्याची चर्चा दोघांनींहि बुद्धिपुरस्पर टाळली होती...

कावेरी अशीच मध्येंच केव्हां तरी उगवे आणि अशीच जयरामच्या सान्निध्यांत अर्धापाऊण तास प्रसन्न मनानें घालवी. आणि मग ती प्रसन्न मनानेंच परत जाई. जयराम मात्र असाच कष्टी मनानें...

अशा एका प्रसंगीं फक्त एकदांच जयरामनें विचारलें, "घरीं येण्याचं अद्याप तुझ्या मनांत येत नाहीं ना?"

त्यावर कावेरीनें "आपण दुसरा कुठला तरी विषय काढूं या ना!" असें म्हणून त्याला त्या बाबतींत बोलूं दिलें नव्हतें.

असेच आणखी कांहीं महिने गेले. आणि मग एके दिवशीं जयरामची बदली झाली. त्याला सोलापूरला जावें लागणार होतें. आपल्या खात्याची एक परीक्षा पण तो नुकताच पास झाला होता, तेव्हां बदलीबरोबरच त्याच्या पगारांतहि वाढ झाली. घसघशीत. अगदीं दोन वेगळीं बिऱ्हाडें आतां सहज झेपतील इतकी वाढ होती ती. त्याला ज्या दिवशीं ही बातमी समजली त्यानंतर दोनच दिवसांनीं कावेरी त्याला भेटली. नेहमींसारखीच कचेरीच्या रस्त्यावरच्या पिंपळाखालीं. नंतर जवळजवळ पाऊण तास त्या दोघांचा एकमेकांच्या सान्निध्यांत गेला होता, पण जयरामनें तिला ती बातमी सांगितली नाहीं. मुद्दामच. त्यांच्या गप्पा झाल्या, पण इतर विषयांवरच. मध्यें एकदां तर कावेरी म्हणालीसुद्धां, "तुम्हांला एकटंएकटं वाटत नाहीं कधीं?"

जयरामनें उत्तर दिलें, "वाटतं, खूप वाटतं. पण आतां मीं विवेक करून मनाला गप्प केलं आहे. आणि संवयदेखील झाली आहे आतां मला. संवय ही माणसाच्या पुष्कळशा दुःखांवरचं एक चांगलं औषध आहे."

त्या दोघांमध्यें ही भाषा होऊनसुद्धां जयरामनें आपल्या बदलीची आणि पगारवाढीची हकीकत तिला सांगितली नाहीं.

आणि म्हणूनच जाण्याच्या दिवशीं, आपली गाडी येण्याची वाट पहात जयराम स्टेशनच्या फलाटावर उभा होता तेव्हां समोरच्या फलाटावर कावेरी आणि तिचा भाऊ आलेलीं पाहून त्याला परमावधीचें आश्चर्य वाटलें. तो घाईघाईनें दादर चढून पलीकडे गेला आणि त्यानें त्या दोघांना गांठलें.

त्याच्याकडे बघून कावेरी हसली, गालांतल्या गालांत मोहक हसली. जयराम हसला नाहीं.

ती म्हणाली, "ओळखा, मी कशाला आलें असेन?"

"मला पोंचवायला?"

"चुकलं! साफ चुकलं! म्हटलं महाराज, मी तुमच्याबरोबर सोलापूरला येणार आहें."

जयराम हें ऐकून तिच्याकडे पहातच राहिला.

"तिकडे माझी बदली झाल्याचं तुला कसं कळलं?"

"कळलं असंच जमतीनं! पण कसं पकडलं एका माणसाला!"

"पकडायचं काय त्यांत? मी कांहीं चोरून जात नाहीं!"

"मग अगदीं पत्ता नाहीं लागूं दिलात?"

"मुद्दामच! पण लपवून ठेवण्यासाटीं नव्हे."

"मग कशासाटीं?"

"आधीं मला खरं सांग, तूं स्टेशनवर कशासाटीं आली आहेस?"

"आत्तांच नाहीं का तुम्हांला सांगितलं? खरं नाहीं वाटत?"

"आतां खरं वाटतं आहे. पण हा प्रसंग यायला नको म्हणूनच मीं तुला कांहीं सांगितलं नव्हतं."

"म्हणजे काय?"

"उघड आहे. मी तुला बरोबर नेणार नाहीं."

"पण आतां कसली अडचण आहे? मी म्हणत होतें त्याप्रमाणं, असं नव्हे तर तसं, पण वेगळं बिऱ्हाड होतं आहे! आतां माझी कांहीं हरकतहि नाहीं आणि मला कोणतीहि अडचण पण वाटत नाहीं."

"तीच तर अडचण आहे, आणि माझी हरकत पण आहे!"

कावेरी भांबावून भावाकडे पाहूं लागली. जयराम असें कांहीं बोलेल हें तिला सर्वस्वीं अनपेक्षित होतें. तिचा भाऊ निर्विकारपणें सिगरेट ओढीत, समोर विजेच्या तारेवर एक कावळा कर्कश ओरडत बसला होता त्याकडे पहात होता. त्याचें या दोघांच्या बोलण्याकडे लक्ष होतें कीं नाहीं कुणास ठाऊक! मग कावेरी त्याला म्हणाली, "तूं तरी सांग बाबा यांना कांहीं तरी."

जयराम शांतपणें पण निर्धारानें म्हणाला, "नाहीं. तूं आपली परत जा!"

"पण कां?"

"कारण सांगायलाच पाहिजे का?"

"सांगा. कळूं दे तरी मला."

"मग तुझं मन बदललेलं नाहीं आणि माझंहि मन बदललेलं नाहीं, म्हणून. बदलली आहे ती फक्त परिस्थिति"

"पण हें काय थोडं झालं का?"

"मला नाहीं तें पुरेसं वाटत. त्या कारणानं आपण एकत्र यावं असं मला

वाटत नाहीं. एक तर तें मला पसंत नाहीं, आणि दुसरं असं कीं ही परिस्थिति पुन्हा बदलली नि मी इथं परत आलों, तर साऱ्या गोष्टींची पुनरावृत्ति होणार. त्याला माझी तयारी नाहीं."

कावेरी काकुळतीला आली आणि म्हणाली, "असं काय करतां? मी सामानसुद्धां घेऊन आलें आहें. बाहेर रामाला तिथं उभा करून तुम्हांला शोधायला आणि चकित करायला आम्ही पुढं आलों होतों."

जयराम एकदां हसला आणि म्हणाला, "मग आतां मी सांपडलों आहें आणि चकितहि झालों आहें. आतां परत जा."

कावेरीचा आवाज एकदम दाटला. "कसं बोलतांहां, पहा तरी! माझा तुमच्यावर कसा जीव होता, आणि अजूनदेखील आहे, तें लक्षांत आणा. तुमचं घर मीं सोडलं तें तुमच्यावर किंवा तुमच्या माणसांवर रागावून नव्हे, तर ज्या परिस्थितीची कोंडी फोडतां येणं तुम्हांला अशक्य झालं होतं त्या परिस्थितीला वैतागून,—निदान मी गेल्यामुळं तरी तुम्हांला ती फोडावींशी वाटावी म्हणून."

"तें ठीक आहे. पण त्या परिस्थितीला तूं वैतागलीस त्याचं कारण तुला मी सर्वस्वीं हवा होतों. तुला फक्त एकटीचाच संसार हवा होता. तुझ्या त्या कोषांत मला बांधून ठेवायची तुझी इच्छा होती. मला त्याबाहेरच्या जगाचा विचार करणं भाग आहे, इतर कर्तव्यं आहेत, इतरांचीं ऋणं फेडायचीं आहेत, हें तुला मान्य नव्हतं. आणि मान्य असलं तरी सहन होत नव्हतं. ही तुझी वृत्ति आणि माझी वृत्ति जमणं शक्य नाहीं."

"पण जमवायचं मनांत आणलं तर जमवतां येतं."

"हे शब्द बोलण्याची वेळ निघून गेली आहे. अवेळीं पडणाऱ्या या पावसाचा आतां कांहीं उपयोग नाहीं."

कावेरी चिडून म्हणाली, "असं करायचं होतं तर तुम्हीं लग्न हो कशाला केलंत?"

"तूं रागावली आहेस, पण विचार केला नाहींस. तुझ्या प्रश्नाचं, खरं म्हटलं तर, उत्तरदेखील द्यायला नको. पण द्यायचं म्हटलं तर अनेक प्रकारांनीं देतां येईल. उदाहरणार्थ, हाच प्रश्न तुलाच विचारायला हरकत नाहीं. परंतु आतां मला वेळ नाहीं. गाडीची वेळ होत आलीय्. मला जायला पाहिजे. आपली चूक झाली, पण त्याला उपाय नव्हता. ज्या पद्धतीनं आपलं लग्न झालं, त्या पद्धतींत हा धोका असतोच. मीं तो पत्करला होता. एवढंच

सांगून मला हा वाद संपवायचा आहे...समाधानाची गोष्ट एवढीच, कीं हल्लींच्या दिवसांत बायकोला नवऱ्याशीं जन्मभर बांधून रहावं लागत नाहीं."

कावेरी पिसाळली. तिनें प्रहार केला, "'नवऱ्याला बायकोशीं' असं तुम्हांला म्हणायचं आहे ना?"

"नाहीं. कारण तूं मला नकोशी झाली नाहींस. पण तुझी वृत्ति मला मान्य नाहीं, तोंपर्यंत आपण एकत्र असणं इष्ट नाहीं. तूर्त, तूं मला अधूनमधून भेटत होतीस तसं भेटावंसं वाटलं तर पत्र पाठव. मी उत्तर पाठवीन. पण तेवढंच. त्यापलीकडे आपलं नातं जातां कामा नये. मी जातों. संभाळून रहा."

कावेरी जागच्या जागीं थक्क होऊन उभी राहिली. मग तिच्या पोटांत एकदम कालवून आलें आणि तिनें जवळच्या खांबाला डोकें टेकलें. तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले.

जयराम विलक्षण झपाझप पावलें टाकीत जात होता.

१९५२

# . १३ .

# शंतनु

एखाद्या व्यक्तीवर आपलें मन कोणत्या क्षणीं जडलें तें माणसाला ठाऊक असणें मोठें कठीण आहे. कारण, असा विशिष्ट क्षण पुष्कळांच्या आयुष्यांत निर्माण झालेलाच असत नाहीं. सामान्यतः माणसाला ही जाणीव जेव्हां होते, तेव्हां प्रेम रुजून त्यानें मूळहि धरलेलें असतें.

शंतनूची गोष्ट तशी नव्हती.

पदवीपरीक्षा पास होऊन पुढचा अभ्यास करण्यासाठीं त्यानें कॉलेजांत नांव घातलें होतें व कॉलेजच्या जीवनाशीं त्याचा संबंध नाममात्रच उरलेला होता. तथापि संमेलनाच्या बहुतेक कार्यक्रमांना तो हजर राहिला होता. दुपारच्या गुणविकासदर्शनाच्या कार्यक्रमांत रेवा एक गाणें म्हणाली होती. या वेळीं वाटेल तो बाष्कळपणा करणाऱ्या मुलांनासुद्धां तिनें आपल्या पहिल्या लकेरीनेंच स्तब्ध आणि मंत्रमुग्ध करून टाकलें होतें, मग शंतनूची काय कथा? पुढें तिच्या प्रत्येक स्वरांदोलनाबरोबर तो मानसिक झोले घेत गेला, रेवा त्याची दूरची नातलग असल्यामुळें तिच्याविषयीं त्याला वाटणारी आपुलकी शतपटींनीं वाढली आणि तिचें गाणें संपल्यावर कडकडून टाळी पडली तेव्हां तर त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. मग तिनें हास्यमुद्रेनें मान किंचित् झुकवून त्या टाळीचा लोभसपणानें स्वीकार केला, तेव्हां शंतनु एकाएकीं विलक्षण कासावीस झाला.

हाच तो क्षण आणि हाच त्याला पुढें दिवसानुदिवस मनस्ताप देऊं लागला. त्या व्यथेचें ओझें त्याला असह्य झालें, पण त्यांतून मुक्तता कशी करून घ्यावी तें त्याला समजेना, सुचेना. जेव्हां सुचलें, तेव्हां त्याच्या डोळ्यांपुढें एक व्यक्ति उभी राहिली. शांतावहिनी...

शांतावहिनीपुढें आपलें हृदय खुलें करण्याचें शंतनूनें ठरवलें तेव्हां त्याच्या मनाची अवस्था मात्र चमत्कारिक झाली. शांतावहिनीला काय सांगायचें तरी काय? तिला असें का म्हणायचें, कीं 'तुझी धाकटी बहीण रेवा माझ्या मनांत भरली आहे. तेव्हां...तेव्हां...तेव्हां...' नुसता विचार करतांनासुद्धां शंतनु तीनपेक्षां किती तरी अधिक वेळां 'तेव्हां' या शब्दाभोंवतीं फिरला. चरकाच्या बैलासारखा. पण त्याला एक पाऊलहि पुढें जातां आलें नाहीं. त्याच्या मनांत शब्द जुळेनात. प्रीति ही अवर्णनीय असते, असें म्हणतात. शंतनूच्या बाबतींत हा सिद्धांत वेगळ्याच अर्थानें खरा ठरत होता. मग त्याला स्वतःचीच लाज वाटली.

शांतावहिनी. त्याच्या आतेभावाची बायको. त्यांच्या घरीं तो फारसा जातहि नसे. घरें दूर, आपापलीं बिऱ्हाडें वेगळीं, त्यामुळें जाण्याचें तसें कारण पण पडत नसे. कधीं सणासुदीच्या दिवशीं बोलावणें आलें तरच जाण्याचा प्रसंग यायचा. आणि मग अशा स्थितींत आज अचानक जाऊन या विलक्षण विषयाची प्रस्तावना तरी कशी करायची?...

आणि रेवा! तिला तर कशाचीच कांहीं कल्पना नसेल. प्रत्यक्ष तिच्याशीं फारच थोडा वेळ तो बोलला होता. तेंदेखील शांतावहिनीच्या घरीं ती आली असतांना. पण त्या वेळीं त्याचें मन सर्वस्वीं कोरें होतें. तथापि तेवढ्या परिचयाच्या आधारावर प्रत्यक्ष तिच्याकडे जाऊन तिच्यापाशीं हा विषय काढण्याचा धीर त्याला होणें शक्यच नव्हतें. जिथें शांतावहिनीला मध्यस्थी करायला सांगण्यासाठीं सूतोऽवाच कसें करावें हा प्रश्न पडलेला, तिथें रेवाशीं काय बोलणार? प्रीतीची वावटळ माणसाला पहिल्यांदा ग्रासते, तेव्हां त्याच्या मनोवृत्ति अतिशय तरल झालेल्या असतात.

पण या तरल मनोवृत्तीच्या तापापेक्षांहि दोलायमान अवस्थेचा ताप शंतनूला गेले कित्येक दिवस अधिक होत होता. आणि त्यामुळें आज शांतावहिनीकडे मोठ्या निर्धारानें जायला निघाल्यावर वाटेंत भांबावून दोनदां तो परत फिरला. तथापि मनाला घट्ट करीत स्वतःला रेटीत त्यानें आपल्याला शांतावहिनीकडे पोंचवलें. ती एकटी भेटली ही घटना त्याला मोठी शुभसूचक वाटली.

शांतावहिनी त्याच्यासाठीं चहा करूं लागली आणि एकीकडे त्याच्याशीं गप्पा मारूं लागली. पृथ्वीच्या पाठीवरचे अनेक विषय आणि वर्तमानपत्रांतल्या हजार बातम्या. मध्येंच गप्पांत एक मोठा विराम आला, तेव्हां शांतावहिनीनें

सहज विचारल्यासारखें केलें, "कांहीं काम नव्हतं ना? सहजच आलां होतांत ना?"

शंतनु अडखळत चांचरत म्हणाला, "तसं पहायला गेलं तर काम होतं."

मग त्यानें आपलें मनोगत शांतावहिनीपुढें व्यक्त केलें तेंहि तसेंच अडखळत व चांचरत. बोलतांना त्यानें मान खालीं घातली होती. शेवटीं त्यानें ती वर करून वहिनीकडे एकदां बघितलें. वहिनी चकित झाली कीं काय हें त्याला पहायचें होतें. पण त्याला कांहीं ओळखतां आलें नाहीं. वहिनीनें आपल्या चर्येवर कांहीं दिसूं दिलें नाहीं. चर्येवरच काय, पण ती बोलली तेव्हां तिच्या आवाजावरूनहि त्याला कांहीं पत्ता लागला नाहीं. तिनें विचारलें, "या बाबतींत मीं काय करावं असं तुम्हांला वाटतं?"

शंतनु म्हणाला, "तुला जें योग्य वाटेल तें कर. माझं मन तुला सांगितलं आहे."

"रेवाशीं या संबंधांत तुम्ही कांहीं बोललां आहांत काय?"

"नाहीं. मला धीर होत नाहीं."

"मग तिला मी विचारूं का?"

"तुझ्या वडिलांचा तिच्याविषयीं काय विचार आहे?"

"हा विषय आजपर्यंत कधीं निघालेला मला दिसला नाहीं. माझं लग्न झालं जुन्या पद्धतीनं. नव्या पद्धतीविषयीं बाबांचे विचार आज बदलले असले तर मला ठाऊक नाहीं."

"रेवानं स्वतः कुणाशीं ठरवल्याचं तुला कळलं आहे?"

"नाहीं. पण ठरवलं नसावं असं वाटतं. कारण तसं असतं तर सध्यां तिची गाण्यांतली प्रगति आणि कॉलेजचा अभ्यास आहे तसा राहिला नसता. माझी कल्पना अशी, कीं शिक्षणाच्या काळांत असले विक्षेप आले कीं तें धड होत नाहीं."

वहिनीनें आपल्याला चिमटा घेतला कीं काय अशी शंतनूला शंका आली. तो म्हणाला, "तूं म्हणतेस तें खरं. माझी अवस्था तीच झाली आहे. पण त्याला दुसरा उपाय सुचत नाहीं. म्हणूनच आतां मी एम्. ए. चा अभ्यास सोडून कुठं तरी काम मिळवण्याच्या खटपटींत आहें आणि तुला शरण आलों आहें. मला तरी सध्यां एवढेच उपाय दिसतात."

वहिनी म्हणाली, "मीं तुम्हांला उद्देशून नव्हतं कांहीं म्हटलं, भाऊजी!

सर्वसामान्यपणं आणि त्यांतूनहि रेवाच्या संबंधांत सांगितलं. सर्वांच्याच बाबतींत तें खरं असेल असं म्हणतां यायचं नाहीं."

"तें जाऊं दे. तूं काय करूं शकशील मग?"

"तुम्ही सांगाल तसं करीन."

शंतनु बराच वेळ बोटानें टेबलाच्या कापडावरची सजावट गिरवीत राहिला आणि मग म्हणाला, "संधि साधून तुझ्या वडलांना विचारशील का? माझी सारी माहिती आहेच तुला. त्यांना सगळं कांहीं हवं तर खुलेपणानं सांग—म्हणजे माझ्या मनांत रेवाविषयीं असलेल्या भावना. किंवा तसं नको असं वाटलं, तर अचानक सुचलेलं एखादं स्थळ असं भासवून सांगितलंस तरी चालेल."

वहिनी यावर कांहीं बोलली नाहीं, तेव्हां शंतनु म्हणाला, "यापेक्षां अधिक काय सांगूं?"

शंतनूच्या या शब्दांबरोबर वहिनीनें रुकार दिला. तेव्हां त्यानें विचारलें, "मग तुला मी कधीं भेटूं? एका आठवड्यानं?"

"नको. पंधरा-तीन वारांनीं भेटा."

शंतनूला हसूं आलें. तो म्हणाला, "लग्नाला मी अधीर नाहीं हें तुला सांगायला नको. पण मनाची अवस्था मला असह्य होते. ती तुला कळते ना?"

"कळते. पण मला घरीं जायला मिळायला हवं. तें मिळालं तरी संधि मिळायला हवी. बाबा एकीकडे भेटायला हवेत. म्हणून जास्त दिवस मागून घेतले, एवढंच."

यानंतर पंधरा दिवस गेले, पुन्हा पंधरा दिवस गेले, आणखी पंधरा दिवस गेले, पण शंतनु टांगलेलाच राहिला. शांतावहिनीकडून त्याला कांहींच उत्तर मिळूं शकलें नाहीं. तिला संधि सांपडत नव्हती. शंतनूची मनोव्यथा आतां उतूं जाण्याच्या बेतांत आली होती, पण प्रत्येक वेळीं पाण्याच्या दोनचार थेंबांचे नुसते शिडकावे पडत होते. आपला कांहीं उपाय चालत नाहीं असें शांतावहिनी म्हणे. अखेरीस तिनें पुन्हा एका आठवड्याची मुदत मागून घेतली.

ठरलेल्या दिवशीं शंतनु तिला भेटायला गेला, तेव्हां तिनें त्याला सांगितलें तिच्या वडिलांचा निर्णय नकारार्थी होता. शंतनूला एकदम गरगरल्यासारखें झालें. या उत्तराला त्याची अर्धी तयारी असूनसुद्धां, घोगऱ्या आवाजांत त्यानें

विचारलें, "तुझे वडील काय म्हणाले?"

"जमायचं नाहीं, एवढंच म्हणाले."

"कारण काय सांगितलं त्यांनीं?"

"कांहींच कारण सांगितलं नाहीं."

"तूं विचारलंस ना?"

"विचारलं, पुष्कळ विचारलं, पण त्यांनीं मला गप्प करून टाकलं."

"खरं?"

"अगदीं खरं!"

आणखी बोलण्यांत अर्थ तरी काय होता? शंतनु "जातों." एवढेंच बोलून निघाला. वहिनी त्याला म्हणाली, "तुमचं काम मला करतां आलं नाहीं याचे माझ्या मनाला फार कष्ट झाले..." तरीहि कांहीं न बोलतां तो चालता झाला. याच्या बुडाशीं प्रीतिविवशता होती, कीं प्रीतीच्या पहिलेपणाची बुजरी वृत्ति होती? वहिनीनें आपल्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले असतील, पण तिला स्वतःला जी भाषा ऐकावी लागली असेल ती आपल्या कानीं कशी घालावी, या विचारानें, आपल्याला होणारें दुःख टाळण्याचा ती प्रयत्न करीत असली पाहिजे हा कयास त्यानें केला कीं काय कुणास ठाऊक!

तें कांहीं असलें तरी शांतावहिनीनें सांगितलेला निर्णय न्यायाधीशाच्या तोंडून ऐकलेल्या शिक्षेप्रमाणें त्यानें गिळला. आतां नव्या यातना नव्यानें सुरू होणार होत्या. त्या सुसह्य व्हाव्या म्हणून तिसऱ्याच दिवशीं तो संगमनेरला आपल्या मित्राकडे निघून गेला. त्याचा मित्र श्याम. पदवीपरीक्षेपर्यंतचे विद्यार्थिदशेंतले त्यांचे दिवस एकत्र गेले होते.

संगमनेर—माळवदी घरांचें छोटें संगमनेर. प्रवरेच्या कांठीं वसलेलें संगमनेर. वाचायसाठीं शंतनूनें पुस्तकें बरोबर नेलीं होतीं. तीं वाचणें शक्य होई तेव्हां तो वाची. जेव्हां कांहींच सुचेनासें होई, तेव्हां तो माडीवरच्या खिडकींत जाऊन उभा राही. समोर रस्त्याच्या पलीकडच्या अंगाला एक लांकडाची वखार होती, तिथें दिवसभर लांकडें फोडण्याचें काम चाले, तें तो पहात राही. त्या वखारींत चालणारी हालचाल बघण्यांतहि त्याचा किती तरी वेळ निघून जाई. संध्याकाळीं प्रवरेच्या कांठीं केशवतीर्थ घाटावर श्यामबरोबर तो जाई आणि तेथें फिरायला येणाऱ्याजाणाऱ्या लोकांच्याकडे तो बघत राही. क्वचित् वेगानें वाहणाऱ्या प्रवरेच्या अरुंद पात्राकडे, क्वचित् पैलतीरावरच्या

वाळवंटाकडे, त्यापलीकडील डगरी, माळ आणि दूरच्या डोंगरांच्या रांगा यांजकडे पहात राही. भकासपणा कमी करण्यासाठीं मधून मधून श्यामशीं गप्पा...

सुमारें तीन आठवडे मनाच्या जखमा चाटल्यानंतर शंतनूचें मन जरा पूर्वस्थितीकडे आलें आणि मग संगमनेराहून तो परत यायला निघाला. श्याम त्याला पोंचवण्यासाटीं मोटारतळावर आला होता.

तेथें दोन व्यक्ती आल्या. त्यांतला पुरुष श्यामच्या ओळखीचा निघाला. शंतनु पुण्याला जातो आहे हें समजतांच आपल्या भाचीला तेथपर्यंत सोबत करण्याची त्यानें विनंति केली. ती तेथेंच जाणार होती. तेथें तिला घेऊन जाण्याकरितां मोटारतळावर कुणी तरी येणार होतें. पण जर कुठें कांहीं घोटाळा होऊन कुणी नाहीं आलें तर तिला घरीं पोंचवायचें होतें. शंतनूनें तें कबूल केलें. सुमतीचे वडील पुण्याला होते आणि ती हुजूरपागेंत शेवटच्या वर्षात शिकत होती.

मोटार संगमनेराहून सुटल्यापासून शंतनु जवळ जवळ अर्धा प्रवास होईतों स्तब्धच राहिला होता. नारायणगांवला उपाहार-विश्रांतीसाठीं मोटार येऊन थांबल्यावर सुमतीनें आपल्याबरोबरचें फराळाचें काढलें आणि शंतनु 'भूक नाहीं, नको—' म्हणत होता, तरी आग्रहानें त्याला मोटारीबाहेर काढलें. मग जवळच्च एका शेतांतल्या झाडाखालीं दुपारचें खाणें उरकून, पाणी पिऊन तीं दोघें मोटार सुटण्याच्या सुमारास परत आलीं. उरलेल्या प्रवासांत मग त्यांच्यांतली पुष्कळशी भीड चेपून शब्दांची, माहितीची देवघेव झाली.

पुण्याच्या मोटारतळावर सुमतीचे वडील आले होते. सुमतीनें शंतनूशीं त्यांची ओळख करून दिली तेव्हां त्यांनीं त्याचे आभार मानून म्हटलें, "आतां परिचय झाला आहे. अधूनमधून येत जाऊन तो वृद्धिंगत होऊं दे."

शंतनूनें उत्तर दिलें, "अवश्य!"

हा 'अवश्य' शब्द त्याच्या मनांत नव्यानें रुजलेल्या बीजाचा अंकुर होता. त्याची त्याला जेव्हां प्रथम जाणीव झाली तेव्हां त्याला विस्मय वाटला. रेवा त्याच्या मनांत होती, पण आतां ती पुसटपणें रेंगाळत होती. तिला आपण विसरलों काय? म्हणजे आपण तिच्यावर जें प्रेम करीत होतों तें खरें नव्हतें? तो केवळ भास होता? माया होती? एखाद्या झाडाच्या फांदीवर बसलेला पक्षी ती हलल्याबरोबर उडून जावा तसें आपलें प्रेम होतें काय? आणि तें जर तसें असेल तर आतांचें हें कसें आहे?—प्रेमाचा अर्थ तरी काय? माणसाच्या

आयुष्यांत कधीं निळे, तर कधीं तांबडे रंग भरणें एवढाच का त्याचा हेतु? कीं सृष्टीच्या कार्याची पूर्वतयारी?—शंतनूला उत्तरें सांपडत नव्हतीं—स्वतःच्या मनाचा पत्ता लागत नव्हता.

तथापि पहिल्या प्रीतीच्या वैफल्याच्या धगीनें तो भाजून निघाला होता हें खरेंच होतें, आणि या नव्या प्रीतीनें त्याच्या दाहावर अंजन लागत होतें हेंहि खरें होतें. पहिल्या अनुभवावरून तो आतां शहाणा झाला होता आणि सावधहि झाला होता. दिवस, महिने निघून जाऊं लागले तसतशी त्या सावधपणांतूनच सुमति आपल्याला साद देत असल्याची त्याला अधिकाधिक खात्री पटत चालली होती.

मग ज्या दिवशीं सुमति परीक्षा पास झाल्याचा निकाल लागला त्या दिवशींच्या आनंदाची संधि साधून शंतनूनें सुमतीला जें विचारायचें तें धीटपणानें, न चांचरतां विचारलें आणि दोघांनाहि झालेला आनंद अधिक वाढवला.

सुमतीच्या घरून तो आपल्या घरीं परतला तेव्हां एकटा बसला असतांना एकाएकीं त्याला रेवाची आठवण झाली; पण आज त्याच्या मनानें केवळ कुतूहल उत्पन्न करणारें एक दृश्य यापेक्षां त्या स्मृतीला अधिक किंमत दिली नाहीं. काँक्रीटचा रस्ता ओला असतांना त्यावरून एखादें लहान मूल चालत गेल्यामुळें उमटलेल्या पावलांच्या खुणांइतकीच...

त्याच वेळीं मग त्याला शांतावहिनीचीहि आठवण झाली. विलक्षण तर खरेंच, पण पूर्वीप्रमाणेंच आजदेखील आपल्या प्रीतिसाफल्याच्या आनंदाचें रहस्य तिला सांगितल्याखेरीज त्याला राहवेना.

तो दिवस त्यानें कसाबसा काढला. आणि मग दुसऱ्या दिवशीं शांतावहिनी-कडे जाऊन गेल्या सात आठ महिन्यांतला इतिहास स्थूल रूपानें लाजत लाजत त्यानें तिला सांगितला.

शांतावहिनीनें त्याचें अभिनंदन करून विचारलें, "आतां पुढची वार्ता कधीं?"

"ती इतक्यांत नाहीं. मी ज्या खटपटींत सध्यां आहें, तिला यश येऊन स्वतःच्या पायांवर उभा राहूं लागल्यावर मग त्याचा विचार."

शांतावहिनीला ही कल्पना अतिशय आवडली व तिनें तसें बोलून दाखवलें. मग शंतनु म्हणाला, "मात्र वहिनी, माझ्या या प्रकरणाची वाच्यता कुठं करूं

नको बरं का! त्या वेळचं तें रहस्य तुला एकटीलाच मीं सांगितलं, आतांचं हेंहि तुला एकटीलाच सांगतों आहें. वाटलं, हें पहिल्यांदा ऐकण्याचा मान तुझा!"

शांतावहिनीनें आनंदानें स्मित केलें व म्हटलें, "आतां त्या भावनेचा अंशदेखील तुमच्या मनांत नाहीं ना?"

"आश्चर्य वाटतं खरं, पण केवळ आठवण होते क्वचित् प्रसंगीं; आणि आठवण होऊनहि सुमतीच्या सान्निध्यांतले क्षण कडू होत नाहींत, यावरून काय तें समज."

"सुमतीला सांगितलं आहांत?"

"अद्याप नाहीं. पण संधि गांठून सांगणार आहें. ती रागवायची नाहीं. फार समंजस आहे ती."

"तुम्ही भाग्यशाली आहांत. आज मला वाटतं, त्या वेळीं तें तसं झालं हेंच चांगलं झालं. तुमची ती भावना खरी नसली पाहिजे. नुसती मोहाची लाट!"

"असेल! कुणीं सांगावं? त्या वेळचं प्रेमहि मींच केलं आणि आजचंहि मीच करतों आहें. त्या वेळीं तुझ्या वडलांनीं रुकार दिला असता तर काय झालं असतं याचा विचार मी करीत नाहीं. कारण तो व्यर्थ आहे."

शांतावहिनीनें चहासाठीं स्टोव्हवर आधण ठेवलें होतें, त्याला उकळी आली होती. त्यांत चहाची पत्ती टाकून भांडें सांडशीनें उतरवीत शांतावहिनीनें खालीं पहात म्हटलें, "आतां तुम्ही त्यांतून सर्वस्वीं मुक्त झालां आहांत, तेव्हां तुम्हांला एक गुपित सांगतें. सांगूं?"

"सांग."

"रागावणार नाहीं असं वचन द्या."

"रागावण्यासारखं असं काय असणार आहे?"

"चहा कसा झाला आहे? दूध पाहिजे?"

"चांगला झाला आहे; न् दूधहि नको. पण गुपित काय सांगणार होतीस तें सांग."

शांतावहिनी 'सांगतें' म्हणाली आणि गप्प झाली. मग थोड्या वेळानें म्हणाली, "त्या वेळीं शेवटचे माझ्याकडे आलांत तेव्हां बाबांचा नकार मीं तुम्हांला कळवला. आठवतं?"

"तें कसं विसरेन मी?"

"तो नकार सगळा माझ्या मनांतला!—"

विलक्षण थक्क होऊन शंतनु म्हणाला, "म्हणजे काय?"

"म्हणजे असं, कीं तुमच्या संबंधांत बाबांना मीं कधीं कांहीं सांगितलंहि नव्हतं नि विचारलंहि नव्हतं!"

"केवळ तूं स्वतःच निर्णय घेऊन तो नकार कळवलास?"

"हो तसं म्हणायला हरकत नाहीं—रागावलांत?"

"पण असं तूं कां केलंस?"

"मला तें योग्य वाटलं. आज तर अधिकच वाटतं आहे. तुम्हांलासुद्धां तें कबूल करावं लागेल."

"पण तूं हें भलतंच कांहीं तरी सांगते आहेस! आणि तुला योग्य वाटलं म्हणजे काय?"

"खरं सांगूं? मला वाटलं, रेवा गाणं शिकते आहे. तिची त्यांत उत्तम प्रगति होते आहे. आकाशवाणीवर तिचे कार्यक्रम होतात. सगळीकडे कौतुक होतं—"

"तें मला ठाऊक आहे."

"सगळं ऐकून तर घ्याल! मला वाटे, बाबांनीं होय म्हणूं नये. पण त्याची खात्री वाटेना. ते होय म्हणाले, तर मग तुमचं-तिचं लग्न होऊन तिची पुढची प्रगति खुंटेल. तसं मला व्हायला नको होतं. निदान मी त्याला निमित्त व्हायला नको असं वाटे. मुलगी मोठी झाली, कीं तिचं लग्न उरकून तिला हातावेगळी करण्याशिवाय, बापाला दुसरं कांहीं सुचत नाहीं."

"पण मग मला हें सगळं स्पष्टपणानं कां नाहीं सांगितलंस? मी तिच्या गाण्याआड कसा आलों असतों? ज्याच्यामुळं माझं मन तिच्यावर—"

"हें आज म्हणतांहां. कांहीं असलं, तरी माझं लग्न झालं आहे. तुमच्या भावाची निंदा करतें असं समजूं नका, पण माझा अनुभव सांगतें, मुलीच्या हातून जर कांहीं होण्यासारखं असेल तर तें लग्न व्हायच्या आधींच होतं. तिनं तें लग्न व्हायच्या आधींच करून घ्यावं."

"काय विचित्र विचार आहेत एकेक तुझे, वहिनी!"

"तुम्ही विचित्र म्हणा. पण माझ्या मनांत जें होतं तें खरंखुरं सांगितलं. आणि आज तर—"